भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
राष्ट्रीय पुस्तकालय, कलकत्ता
NATIONAL LIBRARY, CALCUTTA

Mar

वर्ग संख्या
Class No. 891·461

पुस्तक संख्या
Book No. K862

रा०पु०/ N.L. 38

U-20

MGIPK—11 LNLC/67—3-1-68—1,50,000

TELE: 73844,
Raj Guru R. H. Pandit,
B: A:, LL: B., Advocate,
Madhav Villa, Setalwad Road,
Nepean Sea Road,
BOMBAY 6:

काव्यरत्नावली.
[redacted] २० वें.

## साल अखेर.

ईश्वरकृपेनें काव्यरत्नावलीचें विसावें वर्ष संपलें ह्या वर्षांतही अनियमितपणानें अंक प्रसिद्ध झाले. तरी वाचकांनीं कृपा करून थोडा बहूत आश्रय दिला, याबद्दल आह्मी त्यांचे आभार मानतों.

या वर्षांत ३७ कवींच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. एकंदर कवितेची संख्या २१४२ आहे. यांतील मोठीं प्रकरणें ह्मणजे, महाराष्ट्र-महोदय, गजकुमारचरित, अर्व्हेयर प्रभृति सप्तज्ञानी, आशांकुर, त्रिपुर विलाप, दशरथ कौशल्या, नारायणराव पेशवे यांचा मृत्यु, कपटविपाक वगैरे होत. याशिवाय लहान मोठीं प्रकरणें प्रसिद्ध झालेलीं आहेत.

ह्या वर्षीं रत्नावलीस नवीन कवि बरेच मिळाले आहेत. ते रत्नावलीवर लोभ ठेऊन कवितेची मदत देतील अशी आह्मास आशा आहे.

आह्मी विनंति केल्याप्रमाणें बऱ्याच कवींचीं चरित्रें अजून आह्मांस मिळालीं नाहींत, तरी पहिल्या अंकांत लिहिलेल्या कवींचीं चरित्रें ज्यांला कवींची माहिती उपलब्ध असेल त्याणीं ती जरूर पाठवावी.

---

SP 1/90
L/59

Mar
891.46105
K 862
v.20

NATIONAL LIBRARY
No. 352
DATE 2/12/69
CALCUTTA

B

## अनुक्रमणिका.


| कवि, विषय व पद्यसंख्या. | पृष्ठांक. |
| --- | --- |
| १ नारायण कृष्ण गद्रे ( कविता ३९१ ) | |
| ५१ महाराष्ट्र महोदय १ ला अध्याय | ५६ |
| ३५ ,, ,, २ रा अध्याय | १३२ |
| ५२ ,, ,, ३ रा अध्याय | १५३ |
| ८९ ,, ,, अध्याय ४—५--६ | १८२ |
| १०३ ,, ,, अध्याय ७--८ | १९३ |
| ६१ ,, ,, अध्याय ९--१० | २१७ |
| २ विद्याधर वामन भीडे बी ए ( कविता २३० ) | |
| ४५ यास्कयांचा | २० |
| २३ बहिरंग विषण्णता | ८२ |
| ७१ रथरूपक | १२५ |
| १८ प्रसूनय | १३९ |
| ३० मदमाधुरी | १६३ |
| २३ श्रीशारदा | २०२ |
| १३ गुणज्ञ गातात गुणा | २५८ |
| ७ बगलबच्चे | २६४ |
| ३ अनंततनय ( कविता १५० ) | |
| १०१ आमचे आधुनिक कवि | १०३ |
| ४९ ,, ,, | १२१ |
| ४ दत्तात्रय भीमाजी रणदिवे ( १४० ) | |

| | | |
|---|---|---|
| | १०३ गजकुमारचरित | ७१ |
| | १० सासरीं जाणारी बालिका | ९५ |
| | २७ श्रीमहावीरस्तवन | ११४ |
| **५ रंगनाथ एच अधिकारी** ( कविता १३० ) | | |
| | ७२ अव्हेयर प्रभृति सप्तज्ञानी | ९७ |
| | ५८ शंकराचार्यांचा जन्म | १५७ |
| **६ मुकुंदराय** ( कविता ११२ ) | | |
| | ४८ आशांकुर | १४५ |
| | ६४ आर्यभगिनींस दोन शब्द | २४१ |
| **७ त्र्यंबक जयराम प्रधान** ( कविता १११ ) | | |
| | १५ मराठा नको | ६८ |
| | ६ आकाश दिवा | ७१ |
| | १० उदितार्क | ८६ |
| | २१ उद्यानस्थ बाला | ९१ |
| | १० कासार | २११ |
| | १६ वसईचा वेढा | २२२ |
| | १० बाळप्रभु चिटणीस | २२५ |
| | १० आदर्श | २३१ |
| | ६ तिमिर | २५४ |
| | ७ रजनी | २७२ |
| **८ इंदुकांत** ( कविता ९० ) | | |
| | ७५ विधुरविलाप | १६९ |
| | १५ प्रदोष तारा | २०६ |

९ विठ्ठल भगवंत लेंभे ( कविता ९० )
५० दशरथ आणि कौशल्या २८
४० रामकथासार ६०
१० बा. सी. जोसी. ( कविता ८० )
८० श्री. नारायणराव पेशवे मृत्यु ४९
११ श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए. ( कविता ७५ )
७५ कपटविपाक २५
१२ चक्रवाक् [ कविता ७० ]
२७ कालिदास आणि सरस्वती १४
९ बंधूस पाठविलेलें पत्र १८
१५ गुरुप्रहाप्रत ६६
१९ भ्रमरीची विनंति १३५
१३ जगन्नाथ रावजी टुल्लु बी ए ( कविता ५३ )
५३ विवेकानंद सर्ग १ ला ४
१४ किरात ( कविता ५२ )
१४ कवींचें व राजाचें शयन मंदिर २१२
१७ स्वप्नांत पाहिलेलें शारदा मंदिर २३३
११ कवितेचें प्रकाशन २६०
१० तापी नदीवरील रजनी काल २६२
१५ भृंग [ कविता ३८ ]
३८ मंगलाचरण १
१६ सौ. स. भिडे [ कविता ३६ ]
१२ घोडा, हरिण आणि मनुष्यें २१६

७ मुंगी आणि खबुतर — २३७
५ डुकर आणि घोडा — २३८
४ ताम्हेला कावळा — २३८
८ करडूं आणि लांडगा — २७६
१७ कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी [ कविता ३४ ]
११ भावगुप्तदशकोत्तर — ११२
१३ व्हावयाचें जें, तें न कधीं राहे — २७०
१० संक्रांतीची भेट — २७३
१८ गजानन गोपाळ जोशी [ कविता २७ ]
२७ श्रीनिवृत्तिनाथस्तुति — २३७
१९ लक्ष्मण विनायक परळकर [ कविता २५ ]
१३ अयोग्य नायक — ८८
१२ निराशेचें गीत — १४२
२० नारायण महादेव भीडे ( कविता २४ ]
३ चंद्रास — १९२
३ अन्योक्ति — २१६
१८ माझा एक अनुभव — २२९
२१ एकनाथ पांडुरंग रेंदाळकर ( कविता २४ )
४ झपूर्झा — १९०
५ भावगुप्तपंचक — २१०
६ दिवाळी — २३९
९ कांतानुनय — २५६
२२ भामासुत ( कविता २४ )

c


१७ दुर्जनोपकार २२७

७ कोकिलान्योक्ति २३०

२३ विहंगम [ कविता २१ ]

१० भावप्रकटित ८४

११ शरण्यशरणागति २६५

२४ बालकवि [ कविता १६ ]

१० भ्रमर आणि कवि ९०

६ दुबळें तरू १४३

२५ सं. ग. कालेकर [ कविता १५ ]

५ असें कसें झालें ? २५७

१० चांदण्यांतील प्रेमदर्शक २६४

२६ दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी [ कविता १५ ]

१५ एका कवीचा सरस्वती मंदीर प्रवास २५२

२७ वामन जनार्दन कुंटे [ कविता १४ ]

४ काव्यस्फूर्ति २१५

१० वियोगी २७८

२८ कोणी एक कवि [ कविता ११ ]

८ रतिविलाप ४६

३ अभंगबोध ८९

२९ कृष्ण मित्र [ कविता १० ]

१० झाली उषा १६

३० कार्ष्णि [ कविता ९ ]

९ भावगुलप्रकाश ११९

३१ चिंतामण माधव पिंपळसकर [ कविता ८ ]
८ नीतिसार २८०
३२ अनंत विठ्ठल चित्रे [ कविता ६ ]
६ मनोभृंग २०८
३३ माधवात्मज ( कविता ३ )
३ भ्रमर आणि लतिका ४८
३४ मोरो गणेश कोंढे [ कविता २ ]
१ सुभाषित १४४
२ ,, १६८
३५ सुमंत [ कविता ३ ]
३ धूमकेतु २७६
३६ नारायण वामन टिळक [ कविता १ ]
१ फूल कां मूल २४
३७ बाळकृष्ण अनंत भीडे बी. ए. ( कविता १ )
१ सुभाषित ७२

जानेवारी १९०९ वर्ष २० वें.

# काव्यरत्नावलि.

## अंक १ ला.

### मंगलाचरणम्.

मणिमाला.

श्रीराघवरामा ! श्रीचित्तविरामा ! लीनावनकामा ! श्यामा ! अभिरामा !
वंदारुजनांच्या मंदारनिकंजीं—पादद्वयकंजीं घाली अलि रुंजी. १
भो ! मंगलनामा ! सच्चित्सुखधामा ! प्रेमा बहु रामा ! गाया तव नामा—
अक्षय्य गमावा देवा ! रघुरावा ! ऐसा वर द्यावा हेतू पुरवावा. २
नामा तव गातां गंगाधर धाला; हालाहलतापा—पासाव निवाला.
नामीं महिमा हा ऐसा तव मापा ! लेखा किति तेथें सांसारिक तापां ! ३
रात्रंदिन मातें संसारचि धंदा; भारी रुचि त्याची वाटे मतिमंदा;
तेणें मुकलों कीं हा ! हंत ! मुकुंदा ! त्वन्नामसुधेला सच्चित्सुखकंदा ! ४
आतां विनती ही मच्चित्तमिलिंदा—देवा ! जडवा हो ! पादा अरविंदा
चाखोनि तयानें तेथील मरंदा,—ध्यावेंच सदाही त्याच्या दृढ छंदा. ५
नामें तरले ज्या पाषाण समुद्रीं; पंगू जन लंघी जेणें गुरु अद्री;
होतो जड तोही वाल्मीकिसमान; तें इष्टद काई होईल अज्ञां न ! ६
भावें जितुक्या जो दास्यें तुज सेवी, त्या अंकित तूंही होसी प्रभु तेंवी;
श्रीकांत, अनंत, त्रैलोक्यविभू तूं—त्याचे पुरवीसी साचे शुचि हेतू. ७
मी दीन भणंगा, नोहे पण दास; भक्ती लवही ती ठावी नच यास;
ऐसें असतांही वाया वर याची; होवो न उपेक्षा हो ! मावर ! याची. ८
दुष्टात्मज जन्मे माता न कुशीला; स्नेहें प्रतिपाळी ती त्याहि कुशीला.

रामा ! जननी तूं तैशी मज रक्षीं; वात्सल्य-भरानें दोषां नच लक्षीं. ९
नेणें पदसेवा, नेघें क्षण नामा, रामाश्रित गोमा हा डौल रिकामा;
कैशाहि निमित्तें तूतें परि नातें-लावीं जननीचें; पाळीं तरि मातें. १०
भक्त्या हरिखोनी, बोलोनि तथास्तु,--देसी निजदासा तूं ईप्सित वस्तु.
श्रीराम ! न याला मी पात्र दयाला ! नामीं परि आस्था द्यावी दृढ याला. ११

कन्या सुकवींची सर्वेशपदासी-जी अर्पियलीसे व्हाया प्रभुदासी;-
रत्नावलिला त्या रामा ! वरदात्या ! श्रीच्या सम देई संपन्न पदा त्या. १२
आर्या ! रघुवर्या ! ही जी तव भार्या--व्हावी क्षम रामा ! ती रंजनकार्या,
सेवी भगवंता त्वत्पादसुरागा ! दैन्यास तियेच्या कैंची मग जागा ! १३
श्रीराम ! दयाद्रा ! वर्षून सुधेला,--वेगें हरिशी तूं तीच्या कृशतेला;
हें सत्य, परंतु स्नेहें मन वेडें--ओढे तिजपाशीं याची तुज थोडें. १४
होवो कविकन्या हे सज्जनमान्या; दे दे वर दे हा हे ! विश्ववदान्या !
उत्कर्ष हिचा हो एथून विशेषें; कल्याणनिधाना ! प्रार्थी नत ऐसें. १५

भो ! भो ! कविवृंदा ! सत्काव्यसमुद्रा ! वंदीं बहु मोदें मी सद्रसभद्रा !
तूह्मां करिताहें जी अल्प विनंती; स्नेहें सदयत्वें ठेवाल मनीं ती. १६
रत्नावलि कन्या शिष्टांप्रति इष्टा-- हो, यास्तव घेतां प्रेमें बहु कष्टा;
हें साच न शंका कांहीं मुळिं याची- तो कोण पिता जो बालोन्नति नेच्छी ? १७
साधारण मानें बालार्थ पित्याला-- होती श्रम, आहे सीमा तरि त्याला;
तैशी नच सीमा एथें श्रम घेतां; आजन्म पित्याला हीची मनिं चिंता. १८
लोकीं तनुजेची चिंता पितयाला-- वाटे जरि भारी; तत्रापि तयाला--
ती सुस्थळिं देतां होतें सुख कांहीं-- संबंध हिचा हा तैसा मुळिं नाहीं. १९
नाहो जरि हीचा देवो सकलज्ञ; कौटुंबिक त्याचे सारेहि रसज्ञ;
ऐसें असुनीही, तूह्मां क्षणमात्र-- नाहीं सुख कांहीं हें तंत्र विचित्र. २०

अत्यंत वरिष्ठा कन्या दिधली हे, तेणें जनकाला सौख्यांश न लाहे;
नोहे उलटी ती चिंताच दुणावे; वाटे पति मातें हें भाग्य गणावें २१
त्रैलोक्यगुरू हा जामात मिळाला; साचें कथितों कीं पुण्यांश फळाला;
एथें झटतांना आतां अनमाना-- अत्यल्प कराना; हें सार्थक माना. २२
रत्नावलि बाला रूपें स्वगुणांहीं-- उत्कृष्ट दिसावी भूषावसनांहीं;
लालित्यपदांचें सौरस्य कृतीचें-- तीच्या मन वेधो तत्काल कृतीचें. २३
हें साध्य तुह्मांला आहे कविराया ! एथें नच लागे उद्योग कराया;
विज्ञप्ति तुह्मां ही साहाय्य सदाही-- द्या द्या हिस हंर्षे वाणी मग नाहीं. २४

रत्नावलि कन्या प्रेमें परिपाळी;--कैंवी विसरूं तो या मंगल काळीं?
त्याही सुरसज्ञा नारायणरावा--वंदोनि मुदें मी, सांगें निजभावा. २५
रत्नावलि व्हावी हे सज्जनमान्या,--साठीं झटसी तूं अत्यंतचि मान्या !
निष्काम अशा या यत्ना तुझिया मी--देईन तुला ती होईल निकामी. २६
नाहीं रुचि लोकीं साची कवितेची; तातास न चिंता तैशी दुहितेची;
सांडोनि विचारा या दुःस्थितिच्याही,--कर्तव्य कराया तूं सिद्धचि पाहीं. २७
मीं काय कथावें ? तूं जाणसि सारें;--"श्रेयस्कर होतें कर्तव्य नरा रे
सिद्धांत असावा ऐसा दृढ चित्तीं; कार्यी खरचावी नेटें निजशक्ती. २८
रामास नमोनी, अंगीकृत कार्या- यत्नें झटणें हें सत्संमत आर्या !
निष्ठा निरखोनी, शेखीं हरिखोनी, श्रीराम दयाब्धी होतो वरदानी." २९
हा निश्चय चित्तीं ठेवीं दृढ, तेणें--होती सुफलेच्छा श्रीरामकृपेनें;
बा ! याहुनि तूतें मी अल्पमती तें--नेणें समजावूं; मानीं विनतीतें. ३०

गा ! वाचकवृंदा ! भो ! भो ! रसिकांनो ! प्रार्थी प्रणयें हा तूह्मां वच मानो.
रत्नावलिलागीं अद्यावधि जैसें--साहाय्य दिलें या याहून विशेषें. ३१
श्रीमत्कविवर्या रत्नालिपित्याला--उत्साह तसा जो तत्पालक त्याला,

लोकप्रियताही रत्नावलिला ती,--देणें तुमच्या ना हें सर्वहि हातीं. ३२
हस्तें परहस्तें साहाय्य करोनी, रत्नावलि दैन्या टाकाल हरोनी;
विस्तार तियेचा, हें कृत्य न कांहीं-- तुह्मां जड भारी लीला सहजा ही. ३३
एकेक कणानें होतो जलराशी; होईल समृद्धा रत्नावलि तैशी;
व्हा व्हा तरि हीतें प्रेमेंचि सहाय; लावा ह्मणवाया लक्ष्मीसहि हाय! ३४

इंदीवरनीला! दासामरवृक्षा! रामा! सुखधामा! दीनावनदक्षा!
श्रीमत्कविवृंदा, नारायणरावा, त्या वाचकसंघा सौख्यीं चिर ठेवा. ३५
आयुष्य असों दे सर्वांस उदंड; अंगीकृत कार्यी दक्षत्व अखंड;
संपन्न तशी हो रत्नावलि लोकीं; श्रीलोचनचंद्रें श्रीराम! विलोकीं. ३६

श्रीराम! तुह्मांला संपूज्यतमांला-- अर्पी नत हा मी स्वामी मणिमाला;
हीच्या रुचिरत्वा माझ्याहि अघाला- नाणोनि मनाला, कंठीं तिज घाला. ३७
व्हावी रति रामा! नामा तव गाया; हव्यास असावा ज्ञाना मिळवाया;
आत्मोन्नतिसाठीं हो सज्जनसंग; वांच्छी वर ऐसा तूतें नत "भृंग" ३८

भृंग.

---

## विवेकानंद.

### सर्ग १ ला.

#### प्रास्ताविक.

श्लोक.

ज्यानें सिंहस्वरानें प्रगतिपर तशी हालवीली धरित्री,
ज्याचा वेदान्त मोठा सुलभ गमतसे त्याचियाही चरित्रीं;
आचार्याचा अहाहा! पुनरपि झळके जो प्रचंडावतार;
हे शंभो! कीर्ति त्याची सुकवनिं कथण्या बुद्धि द्यावी उदार! १

विद्वत्ता ज्यास लाभे, मनुज मिळवि जी घालुनी साठ वर्षे;
ज्याच्या त्या वस्तुपाठा सुजन शिकति हे, नाचुनी कोण हर्षे;
थोरांतें थोर वाटे, हंसत गमतसे बाल जो बालकांस.
पुण्यात्मा तो जगाला परमगुरु गमे ! हा नसे व्यर्थ भास ! २

ज्ञानी त्या काव्यभोक्त्यां मम कृति मरुभू ना गमो हेंचि देई;
मध्येंमध्यें तयांना मधुरजल तशी लाभुं दे आंबराई;
कारंजीं, बाग मोठे, जरि मधि न दिसे 'ताज' तो दिव्य हींत,
येथें वृत्ती मनाच्या घडिभरि रमुं दे ! तत्वबोधीं अभीत ! ३

नाहीं दिव्या 'शिकंद्रा' मम कृति गमतें ! वाटुं दे ती समाधि;
जीतें पाहावयाला विरल जन कधीं येति जाती सुबुद्धि;
तीरीं भागीरथीच्या असुनि, परिसतें मंजुला जी प्रवाहा,
शुभ्रा जी मृत्तिकेची बघत तरि असो सूर्य तो, चंद्रमा हा ! ४

ही माझी सज्जनांना कृति जरि दिसली जून द्या हार यातें;
किंवा वाटे नवीशी तरिहि पण बरें श्रेय यत्नास येतें;
माझी वृत्ती निरिच्छा कशि तरि घडते ? थोर संसार याला !
हे शंभो ! प्रार्थना ही श्रवण करुनिया, स्फूर्ति द्यावी मनाला ! ५

ज्यांच्या ठायीं जळे ती कळकळ जळती; थोर विश्वास ज्यांचा;
ज्यांची बुद्धी सदा ती नव नव उकली सृष्टिचा बोध साचा,
ज्यांच्या ज्या त्या परार्था बघुनि, जन कसे भाळती ज्यांसि आहा !--
अम्भोदाः क्षारवाहा मधुरजलमुचः सन्ति ते वंदनीयाः ६

घेऊनी वेष जैनी, शिकुनिहि सकला जैनधर्मी सुविद्या,
होऊनी त्यांत तीव्रा मति सुमतिमतां अग्रणी सर्व--वंद्या,
वेदान्तीं पूर्ण निष्ठा तरि मनिं वसते ज्यांचिया नित्य, आहा,
झाले, हो, धन्य एथें नरमणि अपुले पूज्य ते भट्टपादाः ' ! ७

झाले ते धूमकेतू प्रथम जरि खरे बौद्धसंतान खास,
चैतन्याची जडाची कस सहज असे ठाउकी पूर्ण ज्यांस
दृष्टान्तीं सर्व साम्या बघति जन जरी, बोलणें तेंचि फोल !--
वादान्तीं या यशस्वी, सकलबुधजनीं धन्य ते सर्वकाल !. ८

स्थालीतंदूलनीत्या श्रुतिवचन सभेमाजि जे दाखवीती;
मोठालें दिव्य कैसें उतरुनि विमला कीर्ति संपादिताती;
पावूनी दिव्यदृष्टी, पिहितमुख घटीं सांगती काय जें तें;
धन्यास्ते भट्टपादाः ! स्वजनहित कसें दाविती आपुणांतें ! ९

कर्मोचा मार्ग आतां प्रबल बनविण्या, नित्य जो वर्तताहे,
वेदान्ती मार्ग ज्यासी गहन गमुनि, जो तत्प्रसारार्थ वाहे,
घेऊनी 'मंडना'ला जवळ, हृदयिं जो बंधुभक्त्या विलासे--
धन्या ती बंधुभक्ती, जनहित करितां, भूतलीं या विकासे ! १०

कर्मभ्रष्टांसि ज्यांनीं नयपथ उघडा दाविला आत्मवृत्तें,
आणूनी योग्यता ती बहुतदिनमता दाविली आपुणांतें;
ऐशा त्या शुद्धशीला नमन करुनिया, जाहलें पुण्यवंत--
लाखांचा लाभला तो फुकटचि नमितां, त्यांसि हा धन्यवाद ! ११

उद्धाराकारणें जो नरतनु धरुनी, भूतलीं दावि लीला;
संन्यासी जाहला जो जनहित करण्या, आत्ममोक्षार्थ भोळा;
कामक्रोधादि शत्रू दमन करुनि, जो दंडधारी यथार्थ;
तत्वज्ञानी जगाचा गुरु बनत असे धन्य जो खास सार्थ; १२

नीरक्षीराप्रमाणें मिसळत असलें ब्रह्म तेवीं जगत् जें,
हंसाच्या वृत्तिनें त्यामधुनि उचलि या ब्रह्मदुग्धासि ताजें;
ऐशी ज्या भेदबुद्धी अवगत नव्हती, वंदुनी त्याहि नीचा,--
विश्वेशाचा असा जो दिसत जगति या अंश, तो होय साचा ! १३

श्रीव्यासांनीं श्रुतींचें मथन करुनिया, काढिलें दिव्यसार !
पांडित्याचें पडे त्या विरजण, सगळे तर्क झाले असार !
भाष्याचे भास्कराचे प्रखर किरण ते येति भूमंडळीं या !
जिंकूनी ' मंडना ' तें जगतिं गुरुपदा पावती ब्रह्मवर्या ! १४

मीमांसा--शास्त्रविद् जो, जगतिं ह्मणति ज्या कर्ममार्गीं प्रवृत्त,
' भट्टाचार्यें ' जनाला स्वमतिबलगुणें सोंपिलें व्यासवृत्त,
"कैशा त्या थोर वृद्धा वचनसमयिं मी जिंकु ? मी बाल ऐसा !"
"जिंकी ना अंधकारा" वदति गुरुवरा शिष्य "कां सूर्य तैसा ? १५

पाहूनी सिंहछावा लटपट उडते श्रेष्ठ मत्ता गजाची !
पाहूनी रूप ऐसें, मुखर जरि तसा, स्तब्ध होईल साची !
वादाचें वृत्त तेव्हां कुठुनि मग उरे ? स्वस्थ ऐसा, दयाळो !"
आचार्यांनीं तदा हें सहजचि ह्मटलें "आत्मसौंदर्य भाळो ! १६

तो आहे ब्रह्मदेवासम भुवि सकलां ! जिंकुं मी त्यासि कैसा ?
माझें कर्तव्य आहे ह्मणुनि करितसें वाद मी त्याशि ऐसा !
कर्तव्यीं श्रेय आहे वचन वदुनि हें दाविती व्यास वाट
धर्मीं मृत्यू बरा तो खचित मनिं अशी आपुल्या बांधि गांठ !" १७

मध्यस्था ज्यांत बैसे सकलगुणयुता मंडनाचीच भार्या,
विद्येची जींच मूर्ती उभयविदित हें ! कोण टाकील आर्या ?
मालेची योजना ती करुनि, सुटलि जी थोर चातुर्य तीचें !
झाला आरंभ वादा--सुटति दणदणा कुल्फि[1]--गोळे जिभेचे ! १८

"मिथ्या जीवेश कैसा ? श्रुति वदति तयीं भासते चेतना ती !"
"तप्ता लोहासि जैसा दहनगुण असे अग्निचा जाणताती,

---

[1] (अरबी) कुलुपी.

छाया--तेजासि आहे सकलविदित तो सूर्य, हें मूल जैसें,
ज्ञानव्यापार तैसा सहज मनिं अणा ! आत्मनिष्ठीं विकासे ! १९
सर्वांची मूल--भू जो, तरि अलग असे वस्तुत: नित्य जो हा,
त्याचें अज्ञान ज्याला, भवरुज करितें त्यासि तें दास आहा !
ज्या कर्मस्थासि शुद्धी विमल--मन--करीं पावली, त्यासि लाधे--
आत्म्याचें ज्ञान; तेणें वशचि करुनिया मुक्ति साफल्य साधे!" २०
" भेदाला ठाव नाहीं--सकल दिसतसे ईश्वराचाचि भाव--
तों दु:खाचा सुखाचा जगतिं दिसतसे काय हा हावभाव ?"
" जात्या शुभ्रा मण्याला विविधपटिं जरा ठेवितां, चित्रभास.
जे बुद्धी चालवीती, मनिं उमजति ते शुद्ध आत्मा तसाच !" २१
" जीवातें मुक्ति लाधे ह्मणुनि ह्मणसि तूं--सांग तल्लक्षणातें."
" ऐकें, मित्रा, सदा ही जननमरणदा वासना नाश यातें."
" निद्राकाळीं नसे कां, सदययतिवरा,-वासना नष्ट ? मुक्ति ?"
" निद्राकाळीं असे ती नियमित तितकी जाण ही सत्य उक्ति ! २२
अज्ञानांधा जिवाचे जवळ बसत ती सुप्तिमध्येंचि राहे--
बीजांकूरेंचि नित्या सकलविदितसें बीजिं कार्पास आहे !
त्या बीजा भाजिती, तों कथन करि मला केविं अंकूर फूटे !
हा मिथ्याभास तेव्हां सहज नुरतसे ! मुक्ति ही त्यासि वाटे !" २३
" सांगा तो मुक्तिचा, हो, अनुभव कसला; तो टिके कां सदा न ?"
" आत्मज्ञानी सुखातें विषय मिळुनियां लाधतें तें न भिन्न !
नाना वृत्ती मनाच्या ! सकल जयिं तशा लब्धवस्तु प्रसन्न !
अंतर्दृष्टी जया, त्या सहज उभळती मालतीमाळ जाण !" २४
यायोगें ' मंडना ' ला किति अजब पहा लागली ही समाधि ?
कंठीं माळा सुके ती ! सकल ' जित ' असें तत्क्षणीं बोलताती !

टाळयांचा नाद होई! सुमन कुणि अतां वर्षिती जेतृशीर्षी!
' वादान्ते तत्वबोध: ' खचित अजि गमे! सत्य पावेचि सिद्धि! २५

पाहूनी जिंकिलेला प्रियपति अपुला, खिन्न झाली सती ती!–
भावी दु:खांत वाटे सहज गढुनि ती कीं शिला होय अंतीं!
ती पातिव्रत्यसीमा बघुनि, मनिं तदा तोषला ज्ञानयोगी--
" बोले भर्ता तुझा, गे! जित अजि बनला न्यस्तकर्मा सुयोगी!" २६

बोले ती ' मंडन 'स्त्री " चतुर यतिवरा! दंपती एक व्यक्ति!
शास्त्रोक्तीतें कसें तूं विसरसि बघ या! ही असे योग्य युक्ति?
द्यावा संन्यास त्यांना मज जित करण्यावीण सांगा अतांशी!
न्यायान्यायासि तुह्मी निवडित असतां, वक्रदृष्टी कशासी!" २७

" बाले, हे बोल तूझे यतिनियम, अहा, मोडिती ध्यानिं आणी
स्त्रीशीं वादांत आह्मी कधिंहि करुं नये कालविक्षेप कोणीं"
" अद्वैती वाद ऐसा करुनि नच घडे भंग योगीव्रतातें--
गार्गी ती याज्ञवल्क्यासह, बघ, करिते वाद हें ज्ञात तूंतें" २८

" रूढीला सोडुनी हें, तरि दिसत असे वाद हा आजि प्राप्त–
" बाले, तूं बोल आतां. श्रवण तरि करूं शद्ब ते आजि आप्त!"
" ऐकें ज्ञानी यते! तूं, मजसि गमतसे सत्य ही सृष्टि खास--
सृष्टी आह्मां सदा, रे! सम दिसत असे सर्वकाळीं कशास?" २९

" नाहीं कां स्वप्नसृष्टी अजब अजब ती? गाढनिद्रा तशी न?
आहे कां जागृतीशीं किमपिहि समता सांग, बाले! बघून
ब्रह्माचा भास सृष्टी, मनिं जशि बघसी रज्जुसर्पाप्रमाणें
कां आहे सत्य सृष्टी वद वद चतुरे! बैससी केवि मौनें?" ३०

ज्यानें माझ्या पतीतें वश करुनि, अतां जिंकिली ही धरित्री,
त्याला मी जिंकुं कैसें? कपटशरण मी! जातिनें दीन ही स्त्री!

" आचार्या, जिंकिशी तूं मजसि! वद अधीं षड्रिपू कोणते ते--
कामाच्या कोणत्या त्या वद मजसि कळा ' कुंठिता बुद्धि होते!" ३१
" बाले! प्रश्नास तूझ्या अवधि मजसि दे उत्तराकारणें, गे "
" यावें, भो भो यते! त्वां!"--मम पति तितका लाभला! हेंचि मागें!
योगाभ्यासें यतीनें 'अमरक'--शरिरीं वास केला प्रयासें!
पावूनी शास्त्र तेंही, जयपद मिळुनी, दिग्जया तो निकासे! ३२
काशीरामेश्वरातें सहज दशदिशा जिंकुनी ज्ञानशक्त्या,
'विद्याभद्रासनीं' तो परमगुरु बसे! तुष्टल्या देवता त्या!
राजैश्वर्यी विराजे! भरतभुवि, अहा, चालवी थोर सत्ता!
आत्मैश्वर्यी रतांना त्रिभुवनिं कसली वाण कैंची इयत्ता? ३३
स्थापूनी आश्रमांतें, प्रचलित करुनी वेदधर्मी जनांना,
ठेवी तो देह आतां हिमगिरिवरतीं धन्य ही भूमि जाणा!
पुण्यात्मे जीस झाले सुत जगति भले, कां न ती धन्य माता?
गाऊनी कीर्ति त्यांची कवि तरि कवनीं, कां न हो धन्य आतां? ३४
थोरांची थोर कृत्यें श्रवण करुनि, जे तृप्त होताति कर्ण,
त्यांना माझी असे ही सविनय विनती, जोडुनी हस्त दोन--
ऐकावें स्वस्थचित्तें सुचरित अपुल्या साधुवर्या जनांचें;
चित्राची पीठिका ही खचित असुनिया, चित्र तेंही मजेचें! ३५
गंगोत्री एथ गंगा कृश किति दिसते क्षुद्रधारेसमान!
तीतें पाहून पापी मनिं गणिति कां तीर्थयात्रा करून?
तो नाहीं उंच मोठा मलयगिरि जरी, कां नसे त्यास मान?
आरंभीं जे जनांना चकवितिं न कधीं, श्रेष्ठताहीन ते न! ३६
ज्याच्या ग्रंथासि 'आई' अझुनि जन असे बोलती धर्मभोळे;
लागे जीचें मनुष्या व्यसन निशिदिनीं, नंदनीं वास बोले;

धन्या कीर्ती जयाची दुमदुमदुमते, अल्प आयुष्य ज्यानें,
त्या 'ज्ञानोबा' मराठे सकल ह्मणति हा ईश्वरी अंश साजे ! ३७

ज्याची बारी भुकेनें जन जरि पिडिले, भक्तिनें साधिताती,
'ज्ञानोबा वा तुकोबा' गजर करुनि, ते पंढरी गांठिताती, !
लोकांचें चित्त ज्यांनीं हरण करुनिया, जूट केली स्वधर्मी,
खड्गाचा घाय त्यांचा कितिक सफाइनें बैंसला हाचि मर्मी ! ३८

अल्लाचा थोर गिल्ला परिसुनिहि महाराष्ट्र झालें खजील !
सांईसाहेब झाले दिशिदिशि इकडे ! टाकिती ते सवाल !
भालाईती करूनी, हणुनि, खिळविला भूमिसी तो गनीम !
भाला तो 'रामदासी' अझुनि तळपतो ! भ्रष्टचित्तीं मुलाम ! ३९

इस्लामासीं मुलाजा, स्वजनहित तसे ठेविती जे समोर;
धर्माचा खोल पाया खचुनि भरुनि, जे बांधिती राष्ट्र थोर,
खासे ते राजबिंडे ! अझुनि मनिं पहा चालवीती स्वराज्य !--
काळाची वक्रदृष्टी मुळिंच न नडतें ज्यास तें धन्य राज्य ! ४०

राज्याची क्रांति झाली ! नविन वसलि ती 'कंपनी' मायबाप !
धर्माचे थोर तारे चमकति मधुनी ! रात्र ही ना अमूप !
तेजस्वी 'विष्णुबोवा' मिशनारि उठले ! हिंदुचे पाठिराखी !--
रट्टा ज्यांना बसे, ते निमुटचि बसली टाकुनी व्यर्थ शेखी ! ४१

ज्यातें 'रौंजे तुकोजी' भवभय हरण्या सेविती भक्तिभावें;
ज्यातें 'रौंजे जयाजी' अणुनि बहु धना, पाहती मोहिं यावें;
प्रेमानें ज्यास आह्मी सतत वदतसूं 'देव यशवंतराव';
ज्यातें जौफत्त दई गुणिगणसहिता लॉट, तो ठीक राव ! ४२

---

१ बोंचणारा. २ समजुतीची वागणूक. ३ तुकोजीराव होळकर ( इंदूर ) ४ जयाजीराव शिंदे ( ग्वाल्हेर ) ५ मेजवानी. ६ तत्कालीन मुंबईचे गव्हर्नर सर बार्टलफ्रीयर.

खिस्ती, इस्लाम धर्मासम जगति असे आपुला धर्म--मेवा;
एका देवासि सत्ता दिसत असुनि, ही त्यावरी भाव ठेवा!
त्या नाना देवतांना पुजुनि मनिं, पहा द्वैत वाढे फुकाचें!--
ऐशा त्या 'ब्रह्मवादी' बुधजन ह्मणती! पूज्य तो याहि वाचे! ४३

आहे वेदांत सारें, कृति जरि असली ईश्वरी खास आहे
दोषाला पात्र नाहीं अणुसम इथलें! धोपटा मार्ग पाहे!
मुक्ती सत्संगजा ती! यमदमसम ते पुण्य आहेत मार्ग!--
सिद्धान्ता स्थापिते ते गजबजति 'दयानंदस्वामी' कुशाग्र! ४४

ज्यानें त्या तत्त्वपूर्णा सहज नव'मना' आणिलें भूतलीं या;
ज्याच्या त्या थोर काव्या रसिक उघडिती नित्य तो मान द्याया;
ज्याची बुद्धी उदारा ग्रहणमनन हें केवढें थोर ज्याचें
ते 'कुंटे' धर्ममूर्ती अवतरति इथें वक्तृरत्नांत साचे. ४५

जीनें ख्रिस्तीजनांना चुणकवुनि, अहा, कीर्ति संपादिली हे,
जीची ती मंजुवाणी विपुलमति तिशी साहसीं धैर्य आहे,
झाली अल्पायुषी ती! हळहळ मजला लागते या स्मृतीनें!
'आनंदीबाइ' ऐसी हिरकणि अपुली ठेवि जो तो मजेनें! ४६

ज्याला तो धर्म मिथ्या खचित गमतसे जो परार्थातिरिक्त,
ज्याच्या त्या अष्टपैलू चळवळि असती प्रीतिनें नित्यसिक्त,
ज्याला निंदास्तुतीही किमपि न नडते, सागरीं दुर्ग तो हा!
मोठे ते 'रानडे' हे! विसरतिल कवी त्यांसि केवीं अहा हा! ४७

गंगा ती वाहताहे बहुतशतक ही! सारखा ओघ हीचा!
घोघो हें पात्र वाहे! जन मुदित असे, पाहुनी वेग याचा!
व्यक्तीचा नाश होई जलकणसम या राहते लोकसृष्टि!
व्यक्ती ही सृष्टिला त्या, जमुनि, कशि अणी श्रेष्ठता! हीच दृष्टि! ४८

आली कष्टा दशा ही, तरि पण अपुणां काय आहे तियेचें ?
धैर्यानें संकटातें सहज हटविती, शूर ते वीर साचे !—
आशावादासि ऐशा करुनि, मिटविती माजलेली दुही ती !
झाले ते धन्य येथें नरमणि गुरु, जे वाटती धर्ममूर्ति ! ४९.

' ब्रह्मो ' ते ' रानडे ' हे कितिकतरि पहा ठेविती कीर्ति तेथें !
गेले ' कुंटे ' मनस्वी ' मन ' उपजविते शोभते तत्त्ववेत्ते !
' आनंदीबाइ ' होती विपुलमति तशी, शोभती तत्त्वबोधी !
होतें हें श्रेय खासें, ह्मणुनिच अपुणां लाधली वंगबुद्धि ५.

प्रभूच्या मनीं येतसे धर्मवृद्धि !
तयाकारणें रंगली वंगबुद्धि !
तिथें ' स्वामिजी ' जन्मले ज्ञानदाते !
रमे ' रामकृष्णा 'वरी प्रेम तेथें ! ५

गुरुमुखांतुनी ज्ञान--बोध तो—
' केशवा 'सि त्या प्राप्त होय, तो—
भाव त्याहुनी अधिक दावि हा !
मुक्तिमार्ग ते दाविती तया ! ५२

धन्य ते गुरू धन्य शिष्य ते !
शोभलों अह्मी याचि शुद्धते !
शुद्धता हवी, तरिच ही कथा—
चित्ति चिंतितां येइ सर्वथा ! ५३

———————— जगन्नाथ रावजी टुल्लु बी. ए.

१ बाबू केशवचंद्रसेन.

## कालिदास आणि सरस्वती.

### श्लोक.

**सरस्वतीः--**

" ऊठ तूं कविवरा ! निजला कां ? । मारिती रसिक हे तुज हाकां;
सोडिं सोडिं शयना द्रुत या तूं; । ठेवितां निज मनांत न किंतु. १
हा असा रसिकवृंद कदाही-- । ना दिसेल पुढतीं तुज पाहीं !
याचियावरि दया कर कांहीं; । कामना सफल हो लवलाही. २
राक्षसी तुजसि झोंप कशी ये ? । वेसि काय **अलकें**तिल पेयें ?
काव्यपुष्पमकरंदमिलिंद-- । तूं कसा गमसि सांप्रत मंद " ३

**कालिदासः--**

" कासया जननि ! बाहसि मातें; । सांकडें तुजसि काय पडे तें ?
या सुरम्य **अलके**मधिं खाशी-- । घेउं दे मजसि झोंप पुरेशी. ४
हीं सरें सरसिजें भरलेलीं, । नित्य नूतन सुमें फुललेलीं;
वाटिका सुरभिता सुखदायी; । सोडवेल मजला कशि आई ? ५
स्कंधभागिं बसुनी विटपाच्या, । वृत्तितें खुलविण्या रसिकांच्या;
या विहंगमगणासह येथें-- । कोकिला मधुर गायन गाते ! ६
चंचलेकरविं बिंदु जलाचे- । वर्षवी जलद नित्य सुखाचे !
स्वीकरी रसिक जो सुमगंध; । ये असा सहज वायुहि मंद ! ७
राहुं दे मजसि या स्थलिं मातें । ऐक ही मम विनंति नमस्ते,
मीच काय कवि एक जगांत ? । हें असे खचित विश्व अनंत !" ८

**सरस्वतीः--**

" हट्ट काय तुज शोभतसे हा ? । होसि कां वश निरर्थक मोहा ?
ऐक तूं विनति या रसिकांची; । साक्ष हीच तव थोर मनाची. ९

ऊठ ये मजसवें चल आतां । ही पहा ! कुतुककारि अनंता !
पूर्विहूनि किति मोहक, रम्य ! । हा समीप विलसे शशि सौम्य ! १०
आंग्लभूमि बघण्या मम संगें-- । सागरापलिकडे चल वेगें;
पाहतांच तत्र चित्त रमेल; । बोलशील मज केवि मिळेल ? " ११

**कालिदासः-**

" अम्बिके ! वदसि हें तरि काय ! ! । आर्यभूमि नच कां रमणीय ?
ये तिच्या विषयिंची कशि शंका ? । लोपली सुभगता सगळी कां ? १२
शोभना धनसमृद्ध, विशाला, । जी पुरी प्रथित लोकिं विशाला.
स्वर्गिंचे सुर जिचे स्तव गाती,- । आणखी कथिति जाच पहा तीं; १३
ती दिसो न कधिं नील विषानें;-- । यास्तव स्वशिरिं चंद्र खुशीनें.
राखण्या विमल कीर्ति तियेची-- । ठेवि तो शिव न काय तिथेंची ! १४
मालिका जणुं अनर्घ मण्याची,- । पंक्ति त्यापरि अनेक कवींची--
ज्या पुरीप्रति विभूषवि मोदें; । कां तिथें न कमला अजि नांदे ? १५
सांग कीं द्रविण--संचय गेला ! । वा समूळ नृपवंश बुडाला ! !
वा सुधी सचिववृंद निमाला; । कीं पराक्रमपटू भट म्याला ! १६
सूर्यवंशरत ती अकलंका,-- । शत्रुंनीं लुटिलि उज्जयिनी कां ?
वीरसू करिति काय तिथें त्या ! ! । कां पुन्हा विनविती न विधात्या १७
वाडवापरि सतेज असे जे,-- । ते कुठें असति वाडव राजे ?
जाहला प्रखर वन्हि पवित्र-- । काय सांप्रत तदीय अमित्र ? १८
माझियाकरविं जीं लिहवीलीं,-- । मान्य त्या समयिं जीं जगिं झालीं;
नाटकें करिति काय कुणी तीं ? । गानशास्त्रपटु सुंदर रीतीं ? १९
सांग सांग जननी ! वरदायी ! । वृत्त दे परिसुं येथिल कांहीं;
नंतरीं रसिकवृंद बघूं तो, । जो तुला प्रियपणें विनवीतो; " २०

**सरस्वतीः-**

" मी पुन्हा अवतरें तंव साचें- । तूं करीं अवन या अवनीचें;

यापरी कथुनियां जलधीला, । तो परेश निज मंदिरिं गेला ! २१
निंद्य जें खचित कृत्य जगांत-- । तें करी उदधि या अवधींत !
सेवकाकडुनि आपुलिया हा - । त्रस्त दीन वसुधा छुदत्री हा ! २२
शुष्क पल्लव जसे, बपु तैसें; । ना मिळे कधिहि अन्न पुरेंसें !
हाय ! हाय ! कारिते दिन राती !! । कोरडी निवळ खाउनि माती !! २३
मद्यमांसरत पुत्र तियेचे-- । मानुनी सुखद दास्य पराचें;
अब्धिताडित उपानह--भारें-- । मारिती निशिदिनीं वसुधे रे ! २४
शौर्य आधुनिक या तरुणांचें-- । वेष घेउनि मुदें अबलांचे,
हावभाव अति दाविति रंगीं ! । ह्या निसर्ग वनिता जणुं रंगी !! २५
मेषपात्र पतिच्या दयिता या,-- । इच्छितात वरमायचि व्हाया !
व्हावया परि न इच्छिति कोणी-- । वीरमाय अथवा शचि राणी !!" २६

ही अशी परिसतांच बचाली,-- । मूर्च्छना कविवराप्रति आली;
शारदाहि घडिमात्र विराली ! । अश्रुबिंदु गळुं लागति खाली !! २७

चक्रवाक.

## झाली उषा तरिहि तूं निजशी कसा हा !

श्लोक.

निद्रासखीवश असा 'मृदुमंचकीं' मी--
होतों सुखें पहुडलों बहु रम्य हर्म्यी;
येवोनियां अनिल मंद सुवासयुक्त,--
वातायनांमधुनियां मज तोषवीत.
कोणीं करें मृदुलशा तंव हालवीलें;
निद्रासखीस मजपासुन दूर केलें;

वाटोनि दुःसह वियोग तदा तियेचा,—
मी बैसलों शयनिं होउनि रुष्ट साचा. २

नेत्रां पुसोनि, वर मी जंव दृष्टि केली;
तों एक चारु युवती वरि पाहियेली.
सौंदर्य तें नव मनोरम केविं वर्णूं ?
कोठून त्यास तुलण्या उपमान आणूं ? ३

तेजें प्रकाशित समीपग देश झाला;
जाई तिला सकलही बघुनी लयाला;
कांहीं न अन्य मजला मग होय दृश्य;
इच्छीं हिचें मनिं करीन सदैव दास्य. ४

होतां मनांत बहु हृष्ट तिला बघून,—
नामाभिधान पुसलें विनयेंकरून;
पृच्छा " सखे ! कवण तूं ? " मग एविं केली;
हेतू तुझा कवण आगमनीं अकालीं ? ५

ज्या दे तदा सुरुचिरा मज उत्तरातें—
संक्षेपरूप कथितों मम व चकांतें;
वाचून तें सकल त्यांतिल बोध घ्याया;
तो आदरें त्वरित आचरणांत याया. ६

हे सिद्ध नागरिक सर्व उठून झाले;
स्नानादिकां उरकुनी द्रुतसे निघाले.
सालंकृता युवतिही नटुनी निघाल्या,
आनंदयुक्त बघ ह्या जनवृत्ति झाल्या. ७

उद्योगभानुकर येतिल जाणुनी यां—
साहित्य तीं करिति त्यांशिच अर्घ्य द्याया;

पूर्वेकडे बघति सर्व चकोरदृष्टी;
ही कृष्ण दीर्घ रजनी करि त्यांस कष्टी ! ८

झाली उषा तरिहि तूं निजशी कसा हा !
आलस्यमग्न ह्मणती तुज सर्व पाहा;
जे मूढ निद्रित तुझ्यापरि देशवैरी;
त्यां जागवूनि करितें झणिं मार्गचारी. ९

जा तूं गड्या ! निरलसा ! रत उद्यमीं हो;
ह्या बांधवांसहित तूं मग घेइं लाहो.
जात्यें दुज्यां उठविण्या तुजसारख्याशीं;
नामाभिधान पुसशी तरि तें स्वदेशीं. १०

"कृष्णमित्र."

## बंधूस पाठविलेलें पत्र.

" 'सिईचीकिमुरी' हा जपानी वीर लढाईस आला असतां कांहीं गैरवर्तनामुळें वरिष्ठ अधिकाऱ्याकडून 'करेक्शन हॉउस' मध्यें पाठविला गेला. वडील बंधु जो 'बुनिचीकिमुरी' त्यांस हें आपुल्या बंधूचें वृत्त कळतांक्षणींच त्याची कानउघाडणी करण्याकरितां त्यानें आपल्या भावास जें पत्र पाठविलें त्याचा आशय पुढील कवितेंत आहे."

### श्लोक.

बंधो ! आलींत पत्रें बहुत जननिचीं आजपर्यंत येथें;
आतें प्रत्येक पत्रीं तशि तुजविषयीं ती करी प्रश्न मातें;
घालाया प्राण खर्ची निज नृपतिचिया कारणें तूंहि येशी;
होतें हें वृत्त ठावें ह्मणुनि कळवितों त्यापरी जन्मदेशी १

नाहीं अद्यापि गेलें तुजकडुनि मुळीं एकही पत्र तीला !
किंवा या आपुलीया नच कळविसि तू बंधुलागीं वडीला !
होत्या येणार फौजा कुमक ह्मणुनि ज्या काल रात्रीं अह्मांला;
गेलों तेथें बघाया तुजसि परि अहा ! चित्त पात्रे भ्रमाला !! २

होती युद्धीं जहाली मनसि जखम जी तीहि आली भरोनी,
आतां जातों लढाया पुनरपि निघुनी लागवेगें इथोनी;
माझ्या एक्या सख्यानें सहज कळविला सत्य वृत्तांत सारा;
तेणें वाटे लिहावें ह्मणुनि लिहितसें ऐक माझ्या विचारा. ३

चातुर्यानें बलानें अधिक मजहुनी थोर तूं धीर वीर !
शौर्याग्नीच्या प्रभावें रिपुकुळविपिना जाळण्याला तयार !
तेजस्वी याप्रमाणें असुनि वश कसा दुष्ट मोहास होसी ?
वाटे आश्चर्य याचें फिरफिरुनि मला !! काय हें आचरीसी ? ४

देशाला, सैनिकांला, महित नृपतिला, क्षत्रियांच्या कुळांला,--
घेसी जन्मास जीच्या उदरिं शुचिमती वृद्ध ऐशा प्रसूला,--
बुद्धिभ्रष्टा ! प्रमत्ता ! अविनयनिपुणा ! दुष्ट कर्मी अलीका !
स्वेच्छाचारें कृतघ्ना ! कपट करुनियां लाविसी तू कलंका !! ५

मातेलागीं तुझें हें कुचरित कळतां हाय ! खाईल वाटे !!
ऐसें केलेंस कैसें अशिवकर तुवां शोखटें कर्म खोटें ?
मेला नाहींस कां तूं शिशुपणिं, अथवा कां न खासी विषाला ?
कैसा कंटाळवाण्या अजुनि उबगशी या न मूर्खा ! जिण्याला ६

सांगूं मी काय आतां ! त्वरित निघुनि ये त्या गृहांतोनि येथें;
दावाया शौर्य आहे उचित समय हा लावि कीर्तिध्वजातें.
यूरोपाख्य प्रभूच्या मुकुटिं झळकतो ज्ञार नामा मणी जो;
तो त्वच्छौर्यप्रभावातप बघुनि दिनीं स्वास्थ्यीं बा ! विराजो ! ७

MaM 891.46165 K 862 v.20

छात्रा तूं केसरीचा असुनि रिपुगजें कां न व्हावें विहस्त ?
किंवा दौर्बल्यवातें अवचित दुबळ्या ! पावले कंप हस्त !
प्रेमें काय प्रसूनें शिशुपणिं नव्हतें पाजिलें स्तन्य तूंतें ?
केली त्वां फेड खाशी ! हर ! हर ! अधमा ! भोगिशी दुर्दशेतें ! ! ८

" मेला, गेला. निमाला, त्रिभुवनिं नुरला, भक्ष्य भूतांस झाला " ! !
ऐसें मी याचवेळीं जननिस लिहितों ' आठवीं तूं न त्याला; '
दावोनी शौर्य युद्धीं. मरशिल जयिं तूं ' बंधु आहे जिवंत '—
ऐसें जाणेन तेव्हां; तंववरि ह्मणतों जाहला कीं त्वदंत ! ९

चक्रवाक्.

---

## यास्कयांचा.

( दोहावृत्त. )

पूर्वी होता सूद हो यास्क तयाचें नाम;
पाक जयाचा सर्वदा पुरवी रसनाकाम. १
कान्हवले, जिलबी, पुरी, बासुंदी, श्रीखंड,
त्याणें केले चाखितां, जन हो तृप्त उदण्ड. २
खीर, करंज्या, अनरसे, मोदक, गोंडस, लोड,
जें जें बल्लव हा करी; तें तें खाया गोड. ३
मालपुवा, मांडे, शिरा, रुचिकर, व्हावे, फार;
यास्काच्या ह्या कीर्तितें जन गाई बहुवार. ४
चिंचापल्ली हें असे त्याचें वसतिस्थान;
येथें होतें मोडकें त्याचें सदन लहान. ५
कार्यास्तव यास्काप्रती जन बोलावुनि नेत;
पाकासाठीं त्याचिया द्रव्यहि त्याला देत. ६

National Library, Acc No 352.
Calcutta-27 Dt 2/12/57.

त्या देशाच्या पार्थिवें एके दिवशीं त्यास–
कार्यनिमित्तें बाहिलें पकान्न करायास. ७
पावुनि चित्तीं हर्ष, हा आला राजगृहास;
घेउनि संगें लाटणें जें आवडतें त्यास. ८
पोळ्यांचाही आणिला त्याणें संगें पाट;
कलथा, झारा, सांडशी, कढई, सांघण, ताट. ९
पाकाचीं हीं साधनें खांद्यावरि टाकून,
सत्वर आला धन्यता निजचित्तीं पावून. १०
राजाज्ञेनें बल्लवें पकान्नें बहुसाल--
केलीं; ज्यांची स्वादुता चिंतावी चिरकाल. ११
जेवायाला मंडळी पीतांबर नेसून,
पाटावरती बैसली आनंदित होऊन. १२
राजाही त्यांच्यामधें घेउनि अग्रस्थान,
जेवायाला बैसला; कीं हा त्याचा मान. १३
थोडीं थोडीं सर्वही पकान्नें जन खाय;
वर्णी जन त्यांची रुची; तैसा तोही राय. १४
साऱ्या पकान्नांमधें पुरणाच्या पोळीस–
वाखाणुनि, त्या भक्षिल्या एकेकानें तीस ! ! १५
त्या पोळ्या राजासही आवडल्या अति वेळ;
आस्वादसुखा त्यांचिया वर्णू कोण शकेल ? १६
यास्कातें पंक्तीमधें मग बोलावुनि राय,
त्यास ह्मणे " त्वत्पाक हा सुधेस ह्मणविल हाय ! ! १७
तव पकान्नें गोड हीं जो भक्षी तो धन्य !
चित्तीं मानिल तुच्छसें तो इंद्रियसुख अन्य ! ! १८
या तव पाकीं पाटवें होई मजला हर्ष;

सांडुनिया भय बोल गा ! जो त्वन्मनिंचा तर्ष " १९
प्रभुचें भाषण ऐकतां जोडी यास्क करास;
बोले विनयें यापरी त्यासमयीं वचनास. २०
" मत्पटुतेनें आपणा जर झाला संतोष;
तर पुरवा मत्काम हा न धरुनिया मनिं रोष. २१
ज्या पोळ्या सर्वां जना गमल्या रुचिकर फार;
त्या केल्या ज्या साधनें त्याचे हे उपकार. २२
तें साधन जें लाटणें त्याला घुंगुरघोस;
लावा ह्मणजे तद्ध्वनी जाइल अर्धा कोस. २३
पोळीतें मी लाटितां लोक ध्वनि ऐकेल;
मत्पटुतेची यापरी कीर्ति जगीं वाढेल. २४
मग मजला आमंत्रणें पाकास्तव येतील;
पाकपाटवें हर्षले जन मज धन देतील. २५
शुभ्र रुप्याचीं घुंगुरें द्यावीं मजला. राय !
बहुधनदायी यामुळें होईल मद्व्यवसाय. २६
पुरवा माझा काम हा; काम मनीं मम नान्य;
पुरवावा तो आदरें. आपण थोर वदान्य !" २७
यास्काची ही याचना त्यासमयीं ऐकून,
हसली सारी मंडळी; नृप झाला मनिं दून. २८
बाह्यात्कारें हासला नृप तेव्हां जरि फार;
त्याणें तरि मनिं भाविलें निजदातृत्व असार ! २९
नृप किंचित्स्मित तेधवां करुनि, वदे यास्कास;
" यांचा सफला मी तुझी करितों; धरिं विश्वास. " ३०
भोजन होतां, त्या नृपें आणविला सोनार;
त्याच्या हातें लाटणें शोभविलें तें फार. ३१

सुंदर घेउनि, लाटणें गेला यास्क गृहास;
ज्याला त्याला दावुनी, तो पावे हर्षास. ३२
चिंतापल्लीच्या जनें बहु त्याचा उपहास--
केला; तद्बीजांश जो तो रुचला न तयास. ३३
यास्ककथा ही ऐकुनी, घ्या हो ! हा सद्बोध;
" **नश्वरलाभा गुंतुनीं, न करा पुण्यविरोध.** " ३४
कामधेनुतें तोषवी, तो मागेल न दास--
शेण मला दे गोवऱ्या बाई ! थापायास ! ! ३५
कल्पद्रुम जो देखतां, तोडुनि तो जाळील--
शेकायास्तव; त्या नरा ह्मणती बालिशशील. ३६
हाताला चिंतामणी येतां, जो टाकील;
मूढशिरोमणि तो खरा, कोण तया वानील ? ३७
हातीं येतां जो सुधा टाकुनि, पी मद्यास;
त्याची प्रज्ञा कायशी ? काय ह्मणावें त्यास ! ! ३८
स्तुत्यगुणें आकर्षिला विभु दे ज्या अधिकार;
न्याय्य महत्तम लाभ तो घेओ वारंवार. ३९
विभुची लाहुनि जो कृपा, करि दुर्जनसंहार;
तो साधूंनीं वानिजे; त्याचें वीर्य ससार ! ४०
विभुची लाहुनि जो कृपा, साध्वना विसरेल;
त्याचें जीवित निंदिजे साधूंनीं अतिवेळ. ४१
ईशकृपेनें इंद्रियें आलीं जीं मनुजास;
पापार्जनिं तो योजितो नाहीं लज्जा ज्यास. ४२
काया वाचा मानसें नित्य करी उपकार;
त्याचीं वंदूं पाउलें; वानूं त्याला फार ! ४३
यास्कापरि बहु माणसें दिसतीं करितां शोध;

ज्यांना हवें धुंगुरें त्यांना हा मम बोध. ४४
संसारीं शमलिप्सुहा विद्याधर सुजनास—
बोध करी; तो हो सदा आदरणीय तयास. ४५

——— विद्याधर वामन भिडे; बी. ए.

## फूल का मूल!

पद.

चालः— "नृप ममता रामावरतीं."

तूं स्वयें फूल का मूल
ही मजला पडली भूल! ॥ बाइग ॥ धृ० ॥
तव सुगंध किंचित् सुटला
बाकीचा हृदयीं दडला ॥ बाइग ॥
तूं थोडी थोडी फुलशी
हसशीना पारि स्मित करिशी ॥ बाइग ॥
निजरूपा लपवीतांना
अति सुंदर दिसशी नयनां ॥ बाइग ॥
तूं कळी फुलांमधि असली
देवाच्या मर्जीमधली ॥ बाइग ॥
मज फुलें। जरी आवडति
तरी मज धरिति
आकळुन बाळ। आकळुन बाळ
मज खरें मुलांचें खूळ ॥ बाइग ॥ १

——— टिळक.

# काव्यरत्नावलि.

## अंक २ रा.

### कपटविपाक.

सदर प्रसंग झुंझारराव नाटकांतील आहे. कपटपटु जाधवराव यानें कमलजेविषयीं झुंझारराव याचें मन कलुषित केल्यानंतर जो प्रसंग घडूनआला त्याचें वर्णन पुढील कवितेंत आहे

मंदाक्रांन्तावृत्त.

अस्ता गेला हिमकर कलानाथ कल्याणधाम
भूगोलातें तिमिरनिकर व्यापि घोर प्रकाम
सृष्टीचा हा नयनविषयातीत होई पसारा
निद्रासौख्यानुभवरत हा जाहला लोक सारा १

तेजोराशी विझवुनि बळें तारकादीप पूर्ण
झांकोनीया सकल धरणी कृष्णवस्त्रांहिं तूर्ण
दुष्कर्मोची प्रकम जननी नेसुनी कृष्ण शाल
आनंदानें भयद रजनी नाच नाचे कराल २

दुष्कर्मीहीं सकल जगती जाहली सत्य पूर्ण
कोठें कोठें सुकृति चमके त्यामधें जेंवि तूर्ण
घोर ध्वान्तें तिमिरमय हा होय भूगोल सारा
कोठें कोठें नयनसुभगा शोभते त्यांत तारा ३

दुष्कर्माला उचित गणुनी काल हा चोर जार
मार्गातोनी अभय फिरती गुप्तचेष्टाप्रकार

जी ऐकोनी निजमनिं महा भीति पावेल काल
कृत्यें ऐशीं कुटिलमतिनें योजितीं ते खुशाल ४
झाली सर्व स्तिमित धरणी होय दिग्भाग शान्त
रानामध्यें मृगखगतती सेवि निद्रा निशान्त
झाल्या सर्व स्थिर तरुलता शून्य आकाश तेवी
साम्राज्यातें वसुमतिवरी चालवी शान्ति देवी ५
केव्हां केव्हां श्रवणिं पडती यामघंटानिनाद
चाले कोठें अविरत महामद्यप्यांचा विवाद
होई तैसा श्रुतिपथगत श्वानभुंकार कोठें
कोठें कोठें उठति नगरीं घूक–घूत्कार मोठे ६
त्या काळीं जो पृथुतरयशा वीर झुंझारराव
कांपे शत्रू थरथर मनीं ऐकतां यत्प्रभाव
शय्यागारीं असिधर उभा क्षुब्ध सर्वान्तरंग
चित्तामध्यें अमित उठती कल्पनांचे तरंग ७
लावण्यानें ललितललनास्वामिनी जी जगांत
ती पर्यंकीं कमलनयना घेत निद्रा निवांत
चार्वंगीतें स्तिमितनयनीं पाहुनी शस्त्रपाणी
बोले वेगें स्वगत मग तो यापरी राव वाणी ८
" लोकीं साक्षात् मदनतरुची मंजिरी तेवि साजे
लावण्याची सुभग सरिता सत्य किंवा विराजे
किंवा भूषा निरुपम खरी भूषणांची जगांत
पर्यंकीं ही कुसुमशयनीं घेत निद्रा निवान्त ९
घेवोनीयां निज तनुवरी ही हरिद्वर्ण शाल
ठेवोनीयां वदन उघडे घेत निद्रा खुशाल

देती भ्रान्ति प्रकट कुरळे केश ते केसरांची
तेणें शोभा दिसत मजला सुप्त पंकेरुहाची १०
किंवा सत्य स्मितविकसिता मुग्धवक्त्रांबुजा ही
देती शोभा मृदुल कर हे नाळसे जीस पाही
कस्तूरीचा तिलक अलि हा जीवरी ती सुवर्णा
हा! हा! भासे नव कमलिनी ही हरिद्वस्त्रपर्णा ११
हर्म्यामध्यें सुटुनि सुरभी तन्मुखोच्छ्वासगंध
वातासंगें गगनकुहरीं संचरे मंद मंद
मंदाराचा परिमल गमे यापुढें हीन पाही
देवांनाही खचित खचित प्राप्त हा अल्प नाहीं १२
बाल्याचा तो समय मजला आठवे आज आर्ता
बाले जेव्हां असुख मजला देत अत्यन्त धाता
माता ताता मुकुनि जगतीं हिंडतां मी अनाथ
त्वत्तातानें करुनि करुणा यास केलें सनाथ १३
देवोनीयां करुणमतिनें तेधवां अन्नपान
औदार्यानें सुमति मजला दीधलें प्राणदान
या दीनाच्या वरि बहु तदां ठेविसी प्रेमदृष्टि
वेळोवेळीं करिसि सदये वाक्सुधासारवृष्टि १४
तेव्हांचें त्वच्चरित बघतां होय दीनांस भास
देवी आली क्षितिवरि विपदु:ख वारावयास
दु:खार्तांना बघुनि तुजला होय पीडा अपार
तत्तापाचें हरण करण्या सर्वदा तूं तयार १५
येई जेव्हां त्वरित तुजला पूर्ण तारुण्यकाल
बाले तेव्हां वदन तव हें दावि शोभा विशाल

कंदर्पानें सुतनु तव ही आपलें स्थान केली
लावण्यानें कुसम मधुनें तेवि ती व्यापियेली १६

त्या कालीं मी निरखुनि तुझी ती तडित्प्राय लीला
संतुष्टात्मा त्वरित विसरें सर्व दु:खावलीला
पाहोनीयां नयनसुखदा अंबरीं चंद्रकोर
आनंदानें गुणवति जसा व्याप्त होई चकोर १७

लोळे पद्मा सतत चरणीं ज्यापरी दीन दासी
कोठें ती तूं ललितललनारत्न लावण्यराशी
बाले कोठें निरतिशय हा दीन कार्पण्यदास
पाहोनीयां विकृत तनु ही लोक हासे जयास १८

हंसश्रेष्ठा विगणुनि कधीं स्वर्गगंगानिवासी
हंसी कां ती अधम मलिना आदरी वायसासी
हें मी जाणें तरि तुजवरी प्रेम अत्यन्त ठेवीं
त्वन्मूर्ती ती हृदयभवनीं स्थापिली जेवि देवी १९

प्रात:कालीं हिमजल तसें चित्त तें निष्कलंक
नाहीं नाहीं कधिंहि शिवला त्यास दुष्कर्मपंक
कंदर्पानें जरि तनुमधें वास केला विशेष
नाहीं झाला तरिहि हृदयीं अल्प त्याचा प्रवेश २०

लावण्याला भुलुनि तुझिया रूपशाली कुलीन
बाले तेव्हां किति तव पदीं जाहले पूर्ण लीन
होतां केव्हां तव चुकुनियां त्यावरी प्रेमदृष्टि
वाटे त्यांना जणु तनुवरी होय पीयूषवृष्टि २१

चार्वंगि ! त्वद्वचनमधुचा लाभ व्हावा स्वतास
औत्सुक्यानें ह्मणुनि जपती भृंगसे आसमास

पाहोनीयां गगनिं सजला मेघमालेस मोर
होती तैसें सुखित तुजला पाहुनीया समोर २२
प्रेमोत्फुल्ला मजवर इची स्निग्ध दृष्टी वळावी
लावण्याची ललित लतिका आपणा ही मिळावी
आकांक्षा ही धरुनि तुजला सर्वदा लोक सेवी
प्रातःकाळीं मधुकर अहा पद्मराजीस जेंवी २३
पूर्णत्वानें पारि करुनिया पूर्ण धिःकार त्यांचा
प्रेमा तेव्हां मजवरि तुंवा ठेविला पूर्ण साचा
पूजी तूतें हृदयभवनीं तेधवां मीहि रक्त
सद्भावानें सतत सुमती देवता जेंवि भक्त २४
माझ्या अंगीं गुण लव नसे हे जरी तूज ठावें
पाहोनीया मम अभिनवा विक्रमा तूं रमावें
मच्छौर्याचें अनुपम असे ऐकुनीया प्रसंग
गीतामध्यें हरिण तशि तूं होस अत्यंत दंग २५
सौंदर्याला बघुनि भुलती कामिनी बुद्धिहीन
त्याचा तूतें खचित महिमा सुंदरी अल्पही न
संपत्तीच्या सतत चरणीं लोळती थोर राशी
होई कैसा अगुण धनवान् पात्र तो आदराशी २६
तूं शूरांची अससि सखये पूर्ण संमानणारी
त्याच्या पायीं सुतनु अपली वाहण्या इच्छिणारी
इच्छा मातें विदित तव ही चारुशीले ह्मणोनी
संग्रामीं मी अभय विचरें तुच्छ काया गणोनी २७
त्वन्मूर्तीं ती हृदयपटलीं ठेउनीया अभंग
युद्धामध्यें अभय विचरें होउनी पूर्ण दंग

दावी वेगें पथ मज रणीं नीच गे देवतासी
जैशी भ्रांता गहन तिमिरीं तारका स्वर्गवासी २८

एकाकी मी समरशिरसीं खड्ग–मात्र–द्वितीय
धैर्योत्साहें रणकुशलता दाखवीं अद्वितीय
जेव्हां कोपें चरचर चिरी शत्रुचे कंठनाल
वाटे लोकां समर करण्या पातला काय काल २९

शस्त्राघातें अनल पारितां पेटती सर्वदाही
हुंकारानें त्वरित भरिती वीर दिग्भाग दाही
चित्तेंही तो यम नच शके जावया सत्य जेथें
आनंदानें सुमति करि मी स्वेच्छ संचार तेथें ३०

आवेशानें समरशिरिं मी फोडितां घोर हाक
रानामध्यें भटहि दडती पावुनी थोर धाक
माझ्यासंगें समर करण्या होय कोणा न धीर
येती वेगें शरण मजला हात जोडून वीर ३१

हुंकारानें गगनकुहरा भेदिती व्याघ्र–सिंह
जेथें जाया लव न धजती थोरही वीरसिंह
त्या रानीं मी अभय विचरें एकला शस्त्रधारी
त्यांच्या संगें करिं बहु सुखें युद्धसंमर्द भारी ३२

ते शौर्याचें कथन करिता तूज भव्य प्रसंग
हृत्कासारीं उठति तुझिया विस्मयाचे तरंग
बाले तेव्हां सुख तुज मनीं होय निर्वर्णनीय
आनंदानें गुणवति उडे देहभान स्वकीय ३३

तो सौख्याचा समय मजला आठवे आज आर्ता
बाले जेव्हां कथन करि मी युद्धसंमर्द--वार्ता

प्रेमोल्लासें करुनि विविधालाप जे देत तोष
नेले तेव्हां कितितरि सखे ! कौमुदीवत्प्रदोष ३४

होशी तूंही मजवरि तदा सुंदरी बद्ध भावा
माझ्यावीणें क्षणहि तुजला कल्पसा सत्य जावा
येई जेव्हां परत समरांतून मी अक्षतांग
आनंदानें मज निरखिशीं तूंच ना सूभ्रु सांग ३५

पाहोनीया अतुल मम तो विक्रमोत्कर्ष सत्य
आनंदानें नृपति मजला देइ सेनाधिपत्य
भंगोनीया रिपुबल रणीं जिंकि तत्सर्व--भूतें
वेळोवेळीं अतुल कृतिनीं तोष देई प्रभूतें ३६

कान्तारीं मी फिरत असतां अल्प लोकांसमेत
एकेकालीं मज रिपुजनीं गांठिलें शीघ्र तेथ
आवेशानें चहुकडुनियां वेढिलें सत्य मातें
तें पाहोनी भय बहु गमे तेधवां मज्जनांतें ३७

तेव्हां तेथें समररस तो माजला फार गाढा
संकोपानें रगडिति रणीं आपल्या वीर दाढा
सेना माझी करि रिपुवरी घोर अत्यन्त मारा
धारातीर्थीं कितिक पडले टाकुनी हा पसारा ३८

तेव्हां कोपें करित सुटलों मी रिपूंचा चुराडा
खड्गाघातें त्वरित अवघा फोडि त्यांचा गराडा
विद्युद्गोल त्वरित विचरे अन्तरिक्षीं प्रचंड
युद्धामध्यें अभय फिरलों मीहि तैसा अखंड ३९

पाहोनी ती अतुल करणी धैर्य त्यांचें गळालें
सोडोनीयां त्वरित समरा वीर सारे पळाले

मीही ग्रामा परत फिरलों सुंदरी त्याच कालीं
तेव्हां सारे वदति जगतीं धन्य हा वीर्यशाली ४०

जेव्हां वेगें तुजशि कळलें वृत्त हें सर्व बाळे
आनंदानें हृदय तव हें व्याप्त संपूर्ण झालें
धावोनीयां मम निकट तूं तेधवां पातलीस
प्रेमोल्लासें रसमय गिरा यापरी बोललीस ४१

" सौंदर्यानें रतिपतिस जे आणिती लाज पाही
पाहोनीयां भुलति हृदयीं ज्यास दिव्यांगनाही
मत्प्राप्तीची धरुनि हृदयीं आस ऐसे कुलीन
आनंदानें भज निशिदिनीं सेविती पादलीन ४२

सौंदर्याला बघुनि भुलतीं या जगीं सर्व बाला
शौर्यानें जो प्रथित नर तो आवडे मन्मनाला
प्रेमोल्लासें युवजन सदा सेविती यत्पदासी
ती मी शूरा तवपदनता जाहलें आज दासी " ४३

वर्षोनीयां वचनमय हें दिव्य पीयूष बाढ
धावोनीयां त्वरित मजला देशि आश्लेष गाढ
शंपा जैशी सजलजलदोपश्लिष्टा शोभते गे
शोभा तैशी असितनयने ! पावसी तूंहि वेगें ४४

लावण्याची अभिनव लता तूं मला लाभतांच
गाढानंद--क्षितिधर–शिरीं पोचलों मी खराच
तो सौख्याचा समय मजला आठवे सर्वदाही
नाहीं नाहीं पुनरपि तसा काळ येणार नाहीं ४५

त्या कालीं तूं खचित असशीं सद्गुणाचीच मूस
आतां कैसा अहह रुचला हा दुराचार तूस

होतें पूर्वी हृदय तव जें देवतातुल्य शुद्ध
झालें कैसें अहह अधुना सत्कृतीला विरुद्ध ४६

प्रेमा जी तूं मजवरि सदा ठेविसीं पूर्ण पाही
प्राणापेक्षां अधिक गणिसीं जी मला सर्वदाही
ती तूं मातें अवगणुनि जो पापकर्मा पिलाजी
त्याला आतां कशितरि अहा सांग झालीस राजी ४७

भोगी जे जे तुजसह तदा रम्य नाना विलास
हा ! हा ! आतां स्मरुनि मज ते दुःख वाटे मनास
होते पूर्वी नयन सुदृढोत्कंठ जे दर्शनातें
आतां तूतें अहह बघतां होय पीडा तयांतें ४८

चारित्र्याची गमसि खनि तूं एक लोकांस पूर्वी
पाहोनी हें कुचरित तुझें सर्व निंदील उर्वी
लाजे पूर्वी कुलजन तुझें पाहुनी साधुशील
हा ! हा ! आतां बघुनि तुजला मान खालीं करील ४९

होतों तूतें अभिमत जरी हा न मी तेधवां गे !
कापट्यानें अहह ! मज कां वंचिलें सत्य सांगें
बोलोनीयां प्रणयसरसा वाणि कापट्यराशि
कां गे ! मातें सरल—हृदया गोविलें प्रेमपाशीं ५०

चारित्र्याचा खचितचि तुवां प्राण हा घेतला गे
सत्प्रेमाला अजि दवडिलें या जगांतून वेगें
दुष्कर्माचा ध्वज उभविला अंबरीं उंच पाहीं
स्त्रीजातीला निरतिशय तूं आणिला कालिमाही ५१

लोला विद्युल्लिलसितंसमा कामिनीचित्तवृत्ति
होई त्यांना सहजचि अहा ! दुष्टकर्मी प्रवृत्ति

विद्वानानें तव भरवसा ना धरावा तयांचा
वेळोवेळीं बुधजन करी यापरी बोध साचा ५२

वेश्याही जें बघुनि हृदयीं लाज अत्यन्त पावे
हा! हा! ऐसें कुचरित तुंवा काय गे आदरावें
सद्वंशाला खचित कुटिले! लाविला डाग थोर
हा! हा! याची परिणति खरी आज होईल घोर ५३

दुष्कर्मानें मलिन अपुलें नाम केलें जयानें
पाहोनी जो रण पळतसे दूर वेगें भयानें
संपत्तीनें रहित भणगप्राय दासानुदास
हा! हा! दुष्टे! सुतनु कशि ही अर्पिली सांग त्यास ५४

पुण्याकारा वरुनि दिससी दिव्ययोषे—समान
हा! हा! कृत्या तुजहुनि बरी वाटतें सत्य जाण
लावण्यानें भुलवुनि नरा गोवुनी प्रेमपाशीं
वंची अन्तीं कपटकुशला दुष्ट नारी तयाशीं ५५

केले पूर्वी प्रकटित तुंवा प्रेमलीला—प्रकार
वारस्त्रीच्या प्रणयवचनातुल्य कां ते असार
झांकायाला कपटकृतिनें काय पापावलीस
चारित्र्याच्या अगणित कथा सर्वदां बोललीस ५६

देवा देवा अहह इतुका जाहलों मूढ केंवी
दुष्ट स्त्रीला निजमनिं सदा मानिली सत्य देवी
ज्या कृत्येचें अशुभ मुख हें पाहवें ना कदापि
तीच्या संगें अहह रमलों आजपर्यंत पापी ५७

जेव्हां येई निकट सविता पूर्वदिक् होय रक्ता
जाता दूरी निघुनि परि ती होय वेगें विरक्ता

स्त्रीजातीचा खचितचि तडित्चंचल प्रेमराग
संसाराचा ह्मणुनि उपजे सज्जनांना विराग ५८

दुष्कर्मानें पतित जगतीं सर्वथा जाहलीस
नीचावस्था अतिशय पहा सत्य तूं पावलीस
या कालीं मी क्षणभरि जरी जीत ठेवीन तूंतें
त्वद्देहाचा अतितर अहा भार होईल भूतें ५९

दावोनीया कपट–कुटिला प्रेमलीला अपार
विश्वासानें अहह मजला दंश केलास फार
व्याली होशी खचितचि जरी जीत तूं राहशील
दंशानें तूं वधिशिल किती लोक गे दुष्टशील ६०

आनंदानें बघुनि सुभगा जेंवि वृंदावनाला
लावण्यानें तव मज तसा सर्वथा मोह झाला
अन्तर्भागीं विषमय धरी गर्भ तें गे अभंग
आहे तैसें खचितचि तुझें सत्य हें अंतरंग ६१

या पापाला वधचि गमतो योग्य हा दंड मातें
नाहीं नाहीं खचित उचिता अन्य शिक्षा तयातें
दुष्कर्माचें फल तुज पुरें याच लोकीं मिळावें
तैसें आतां पुनरपि न हें नाम माझें मळावें ६२

लावण्याची रुचिर कलिका हाय ही केंवि तोडूं
शृंगाराचें नव भवन हें सर्वथा केंवि मोडूं
चातुर्याची अनुपम खनी हाय ही केंवि फोडूं
स्त्रीहत्येचें निरतिशय मी पाप हें केंवि जोडूं ६३

हें जें येथें भवन रुचिराकार अत्यंत साजें
सौंदर्यानें सकल नयनां देतसें कौतुकां जें

आतां वेगें करिन जरि मी सर्वथा ध्वस्त यातें
आहे मातें पुनरपि तरी शक्य निर्मावया तें ६४

धात्यानें हें खरचुनि कलाकौशलातें अमूप
लावण्याचें सदन रचिलें कामिनी-कायरूप
वेगें याचा करिन जरि मी सर्वथा नाश हातें
निर्मायाला पुनरपि मला हाय येईल कां तें ६५

पाहोनीयां नयनसुभगा तारका ज्यास लाजो
नाशोनीयां तिमिर--निकरा शोभला दीप हा जो
आतां वेगें बिझविन जरी त्यास मी सत्य पाही
लावाया तो पुनरपि मला काय येणार नाही ६६

विश्वाधारें अतुल कृतिनें दिव्य जो निर्मिलासे
तन्वंगीच्या वरतनुमधें प्राणदीप प्रयासें
हा! हा! वेगें बिझविन जरी सत्वरीं मी तयातें
लावाया तो पुनरपि अहा! काय येईल मातें ६७

येथें हीं जीं बहुत दिसतीं भूषणें कांचनाचीं
शोभा ज्यांची परम सुखवी लोकनेत्रांस साची
आतां वेगें खचितचि जरी नाश त्यांचा करीन
निर्मायाला पुनरपि मला काय येतील तीं न ६८

स्त्रीजातीची कुशल विधिनें निर्मिली रम्य भूषा
शोभा जीची बघुनि रुचिरा लाज पावेल पूषा
हा! हा! तीचा करिन जरि मी सर्वथा नाश हातें
निर्मायाला पुनरपि मला हाय येईल कां ते ६९

स्त्रीजातीचें अनुपम शिरोरत्न हे केंवि फोडूं
उत्फुल्ला ही मदनतरुची मंजरी केंवि तोडूं

हा! हा! कैशी सकल--विफला--लोक पृथ्वी करावी
क्रूरत्वानें अहह वसुधा ही कशी मी भरावी ७०

युद्धामध्यें अतुल करणी दावुनी सर्व काल
जो मी वीरा थर थर रणीं कांपवी जेंवि काल
हा! हा! त्यानें अबल--ललना--नाश कैसा करावा
सत्कीर्तीला अनुचित असा मार्ग हा आदरावा ७१

मत्प्रेमाची निजतनुवरी घेवुनी रम्य शाल
शय्यागारीं कमलनयना घेत निद्रा खुशाल
विश्वासानें सकल--हृदया अंकिं जी कंठ ठेवी
छेदावा तो कपटकृतिनें हाय! मी हाय! केंवि ७२

मातें कंठीं सुतनु धरिलें मानुनी रम्य हार
हा! हा! झालों परि तुज खरा आज मी गे विखार
एणी जैसी वृककरगता तेंवि ही निःसहाय
मारावें मी अदय कृतिनें तीस कां हाय! हाय! ७३

संग्रामीं जो चरचर चिरी शत्रुंचे कंठ हातें
आहे कां हें उचित असलें चित्तदौर्बल्य त्यातें
कापट्यानें फसवुनि जिनें पीडिलें फार मातें
शंकावें मी किमपि तिजला काय मारावयातें ७४

पापानें जी परम मळवी निर्मला कीर्ति माझी
दुष्कर्मानें पतित जगतीं जाहली सर्वथा जी
सद्वंशाला निरवधि जिनें आणिला डागही हा!
मारायाला त्वरित तिजला सिद्ध निःशंक मी हा ७५

——— श्रीपाद नारायण मुजूमदार बी. ए.

## दशरथ आणि कौसल्या.

श्लोक.

स्नानासक्ता पुरयुवतिच्या गंधशाली स्तनांला
लागोनीयां वरिवरि जिच्या भंगल्या ऊर्मिमाला
हंसश्रेणी धवल कमलासारिखी जेथ शोभे
पूजाद्रव्यें विमल जलही रंगलें पुष्पलाभें १

क्रीडारंगें वरिवरि जिथें रंजवी ती करेणु
जेथें वातें उडुनि पुलिनीं संचरे पुष्परेणु
जेथें नाना सुरभि लहरी लग्न शीतानिलानें
मोदा देती जलकण; हरे कामसंताप जेणें २

ऐशी शोभे सुरभि सरयू मेखला रम्य साची
पक्षीश्रेणी मुखरमधुरा श्रीअयोध्यापुरीची
जीच्यामध्यें कुसुमितलतामंडपाच्या समाजीं
बालोद्यानीं सुफलित अशी शोभली वृक्षराजी ३

ऐशा स्थानीं नृपतिरमणीमंदिरें रम्य होतीं
जाणों येथें भुवनसुषमा संचरे दिव्यकांति
शोभा देती धवलसदनां चंद्रशालामनोरे
कैलासाचीं धवलशिखरें तुल्य ज्याच्यासवें रे ४

होत्या नाना कनकलतिका रम्यवातायनांतीं
रत्नज्योत्स्नासम पसरली त्या स्थळीं दिव्यकांती
होते नाना परिजन तिथें सुंदरीरंजनाला
वीणावाणी मधुरकवनें रंजवीतीं मनाला ५

प्रेमानंदें मधुरवचनें सारिका गोड गाणीं
गाई, लाजे परिसुनि जिची किन्नरी मंजुवाणी
मोर प्रेमें छुमछुम रवें नाचुनी धन्य होई
ज्यातें मोदें करवलयजा किंकिणी ताल देई ६

कारंजाचे उडुनि वरती मोद देती फवारे
येई जेथें रविकरगुणें इंद्रचापप्रभा रे
रांगोळ्याही सुमणिघटिता मंदिरीं भिन्नरंगें
शोभा देती; परिमळ भरे धूपधूम्रप्रसंगें ७

होतीं जेथें मुरज मुरली झल्लरी तंतुवाद्यें
भेरीघोषें पुर दुमदुमे अंबरीं नाद कोंदे
होती जेथें हृदयसुभगा काव्यसंगीतशाला
गाती भाट श्रवणमधुरा भूपतीच्या यशाला ८

चित्रें होतीं भुवनरमणी पद्मिनी चित्रिणीचीं
तैशीं नाना विमलचरितें सूर्यवंशोद्भवाचीं
हंसश्रेणी जलविहरिणी निर्मिला मानसाची
उद्यानश्री अमरपुरिची चित्रिली तेथ साची ९

ऐशा रम्यत्रिभुवनकलामंदिरीं पट्टराणी
श्रीकौसल्या दशरथनृपा शोभली रूपखाणी
माया ब्रह्मा, कनकलतिका कल्पवृक्षास जैशी
किंवा मेघा चपलचपला, सुप्रभा श्री रवीशीं १०

उद्यानाची कुसुमसुषमा; चंद्रिका वा शशीची
गंगौघाची विमललहरी, कांति, किंवा हिऱ्याची
ज्योतिर्माला उदयगिरिची, श्री सुरत्नाकराची
शोभे ऐशी दशरथनृपा रत्नमालाचि साची ११

सौंदर्याचें सदन अथवा सार तें सारसाचें
आनंदाचें भुवन अथवा रंजन प्रेमळाचें
नेत्रानंद प्रचुर बिलसे रूप त्या सुंदरीचें
जाणो तेज त्रिजगिं पसरे प्रेमरत्नांकुरांचें १२

जीच्याभोंती मधुकर करी मंजु गुंजारवातें
आश्चर्यानें चकित हरिणी होय पाहूनि जीतें
होई नम्रा कुसुमितलता देखुनी सुंदरीतें
वाणी जीची श्रवणमधुरा मौन दे कोकिलेतें १३

सेवाधर्मी परिजन झटे मोद द्याया मनासी
होती जेथें अगणित जरी साधनें रंजनासी
श्रीकौसल्या सुखद सदनीं भूप जों येत आहे
तों त्या स्थानीं विकल हृदया खिन्नदेवीस पाहे १४

चिंताक्रांतास्तिमित नयना निश्चलाते सुशीला
बैसे खिन्ना निजकर अहा ! लाउनीया कपोला
दासी झाल्या चकित नयना निष्प्रभा चंद्रलेखा
आश्वासाया कुशलरमणी धांवल्या सर्व देखा १५

पुष्पासंगें कच विखुरले म्लानता ये मुखाला
कंठीं होता कुसुमसुरभी हार तोही गळाला
शालूसंगें स्तनहि भिजले अश्रुबिंदुप्रपातें
जाणों मुक्तांजलि वरुनिया सोडिते अप्सरातें १६

प्रत्युत्थान प्रियपतिस तें देउ जाता शुभांगी
प्रेमें तीचा कर धरुनिया बैसवी तो पलंगीं
कुर्वाळोनी वदन पुसुनी अश्रुबिंदु स्वहस्तें
राजा प्रेमें सदय हृदयें बोलता होय तीतें १७

कां म्लानत्व प्रियसखि असें या मुखांभोरुहाते
अंतःशोक स्फुरित हृदयीं दुःख मावे न कां ते
मुक्ताजालग्रथनकुशला अश्रुनीं पक्ष्मपंक्ति
झाली तेणें अरुण कमलासारिखी नेत्रकांति १८

नाहीं झाले चरण तव हे रक्त लाक्षारसानें
तेणें आलें अरुण कमला आजि धन्यत्व जाणें
कर्णी कां गे कलरव न ये या स्थळीं नूपुरांचा
कां गे मूकामणिमय तुझ्या किंकिणी मेखलेच्या १९

भिन्न च्छाया नयनसुभगा त्यागिली रत्नमाला
अश्रुक्लिन्ना अरुणरचना दैन्य दे या कपोला
नाहीं शोभा प्रियसखि जयां कर्णपूरप्रभेची
त्या दीनातें मग वद सखे पांडुरी ये न कैशी २०

गे या भालीं तिलक न दिसे आजि गोरोचनाचा
लोकीं ख्यात प्रणयतिलक स्पष्ट जो सुंदरीचा
नाहीं केली कुसुमरचना रम्यनीलालकां तीं
निश्चंद्रा गे जणुं मज गमे शार्वरी नीलकांति २१

हृदय धडधडे हें दीर्घ निश्वासयोगें
अधर थरथरे हा कांपतीं कोमलांगें
वरिवारि तुज मूर्च्छा येउं पाहे कृशांगि
असुखभर वरांगे ताप दे अंतरंगीं २२

सखि सकल सुखाचें मूल ज्यां रम्यहास्य
वदनकमल ऐसें स्थान जें रंजनास
बघुनि कमलनेत्रे खिन्न गे दुःख होई
सदयहृदय कांते एक या साक्ष देई २३

प्रियजनपरिरंभा अन्य नारीस देतां
बघुनि तुज जडे हें काय गे स्वप्नचिंता ?
हंसत, सखि, सपत्नी मैत्रिणी, मंदिरातें
बघत बघत गेली यामुळें खिन्नता तें २४

नवल मजसि वाटे मौन हें आजि कां गे
कवण तुजशि देई तापसांगे शुभांगे
परिजनकृतमन्युत्रस्त हें चित्त झालें
गुरुतर तव शोका कारण स्पष्ट बोलें २५

नरपति बघुनीया स्तब्ध ऐशी मृगाक्षी
परिजनगण बाहे लोकसंसारसाक्षी
लगबग मग आली चंचला एक दासी
तिजशिं नृपति बोले " काय झालें प्रियेशी " २६

नृपतिचरण भावें वंदुनी शीघ्र दासी
विनय मधुर ऐसें बोल बोले तयासी
सदयहृदय देवा धर्मपाला नृपाला
गणि तनुसि अधन्या स्वामिनी हे दयाळा २७

सकलरिपुकुलाचे काळ जे नाथ जीचे
जवळ असति ऐसे रक्षणीं सज्ज साचे
छळिल कवण ऐशी राजभार्या जगीं या
परिजनगणआज्ञापालनीं दक्ष आर्या २८

जरि परम सुखाचें स्थान तें सन्निधानीं
अभिनव तरुणीचें सार हें रूपखाणी
सकलसुखविलासी मंदिरीं पुष्पबाण
निशिदिनिं परि देवी होतसे हाय खिन्न २९

अशनशयनपान त्यागिले भोग सारे
नयनसलिल वाहे सर्वदा शोकभारें
बघुनि सकल ऐशीं भूषणें जागजागीं
खचित गमति मातें या क्षणीं ही अभागी ३०

सुकुनि विगतभा ही जाहली पुष्पशय्या
पडुनि सकल पात्रीं राहिले हार वाया
विफल पडुनि राहे गंध हें चंदनाचें
कवण उघडिताहे पात्र हें तांबुलाचें ३१

अति करुणवचेंही सारिका साद घाली
प्रियजनवचनाची विस्मृती हीस झाली
जवळ जवळ येई बाळ लोभें मृगाचें
विकळ हृदय ठावें काय त्या स्वामिनीचें ३२

चतुर पति विलासी कल्पवृक्षासमान
अभिनवमधुवल्ली सुंदरी हे सुजाण
सुखकर रमणी या प्रेमळा संगमाचें
फल अझुनि दिसे ना भाग्य जें या जनांचें ३३

अभिनवसुषमा या इंदिरामंदिराची
जणुं सकल सुखाची रम्य शालाचि साची
जरि बहुदिन येथें संचरे प्रेम बाई
अझुनि अहह दैवीं नंदनानंद नाहीं ३४

छवि धवल विराजे ज्या स्थळीं चंद्रिकेची
मणिमय नवमाला ज्यावरी निर्झराची
गिरितटगत ऐशा माधवी कुंजगेहीं
प्रभुचरण नमोनी पुण्यसाफल्य नाहीं ३५

तरुवरफलभारें ज्या स्थलीं नम्र होतीं
कुसुमित सुलताच्या रंगल्या जेथ पंक्ति
सुधवल बिसमाला रम्य फुल्लारविंदें
विमल जलतरंगीं डोलती जेथ मोदें ३६

सुचवि करुनि जेथें कोकिला कूजिताला
मदनसखवसंत स्त्रीजनानंद आला
मधुवन जरि ऐसें धन्य झालें विलासें
अझुनि न सुख दैवीं वत्सला माउलीचें ३७

अभिनव सरयूच्या संगमांतस्तरंगा
वरुनि पवन वाहे मोद दे अंतरंगा
असुनि पुलिन ऐसें साधन प्रेमरंगा
अझुनि न मळवाया बाळ या कोमलांगा ३८

निशिदिनिं ह्मणुनीया होतसे खिन्न देवी
करुण वचन आह्मां बोलण्या दैव लावी
वरिवरि बघुनीया धूसरा चंद्रिकेतें
अतिकरुणभरें ये पाझर प्रस्तरातें ३९

करुण वचन ऐसें ऐकुनी किंकरीचें
हृदय खळबळोनी राय तो स्तब्ध बैसे
दृढतर परिरंभा देउनीया मुखातें
पुसुनि निजकरानें बोलिला सुंदरीतें ४०

प्रियसखि बघ ऐशी खिन्नता व्यर्थ आहे
शुभकरसमयाला पाहिजे दैव पाहे
प्रियसुतहृदयाशीं चुंबुनीया धराया
विधिबळ नच आह्मां साह्य हा शोक वाया ४१

अमुख सुख सखे दे कर्म जन्मान्तरीचें
शुभकरविधियोगें पुण्यसाफल्य साचें
प्रभुवरचरणांतें भक्तिभावें भजोनी
तनयसुख मिळे हें बोलिजे सज्जनानीं ४२

गुरुजनरुचिराशीं साधुसंगप्रभाव
ऋषिवरचरणाच्या वंदुनी प्रेमभाव
हितकर सखि तेणें ईप्सितप्राप्ति होय
सदय मुनि न देती नंदनानंद काय ४३

खचितचि मज भासे मूढ हें अंतरंग
उठति सखि विकारें जेथ नाना तरंग
छवि धवल मुखीं या गर्भभारें बघावी
शशधरधवलांगा चांदणी रात्र जेवी ४४

अलसलुलितगात्री, गर्भखिन्ना प्रियेतें
बघुनि कधिं शुभांगे मोद होईल मातें
परिजन कधिं वार्ता पुत्रजन्मोत्सवाची
करितिल कथुनीया धन्य गे या जिवाशीं ४५

स्मित वदन जयाचें दर्शनानंदकारी
रुचिरतर तनूचा हर्ष दे स्पर्श भारी
धरुनि सुमुखि ऐसें तान्हुलें अंकदेशीं
कधिं रुचिर करानें सारिशी कुंतलाशीं ४६

हंसत हंसत येतां कोवळ्या दंतपंक्ति
रुचिर हिरकण्याशा आननीं शोभताती
पदर धरुनि शाल्क ओढुनी स्तन्य मागे
उचलुनि कधिं ऐसे चुंबिशी बाळ सांगे ४७

मधुर मधुर ऐसे नाद जे पैंजणांचे
मधुर मधुर ऐसे बोबडे बोल साचे
मधुर मधुर ऐसें सौख्य गे चुंबनाचें
मधुर मधुर गाणें बाललीलामृताचें ४८

सखि सकलहि चिंता सोडि हा खेद आतां
सुखकर गुरु नित्यानंदकल्याणकर्ता
सुकृत, विमलतेज, ज्ञान ज्याचें वरिष्ट
करिल खचित आह्मां धन्य लोकीं वशिष्ठ ४९.

मधुर मधुर ऐसे बोलुनी बोल रायें
शमवुनि दयितेचा शोक नाना उपायें
पुसुनि नयनपद्में निर्मळा शेलियानें
हृदयिं धरुनि तीतें तोषवी तो दयेनें ५०

विठ्ठल भगवंत लेंभे.

## रतिविलाप.

( कुमारसंभव. )

श्लोक.

सहन करण्या वैधव्यातें विबोधित होतसे;
विकल नयनें पाही कान्ता न तों तिजला दिसे !
" अहह ! रमणा ! नाथा ! " बोले उठूनि रती सती,–
रमण न तिथें पाही, दग्धा दिसे पुरुषाकृती. १
अवश ललना वैक्लव्यानें पडे धरणीवरी;
गडबड सती लोळे शोकें विषण्ण मही करी;

कच विखरती, मालिन्यातें रजें उर तें धरी;
व्यथित–हृदया बोले बाला सुदु:खद वैखरी. २

कळसचि जिथें सौंदर्याचा तुझें वपु जें असें
त्वरित कुदशा आली त्यातें ! अभाग्य अहो ! कसें ! !
स्थिति उलट ही पाहायातें, सजीव असे रती !
खचित हृदयीं आह्मी वाहूं कठोरपणा किती ! ! ३

क्षण न लगतां प्रेमातें त्वां झुगारुनि टाकिलें !
शरण तुज जी, कोणापाशीं तुवां तिजला दिलें ?
मन दुखविलें स्वप्नींही त्वां न, मींहि तुझें प्रिया !
त्यजिशि मग कां ? झालें आतां कशी रति अप्रिया ? ४

कठिण कमलें क्रौर्यें तूतें समत्सर ताडिलें;
हृदय भरलें मात्सर्यें हें प्रिया ! तुज वाटलें.
उपजुनि मनीं निर्वेदें कां मला अवमानिलें ?
वद वद मनीं आतां नाथा ! न मार्दव राहिलें ! ५

मज फसविलें वाटे आतां; मला कथिलें यदा–
हृदयकमलीं वास्तव्यातें प्रिये ! करिशी सदा;
अनृत जरि हें नाहीं, येथें खुशाल रति असे ! !
प्रियकर तिचा होई दाहें अनंग; पहा कसें ? ६

गमन करिशी स्वर्लोकीं तूं तिथें मज यावया–
झडकरि तुला भेटायातें, विलंब नसे प्रिया !
जगपरि गमे दुर्दैवी, तूं इथें नसशी जरी;
सुख तुजमुळें ह्या लोकांचें, कथा वदती खरी. ७

निबिड तिमिरीं रात्रीं सोडी गृहा अभिसारिका;–
प्रणय विवशा शोधायातें निघे रमणा स्वका;

घनरव करी तन्वीतें ज्या मनीं अति विव्हला;--
तुजविण तिला न्यावें कोणीं तदिच्छित त्या स्थला ? ८

कोणीएक कवि.

## भ्रमर आणि लतिका.

श्लोक.

पद्मांनीं भरला सुरेख रचिला स्त्रीदेह तो एकला--
पाहोनी, भ्रमला तदीय कमला; सेवावया लोभला.
देहस्वामिनिला मुळीं न रुचला त्या लोंचटाचा लळा;
रागें लोटियला तिनें भ्रमर; तो दुःखानळें पोळला ! १

" रे ! रे ! दुर्बळ तूं तुझें भ्रमण बा ! निर्जीव पुष्पीं बरें;
ही तों यौवन--पुष्प--माळ तुजला योग्या न दूरीं सरें.
तूतें यौवन, बुद्धि, आयु ह्मणुनी हीचा नको रे ! करूं--
आतां लोभ पुढें; बरें उमजुनी, चिंती मनीं ईश्वरू. " २

" अहह ! कळतें मातें ऐसें, तरी विरह्या अशा--
अनुदिनिं लते ! घालोनी ना तनू करितों कृशा;
सदनिं तुझिया राहों कैसा ? बरें बन वाटतें;
विमल लतिके ! शोकें माझें किती मन दाटतें ! " ३

माधवात्मज.

# काव्यरत्नावलि.

अंक ३ रा.


## श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा मृत्यु.

गीति.

ग्रीष्में संतप्त जनां निववुनियां मेघ शांत हो कांहीं,
वापी, तडाग, तटिनी भरुनि जलें पूर्ण वाहती पाहीं. १
वृक्ष, लता, उद्यानें होउनि विमलें, मनोहरें दिसती;
भूषवि मही तनूतें तृणांकुरें नव्य, जेविं नव युवती. २
निकट गणेशचतुर्थी यास्तव संभार संभ्रमें करिती
पुण्यपुरीं सर्वहि जन; सौख्याब्धीतें अतीव ये भरती. ३
एके दिनीं प्रभातीं प्रातर्विधि संपवीत राघोबा
असतां आनंदी ये, ह्मणे मनीं 'कार्य सिद्ध कर नशिबा!' ४
येतां समीप वदली, 'मातें द्या एक आपुलें वचन,
हित यांत थोर तुमचें, जाणावें मात्र अल्पही मम न. ५
प्राणापरीसही प्रिय मानितसां मज, जरी असेल खरें,
'नारायणा वधावें' लिहुनी द्यावें तुह्मी तरी स्वकरें' ६
राघोबा तीस वदे, "आनंदी कालवीसि कां माती?
ही दुष्टबुद्धि सोडीं, येइल नच तुज कदापि कामा ती. ७
हा नारायण सुतसा मज तुजही, पुरविले तुवां कोड.
जलसेकें वाढविला त्या तरुची योग्य का नरा तोड? ८

शिशु पंद मारी माते अंकीं घेतां, त्यजी न तरि माया;
तैसाच अल्पबुद्धी समजुनि तूं कष्टवूं नको काया. ९
अंतीं नाना वदले, रघुनाथा ! पुत्र हे तुझे आतां
अधिक न कांहीं वदवे, करिसिल पालन, समर्थ, तूं ज्ञाता. ' १०
तें तुजला स्मरतें का ? निजवंशांकुर असेचि नूतन हा,
यातें खुडुनि त्यजितां ह्मणत्रिल सतत न काय निजमन हा ? ११
जरि वक्र होय वळवुनि कीर्तीच्या मंडपावरी योजीं,
असिवाणी असि वाणी शत्रुमुखींही कधीं न पारि यो जी ! " १२
आनंदीबाई मग बोले, ' हित वच तुह्मां अहित गमतें;
वैद्यवचा तुच्छ करी रोगी, अल्पायु, बालचि स्वमतें. १३
नानांचा थोरपणा वर्णा तूह्मी परी मला ठावा,
कावा तसाच होता, शंभु तुह्मी हो ! खराच वाटावा. १४
आपण इथें बसोनी धाडित होते तुह्मां रणामाजी,
हित काय वदा केलें ? विजयी झालेत जरि सदा गाजी. १५
एखादे समयीं जरि लागे पैका बहू जयासाठीं,
उपमर्द करुनि तुमचा शब्दशरें टोंचिलें तुह्मां पाठीं— १६
ज्या माधवास मानुनि जीवापरि कौतुका सदा केले,
कारागृहांत घालुनि त्यानें उपकार थोर फेडियले ! १७
तैसेंच या अहीतें पाजुनि उपकारदुग्ध पाळावें,
ह्मणजे मृत्यु सुखानें लाभेल तुह्मा, कशास रण व्हावें ? १८
देहींचा रोग ह्मणुनि पोसावा कां सुखें नरें देहीं ?
तैसा गमे मला हा, राखावें केविं यास हो गेहीं ? ' १९
रघुनाथ वदे तीतें, ' दयिते ! तद्वध गमे न मज युक्त '
आनंदी बोले कीं, ' करिल भयांतूनि तो तुह्मां मुक्त. २०
आतां तरि सावध व्हा स्मरेल हितवच तुह्मांस हें माझें;

मत्तेज पहा आतां, गेलें तुमचें जगांत जें गाजे.' २१
निज निश्चय करिल पुरा आणुनि चित्तीं तदा वदे तिस तो
रघुनाथ, 'धरावा' हें लिहूनि देतों, करीं न परि वध तो.' २२
'नारायणा धरावें' फिरवुनि करि ती तयास 'मारावें.'
वित्तें लोभांध नरा फसवुनि कां संकटीं न घालावें ? २३
देउनि पत्र तुळाजीजवळ वदे दे सुमेरसिंगास.
जरि काम पूर्ण होइल वित्तें तुझिया भरीन धामास. २४
नंतर एके दिवशीं नारायणराव जेउनी उठला,
आंदोलकीं बसूनी, सेवित तांबूल घेइ जों झोला, २५
तों प्रासादद्वारीं गारदि करिती त्वरें बहुत गर्दी,
सेवकगण मग धावुनि, त्यांतिल तत्क्षणिं बहुतसे मर्दी. २६
गारदि असंख्य यास्तव दासांचें त्यापुढें न हो ! चाले,
पावति नाश जरी ते झुंजति नेटें धरूनियां ढाले. २७
दुर्वृत्त ऐकुनी हें भीतीनें धावलीं स्त्रिया, बाळें;
तेव्हां गमलें हरिणी, हरिणीशिशु पळविलेंचि मृगपाळें. २८
हें वृत्त श्रुत होतां द्वारावरते त्वरें कितिक पडले,
नारायणरावा किति, किति आनंदिस कथावया जुडले. २९
तों आंत गारद्यांनीं येतां द्वारेंचि बंद हो केलीं;
तेव्हां जनांस वाटे कृतांतकटकेंचि काय हीं ठेलीं ! ३०
चाफाजी श्वासातें टाकित ये जेथ बैसला होता
नारायणराव तिथें, परि न मुखांतूनि शब्द ये पुरता. ३१
नारायणराव, वदे 'चाफाजी ! तूं भिऊं नको बोल.'
चाफाजी त्यास वदे, 'दगा दिसे घालवा न हो ! काल. ३२
ठावें आहे मजला त्या विवरें पाडितों तुह्मां पार,
कसला विचार करितां ? ठेवा देवावरी चला भार. ३३

असिखदावज्वाला कर्णतृणातें अहा ! पहा स्पर्शे,
कां मौन ? संशय वसे चित्तीं ? शिवतों तरी पदा शीर्षे. ' ३४
नारायणराव वदे, ' शूरा ऐसें अयोग्य जें जाणें,
त्याहून वीर्य दावुनि जावें स्वर्गीं असेंच मी जाणें. ३५
कीं दादांनीं केला आहे हा भेद जाणतों सर्व.
यास्तव करितिल रक्षण तेचि, जसा दीन रक्षितो शर्व. ३६
सोपानांतुनि उतरुनि नारायणराव चौकिं जों शिरला,
तों धेनु मागुनी ये वाटे अवनास धर्म अवतरला. ३७
त्यावरि सुमेरसिंगप्रमुख बहू गारदी तदा पडले,
तैं धेनु आडवी; ते कौशिकजन, नंदिनीच ती गमलें. ३८
पूजा व्हावी तेथें दुष्टांनीं नाश हो ! तिचा केला !
क्रुद्धा नरास देइल सुविचार कधीं तरीहि हाकेला ? ३९
नारोबा फाटक ये धावत धावत करावया अवन.
स्वामिवचा वपु वेंचिति, काय न कायार्थ काय ते सुजन ? ४०
गारदि वधार्थ येतां धांवे काकाकडे " वदे काका—
पदरांत बाळ घ्या हा सत्वर आश्रयपटें मला झांका. " ४१
राघोबा ! त्यास वदे, ' नारायण ! भीति तूं त्यजीं सारी;
स्वापत्यनाश इच्छुनि सुखी कधीं होय काय संसारी ? ' ४२
पाहुनि सुमेरसिंगा राघोबा बोलिला, ' जरा थांब,
दे जीवदान सिंगा ! रे ! त्वत्कल्याण करिल तो सांब ४३
बोले सुमेरसिंग, ' व्यर्थ अतां हें, असेंच जरि पूर्वी
वदतां, तरि मग तुमच्या विमलयशा गाति नित्य ती उर्वी. ४४
आतां जरि सोडूं या, करिल न अमुचा, करील कुलनाश;
सर्पासहि ह्मणविल वर, तो पद दे त्यास करितसे दंश. ४५
या इकडे लोटुनियां ह्मणजे देतों क्षणांत त्या मुक्ती,

निष्कंटक राज्य करा, नलगे मिळवावयास मग युक्ती. ४६
सोडा, लवकर सोडा, नाहीं तरि घालितों पहा घाव,
अथवा असि करिं घेउनि साधा हो ! आपुला तुह्मी डाव. ४७
नाहीं तरी नका हो ! सोडूं हा घातलाच असि माथां,
ऐसें वदूनि उचली असि, तैं दादा त्यजी दुरी घाता. ४८
राघोबा न मनीं घे, स्तवि यास्तव तो सुमेरसिंगास,
' मद्रक्षणिं यश पसरो, अपकीर्ति शिवो तुझ्या न अंगास. ४९
न करीन घात तव मी, देतों हा घे तुझ्या करीं हात,
देइन वित्त बहूतहि, मोडिन वच तरि करील भव घात. ' ५०
अग्नीवरी नव्हे तरि सान्निध्यानेंहि तें विरे आज्य,
ऐसें वदशिल तरि मी देउनि जातों तुझ्या करीं राज्य. ५१
जेव्हां सुमेरसिंग स्थिर राहुनियां करी विचार मनीं,
तइं त्या विचारदहना वित्ताशा जाहली खरी धमनी ५२
तों आनंदी बोले, ' सुमेरसिंगा विचार कां करिसी ?
संशय विष, अमृत नसे, निजावनास्तव करांत जें धरिसी. ५३
बहु काळ लंघिला त्वां आतां करिशिल पळैक जरि उशिर,
मज निश्चयेंचि वाटे, अरिहस्तें हरविशील तूं स्वशिर. ५४
असि वरि करी तुळाजी, चाफाजी तोंच त्यास अडवा हो.
दोघांहि वधी. भूनें रक्तमिषें अश्रुवर्ष केला हो ! ५५
हें वृत्त ऐकुनीयां नानादिक सर्व धावले मंत्री,
द्वारास बंद पाहुनि ते झाले गुंग तत्क्षणीं मंत्रीं. ५६
चढुनी शिडीवरूनी पाडावें द्वार मंत्र हा ठरला,
तों द्वाररक्षक वदे, ' नारायणजीवतंतु हो ! तुटला. ५७
हें ऐकतांच झालें दुःखभयें व्याप्त चित्त सर्वांचें,
गेले झणि मंत्रालयिं परी तयांच्या न शब्द ये वाचे. ५८

आनंदीबाईनें वाटविली शर्करा जनां मोदें,
परि ती त्यांनीं विषसम मानुनियां दूर फेंकिली खेदें. ५९
दिल्ली दरवाजातें उघडुनि जों गारदी पळायातें–
लागति, तों त्या घेउनि कोंडी जें सैन्य एकवटलें तें. ६०
प्रातःकाळीं यावी कोमलरविराशिनेंहि जिस मूर्च्छा,
ती गंगा खर किरणा सेवित आली करीत तनु तुच्छा. ६१
जाउनि पतिजवळी ती आलिंगुनियां ह्मणे, ' अहा! काय–
झालें तुह्मां ? वदा कीं, शोकाग्नीनें प्रतप्त हा काय! ६२
एकाकी जायाचें यास्तव का धाडिलेंत माहेरीं ?
ऐसें कदा न होइल, अजुनी तुमची दया मला हेरी. ६३
क्षणभरि जरी न दिसलें, व्याकुळ होऊनि शोधिलें मजला.
आतां मी व्याकुळ तरि नेत्राची पापणी जरा नुचला! ६४
एक दिवस जरि झाला विरह, तरी वाटला युगासम तो;
आतां सदैव केला, पळापरी कां तुह्मास ह्य गमतो ? ६५
अपराध थोर झाला, यास्तव मजवरति रोष हा करितां ?
तरि ती क्षमा करितसां, आजचि कां हो! स्वहस्त आवरितां ? ६६
निजसत्कृति घेउनियां संगें स्वर्गीं रमावया गेलां,
प्राणप्रिय असुनीही, त्यजितां ह्या एकल्याच रामेला! ६७
पापी ह्मणूनि मजवरि, प्रिया महाराष्ट्रभूमिवरि तरि का
रुसलां ? सांगा मजला हो! मत्सौभाग्यरत्नसत्तिलका! ६८
मत्पाणीग्रहणीं जें वदला तें सर्व विसरलां काय;
जातां श्रम बहु होतिल, तेव्हां निववील कोण हा काय ? ६९
आशैशव वाढविलें ज्यांनीं त्यांनांहि काय हो त्यजिलें ?
त्या ह्या तुह्मांस वाहति, अदयेतें आज केविं हो! वरिलें; ७०
युष्मद्वंशीं झाले शूर तयां जोडिलें करां अरिंनीं,

हें वृत्त ऐकुनी ते आनंदें नाचतील अजि भुवनीं ! ७१

धर्मन्यायें वागसि धर्मा ! तुज धर्मराज जन वदतीं;
परि आज कां न वागसि ? मी पापी परि अपंग हे असती. ७२

नाथा ! जाउं नका हो ! आल्यें ही मी, अधीर कां होतां ?
सेवा करीन तुमची, तेणें सुखकर गमेल तो पंथा. ७३

मग पार्वतिबाइकडे वळुनि वदे, ' सासुबाइ ! मज आज्ञा
द्या सहगमना, जातें, वसवेना या जगीं, तुह्मी सुज्ञा. ७४

पार्वतिबाइ वदे तिस, ' गंगा ! तूं काय गे ! असें करिसी ?
हा हट्ट सोडुनी दे, वंश वृथा आपलाच बुडवीसी ! ७५

जोडावया सतीयश जाशी तों बाळघात ये पाठीं,
या भटकुलवृद्धातें नाशावें का हिरोनियां काठीं ? ७६

पत्यंशबाल यास्तव अव्हेरीतां रुचेल का पतिला ?
कुंती सुतावनास्तव न त्यजितां देह राहिली महिला. ७७

ती उत्तरा तुझ्यासम परि गर्भास्तव करी न सहगमन,
राहे तशीच धीरें पाखडि तिजवरि जरीहि आग मन ! ७८

सोडी न हट्ट, नाना ! ठेवा दृष्टी हिच्यावरी आतां,
वाटे करील चुकवुनि निजजीवाच्या बळेंचि ही घाता. ७९

नेउनि शव श्मशानीं यथाविधी करविलें तिथें दहन,
हळहळती जन सारे, ह्मणती मायाच ईश्वरी गहन. ८०

---

बा. सी. जोशी.

## महाराष्ट्रमहोदय.

### नमनाध्याय.

आर्या.

ओंकारनाम वाचें उच्चारुनि आर्यकाव्य आर्यांनीं
आरंभूं कीं व्हावें संतत सूद्योगसक्त आर्यांनीं १
कार्याच्या आरंभीं देवाच्या मी प्रणाम पायांस
करितों; हरण करो तो माझ्या कार्यांतल्या अपायांस २
मुनिजन–मानस–हंसाकंसारातें तुला असो नमन
प्रतियुगलीलाकर तव पदयुगलीला त्यजूं कधीं न मन ३
किंकरशंकर गिरिजापरमेशाचरणदयानदी नातें
ध्याउनि नमितों सुमनें निजवर तो देउ लीन दीनातें ४
संकटकानन जाळी जो, त्या विद्यार्णवा गजास्यास--
ध्यातों, सकरुण पाहो तो या निजचरणलीन दासास ५
पदवीस पढवि चढवी सुवचें वदवी स्वदास वदनानें
श्रीमत्‌ब्रह्मसुतावाक् देवीला त्या प्रणाम करिं सुमनें ६
जे जे होउन गेले मोठे मोठे कवी तयांनांही
स्मरतों, वरें जयांच्या मजला उरणार यातना नाहीं ७
श्रीमच्छुक मुनि तैसा वाल्मीकि व्यास पूर्वकविराजे
नमिले, कविता ज्यांची त्रिभुवनिं सन्मानपूर्वक विराजे ८
नमिली आर्याजननी म्लेंच्छांचा होय फार भार तिला
ह्मणुनी " सावध व्हा " जी स्वकीय पुत्रा वदे स्वभारतिला ९
वंदिन आर्यानंदन सत्कवि ज्याचें उदार निजशील
देउनि सुबोध आह्मां; तो नच हृत्ताप दूर सारील ? १०

किति वदुं नामें ! भारत--जननी व्याली अनंत सुकवीतें
निजवर्णनिं जें शेषाऽनन यज्जिव्हा अनंत सुकवीतें ११
कांहीं जे मत्स्मरणीं येतिल त्यांचाच नामनिर्देश
संतोषें करिन परी न धरावा तदितरीं मनीं रोष १२
श्रुतितें स्मृतितें तैसें सर्व पुराणा महापुराणांस
तत्कर्त्यासह भावें वंदिन तद्गर्भ सर्व देवांस १३
प्रथम महाराष्ट्रगिरा वीता कवितासुता यदानन हो
तिस पाळणा मुकुंदा त्या सादर मम सदैव वंदन हो १४
हासविली, खेळविली; श्रीज्ञानेश्वर निवृत्ति सोपान
मुक्ता; यांहीं कविता. गमतें यद्रच निवृत्तिसोपान १५
ज्ञानेश्वरादिकांसह जीची क्रीडा नवी जयासंगें--
ने लोकमनें हरुनी, स्मरतों तो चांगदेव अनुरागें १६
मानीं मान मनीं मी नामानमनीं निनाद नामाचा
हरिच्या, अघहर करि जो कर्णीं सर्वांचिया सदा साचा १७
सद्गुरुजनार्दनीं यन्निष्ठा अत्यंत एकनाथास--
नमितों, यत्गृहिं खपतां दीनांच्या तोष एकनाथास १८
दंभदशाननीताशोकान्तःस्थ स्वभक्ति हेतु कुजा
संशोधक कविसा जो आवडता विठ्ठला तुका समजा १९
आनंदें त्या वंदन करितों मी जो अभंग वाणीनें
वळवी अभंग हृदयें तारुनियां आपणांसवें जननें २०
नमिला बोधाचा जो मूर्त, श्रीरामदास, संतान
कथि जो स्वप्राणाधिक मानी श्रीराम दास संतान २१
ससखश्रीहरिविजया रचि जो श्रीधर तयास आधीं न
तद्वर्ण्य नमुनि मग मी नमितों कविता जयास आधीन २२
मुक्तेश्वरास नमितों मुक्तांचा सत्य होय नायक तो

तो जर नसतां प्राकृत भारत आपण कधींहि नायकतों २३
शिवराजसभाभूषण भूषण सत्यचि नभी असा सुकवी
भाषालंकारांबुधि जो शिववर्णनिं घसा तसा सुकवी २४
आर्यारसना रमली स्वपतिमुखीं कीं जणूं उणाचि रस
यन्मुखि बघुनि वदे मा तिस ' तूं मजहून चंचला सरस ' २५
वाजो स्वातिघनरसें मुक्तालयमुख तसेंच रसिकांचे
उघडीं स्वतोषदर्शनिं नमन करीं मी अशा मयूराचें २६
तद्भक्तांच्या लीला वर्णुनि ज्यानें महेश तोषविला
नति त्या महिपति कविला करितां आनंद फार मन्मतिला २७
गुरुचा प्रसाद व्हावा मज त्यातें आज आदरानें ती
प्रणती करितों विलया शिष्याच्या सर्वथा दरा नेती २८
मातापितापितामह यांच्या याचीन मी न आशीस ?
व्यर्थ तरी मम सुतता होइल त्यांच्या पदीं असो शीस २९
इतिहास लिहावासा वाटे कांहीं मला स्वदेशाचा
वंद्य ग्रंथ मला या कामीं भूपतिसभासदेशाचा ३०
सामर्थ्य मला नाहीं कथण्या इतिहास साग्रसारंभ
सांगेन स्फुटही मी गोष्टी; केवळ असेंच मी शुंभ ३१
केव्हां विश्वासातें योग्य कधीं परि अयोग्य वाटेल
मल्लेख आपणाला परि चित्तीं स्वाभिमान दाटेल ३२
विश्वासायोग्यत्वा कारण परदेशलेखकांनीं ती–
चव आमुची फिरविली योग्य न ही देशलेखका नीति ३३
इतिहासलेखकांचें काम लिहावें जसें असें घडलें
ऐसें कथिती परि मज न दिसे तत्ग्रंथिं हें कुठें दडलें ३४
इतिहासलेखकांची लागे अपसांत कीं चढाओढ
अन्योन्यविरुद्ध अशी त्यांची दिसते बुधांस धरसोड ३५

एक स्वपक्षरक्षणिं विपक्षलक्षण पदोपदीं भेदी
च्छेदी तत्सिद्धांता; स्वछंदी सर्व मी अशा वंदीं ३६
एक कथी एक तरी दुसरा दुसरेंच वृत्त सांगतसे
लागे न सदसदाचा थांग कुणाचें न वृत्त सांग तसें ३७
इतिहास हा सहेतुक नसुनी न कधीं खपे तया नखरा
अश्वासचि अश्व ह्मणां नाम न तें ध्याल चांगल्याहि खरा ३८
स्वोदरपूर्ति घडाया रण कोणीही करील सामान्य
सत्पथ जो दावाया जनास रण करि न तो कसा मान्य ३९
ऐशा परोपकारीं लोकीं ऐतीह आपुलें लिहिलें
तदनुकरणपटु व्हावें भरतीं त्यांचें करावयास भलें ४०
मूर्खत्व आमुचें त्या आलें कोठें कसें कसें आड
याची उदारधींनीं नाहीं केली कुठें परी फाड ४१
सच्छील तें तयांचें परि आतां ज्ञान आपणां आलें
मूल्य तयाचें कळण्या मौर्ख्यहि मागील पाहिजे कळलें ४२
त्यासाठीं वाटे मज यत्न करावा कसाबसा माना
आहे मज ठावें मी पात्र न होईन सावसा माना ४३
बहु धूर्त मूर्त सकला कला तयाना सदा वरायाची
हाव धरीती मीही यशोर्थ त्यांच्या सदा वरा याची ४४
स्वजनशिवाकर जो श्रीशिव त्या करितों समान मी नमना
जलनिधिवांचुन द्यावा वाटे कोणास मान मीनमना ४५
झटला जो शिवनृप कीं यवनत्रासें न दीन मज्जन हो
वाटे अजि रसने मम शिवकर तद्गुणनदीनमज्जन हो ४६
श्रोते वक्ते पाठक यांनीं माझी विनंति परिसावी
दृष्टि गुणावरि द्यावी दोषग्रहणीं न बुद्धि लावावी ४७
भारतभूभागमहाराष्ट्रविभूषणसुवीरचरितातें

ऐकावीं मद्रचितें, तोकवचें बोबडीं जशीं तातें ४८
रसिका पाहुनि येइल कंटाळा दीर्घ रीत नमनाची
काय करूं त्यावाचुन या माझ्या शान्ति होय न मनाची ४९
यास महाराष्ट्रमहोदय हें सन्नाम देतसे प्रेमें
वाचोत आर्य यातें त्या वेळीं जो उरं सरुन कामें ५०
कार्तिकवद्यत्रितिये नमनाचा होय पूर्ण अध्याय
शकसोळाशें सोळा कुसुम शिवाचे पुजेस हें जाय ५१

नारायण कृष्ण गद्रे.

## रामकथासार.

श्लोक.

श्रीरामराम रघुनंदन रामराम
श्रीरामराम सुयशोधन रामराम
श्रीरामराम जनरंजनधाम राम
श्रीरामराम दुरितान्तक रामराम १
श्रीरामचंद्रचरितामृतमाधुरी ती
आनंद दे, हृदयरंजन, साधुरीती
ज्याचीं यशें धवलचंद्र–करांकुरश्री–
तुल्यें, सदैव कवि वर्णिति यज्जयश्री २
वाल्मीकिगी हृदयरंजनशालिनी ती
वर्णी सुरम्य त्रिभुचे गुणवीर्य कीर्ति
प्रत्येक रम्यरससंकलित प्रसंग
मंजु–स्वनें करि सदा हृदयासि दंग ३
तंत्रीलयास्पद सुरम्य सुमंजु गीते
आल्हाद दे सहृदय श्रवणेन्द्रियातें

नाना उदात्त लहरी कविकल्पनेच्या
जाणों नद्या सुधवला मधुरा रसाच्या ४
जेणें उदार चारितें रघुनंदनाचीं
माला जणों रचियली हरिचंदनाची
ऐशा पुराणकविच्या पदपंकजांला
मी वंदितों स्मरुनियां विमला यशाला ५
विख्यात एक अतिरम्य वसुंधरेचा
आनंदद प्रथित कोशल देश साचा
शोभे जया वलय हें सरयुप्रवाहें
जेथें सदैव धनधान्यसमृद्धि आहे ६
तेथें विशाल विलसे नगरी अयोध्या
खाणी जणों सुरसिकां नरवीर योध्या
विस्तीर्ण राजपथ शोभति येथ जाणे
मुक्तप्रसूनजलचंदनशिंचनानें ७
विस्तीर्ण भव्य अति सुंदर राजवाडे
ज्यांतें कृपाणधर रक्षिति वीर गाढे
माला जिथें विलसतें नवमंदिरांची
छाया जयांवरि असे घनमंडलाची ८
विक्रेय्य वस्तुसदनें बहु जागजागीं
तेणें दिसे नगरवैभव राजमार्गीं
नाना सुरम्य शिखरीं ध्वज सोनियाचे
जाणों निधी झळकती सुयशोधनाचे ९
नाना विलाससदनें नव चंद्रशाला
नृत्याङ्गनाऽभिनयसंगतरागशाला

वीणामृदंगरव, घोषहि दुंदुभीचे
व्योमीं जणो घुमविती यश भूपतीचें १०

उद्यानवृक्ष फुलल्या नवमल्लिकेचा
जेथें सुगंध जणु जीव विलासिनींचा
येथें जवें वारिवरी उडती फवारे
त्यांचे तुषार वरितां तरुताप हारे ११

येथें सुरम्य लतिका कनकानुकारी
आलिंगिते तरुवरा सुमनांगिकारी
पुष्पावकीर्ण मकरंद सुगंधि मार्गी
गुंजारवें मधुप गुंगति जागजागी १२

दुर्भेद्य दुर्गतट खंदक ज्या सभोंतीं
स्वप्नींहि जेथ ह्मणुनी न शिरे अराति
जेथें गजाश्व रथ दुर्धर शस्त्रधारी
सेनाग्रणी रणधुरंधर साह्यकारी १३

अंजनीगीत.

अशा अयोध्या नगरीमाजी । राजा दशरथ झाला गाजी
प्रतापशाली लोकसमाजीं । धन्य ह्मणुनि घे जो १४
धर्मनिष्ठ जो सुदूरदर्शी । मनोनिग्रही जणो महर्षि
इंद्रकुबेरहि जितेन्द्रियाशीं । ह्मणती धन्य धनी १५
दीप्ति जयाच्या शरपत्राची । देखुनि उडतीं हृदयें रिपुचीं
वदनें झळकति मांडलिकांची । यत्पदनखरुचित १६
सत्यसंध जो सत्धर्मानें । पाळी निजजन तत्परतेनें
आनंदाविण अन्य न जाणे । अवघी ती नगरी १७
धनधान्यातें वाण न कांहीं । लोभ दंभ मद मत्सर नाहीं

सत्संगें आनंदें पाही । नांदति नर नारी १८
मदांध नास्तिक दुष्ट न कोणी । सदाचारसंपन्न जनानीं
शोभे नगरी, असत्य वचनीं-- । मळवि न मन कोणी १९
ज्याच्या कर्णीं कुंडल नाहीं । माला शिरभूषणही पाही
चंदनगंधविना नच देही । न मिळे त्या नगरीं २०
मंद मंद सुमगंधविहीना । मंजु मंजु नवमंजिरहीना
किणिकिणिकंकणरशनाहीना । एकही न रमणी २१
वर्णाश्रमधर्मा लंघोनी । अन्यायातें न करी कोणी
वेदाध्ययनीं विद्याव्यसनी । गर्जति विप्रकुलें २२
वेद्षडांगें न जाणणारे । व्रतवैकल्यातें त्यजणारे
कथापुराणें न श्रवणारे । नास्तिक नच तेथें २३
चिंता प्रभुच्या चिंतनकामीं । व्याधीग्रस्त न एकहि धामीं
दारिद्र्याचे नामहि लक्ष्मी । राहु न दे जेथें २४
मत्त गजांच्या झुंडी जेथें । लाजविती जणुं घनमालेते
शुभ्राश्वांच्या दौडीनें ते । व्योमीं जाय धुळी २५
जेथें दशरथमंगलनामीं । तल्लिन सज्जन अवध्या धामीं
तेथें राजद्रोह हरामी । राहिल हो कैसा २६
शस्त्रास्त्राचे विद्येमध्यें । अग्नितुल्य ते चंचल योध्ये
सिंहहि पळती ज्याच्या क्रोधें । ह्मणुनि अयोध्या ती २७

श्लोक.

ती सत्यनामा दृढ तोरणार्गला
गेहें विचित्रें बहु शोभती जिला
पुरी अयोध्या जनसंघसंकुला
देवेंद्रसा भूपति शासि तो जिला २८

इक्ष्वाकुवंशोद्भव राजयाते
मंत्रज्ञ मंत्री क्षणि आठ होते
चर्येवरोनीच परेंगिताते
जे जाणती राजहितांगिकर्ते २९

विद्याबलें ये विनय प्रभूत
चातुर्य कौशल्यहि यत्कुलांत
ये थोरवी ज्यां नियतेन्द्रियानें
सत्कीर्ति लाभे दृढ विक्रमानें ३०

जे शस्त्रवेत्ते नयशास्त्रवेत्ते
सन्मार्ग जे दाविति सत्य वक्ते
आज्ञा प्रभूची शिरिं वंदुनीया
जे राहती दक्ष नृपालकार्या ३१

मंत्रें नृपा, लाविति साधुरीती
सत्धर्ममार्गें जन रंजवीती
स्वप्नीं जयातें धनलोभ नाहीं
न्यायासनीं शांति अखंड पाही ३२

जे शत्रुचे सर्व मनोविकार
जाणावया योजिति गुप्त हेर
होणार जें कार्य पुढें तयाचें
आधीं कळे कारण ज्यांसि साचें ३३

सर्वज्ञ लोकीं व्यवहारशाली
ज्यांची असे ईभ्रत सर्व काळीं
न्यायें स्वपुत्रासहि दंडकर्ते
त्यांची कळे किम्मत त्या नृपातें ३४

भांडार ज्यांहीं भरिलें धनानें
सेना असे सज्ज अखंड जाणें
आचारसंपन्न समस्त मंत्री
भूपालकार्यी लय लावितातीं ३५
धन्या असे बुद्धि विशाल ज्यांची
ख्याती जगीं वीर्यपराक्रमाची
ठावीं जया विग्रहसंधितत्वें
लाधे जयांते गुणसंपदा ते ३६
रक्षावयातें क्षम गुप्त मंत्र
ठावें जयां सूक्ष्म विचारतंत्र
जे जाणती सर्वहि राजनीति
आनंददा यन्मधुरा गिरा ती ३७
ज्यांचे ऋणी थोर उदार हेर
सत्योक्ति ज्यांचा करि अंगिकार
मंत्री असे ज्या कुलभूषणाला
आनंदराज्यासन दे नृपाला ३८
वीरश्रिया जो जनपीडकातें
लावी नमाया रिपुमंडलातें
ज्याच्या प्रतापें उरला न वैरी
निष्कंटका भूवरि, चापधारी ३९

राजाच्या हितकारणीं कुशल जे, सामर्थ्य कौशल्यही
ज्यांचें प्रेम तसेंच राजचरणीं देखोनि हर्षे मही
मंत्री ज्यासह ते असे ह्मणुनि जो तेजें दिसे आगळा
राजा सोज्ज्वळ रश्मिजालनिकरें रम्यार्कसा शोभला ४०

———— विठ्ठल भगवंत लेंभे.

## गुरुग्रहाप्रत.

श्लोक.

निमग्न असतां रवी अनुदयाचलारोहणीं,
सुधांशुसम कांतिनें विलसतो नभ:प्रांगणीं;
दिशेस मघवाचिया रुचिर गोल विद्युन्मणी–
असे कवण तो, कुणीं जडविला नभोभूषणीं ? १

नतावनधृतव्रता, भरतभू, मनोहारिणीं,
अमंगलविनाशिनी, त्रिविधतापसंहारिणी,
गुणी, विनयशालिनी, प्रभुकथासुधास्यंदिनी,
परोऽपकृतिकारिणी, रजतकांचनस्वामिनी; २

यश:कुसुमसौरभें दशदिशाहि संमोहुनी,
जिची पदसमीपता सुजन वांच्छिती हर्षुनी;
तिच्याच मुगुटांतला मज गमे असे तो हिरा;
प्रकाशित निजांशुनीं करित जो समग्रा धरा. ३

परी कपट–पाटवें अमित रत्न–भांडार तें–
विशंक असुरीं तिचें कधिंच पूर्वि केलें रितें !
कळे न मग केंवि तो चुकुनियां हिरा राहिला ?
सुरीं सुभग दिव्य जो ह्मणुनि मागुनी घेतला. ४

अहो ! किति तरी कथूं हरिख पाहतां त्याजला !
हताश परतंत्र जो मजसि त्या तयीं वाटला;
मनोभवनिं माझिया स्मरण–वस्त्र तो आंथरी;
ह्मणोनि शतदां तया नमन मी प्रहर्षें करीं. ५

मिळेल फिरुनी कधीं भरत--भूमिला तो हिरा ?
कुशीस कधि येइल प्रबळ विक्रमी मोहरा ?
करील धनयुक्त जो त्वरित आर्य--माते--प्रति;
लवेल नृप--वृंद तो सभय ज्याचिया खालतीं. ६

निमग्न असतां अशा मन विचारिं नानाविधीं,
प्रहार करितांहि ज्या तनुस ना कळे आयुधां;
निशा ग्रहविभूषिता सपरिवार जाई जवें,
शशीप्रति मिळावया नयनिं आणुनी आंसवें. ७

विषण्ण हृदयास दे स्मरण पूर्विचें दुःखतें !
विचारहि पुरे अतां मन बहूत भांबावतें.
पुनश्च बघुनी तया नति करोनि जावें घरीं;
असें ह्मणुनि जों बघे गगनिं तो दिसे ना परी. ८

चमत्कृति अशी कशी ! बघितलेंच जें मी अतां,--
अदृश्य मज होय तें क्षण न लागतां तत्वतां !
जग क्षणिक काय हें ? सकल गोष्टि मिथ्याच कां ?
असेंच जर विश्व हें कवण तोषती याचकां ? ९

रडें मधिंच कोसळे, मतिस येतसे खिन्नता,
ह्मणे तुजसि खाउं कां वद वदे निराशा स्वतः;
कुसंशय--रजःकणें हृदय शीघ्र कोंदाटलें;
नभे भुवन हें तसें मग शरीर ही बाटलें ! ! १०

विकल्पवश हो न मी, नच पडो निराशे बळी;
ह्मणोनि रवि फाकवी अरुणकांति भू--मंडळीं;
द्विजातिगण ये पुढें हळुंहळूंच; मंजुस्वनें--
वदे " परिस मानवा ! गळित हो न तूं भीतिनें; ११

तुवां गगनिं- रात्रि जो द्युतिसमूह आलोकिला;
हिरा तुजसि जो गमे भरतभूमिकोषांतला;
न तो मणि महींतला; परि असे सुरांचा गुरू;
यदीय वच शाहणे ह्मणति आदरें आदरूं. १२

स्वातंत्र्यप्रिय सूर्य जो विचरतो स्वच्छंद नीलाबरीं;
निष्ठा--पूर्वक आर्य विप्र सतत ध्याती जया अंतरीं;
तेणें धाडियला निज प्रतिनिधी हा; पारतंत्र्यागेला–
तोडा हें कथण्या निवांत समयीं, निर्जीव कां जाहला ? १३

आज्ञेमाजि जशी सती प्रभुचिया तैसे रहा तत्पर;
देशोद्धार करावया निजबळें, सोडा परांचा दर;
स्वातंत्र्यांबु पितां सदैव अमुचें जैसें सुखी हें जिणें;
तैसें होइल निश्चयें, नच पडे स्वर्गीय सौख्यीं उणें १४

मर्त्या ! सोड विषण्णता, भ्रमिं नको तूं गुंतवूं बुद्धिला;
अज्ञानांध जनांस बोध कथिला हा पाहिजे तूं भला;
येतां भूमिवरी क्षणीं विरघळे ती गार आकाशिची;
हा सद्बोध सुखास मूळ तिथल्या; हीं माणसें तेथिंची; " १५

' चक्रवाक् '

## ' मराठा नको ' सांगतों मी ग्रहातें.

( राजारामकालीन मराठी सैन्याविषयीं मुसलमानवीराचे उद्गार. )

श्लोक.

बहु श्रान्त होऊन ये म्लेंच्छ वीर;
जया शत्रु गाठी वनीं घोर शूर.

मनीं धन्य मानीं जहालों विमुक्त;
मराठा तदा प्राण घेऊं पहात. १

सुटूनी सुखें येइ मी छावणींत;
तरीही मना भीति तो फार देत.
मला वाटतें मागुतीं येत आहे !
धराया मला तो मनीं पाहताहे. २

कुणा ही कथूं भीति माझ्या मनींची ?
मला तों परी मानसीं फार जाची !
मराठा न तो भूत वाटे खराच !
तयाशीं न गांठीं कधींही घडोच. ३

नको चाकरी ही, नको द्रव्य मातें;
मराठा बघोनी मनीं भीति येते !
कसा बादशाहा असा मूर्ख झाला.
मराठ्यांवरी घालितो काय घाला ? ४

तयां अन्नपाणी नको वस्त्र तैसें !
वनीं हिंडती ते जणों भूत ऐसे ! !
दरीं, कंदरीं, उंच शैलाग्रि किंवा,–
नसे भीति त्या घेति हवान धांवा ! ! ५

दिसे एकटासा करूं पाठलागा–
मनीं कैकदां आणिलें ही न कां गा ?
तया मागुतीं धांवलों पंचवीस !
तरी एकटाही मिळे ना अह्मांस ! ! ६

क्षणीं येथ आहे, क्षणीं दूर भासे !
क्षणीं गुप्त होई कुठेंही न दीसे !

क्षणीं गव्हरीं, तों क्षणीं पर्वताग्रीं !
मिळे ना जरी धुंडिलेंही समग्रीं ! ! ७

बहूधा न येती रणाला समोर;
असे आमुचें जाणुनी सैन्य फार;
मनीं शौर्य जैसें, तसा थोर कावा-
तयांच्या असे, लूटिती शत्रु ठेवा ! ! ८

जधीं मूखसे कीं निशाबुंद होवूं;
जधीं झोंप किंवा सुखें गाढ पावूं;
अशा रात्रिं येती, कुणाला कळे ना !
न ये बोल कर्णीं पदें वाजती ना ! ! ९

असा गुप्त छापा सदा घालिती ते;
किती नेति शस्त्रें, हरीती धनातें !
किती प्राण घेती मिती ना तयाला ! !
प्रभो ! निर्मिले त्वां मराठे कशाला ? १०

सदा जाणती ते गनीमी लढाई;
उगी ना मदानें करीती चढाई;
अह्मांला न देतां कळूनी कधींही,-
रणीं गुप्तरीती वधीती शरांहीं ! ११

मराठा न गांठा कदाही भले हो !
तुह्मां संगरीं ता कधींही न पाहो !
जरी एकदां त्यांशि शत्रुत्व केलें;-
तरी निश्चयें जाणणें प्राण गेले ! ! १२

मराठा न माणुस, सैतान खास !
कळोनी न देतांहि घेई जिवास ! !

मला वाटतो बादशाहा खुळा तो—
स्वतःच्या शरीरा मराठ्यांस देतो ! ! १३

जला पी न घोडा दिसे त्या मराठा !
तयीं भीतिनें जाय तो सर्व ताठा ! !
कसा मूकही जीव सैतान जाणे ?
प्रभो ! हा अराती अह्मांला न देणें १४

किती झुंजलों शत्रुशीं थोर थोर !
असे ना परी पावलों कष्ट घोर;
नको चाकरी ही; नको द्रव्य मातें;
**" मराठा नको सांगतों मी शहातें. "** १५

त्र्यंबक जयराम प्रधान.

## आकाशदिवा.

श्लोक.

हा चित्रदीप वरती गगनोदरांत—
जाऊन कोंवि बसला ! दिसतो प्रशांत ! !
हा हालवी झिळमिळया; मज बोलवीतो;
वाटे तयास गगनीं बहु मोद होतो. १

त्यागून बंधुभगिनीगण पृष्ठभागीं,--
एकांत शोधुन बसे वर थोर योगी;
एथील बंधन तयास रुचेचि ना कीं;
ध्यानस्थसा वर बसे जणुं हा पिनाकी. २

साश्चर्य ह्यास बघती नभिं तारका त्या;
" हा निर्मिला कवण तूं ? " पुसती विधात्या;

" तर्जे विधे ! सकलिका बघ लाजवीतो; "
" पाहून यास मनिं मत्सर वास घेतो. " ३

केलें परावृत तमास दुरी प्रकाशें;
कीं साधुसंग घडतां मन तें विकासे;
वृत्ती दुरी वळति ज्या मन दूषवीती;
नासे समूळ हृदयांतिल अज्ञता ती. ४

स्वर्गस्थ देवपितरां दिसण्या प्रकाश,--
हा लाविला मज गमे निबिडा निशीस;
पाहून ही तनयभक्ति तयांस थोर--
वाटेल कां न नभिं कौतुक तें अपार ? ५

तेजोनिधी वरति संसृतिपाशमुक्त--
बैसे सुखें सतत अंबरमंडलांत;
त्याला नमस्कृति असा मम मानवाचा;
संसारपंकगत मूढ अशा नराची. ६

——— त्र्यंबक जयराम प्रधान.

## सुभाषित.

### समुद्रास.

बा नकोत तव मौक्तिक पोंवळीं
रत्नसंहति नको मज सोज्ज्वळी
हे समुद्र ! सगळें फळ पावलें
कीं मला न गिळिलें मकरें खळें १

——— बाळकृष्ण अनंत भिडे बी. ए.

# काव्यरत्नावलि.

अंक ४ था.

## गजकुमारचरित.

चाल– ( चंद्रकांत राजाची कन्या० )

**वसुदेवाची** रमणि **देवकी** देवि सुखें शयनीं–
होती निजली एके रात्रीं **नारायण**–जननी. १
स्वप्निं पाहि ती उत्तर रात्रीं ऐरावति थोर;
स्रवे मदाची संतत ज्याच्या गंडस्थळिं धार. २
जागृत होय त्वरें, उरकुनी प्रातर्विधि सारे
शूचिर्भूत होऊनि, नटुनिया वस्त्रालंकारें,– ३
जाय **सती** ती आनंदानें निजकांतापाशीं;
विनयें नमुनी, **वधू** बद्ध करि वल्लभ-कर-पाशीं ४
मग कळवी ती तयास विनयें स्वप्न-वृत्त सारें;
ऐकुनिया तें डुलूं लागला भूपति हर्षभरें. ५
वदला गे ! जीवितेश्वरी ! तुज पुत्र असामान्य–
होइल सुरनरवंद्य सखे ! कुलदीपकसा मान्य. ६
दुर्भवांत, सिद्धांत[1]–निरत, निभ्रांत बुद्धिमंत,
मुक्तिकांत अति शांत, कांत वपु, लोकमान्य, संत ! ७
स्वप्निं पाहिला गज यास्तव या भावि सुता नाम–
देईं गे ! **गजकुमार** सखये ! शुभ मंगलधाम. ८

---

१ जैनशास्त्राला सिद्धांतशास्त्र असें म्हणतात.

फलश्रुति स्वप्नाची ऐकुनि आनंदप्रद ही,
येई गजगामिनी कामिनी परतोनी गेहीं. ९
क्रमा क्रमानें वाढूं लागे गर्भ तिच्या उदरीं;
पीत वदन हो आला अतिशय मंदपणा शरिरीं. १०
डोहाळेही होउं लागले अनेक शुभ तीतें;
तेणें झाली कृश परि न कथी लाजोनि पतीतें. ११
करुणाजनक स्थिती अशी ही पाहुनि रमणीची,
**वसुदेवाच्या** हृदयिं निपजली अनुकंपा साची. १२
घेउनि अंकीं, बोले चुंबुनि तन्मुखहरिणांका[1]
" कृश झालिस कां सुंदरि ऐशी वद सांडुनि शंका." १३
" गोंडस हे तव कर पूर्वीचे वाळुनि किति गेले ! "
" रत्नकंकणें गळोनि पडती, वदन किती सुकलें ! " १४
" कां झाले फटफटित पांढरे असे तुझे गाल ? "
" होते जे टवटवित गुलाबा-सम सखये ! लाल ! " १५
तेव्हां लाजुनि वदे तया ती प्रणयै[2]-सुधा-सरिता;
" डोहाळे मज बहु दिन होती ते कथितें नाथा ! " १६
" **जिनेश्वराचें** पूजन करुनी गमे दिवारजनी, "
" चिर-हितकारक वाणी त्याची ऐकावी कानीं; " १७
" अन्नदान निर्ग्रंथीं[3] द्यावें अभयें[4] अनाथातें; "
" द्रव्य देउनी गमे करावें सधन दरिद्र्यातें. " १८
परिसुनि नृप हें सकल तियेचे डोहाळे पुरवी.
नव मासांतीं पुत्र होय जो रवि-प्रभा मिरवी. १९

---

१ तिच्या मुख चंद्राला. २ प्रेमरूपी अमृताची नदी. ३ दिगंबरमुनी. ४ जैन धर्मात फक्त चारच दानें सत्पात्राला द्यावीं असें सांगितलें आहे. तीं--अन्न--अभय औषध आणि ज्ञान-हीं होत.

**गजकुमार** हें ठेवियलें त्या नाम कुमाराचें;
प्रफुल्ल पंकज-तुल्य लोचनां भुलवी मुख त्याचें. २०
क्रमें क्रमें तें वाढूं लागलें शुभ लक्षण बाळ;
बघुनि तयाच्या लीला पावे तोष धरापाळ. २१
एके दिवशीं **नेमि** जिनाचें गुण-वर्णन कोणी–
करीत असतां, दैवें अवचित ये त्याच्या कानीं; २२
" वदा **नेमि** तो कवण ? " घेतला हट्ट असा बाळें;
सुजवी डोळे रडुनि गडबडा भूमीवर लोळे ! ! २३
आली समजुत घालायातें धावुनिया माय;
नानारीती समजावी परि शांत न तो होय. २४
वदे " तान्हुल्या, काय जाहलें ? सांग तुटे प्राण.
इच्छित देतें नको रडूं रे ! **नेमी**ची आण. " २५
मग बोले तो कुमार, माते ! कोण असे **नेमी** ?
चरित्र त्याचें एकवार मज ऐकों दे नामीं २६
वदे **देवकी** " ऐक कुमारा ! समुद्र विजयाचा--
सुत **नेमी** तो चुलत बंधु तव पुतण्या मम साचा. २७
" **शिवादेविच्या** उदरीं जन्मला तो कुलदीपक रे ! "
" रोंवियला यदुकुलकीर्ति-ध्वज ज्यानें शुभ्र, करें; " २८
" मोह वधुनि, वधु निश्चित सोडुनि विधुमुखि, कमलाक्षा, "
" जाइ तपास्तव **गिरनारी**वर घेउनि तो दीक्षा " २९
" होय केवळ ज्ञान तयाला तपोबळें बाळा ! "
" भूवर विहरे लोक हितास्तव सांप्रत वेल्हाळा ! " ३०
यापरि सांगुनि कथा पुरवि ती बाळाचें कोड;
गमे तयाला **नेमि**चरित तें सुधेहुनी गोड. ३१
चिंती मनिं तो " उगवे केव्हां बरें असा सुदिन ?

दिसतिल माझ्या नयनां नेमी भाऊचे चरण :" ३२
येई यौवनदशा कुमारा, सरलें बाळपण;
समर्थ गति कालाची आहे थांबविण्या कोण ? ३३
व्हावयास यौवनसौख्याचा लाभ कुमारातें,
निश्चित केली भजापाळ-नृप-सुता वधू, तातें. ३४
परणाया ती वधू निघे तो, जमले जन दाट;
गाती मंगल गीत योषिता, पुकारिती भाट. ३५
मार्गि चालतां पडे तयाच्या कर्णी तों साचा—
नेमिसमवशरणांतिल[1] मोहक घोष दुंदुभीचा. ३६
वदे जनांतें कोठुनि येई कानीं हा नाद ?
नेमिसमवशरणांतिल कळतां पावे बहु मोद. ३७
" करुणाघन यदुवंश-विभूषण नेमी जिनराया, "
" आला गिरनारीवर राया ! आह्मा ताराया. " ३८
" ऐकुनि हें जन-वचन मानसीं कुमार तो चिंती; "
" दुर्लभ आहे खचित मानवा धर्मचि या जगतीं. " ३९
" धर्मतरूचें मनीं लावितां एकवार रोप, "
" शांतिच्छाया देई वाढुनि, वारुनि संताप. " ४०
" त्या धर्माचा घडवि लाभ जो खरा मानवातें, "
" आज सुदैवें नेमि जिनेश्वर तो आला येथें. " ४१
" यास्तव आधीं जावें त्याचे वंदाया पाय; "
" मग येवोनी सुखें बघावी लग्नाची सोय. " ४२
" जन्मोजन्मीं विवाह झाले किति देहाचे या ! "
" किती परणिल्या वधू आजवर येइ न मोजाया ! " ४३
" नाहीं जीवें केलें अझुनी धर्म-सुधा-पान; "

---

१ तिर्थंकराच्या-धर्मोपदेश कराश्रयाच्या सभेस 'समोसरण' ह्मणतात.

" ह्मणुनि न होई लेश कमी भव-दुःखाचें मान " ४४
" नसति चिंतले हृदयिं **जिनाचे** तारक ते चरण; "
" न तरि असुनि कां उरतें दुःखद जन्म जरा मरण. ४५
" नसे नेम कधिं हरिल जीव हा कृतांत निजपाशीं !
" बाल, तरुण, विद्वान, धनिक, हा भेद न ज्यापाशीं ! " ४६
" प्राप्त संधि ही दुर्मिळ यास्तव विफल न दवडावी; "
" धर्मसौख्यलाभाची, मग ही भार्या जोडावी " ४७
ऐसें येतां मनांत उतरे शीघ्र रथावरुनी;
समवशरणिं येवोनि जाहला नम्र **नेमिचरणीं**. ४८
उठती आनंदाच्या साच्या त्याच्या मनिं लहरी;
**श्रीमज्जिनदर्शन**, भवसंभव[1]-संभ्रव सकल हरी. ४९
प्रबळ होय वैराग्यभावना त्याच्या देहांत;
उभा राहुनी बोले विनयें मग जोडुनि हात. ५०
" क्षणिक सुखाला भुलुनी, मुकलों सुखसर्वस्वा मी ! "
" दीक्षा देउनि यास्तव मातें तारावें स्वामी ! " ५१
वदला **नेमि जिनेश्वर** " वदशी बहु बरवें बाळ ! "
घे संयम अतिचाररहित शुचि मुनिक्रिया पाळ. ५२
निराकुला सौख्याचा जेथें नच लागे ठाव;
जन्ममृत्युचें तर ऐकाया नच येई नांव; ५३
मिळे ज्ञान-बल अमित जिथें, तो मिळण्या अपवर्ग;
सत्य सनातन असे त्रिभुवनीं हाच एक मार्ग; ५४
मृत्युलोकिचें सर्व सौख्य हें क्षणभंगुर आहे
यौवनसौख्य न सौख्य; जसें बा ! मृगजळ जळ नोहे. ५५
ऐकुनि **नेमी**-वचन **कुमारें** वस्त्रालंकार--

---

१ संसारामुळें उत्पन्न झालेला मोह

त्यजुनि, दिगंबर दीक्षा घे तो उपटुनि कचभार. ५६
वऱ्हाडमंडळ निराश झालें परत घरा जाय!
भग्नमनोरथ रडे माय तर मोकलोनि धाय! ५७
सुत-मुख बघण्या उत्सुक तों सुतमुखचि होय विमुख!!
हाय! जाहली कोमल जननीहृदयाची राख!! ५८
**नेमी**सन्निध राहुनि बहुदिन, ठसवुनि बोध मनीं,--
घेउनि आज्ञा, कुमार जाई तप करण्यास वनीं. ५९
आचरि तेथें उग्र परम तप, परिवह साहून--
कुमार; ज्याचें चरित मधुरतर सुधा-रसाहून. ६०
वीज कडाडो! पर्जन्याची पडो! मुसळ धार!
बर्फापरि अति शीतल होवो! गारांचा मार! ६१
वा दगडांची लाही हो! मार्तण्ड चण्ड तापें;
ध्यानमग्न त्या **मुनीश्वराचें** मन लेश न कांपे ६२
उग्र तपीं रत ऐसा असतां तो मुनि-वीरमणी,
भग्नमनोरथ येई तेथें त्याची ती रमणी. ६३
लग्नावधिही[1] पतिसंगोत्सुख जी दुःखें काढी;
आशाभंगें अशा जाहली केवळ ती वेडी! ६४
अनिवार स्मरवन्हि पेटला अंगिं तिच्या पाहीं;
कर्तव्याकर्तव्य--विचारहि लव उरला नाहीं! ६५
वदे तया ध्यानस्थ मुनीतें "मम मानसहंसा!
कां येशी ही सोडुनि अबला? यदुवंशोत्तंसा! ६६
घोर असा अपराध जाहला दासीचा कवण?
सांग जिवलगा! कां रुसलाशी? धरिशी कां मौन? ६७
कंठ खुलावा जो रमणीच्या बाहु-पुष्प-हारें.

१ लग्न होईपर्यंतचा समय

वाळुनि गेला उग्र तपानें किति तरि तो हा रे! ६८
नाजुक तव वपु, उग्र तप बहु उलट योग किति हा!
रुचला कैसा? सांग जिवलगा! कुसुममृदुल देहा! ६९
सोडुनि तप चल सदनीं, माझ्या अंगींची हळद--
काढीं सत्वर; मत्तनुलतिकाप्रेमसुधाजळद! ७०
दोन दिवस गृहिं राहुनि, देउनि संगमसुख मातें,
तप करण्या मग सुखें हवा तर ये परतुनि येथें; ७१
पर्जन्याविण जशी लता हो शुष्क तशी काया--
झाली तुजविण दीन कितितरी बघ ही तव जाया. ७२
नव्हें कुमारी, विधवा नोहें, सुवासिनी नाहीं!
विचित्र झाली अशी दशा मम तुझ्यामुळें पाहीं!! ७३
उज्ज्वल करिं मन्मुख चल गेहा जिवलग राजेंद्रा!
सुखवीं अबला बहु शिणली मन्नेत्रकुमुदचंद्रा!" ७४
ध्यानमग्न निश्चल मुनिचित्तीं कामोद्भव व्हाया,
यापरि केले यत्न तिनें परि गेले ते वायां!! ७५
होतां ऐसा प्रणय--भंग हो कोपें बहु लाल!
कापें थर थर अधर होय आरक्त, नेत्र, गाल!! ७६
वदे "कोरडी पडे जीभ मम भाकोनी करुणा,
तरी न येई दया कशी ती या नर--पाषाणा!!!" ७७
**निष्ठुर मानस नाहिं ग! बाई! द्रवलें तिळ याचें!!**
**दीन भाषणें विनवित आहें याला केव्हांचें!** ७८
पळहि न सोडी मौन, न पाहे लोचन उघडून,--
दुःखी अबला उभी असुनिही कर--युग जोडून. ७९
**अरण्यरोदनतुल्य विनवणी बाई! मम झाली;**

---

१ माझ्या देहरूपीवेलीवर प्रेमरूपी अमृत वर्षण करणाऱ्या मेघा.

कितितरि निष्ठुर पुरुषांची ही जात असे मेली ! ! ८०
घेउनि चावा येउनि येथें बसला जो साप;
तोंड ठेंचितां त्याचें बाई ! होइल कां पाप ! ” ८१
द्वेषवन्हि अनिवार भडकला तिच्या शरीरांत;
सिद्ध जाहली त्या शमवाया करण्या मुनिघात ! ८२
नितांत सुखद प्रणयसुधेची नदी जिथें वाहे,--
आश्चर्य न कां द्वेषगरलनिधि तिथें वसावा हें ! ! ८३
अथवा नवल न असे जगाचा क्रमचि असा पाहीं;
कांट्यावांचुन गुलाब न पडे दृष्टिस कोठेंही ! ! ८४
कराल रजनी जेंवि अवतरे बाह्य सृष्टिमाजीं--
नियमें, सरतां सुंदर संध्या भुलवी नयनां जी. ८५
तेंवी अंतःसृष्टित होतां रम्य--राग[1]--लोप,
अवतरतो तो परम अमंगल रजनि--रूप--कोप ! ८६
वाटे एका मनोवृत्तिचीं असति दोन अंगें--
प्रणय, कोप हीं; जरि अवतरती नित्य भिन्न रंगें: ८७
रचिलीं काष्टें मुनीभोंवती करुनि तिनें गोळा;
लावितांच त्या अग्नि भयंकर धडाडल्या ज्वाळा ! ! ८८
हाय ! हाय ! गे ! चांडाळिणि ! हें काय तुवां केलें ?
उपलहि असतिल घोर कर्म तत्र बघतां हें उकले ! ! ८९
जोड न भुवनत्रयीं तुझ्या या नीच निंद्य कर्मा !
ऐकतांच जें जळाल जहरापरि जाळी मर्मा ! ! ९०
शरद्गगनसम विमलचित्त जो निर्विकार संत,
शांतरसाचा पुतळा केवळ गमे मूर्तिमंत ! ९१
परपीडेचा विचार शिवला लव न कधीं ज्याला

---

१ सुंदरप्रेमाचा अस्त.

परोपसर्गे क्लेश न होई वश जो कोपाला ! ९२
स्वार्थ विसरला निखिल जयाचा देह—मोह सरला,
निरुपद्रव जो बनला केवळ मृदु कोमल पाला ! ९३
अशा पुण्य पुरुषास जाळितां काममदें नीचे !
स्वतांस साधन करुनि ठेविशी सुचिर रौरवाचें ! ९४
जळतां अग्नित तपोनिधी तो शांत धर्म—कंद,—
हृदयशून्य राक्षसीस वाटे मनिं परमानंद ! ! ९५
शांतपणें घोरोपसर्ग तो, तो मुनिवर साही !
ध्यानमग्न त्या नाहीं शिवला कोप जरासाही ! ! ९६
मंदरगिरिसम अचल राहिला, सोडि न लव धैर्या;
प्राप्त होय केवळ ज्ञान त्या समयीं मुनिवर्या ! ९७
झाले स्वर्गी मुदित, लागले सुर मुनि--गुण गाया !
बहुत काळ मुनितनू नुरं तें वैभव भोगाया ! ! ९८
तुटतां ध्यानाग्निनें मुनीचे प्रबळ कर्म—बंध,
प्रदीप्त वैश्वानरें निखळिलें तोंच अस्थि--बंध ! ! ९९
मर्मस्थानीं अग्नि लागतां झाला प्राणांत ! ! !
होय तदात्मा अजरामर निर्वाणपदीं शांत ! ! १००
क्षणभंगुर तनु जळे; मावळे अनळशिखादीप्ती;
होय यापरी अंतिं मुनीतें मोक्ष--पद--प्राप्ती ! १०१

## उपसंहार

जिनप्रणित हरिवंशपुराणीं कथिलें जें साचें—
चरित्र करुणाजनक मनोरम गजकुमारमुनिचें; १०२
असे शांततादायक केवळ मूळ मंगलाचें !
कोड पुरवि त्या गाउनि दत्तात्रय निजवाणीचें ! १०३

———— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

## बहिरंग विषण्णता.

### कथानक.

आपल्या अंगावरील कांटे लोकांस भिववितात, आणि ह्मणूनच लोक आपला अनादर करितात असा खेद फणसाला झाला; व आपलें कवच फोडावयास लोकांस श्रम पडतात ह्मणून लोक आपणास आव्हेरितात ह्या गोष्टीचा नारळास खेद वाटला. ह्या दोन फळांस बाह्यांगाबद्दल विषाद करण्याचें कारण नाहीं असा उपदेश केला आहे. अर्थात् हें काव्य अन्योक्तिरूप आहे.

आर्या.

उपवनिं एके दिवशीं । वचनें म्या परिशिलीं उपांशु जशीं
कथितों तशीं बुधजना । भावुनि हा विषय योग्य मम कवना १
न पनस, न नारिकेल । व्यवहारीं जरि वदों कधि शकेल
तरि कविसृष्टिंत सगळें । शक्य असे, सर्व विश्व कविस कळे २
वदला पनस वच असें । "मत्सम हतभाग्य वस्तु अन्य नसे
झाला माझा जर लय । तर निंदेचें मला नुरेल भय ३
मज्जन्म फुका वाटे, । माझ्या अंगावरी अमित कांटे
बेढब मी आकारें, । यास्तव धिक्कारितात मज सारे ४
मी फलचि नव्हे ऐसें । जन वदती तें सहों तरी कैसें ?
जन्मासि घातलों कां । विधिनें ? शिव शिव ? रुचे न मी लोकां ५
धिक्कारहेतु जनना–हुनि अजनन इष्ट होय विबुधमना
आलों विधे ! तुज शरण; । लोपविं मज्जन्म, दे मला मरण" ६
ह्यावरि अल्पें काळें । श्रवणीं मम नारिकेलवच आलें
तोही स्वजनिनिमित्तें । वदला हें वच विषादमयचित्तें ७

" होतो अतिउच्चतम । स्थानीं, गगनांत काय, जन्म मम
मत्प्राप्ति अनायासें । होत नसे ह्यामुळें जन त्रासे ८
आलों जरि मी हातीं । तरि धिक्कारें मला जन पहाती
कठिन त्वचा मम असे, । ती फोडाया न बलविहीन धसे ९
त्यजिति दुरुनि मज दुर्मति, । तें राहो; फलचि मी नव्हे ह्मणती
ही सोसवे न मजला । निंदा, ही मम मना करी विकला " १०
ऐकुनि ह्या वचनांतें । विषाद बहु वाटला मम मनातें
मी पनसनारिकेलां । मित्रत्वें बोध यापरी केला ११
" पनसा ! पाहुनि कांटे । हृदय जयांचें भयामुळें फाटे
ते भाग्यहीन मानव, । आंतिल त्यां मिष्ट रस मिळे न तव १२
आपण भितरे यास्तव । निंदिति तुज तेचि जाण नर कितव
तुज अफल असें ह्मणती । त्यांची अनरांत तूं करीं गणती १३
आपण असूनि भितरा । जो लावी व्यर्थ दोष नर इतरा
तो दांभिक, नीच, कितव, । ही निश्चित भावना असोंचि तव १४
त्यजिं खेद नारिकेला ! । त्वां स्वमनिं विवेक पाहिजे केला
जे तव कवचा उकलिति । ते बलसंपन्न तव रसास पिती १५
जे अपुली झाकाया । निर्बलता अफल ह्मणति तुज वाया
ते कितव करिति एना, । नर संज्ञा त्यांस लाविता ये ना १६
अफल ह्मणोत तुला ते, । तूंहि अनर बा ! फला ! ह्मण तयांतें
धिक्कारिति जे तुजला । मित्रा ! धिक्कारिं तूंहि त्यांस फला ! १७
जे अबल कवचभंगीं । त्यां न मिळे सुरस जो तुझ्या अंगीं
ते दैवहतक निश्चित । निंदोत सुखें तुला, न तव अहित १८
जो त्वत्कवचा फोडी । तो चाखी शक्तियुक्त तव गोडी
त्वत्खाद्यांशहि लाहे, । पावुनि तृप्तीस तो सुखें राहे १९
खेद त्यजा फलांनो ! । निंदो अथवा तुह्मास जन वानो

कोठें तरि आढळती । भूमंडाळिं पुरुष ज्यांस रस कळती २०
वस्तु न एकहि भुवनीं । जी स्तविजे निरपवाद सकल जनीं
भुवि वस्तु एकहि नसे । जी एकांतेंहि दे न मोद रसें २१
त्यजिं खेद नारिकेला ! पनसा ! दे हृदयिं न स्थल शुचेला
राखा अंतःशुचिता, । बहिरंगविषण्णता नसे उचिता " २२

श्लोक.

बहिरंग विषण्णताव्हया । निभृतोक्तें हितबोध व्हावया
रचिली कृति वामनात्मजें । रसिकांचें पद नित्य जो भजे २३

——————— विद्याधर वामन भिडे बी. ए.

## भावप्रकटित.*

श्लोक.

वदे निगम विष्णुचे नयन सर्वसाक्षी रवी,
ह्मणून मिटितां निशासमय ये, न ये एरवीं;
निषिद्ध दिवसा रती; ह्मणुनि उत्सुका अंतरीं
हरीस विनवी रमा नयनमीलना सत्वरीः १

स्मरे जनकनंदिनी, चरणिंच्या रजां लागतां
शिळा स्वपतिच्या, क्षणें युवति जाहली तत्वतां;
न होउत शिलात्मक-स्वमणिकंकणाच्या स्त्रिया,
ह्मणून करि दूर ती स्वपतिपाद धूतां तयां ! २

समुद्र मथितां जळीं विषचि उग्र शेखीं निवे,
गळीं, भुवन जाळि तें, ह्मणुनि शंभु शोषूनि वे;

* वे. शा. सं. पां. गो. शा. पारखी यांनीं डिसेंबर १९०८ च्या अंकांत दिलेल्या 'भावगुप्ता'चीं उत्तरें स्वतंत्र श्लोकांत दिलीं आहेत.

खदाहशमनार्थ तो मग शिरीं धरी स्वर्धुनी;
उमा सवतिमत्सरें विषचि पी गळा चुंबुनी ! ३

नलप्रभु उदारधी निधिहि याचकां देतसे;
तया त्रिभुवनांतला धननिधी पुरेसा नसे;
सरेल भुवनांतली सकल लक्ष्मि, हा तेधवां
हरील मम ही रमा हृदयिं धाक हा माधवा ! ४

लता फुलुनि दाटला मधुर गंध चोहींकडे,
मदीय मुखमारुतापुढति काय तो ! बापुडें !
त्यजूनि लतिका अलिव्रज बसेल माझ्या शिरीं,
धरून भय हें मनीं श्वसन कोंडिते सुंदरी ! ५

सुधाधवल तें जरी विमल होय गंगाजल,
तरी अरुण तें अती तरणिच्या कराचें तल;
सुरक्तचि जलांजली करतलांशुयोगें दिसे;
तिला रुधिर वाटलें; ह्मणुनि फेंकुनी देतसे ! ६

सुवर्णमृग पाहुनी भुललि जानकी, द्या ह्मणे;
तयास वधुं धांवतां पळविलें हिला रावणें;
मृगांकमृगही अतां न बघु ही प्रिया, यास्तव
भिऊनि विरहा तिचे नयन झांकि. हा ! राघव ! ७

सुरासुर, गिरी रवी, करुनि, वासुकी रज्जु ती,
विधू विरहिवैरि हा जलनिधींतुनी काढिती;
शशीस बघुनी अशी स्मरुनियां पुराणी कथा
प्रतप्त विरहें तयां युवति निंदि ते सर्वथा. ८

निशी प्रियकरासवें रहसि झालि संभाषितें
वदे शुक यथाश्रुतें, परिसिती सख्या सर्व तें;

तदा ठकवि, दाडिमीफलजबीजसा, सुंदरी
मणी अरुण घालुनी वदन बंद त्याचें करी. ९

शिरे युवति मंदिरीं सकलही जिथें आरसे;
तयांत दिसती तिच्या चहुंकडेच मूर्ती, फसे;
प्रियें मिळविल्या स्त्रिया सवति, तर्किलें हें तिणें;
रुसून बसली; ह्मणे विफल होय माझें जिणें. १०

विहंगम.

---

## उदितार्क.

श्लोक.

मार्तण्ड तेजोमय पूर्वभागीं–
आला जना हर्षवि अंतरंगीं;
गेला पळाला तम दैत्य तूर्ण !
अज्ञान हो ज्ञानकरें विलीन. १

ह्या व्योमगीं मंजुरवेंकरून–
केलें तया तुष्ट बहू स्तवून;
पर्णोत्थितीं गोडवचीं द्रुमांनीं;
तैसें मयूरीं प्रिय नर्तनांनीं, २

गेले कुठें तोयद अभ्र नील ?
त्या तारका ज्या दिसती विलोल ?
शुक्रादि सर्व ग्रह लुप्त झाले !
ज्ञात्यापुढें पामर काय बोले ? ३

वातायनीं सोडुनियां स्वरश्मी,
निद्रिस्त उद्युक्त करी स्वकामीं;

नेमें स्वतां हें नभ आक्रमूनी,–
सांगे न हो कार्यविहीन कोणी. ४

तेजें दवांचे कण हे तृणस्थ–
मोत्यें गळालीं जणुं भासतात.
हा हार कित्रा रवि भूप्रियेला--
प्रेमें समर्पी नव सुंदरीला. ५

सोडी रवी रश्मि जलाशयीं या;
ते लागले नर्तन तैं कराया !
हें पृष्ठ भासे जणुं शुभ्रवस्त्र--
आणी जनीं नूतन बालमित्र. ६

उत्तुंग या थोर महीधरांनीं--
देहां स्वतः रौप्यमयीं पटांनीं,
संभूषवोनी, वरि उत्तरीय–
ल्याले सुरेख द्रुमपल्लवीय ! ७

प्रेमें स्तवीतो दिननाथ मित्र,--
हा चक्रवाक द्विज चारुनेत्र;
त्यातें मिळे आत्मकलत्र नष्ट;
कान्तेसवें होय न कोण तुष्ट ? ८

विप्रीं तया अर्पुन अर्घ्यदान,
मागीतलें इष्ट वर--प्रदान;
भक्ती न निष्काम दिसे परी ही;
जी आचरावी इह मानवांहीं. ९

बाळार्क जो रक्त असा विराजे;
तो तोषवी दुःखित चित्त माझें;

त्यातें विपद्ग्रस्त अशा जनाचा—
पावो नमस्कार विमंदधीचा. १०

——————— त्र्यंबक जयराम प्रधान.

## अयोग्य नायक.

( नायिकेचे उद्गार. )

साक्या.

उदासता कां हृदयीं ये, मम जीवित असार वाटे ?
सौंदर्यसुखा पाहुनि, कां हा कंठहि आतां दाटे ? १
कविच्या रसाळ वाणीमध्यें पूर्वी रमलें फार;
भान विसरलें देहाचेंही काव्यीं वारंवार ! ! २
सौंदर्य अतां अगम्य झालें तेथिल मजला सारें;
पानें उलटुनि बघतां काव्यीं नच मन माझें थारे. ३
तरुणपणीं सुख भोगायाचें सांगत आले लोकीं;
खरें तरी कां वीट सुखाचा मज ये एकाएकीं. ४
हंसुनि, खेळुनी लोक नांदती; रसमय त्यांना सृष्टि;
प्रेक्षक, दंतें, दूरचि राहुनि त्यांजकडे मी दृष्टि; ५
प्रथम भेटिच्या समयीं मजला आनंद किती झाला !
इमारतींनी सुकल्पनेच्या गोंधळ थोर उडाला ! ! ६
सकलगुणांनीं मंडित मम तो प्रियकर गमला तेव्हां !
स्वरूप त्याचें खरें कळाया जगलें कशास ? देवा ! ७
शुद्ध सुनिर्मल हिमसम वाटे तन्मन, आणि प्रेम;
परि पुरुषांची खोटी आकृति; वचींहि नसतो नेम ! ८
मन्मन वेडें होउनि चित्रें चितारिलीं सौख्याचीं;
वेडावित तीं आतां मजला फसलें वेडी साची ९

गुलाब घ्याया गेलें मोहें! कांटा भरला हाता!!
सर्प चावला! रम्य फुलांचा गजरा घालूं जातां!! १०
बहु मोलाचीं रत्नें जाउनि, हातीं आल्या गारा;
उद्यानाचें रानचि झालें! बीणीं तुटल्या तारा!! ११
स्वामी अपात्र समजुनि येतां जें ममतें नारीला;—
तिजविण इतरां कळूं न ये तें; गम्य नसे वाणीला. १२
हृदया प्रणया आश्रय एकचि होता जो, तो गेला!—
चंद्र बुडाला तमीं! नभींचा कैसा सूर्य विझाला? १३

—————— लक्ष्मण विनायक परळकर.

## अभंगबोध.

### अभंग.

१

पंढरीहुनी आलों पाहीं। आह्मालागीं द्यावें कांहीं
पंढरीशीं साधूसंत। तुह्मी आह्मां धनवंत
पंढरीसी देव मोठा। आह्मां धनधान्यां तोटा
नांव विठोबाचें घेतों। दारीं तोंड वेंगाडितों
बोल साधूंचे ते गातो। पाय दात्यांचे वंदितों
आह्मां लागीं जें जें द्याल। तें तें देवासी पावेल
कवि ह्मणे आले संत। कलियुगींचे महंत

२

तुजहूनि देवा लौकिक आवडे। लौकिकार्थ घडे सर्व कांहीं
कर्म धर्म सांग लौकिकार्थ करीं। मन नच धरीं तुज क्षण
तुजला भजतां लौकिकाकारणें। दंभ आचरणें वायफळ
खोटा व्यवहार पसारा मांडिला। लोकांसाठीं आला प्रत्यय हा

देवाच्या नांवानें केले समारंभ । थाट माट दंभ ऊजळीला
आपला गौरव व्हावया जगीं । या उत्सवालागीं कार्ये सर्व
कवि ह्मणे साच भक्ति देवा ! देई । यथार्थ तूं घेई सेवा हातें

३

नको दंभ ज्ञान शास्त्र गोष्टी थोर । प्रेमकथासार ऐकूं द्या त्या
नको गूढ तत्त्वें ज्ञेय वा अज्ञेय । आह्मां दयामय देव व्हावा
नामा ज्याच्या संगें प्रेमकथा बोले । भक्तिरसें डोले ब्रह्मानंदीं
ज्याच्या वेडें तुका तद्रूप जाहला । भान विसरला तुकात्वाचें
नको रसेंविण कथा त्या ऐकाया । प्रचितीविण वायां नको ज्ञान
कवि ह्मणे मिथ्या नको आडंबर । द्यावा कांहीं सार असे जरी

कवि.

## भ्रमर आणि कवि.

साक्या.

सखया भ्रमरा सदैव होसी तूं कमळावरि गुंग
कवितेचा मी दास पदाशीं तिच्याच असतों दंग १
चाखुनि घेसी पुष्पांमधला तूं मधुतर मकरंद
काव्यरसास्वादाचा मजला तसाच भारी छंद २
प्रेमभरानें तूं पुष्पांवर सदैव गासी गाणें
आळवितों मी कवितादेवी मंजुल आलापानें ३
बागडसी तूं स्वैर मजेनें नभांत गरके घेत
बागडतों मी सूज्ञ जनांना हर्षभरीत करीत ४
समशीलाचें आपण दोघे ये ये भ्रमरा आतां
उडूं बागडूं फिरूं मजेनें नुरे कशाशी चिंता ५

ये प्रिय सखया वनलतिकांच्या झोपाळ्यांत बसून
गाऊं सुंदर गीत आपुलें होऊं त्यांत विलीन ६
ये ये कमली प्रेमबंधनें बांधुनि घेऊं काया
आनंदाच्या सुधासमुद्रीं जाऊं स्नान कराया ७
वनराजींतुनि कुंजांमधुनी वेणुध्वनी करून
वात विहरतो त्याचा जाऊं आपण पंथ धरून ८
ये ये स्वच्छंदानें मारूं नभांत उंच भराऱ्या
गिरक्या घेऊं परमानंदें ओसरल्या ज्या साऱ्या ९
रम्य गायनें वेधुनि टाकूं चाल दिशांना चारी
अमृतांचा वर्षाव करूं ये ईशाच्या बाजारीं १०

बालकवि.

## उद्यानस्थ बाला.

श्लोक.

उद्यान हें रम्यरुचि प्रशस्त;
नानापरीचे द्रुम शोभवीत;
आलिंगिलें ज्या मधुरा लतांहीं.
जे मज्जति प्रेमरसप्रवाहीं. १

नेऊनियां उंच मुखप्रदेश,—
वाटे करूं अम्बरचुम्बनास
वृक्षांस या; वायु करूं न देतो.
मूर्धास, त्या पाहुन वांकवीतो. २

चांफा स्ववासें मज मोदवीतो;
दुष्प्राप्य जो गंध गुलाब वी तो;

हा केवडा सर्व दिशा दणाणी;
तो मोगरा वानुं कसा वचांनीं ? ३
सर्वांवरी थोर करीत ताण;
निःशंक तो जाणचि कामबाण;
प्रत्यक्ष कामेषु करील कां न–
पूनीत भावासही तो मलीन ? ४
जाईजुईही अपुल्यापरीनें--
सृष्टीसखी पूजिति गंधदानें;
स्त्रीजाति ती शक्ति किती तियेची ?
सर्वत्रही कोमलता स्त्रियेची. ५
फलोद्गमानें सहकार नम्र--
झाला; न तैसा फलशून्य आम्र;
ज्ञानें जसा सुज्ञ विनम्र होतो.
तैसा दुजा मानव काय हो तो ? ६
द्रुमस्थ पक्षी सहचारिणींना--
घेऊनियां रंग करीति नाना;
देखून हो ! कामविलासभाव,
हा क्षुद्र कैसा मनुजस्वभाव ? ७
ती पार्श्वभागीं सरिता वहाते;
कामेच्छुशी नाथगृहीं पळे ते
जलौघ तीचा नयनाब्जचंद्र;
केला जयें आवृत देश आर्द्र. ८
केलें कुणी पल्लवमंडपाला--
ह्या ? जो दिसे पात्र सुरादिकांला;

केला गमे हा चतुराननानें !
त्याची सरी होय न मानवानें ! ! ९

कुंजीं असे या स्थित कोण बाला ?
जी तैं करी तें हरिदासनाला;
आम्रासवांच्या उपधान मूला;
प्रत्यक्ष वायू व्यजनार्थ केला. १०

ही कोमलांगी श्लथकेश बाला--
पाहून, येण्या द्विजराज भ्याला--
जाईल कीर्ती बहुता दिनांची--
वाटे तयाला मम आननाची ! ! ११

दन्तावली कोरकगर्व--हारी !
नेत्रीं तिला हो मृगदार वैरी !
ओष्ठांपुढें विद्रुम होय लीन !
कान्तीपुढें तुच्छचि हेमवर्ण ! ! १२

सलज्ज रंभेस उरू करीतो !
भूचाप चापा दुसऱ्या हरीतो !
आकार पाहून तिच्या कटीचा--
टाकी प्रियेचा हरि गर्व साचा ! ! १३

सौंदर्यराशी मधुरा सुबाला,
घाली वरी चित्रित कंचुकीला
त्याली असे शुभ्रतरा दुकूला;
जो रंग हो तुल्य तिच्या मनाला. १४

ही एकटी येथ सचिंत बैसे ?
कां हो सखींचा गण सोडिलासे ?

कोणी करी कां मन शद्धविद्ध ?
बाला विलोलाचि निसर्गसिद्ध. १५

आला मनीं अन्य विचार वाटे;
येतां हृदीं तो बहु मोर दाटे;
रम्याननीं ये प्रतिबिंब त्याचें.
आदर्श आहे मुख अंतराचें. १६

हा सत्य वाटे पतिकल्पनेचा--
आनंद, जो तोषवि तीस साचा;
संतोष दे कांतचि बालिकांना
नाथाविना दैवत ना स्त्रियांनां. १७

हा ! क्रांति ही कां दिसते मुखाब्जीं !
दु:खाब्धिमाजी ढकली मना जी ! !
कैसा मिळे योग्य पति स्वतांला ?
ऐसा मनीं काय विचार आला ? १८

व्हावा पती योग्य वयें गुणांहीं;
रूपें तसा जो मनिं हौस वाही;
जो प्रेमशाल्क ममदेहिं घाली;
ऐसा असावा मज भाग्यशाली. १९

अत्यंत दु:खावृत हा भवाब्धि--
उल्लंघणें हे नच अल्पसिद्धि !
सद्वृत्तिनौका परि घालुनीयां,--
भर्त्यासवें शक्य असे तराया. २०

ही कामना ह्या मधुबालिकेची--
भवाब्धि सौख्येंच तरावयाची;

देवा ! तुवां पूर्ण अशी करावी,--
तुल्यें वरें भो ! तिज आदरावी. २१

——— ——— ——— ... त्र्यंबक जयराम प्रधान.

## सासरीं जाणारी बालिका.

प्रथमच सासरीं जावयास निघालेल्या तरुण बालिकेस तिची मैत्रीण ह्मणते.

श्लोक.

कां सांग आज सखये दिसतेस खिन्न
कां वारिदाकुल नभोपम अप्रसन्न !
भासे तुझें वदन कां उमटे न वाणी
कां गाळिती घळघळां तव नेत्र पाणी ! १

होतीस ज्या बहु उताविळ पाहण्यास
येतांच तो पुढति कां दिसशी उदास !
होतीस उत्सुक जयासह काळ जाया
त्या पाहतां बघशि कां सखये पळाया ! २

‘ येणें कधीं तिकडचें सखये ! घडेल
केव्हां गडे ! वदन दृष्टिस तें पडेल ’ !
‘ बैसोनि तन्निकट अग्निरथीं प्रवास
केव्हां घडेल परमोत्सुक या जनास ’ ३

‘ पावित्र्य वर्णिति बहू बुध ज्या पदाचें
जें मूळ केवळ महीवर मंगळाचें ’
‘ जें स्थान गे निखिल मानवि उन्नतीचें
वर्णू महत्व किति मी गृहिणी--पदाचें ’ ४

‘ कर्तव्य शिक्षण मिळे मज त्या पदाचें
मातेकडोनि नच होइल मोल ज्याचें ’

‘ तें दावुनी जननि--नाम करोनि धन्य
मी त्या पदास कधिं होइन सांग मान्य ’ ५

ऐसें न कां वदत होतिस नित्य मातें
गे आज तूं विसरलीस समूळ कां तें !
वाटे तुझे सकल बोलहि फोल झाले
कर्तव्य--शिक्षणपटुत्व लयास गेलें ! ६

होती समुत्सुक किती रसना तुझी ही
कांतांतरा रिझविण्या मधु भाषणांहीं !
कां आज ती अडखळे सखये अशी ही
कां एक शब्दहि तिला वदवे न बाई ! ७

आणी तुझ्या प्रणयवल्लिस जो बहार !
चित्तांत जो करि दिवारजनी विहार !
जो मानितो तुज जणूं नव पुष्प--हार !
व्हावा गडे बघुनि ज्या असुखापहार ! ८

येतांच ती प्रणयमूर्ति तुझ्या पुढें गे !
कां सांग तूं फिरविशी मुखचंद्र मागें !
आहे सुधा--जलधि जो तव सौख्यहेतू !
कां त्यांत शंकसि गडे ! बुडि घ्यावया तूं ९

आरक्त हे किति तरी तव गाल झाले !
पाही उर:स्थल गडे ! किति होय ओलें !
हो म्लान रम्य मुखतेज लयास गेलें !
बाई ! पुरे रडुनि लोचन लाल झाले ! १०

—————— दत्तात्रय भिमाजी रणदिवे.

मे १९०९ वर्ष २० वें.

# काव्यरत्नावलि.

## अंक ५ वा.

## आव्हेयरप्रभृति सप्त ज्ञानी यांचें चरित्र.

आर्या.

विद्वान्, सुभाग्यशाली, पुत्र, तिघे आणि चार सत्कन्या,–
एका अतिशूद्राच्या कन्येच्या पोटिं जन्मल्या धन्या; १
आव्हेयर, आपग्गा वालीज तिजी, चतुर्थ आरव्वे;
झाल्या ह्या जगिं भगिनी कवयित्री सुप्रसिद्ध या नांवें. २
कवि वेल्लुवर तेल्ह स्वगुणें ते कां न मान्य होय जनीं;
बंधू तिसरा कपिलर पंडितसा लेखिलाचि साधूंनीं. ३
यांच्या जन्मकथेच्या वृत्तातें सावधान परिसावें;
हृदयंगम तें आहे सारज्ञें सार मात्र सेवावें. ४
पूर्वी झाला भूसुर ज्योतिर्विद वेदमौळि या नांवें;
ज्याचें यश शुद्ध मनें विद्वद्वृंदें सदैव वानावें; ५
एके रात्रीं पाहे आकाशीं तो प्रभूत विपरीत,--
दैदीप्य तारकाला ज्याला घडला असे अधःपात. ६
एकाकी तारा तो अंत्यजसदनावरी तदां पडला;
जाणुनि भविष्य त्याचें चित्तीं तो विप्र फार गडबडला. ७
त्या वेळीं त्या सदनीं जी कन्या एक जन्मली होती;
होईल मत्सुताची विधियोगें सत्य सत्य भार्या ती. ८

करुनी भविष्य ऐसें दुसरे दिनिं सर्व विप्रवृंदातें--
मिळवुनि, मोघम कळवी व्याकुळ चित्तें समग्र वृत्तातें. ९
विद्वज्जन हो ऐका " संकट जें एक वाडवावरती;--
आलें आहे तेणें चिंता चित्तांत वाढ वावरती. १०
गत रात्रीं जी कन्या अंत्यजसदनांत जन्मली आहे;
तीच्यायोगें व्यसनीं ब्राह्मणगण सर्व हा पडूं पाहे. ११
ऐकुनि तद्वाक्य असें गजबजलें फार विप्रमंडळ तें;--
भाषण अनर्थसूचक परिसुनि धृति साधुचीहि डळमळते. १२
मग बोलावुनि तेथें त्यांनीं अतिशूद्र आणिला त्वरित;
भावें जोहार करी; जोडुनि कर तो तयासि विनवीत. १३
आज्ञा काय असे हो ? तुमची दासावरी कृपा पूर्ण.
सांगा जी ! कार्य मला; आर्यांनों ! केंवि होउं उत्तीर्ण ? १४
वदति तव सुतायोगें ब्राह्मण पडतात हे महाव्यसनीं;
यास्तव तुजला एथें बोलावुनि आणिलें सुविप्रांनीं. १५
" कन्याहानि घडो; वा ब्राम्हण विघ्नांत सांपडोत; कसें--
काय तुला आवडतें ? " सांगें येईल मानसांत तसें. १६
" बोले तनया जावो, परि भूसुरवृंद हा सुखी राहो; "
या हेतूस्तव आतां देतों ही कन्यका तुह्मी घ्या हो. १७
नंतर विचार करुनी, घेउनि मत वेदमौळिचें त्यांनीं,
निश्चय केला, ऐसा--द्यावी हिजला नदींत सोडूनी. १८
तेथें आला होता त्या समयीं पुत्र वेदमौळीचा;
पिरली नामक मोठा भाविक जो भक्त चंद्रमौळीचा. १९
पेटीमध्यें घालुनि विप्रांनीं तिजसि सोडिली जेव्हां;
त्यानें तदूरुवारी अति तेजस्वी तीळ पाहिला तेव्हां २०
गेली वाहत वाहत पेटी बहु दूर, मग तटा लागे;

तेथें दैवानें ती देखियली ब्राह्मणें महाभागें. २१
लगबग करुनी काढी; बोले;–तो " होय पेटि ही कसली ?
उघडुनि तिजला पाहे; तों सद्य:प्रसवकन्यका दिसली. २२
संतानास सदोदित कष्टत होतों; परंतु देवानें–
कन्यारत्न मला हें दिधलें, झालों कृतार्थ दैवानें. २३
ऐसें मानुनि, तेथें प्रातर्विधि तो समग्र सारूनी,
घेउनि नव पुत्रीतें आनंदें विप्र पातला सदनीं. २४
लालनपालन करुनी विद्या शिकवी सदैव तो तिजला;
झाली अति कुशला ती गाणें संपूर्ण नीति, शास्त्र, कला, २५
त्यावरती श्रुतिमौळी कांहीं काळें परासु तो झाला;
विद्यार्जनार्थ तत्सुत हिंडत या ब्राह्मणा गृहीं आला. २६
विप्रानें पारंगत केलें, विद्येंत त्या स्वशिष्याला;
पंडित **गुण**मंडितसें चंडीप्रियशंभुदासदासाला. २७
पाहुनि वृत्ति तयाची, ब्राह्मण तो फार तुष्टला स्वमनीं;
आणी विचार मग कीं, माझी कन्या पडो अशाच जनीं. २८
एके दिवशीं ब्राह्मण एकांतीं कृत विवेक तो कळवी;
कन्योद्वाहार्थ तदां पिरलीचें चित्त युक्तिनें वळवी. २९
सांग विवाह तयांचा पूर्वभविष्यानुरूप तो घडला;
ऐशापरि दैवबळें विप्रतनय संकटांत सांपडला. ३०
यांउपरी एके दिनिं त्याची पत्नी करोनि आंघोळ,
नेसे अन्य पटातें; तों अंकीं त्यासि दीसला तीळ. ३१
या विषयींचें कांहीं माहीत नसे मुळींच त्या सतिला;
पिरली सखेद बोले; " न कळे कोणाशिं ईश्वरी लीला !! ३२
अंत्यजसुताच ती ही ! या द्विजवर्यासि लाभली कैसी ?
लावी शोध तयाचा; कळतां अति दुःख जाहलें त्यासी !!! ३३

आतां काय करावें ? झालों मी भ्रष्ट संकटीं पडलों !
हर ! हर ! शंभो ! कैसा नियतीच्या बंधनांत सांपडलों ? ३४
होउनि उद्विग्न अशा तो श्वशुरासि न विचारितां गेला;
मागें श्वशुर तयाचा दुःखें चिंतार्णवामधीं बुडला. ३५
" वत्से ! तत्सन्निध वस; अथवा शोधोनि आण जा पतिला; "
मोठ्या कष्टें ऐसें ब्राह्मण वदला तदा स्व कन्येला. ३६
वंदुनि पदकमलातें, गेली साध्वी त्यजूनि तातातें;
शोधाया; भेटाया, आणाया—मागुती स्वनाथातें. ३७
दीनाला निधिसा तो एक्या दिनिं कांत भेटला तिजला;
विनवी सांभाळाया, परि न वळे जो विधीवरी रुसला; ३८
निजली तिज पाहुनि तो, सोडुनि गेला प्रिया बहू रडली;
तुटला पतिचा आश्रय जाणुनि, ती धायधाय आरडली ! ! ३९
मार्ग क्रमितां पुढतीं ती एक्या रम्य नगरितें पाही;
क्षणभरि विश्रांतीस्तव वृक्षाखालीं बसोनियां राही. ४०
तों एका साधूनें ऐसी स्थिति पाहुनी तिला पुसिलें;
ऐकुनि वृत्त सतीचें त्याचें मन फार फार कळवळलें. ४१
घेउनि गेला सदनीं, स्वसुतेसम मानुनी महासतिला,—
सांभाळी ममतेनें; तत्तनयांनीं दिलें महास तिला. ४२
मृत्यूच्या समयीं तो संपत्तीचा करोनि सम भाग,—
अर्पुनि निजपुत्रांतें तैसा देई हिला महाभाग. ४३
यावरि पतिव्रता ती घालोनी तेथ अन्नसत्रातें,—
शुद्धाचरणें वागे, ती परिपाळूनि जीवमात्रातें. ४४
एके दिवशीं तीचें भाग्य उदेलें अपूर्व तपयोगें;
त्या छत्रामाजीं तो पिरळी ये कर्मधर्मसंयोगें. ४५
त्या दोघांही तेव्हां नोळखिलें मूळ आपुलें नातें;

जाणुनि अति भीच तया भार्येनें पूजिलें स्वनाथातें. ४६
करुनी आतिथ्य तद्यां, सांगे इतिवृत्त आपुलें त्यातें;
तें ऐकोनी अतिशय वाटे आश्चर्य बुद्धिमंतातें. ४७
तें पातिव्रत्य तिचें, ती वाणी, नीति, तो सदाचार;
पाहुनि कौतुक गमलें चकित बहू जाहला महाधीर. ४८
प्रातःकाळीं पिरली जाते समयीं विशेष विनयानें--
सादर कर जोडोनी विनवी तो तीस मंजुवाणीनें. ४९
परि तें परिसुनि त्याचें धैर्य गळालें, तसेंच गांठोडें;
गहिंवरला पिरली, पति कळला, हें भाग्य काय हो! थोडें? ५०
पुनरपि तुजला सोडुनि नाहीं जाणार; निश्चयें भार्ये,
देउनि ओळख ऐसी; त्या समयीं आण वाहिली आर्ये. ५१
आनंदानें यात्रा करुनी क्रमितां स्वकाळ दंपत्यें,
तदुपरि ईशकृपेनें झालीं साध्वीस सप्त सदपत्यें. ५२
परि नाथाज्ञेस्तव ती टाकी बाळें वनांतरीं जेव्हां,
पोटीं भडभडुनीयां येई बहु कंठ दाटुनी तेव्हां. ५३
शोक करी अबला ती भेटाया काननीं तयां जाई;
क्षेमसमाचारातें ममतेनें त्यांचिया सदां घेई. ५४
त्या सप्त अर्भकांतें वाचा फुटुनी प्रसूसि ते वद्ले;—
केलें सांत्वन तीचें त्या योगें क्लेश सर्वही हरले. ५५
"माते! जेणें मातें वांचविलें, पोशिलें, तुझ्या उदरीं;
तो जगदीश उपेक्षिल कैसा आतां मला दयाळु हरी? ५६
यास्तव निःसंशय तूं आई! जाई" असें वदे पहिला;
यानंतर दुसरें ही प्रेमानें बाळ बोललें तिजला. ५७
"प्रावेमाजी जो प्रभु जीवन पुरवी सदैव भेकातें;
रक्षिल देव मला तो जननी! करिसी किमर्थ शोकातें?" ५८

" दाखविलें मज जग हें, ज्यानें दैवासि लिखिलें भाळीं,
तो परमेश कृपार्णव जीवांना सर्वकाळ सांभाळी. ५९
अन्नोदक देउनियां परिपाळिल तोचि सर्वदां मातें;
याकरितां मजविषयीं वाहुं नको काळजी मुळीं माते !" ६०
ऐसें तिसरा वदला. चौथाही अंबिकेप्रती विनवी;
" ईश्वर सकवच आंडीं पक्ष्यांचीं रक्षि शावकेहि नवीं. ६१
तैसें रक्षील मला होउं नको खिन्न संप्रती माते !
त्वां, जावें, ठेवावें--जगदीशावरति भावनिष्ठेतें. ६२
पंचम तोक वदे " प्रभु सूक्ष्मा, रसवाहिना, शिरा, तरुतें--
सालत्वचाहि, देउनि, त्याकरवीं रक्षि जीव जंतूतें. ६३
तो जगदाधार सदा बहुपरि घेईल काळजी माझी;
यासाठीं आई ! गे ! आनंदें परत मागुतीं आजी." ६४
षष्ठ शिशु वदे मोदें " ज्यानें हें विश्व निर्मिलें आहे;--
अंबे ! त्या ईशकृपें त्यांतिल जन सर्वदां सुखी राहे. ६५
ऐसें जाणुनि माते ! हर्ष करावा स्मरोनि देवातें; "
इतक्यांत तिचें सप्तम अर्भक बोलें प्रसूसि परिसा तें. ६६
" हो ! प्रियकर आई ! तू रडसी कां गे अशी ! मला बोल;
या लोकीं निश्चित कीं, मानवकृत यत्न होतसे फोल. ६७
करुणासिंधू ईश्वर तो बहुविध निर्मितो वनस्पतितें;
त्यांतें स्वाद सुगंधहि मधुरादिक अर्पितो सुषड्स ते. ६८
तो मज काय न देइल ? सांग दयाळे ! करूं नको शोक;
लोभ असूं दे मजवरि आतां जा तूं" वदे असें तोक. ६९
कांहीं काळें बाळें हीं ज्ञानी विश्वपूज्यशीं झालीं;
त्यांचीं कविचरितांतुनि आर्याछंदांत हे कथा आली. ७०
अद्यापि कीर्ति त्यांची प्राचीन ग्रीक गाति, तामिळ ते,

नीच असुनीहि विद्वान् आहे जो त्यासि पूज्यता मिळते. ७१
श्रीगुरुकृपाप्रसादें कथिली रसिकांसि गोष्ट जी चव दे;
टाकुनि दोष तिच्यांतिल घ्यावे गुण, रंगनाथ हेंच वदे. ७२

—————— रंगनाथ एच् अधिकारी.

## आँमचे आधुनिक् कवि पूर्वकालीन कविपदावरून ढळले आहेत काय ?

ओव्या.

भो ! कवितादेवीप्रियजन । तुह्मांपुढती होवोनि लीन
हा बोलतो तें करा श्रवण । देवोनि अवधान साक्षेपें १
मुकुंदापासाव मयूरापर्यंत । कवि झाले नामांकित
काय वर्णू तयांची मात ? । सर्वविश्रुत असती ते २
मुकुंदें वेदांतसागर । मंथोनी जें काढिलें सार
प्रेमानंदें अद्यापवर । सान थोर सेविती ३
गीतानामें सरिता भली । ज्ञानेशें परि सु--तरा केली
ज्ञानेश्वरी ही सांगड निर्मिली । मानिती माउली तियेतें ४
भागवतस्कंध अकरावा । बिकट भासला अज्ञ--जीवां
एकनाथें परी बरवा । केला मेवा तयाचा ५
नामदेवें प्रेमें गायिली । श्रीविठ्ठलाची बिरुदावली
शतकोटी संख्या झाली । असेल पाहिली बहुतांनीं ६
कधीं कोणास ना कळला । तो श्रुत्यर्थ तुका बोलिला
सदेह स्वर्गा गेला । ही काय लीला सामान्य ? ७

---

* सन १९०७ च्या मार्च महिन्यांत जळगांव येथें जे कविसमेलन भरलें होतें त्यावेळीं वरील प्रश्नास उत्तर ह्मणून कवीनें आपलें मत या कवितेंत दिलें आहे.

अष्टोत्तरशत रामायणें । निर्मिलीं कीं मयूरानें
तैशीं भारतादि कवनें । नाना गुणीं मंडित ८
समर्थांनीं बोध केला । ' दासबोध ' ह्मणती त्याला
शिवाजी--करीं प्रेमें दिधला । झेंडा उभविला कीर्तीचा ९
ती नव्हती साधी कविता । मनोरंजनार्थ लिहिली तत्वतां
तिच्यांत कांहीं मार्मिकता । आणि अपूर्वता होती कीं १०
तो नुसता बोध जाण । नव्हता परी बोधांजन
नेत्रीं घालितां प्रेमेंकरोन । जनलोचन उघडले ११
ब्राह्मणशूद्रादि आर्य--वसती । थोडी फार जी आर्यावर्तीं
दिसते कांहीं संप्रतीं । समर्थांप्रति तच्छ्रेय १२
समर्थकालीं आर्यावर्त । झाला होता यवनांकित
अर्धचंद्राची सर्वत्र मात । पसरली होती १३
तत्कालीन देशस्थिती । समर्थें कथिली शिवाजीप्रती
त्यांच्याच शब्दीं निगुती । सांगतों ती परिसावी १४
" तीर्थक्षेत्रें मोडिली ! । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं !
सकल पृथ्वी आंदोळली ! ! । धर्म गेला ! ! ! "
ऐशा वेळीं दासबोधाची । उत्पत्ति झाली जाणा साची
किती करावी स्तुति त्याची । उणीव शब्दांची पडतसे १५
असो. तत्कालीन कवि सर्व । ऐसे होते नर--पुंगव
त्यांच्या योगें सौख्य--पर्व । लाधलें अपूर्व जनासी १६
संप्रति ऐसे कवीशपरी । कां न होती निर्धारीं ?
हा प्रश्न थोर थोरीं । अभ्यंतरीं सोडवावा १७
येविषीं मजप्रती । जें सुचलें तें यथामति
सांगतों आतां निश्चितीं । सावधान चित्तीं परिसावें १८
समर्थें व्याख्या कवित्वाची । केली अत्यंत बहारीची

तीच येथें उतरोनि साची । घेतसें मी साक्षेपें १९
" जेणें घडे भगवद्भक्ति । जेणें घडे विरक्ति
ऐशिया कवित्वाची युक्ति । आधीं वाढवावी १
शीघ्रचि कवित्व केलें । दृष्टीं पाहिलें तें वर्णिलें
भक्तीवांचून जें झालें । या नांव धीट पाठ २
कामिक रसिक श्रृंगारिक । वीर हास्य प्रास्ताविक
कौतुक विनोद अनेक । या नांव धीट पाठ ३
कवित्व नसावें धीट पाठ । कवित्व नसावें खटपट
कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत " ४
एवं पूर्वकवि भगवद्भक्त । होते अत्यंत निष्णात
ह्मणोनी ते विख्यात । जगतीं जाहले २०
पूर्वी जे झाले कवीश्वर । बोटां इतुके साचार
संप्रति परी घरोघर । कवि–वर दिसताती २१
ज्यानें त्यानें कविता करावी । अक्षरांसि अक्षरें जुळवावीं
' कवि–वर ' ही पदवी घ्यावी । कीर्ति गावी आपुलीच २२
कोणी निवडुंगातें वर्णिती । कोणी रजका वाखाणिती
कोणी मूषकातें स्तविती । कोणी गाती घुबडातें २३
ग्रामीं येतां कलेक्टर । कविता कराव्या तयावर
नसते सद्गुण साचार । त्याचे अंगीं जोडावे २४
ट ट ट ट हिंगण बेट । साहेब आमुचे ईश्वर थेट
त्यांची बुद्धि अति अचाट । ऐसें कवित्व संप्रति २५
मार्गी पाहतां उंटबिंट । कवित्वाचे फुटती पाट
नवरसांचे लोटती लोट । जणूं भाट बोलती २६
ऐशियातें कां काव्य ह्मणावें । सांगा तरी जीवें भावें
काय त्यातें नांव द्यावें । न कळे मातें सर्वथा २७

ऐशियातें कवि ह्मणणें । वाटे मना लाजिरवाणें
'कवि' शद्वाची थट्टा करणें । होईल येणें वाटतें २८
एवं पूर्वस्थानाहुनी । कां न व्हावें भ्रष्ट त्यांनीं
कैसा व्हावा मान जनीं । सांगा तरी तयांचा २९
तात्पर्य त्यांची परमेशीं । नसे भक्ति असावी तशी
हेंचि वाटतें मन्मनाशीं । कारण त्यांच्या अवनतीचें ३०
जे आपणातें संप्रती । कवी ऐसे संबोधवीती
ते असतील विद्यापति । मी न ह्मणे 'नाहीं' कीं ३१
ते असतील भाषा–कोविद । साहित्यशास्त्रविशारद
बी. ए. एमे. ऐसें पद । असेल त्यांचे नांवांतें ३२
ते असतील गानभिज्ञ । वा गीर्वाण भाषाभिज्ञ
किंवा असतील अलंकार–सुज्ञ । परी येथें काय त्याचें ३३
पूर्वी जे झाले थोर थोर । रामदासादि कवीश्वर
ते नव्हते पदवीधर । व्यवहारचतुर होते परी ३४
तुकोबासी बी. ए. पदवी । होती काय सांगा बरवी
परी त्यातें ह्मणती कवि । गाती थोरवी तयाची ३५
फंदी कोणत्या शाळेंत । पढला सांगा निश्चित
परी त्यानें केवढी कीर्त । केली पहा पंडित हो ३६
वेणूबाई रूपावली । कोणापाशीं सांगा पढली
जनाबाई कोठें शिकली । साहित्यशास्त्र सांगा कीं ३७
परी ते होते ईश्वराचे । अस्सल भक्त जाणा साचे
ह्मणोनि त्यांच्या कवित्वाचें । नांव निघतें अद्यापि ३८
तात्पर्य जे ईश्वरभक्ति । एकविधा नित्य करिती
सैव शास्त्रें अपाप येतीं । त्यांच्या पायांनिकट कीं ३९
पदच्युतीचें दुसरें कारण । जें भासतें मनालागुन

तें सांगतों हो ! विचक्षण ! । विचार करुनी पहा कीं ४०
सांप्रत आपुली नसे सत्ता । सर्वत्र नांदे पराधीनता
सकलां छळी एक चिंता । पोट कैसें भरावें ४१
दीड वीत खळगीसाठीं । नाना उपाधी लागल्या पाठीं
स्थिति झाली उफराटी । कैसी राहटी अपूर्व ४२
हांजी हांजी करावें लागे । धांवणें पडे साहेबामागें
निद्रित व्हावें असोनि जागे । कार्य वाउगें करणें पडे ४३
धनी वदतां बैल गाभणा । होय खाविंद ! नववा महिना
उद्यां पसवेल खचित जाणा । तुकवोनि माना ह्मणावें ४४
असत्य वदावें उठाउठीं । ना तरी त्वेषें बैसे काठी
राजद्रोह लागे पाठीं । स्थिति मोठी बिकट ही ४५
निखालस धरोनि निस्पृहपण । कोणी करील सत्य भाषण
नृपाचा रोष घडे जाण । कोण्यापरी वर्तावें ? ४६
ऐशी स्थिति भूपतीची । तीच परी समाजाची
दूषण देणें व्यर्थ साची । यथा राजा तथा प्रजा ४७
तात्पर्य आश्रय नसे कोठें । कैसें व्हावें कवित्व गोमटें
तैसें होणें अशक्य वाटे । मातें या काळीं ४८
आश्रयाचा अभाव । कर्तृत्वाचा अंतर्भाव
हेंचि याचें कारण सर्व । विचारांतीं दिसतसे ४९
आश्रय जातां अस्ताप्रती । लक्ष्मी गेली त्या मागुती
शौर्य दाक्षिण्य आणि धृती । यांची गती तीच कीं ५०
खड्ग कैसा धरावा करीं । बंदुक कैसी डागावी तरी
बाणांचा उपयोग समरीं । कैसा करावा न कळे ५१
आधीं समर–भू कैशी असते । हेंचि ठावें नाहीं परतें
शस्त्रास्त्रांचे उपयोग ते । दूरीं ठेले ५२

मुखें बोलावें चुरुचुरू । लेखणी चालवावी कुरुकुरू
कागदी घोडे तुरुतुरू । धांवती आमुचे ५३
परि ते ही पराधीन । नृप–करीं त्यांची अनींन
धरितां त्यांनीं आंखडोन । आह्मी तळीं येतसों ५४
कांहीं न करितां विचार । बकवा आह्मी करितों थोर
पोलीस पाहतां समोर । बसे वाचा आमुची ५५
अर्भकें भीतीं बागुलासी । तैसेंच आह्मी भितों त्यासी
वृश्चिक टाकी नांगी जैसी । पट्टिकेतें पाहतां ५६
आह्मी ह्मणतों तोंड आमुचें । परी तें ही करीं त्यांचे
उघडती वा मिटती सांचें । सांपळा जैसा ५७
बंदुकीचे ध्वनी होतां । अंतर धडाडी तत्वतां
संगिनीतें तैसे पाहतां । दीपती नेत्र आमुचे ५८
रसना तैसी कोरडी पडे । स्तंभित होती पद रोकडे
न पाहवें इकडे तिकडे । कर्णी दडे बैसती ५९
एवं परी शेंदाडशिपाई । बनलों आह्मी करावें कायी
एवढी हानी कशापायीं । झाली हें जाणती जन ६०
बंदुक खड्ग बर्ची भाला । संप्रति जाणों या नांवाला
परी वाटे पुढील पिढीला । नांवें यांचीं न कळतील ६१
चाकू कात्री विळी कोयता । हींच आमुची शस्त्रें आतां
कालांतरें त्यांसी तत्वतां । मुकूं आह्मी वाटतें ६२
कारण हींही देणें, घेणें, । त्यांचेच हातीं आह्मां पुरविणें,
अस्मद्गृहीं आह्मी पाहुणे । झालों कैसे ! ६३
तात्पर्य त्यांनीं जें द्यावें । तेंचि आह्मीं खावें प्यावें
प्रसन्नमनें तैसें गावें । स्तोत्रपाठ तयांचे ६४
याचें कारण माझ्या मतें । आह्मी विसरलों आह्मांतें

फाटा देतां पूर्वकर्मातें । ऐसेंच होतें निश्चयें
ब्रह्मचर्य नाहीं ठावा । गृहस्थाश्रमाची तशी पर्वा ६५
कोणी न करी परी जीवां । रति--पिसें लागलें ६६
अनुदिनीं प्रजा उपजे खुरट । झाला शक्तीचा नायनाट
प्रसंग ओढवला बिकट । भोजन--भट्ट झालों कीं ६७
सर्वेंचि बनलों कामदास । विसरोनि गेलों कामदास
स्वहस्तेंचि केला नास । कां मदास वहावें ? ६८
आह्मांपेक्षां पशु--जाती । बरी वाटे खरी निश्चितीं
ऋतुकालींच ते रमती । आह्मां नाहीं काळ वेळ ६९
सिंहासारिखा बलिष्ठ प्राणी । त्याचा तोंचि त्रिभुवनीं
त्याची समता न करी कोणी । सर्वांस मान्य गोष्ट ही ७०
द्विरद वृक आणि शूकर । यांना वधोनी निरंतर
तो चाखवी निजाहार । अन्य साचार भक्षीना ७१
ऐसा जरी बलि केसरी । संवत्सरानेंच खरोखरी
एक वेळ तो रति करी । आश्चर्य थोर नसे का ? ७२
क्षुद्रप्राणी पारावत । शिलाकणातें जरी भक्षित
प्रतिदिनीं परी होवोनि मत्त । रति--क्रीडा करितसे ७३
या दृष्टांताचें इंगित । रसिक जाणती निश्रांत
पारावतन्यायें समस्त । आह्मी वर्तत असों कीं ७४
ऐशा केवळ स्थितीमुळें । आमुचें मन झालें दुबळें
कैसे निर्माण व्हावे न कळे । कवी पूर्वींसारिखे ७५
उदात्त विचार कवित्वातें । लागती सर्व जाणती निगुतें
परी कैंउते दुबळ्या मनातें । सुचावें तें सांगा कीं ७६
तैशा उत्तम कवित्वास । विशाल कल्पना लागती खास
परी त्या दुबळ्या मनास । कैशा तरी सुचाव्या ७७

उत्तम कवि निपजायातें । निस्पृह नर लागती निगुतें
परी अभाव पडला त्यातें । ऐसे वाटे मजला ७८
तात्पर्य जोंवरि ऐशी स्थिति । दुर्भिळ तोंवरि काव्यशक्ति
तीचा जनिता सांप्रतीं । तैसाचि दुर्लभ भासते ७९
सर्वेंचि आतां विषयोद्दिष्ट । सांगतों मी तिसरी गोष्ट
परिसोनि ती ध्यावी स्पष्ट । मग तुष्टातुष्ट व्हावें कीं ८०
वस्तुतः प्राकृत भाषान्वित । थोडकेचि महाकाव्यग्रंथ
भाषांतररूप परी निश्चित । थोडे बहुत असती जे ८१
रघुवंश आणि कुमारसंभव । नैषध किरात भट्टीकाव्य
ऐशीं काव्यें सुंदराभिनव । प्राकृतीं केवळ नसती कीं ८२
प्राकृत—भारत मयूरानें । हरिविजयादि श्रीधरानें
ग्रंथ केले चातूर्यानें । परी भाषांतरसे ८३
नाहीं ह्मणाया शिवाजीसम । एक दोन काव्यें अनुपम
प्राकृत भाषेंत मनोरम । स्वगुणीं परम शोभती ८४
परि ती केवळ अपवाद । संस्कृताचाचि अनुवाद
कल्पनामय ऐसा सबंध । काव्य ग्रंथ नसे कीं ८५
कांहीं केवळ टीकात्मक । कांहीं केवळ पौराणिक
परी ऐशिया रसात्मक । काव्य कैसें ह्मणावें ८६
ज्ञानेश्वरी यथार्थदीपिका । गीतार्णव पंचदशिका
टीका--ग्रंथीं मोडती देखा । नसेल शंका कोणासी ८७
या वरील विवेचनातें । पाहोनि कोणी ह्मणतील मातें
कीं हा निंदी पूज्य ग्रंथातें । परी तें तसें नसे कीं ८८
जरी हे ग्रंथ टीकात्मक । तरी ते असती प्रासादिक
वंदितों तया प्रेमपूर्वक । परी न ह्मणें काव्य तया ८९
दासबोध ग्रंथ थोर । काव्य न तो परि साचार

महाकाव्याचा आतां प्रकार । ग्रंथाधारें वर्णितों ९०
ज्या ग्रंथीं सरिता ' पर्वत । चंद्रसूर्यांचे उदयास्त
नृपसभा ' युद्धें आणि द्यूत । यांचें वर्णन असेल ९१
आराम आणि निसर्गवन । षड्तूंचें तैसें वर्णन
मनुष्य--स्वभाव भिन्न भिन्न । करोनि यत्न वर्णिले ९२
प्रत्येक सर्गीं एकचि वृत्त । असेल रचिलेले निश्चित
महाकाव्य हें नांव सार्थ । तोचि ग्रंथ पावतो ९३
अधुनिककविताभांडागारीं । वरील लक्षणीं मंडित परी
ऐसा ग्रंथ साचारीं । एकचि मातें वाटतो ९४
' यशवंतराव महाकाव्य ' । तया ग्रंथा हें नांव
सोज्वळ कविता अभिनव । पहावी वांचोनी आदरें ९५
' खरे ' कुळीं जन्म ज्याचें । ' वासुदेव शास्त्री ' नाम साचें
जनकत्व या सद्ग्रंथाचें । त्यांचेकडे असे कीं ९६
आधुनिक कवि--मंडळांत । तया मानितों ललामभूत
न मानावा याचा विषाद । जें रास्त तें बोलिलों ९७
असो. आतां अलीकडे । ऐसें कवित्व नुपजे रोकडें
कारण याचें वाडेंकोडें । पाहूं विचारें आपण ९८
महाकाव्यीं वर्णावयास । सर्वथा योग्य ऐसा खास
नाढळे कोणी उत्तमपुरुष । हेंचि विशेष कारण ९९
दोन तीनशें वर्षी खालीं । शिवाजीसारखा महाबलि
नर--वीर झाला न या कालीं । सत्यासत्य पहा कीं १००
विशालबुद्धि नायक गुणी । तैशी नायिका लावण्य खाणी
पतिव्रता वा वीरशालिनी । नोहे कोणीच संप्रती १०१

अपूर्ण.

अनंततनय.

## रा. रा. संपादक, काव्यरत्नावली यांसः–

श्लोक–पृथ्वीवृत्त.

दहा लगत उत्तरें असति आज मी धाडिलीं
तयांस वितरो स्थळ त्वरित काव्यरत्नावली
गजाननकृपें तिची भरभराट होओ सदा
असो मजवरी तिची सतत ही कृपा सौख्यदा १

———— कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी.

## भावगुप्तदशकोत्तर.*

( श्लोक–पृथ्वीवृत्त. )

उपेंद्रनयनीं असे रवि सुधांशु ही राहत
अयोग्य ह्मणुनी गमे रति रमेस त्यांदेखत
ह्मणून सुरतोत्सुका रहसिं ती वदे स्वप्रिया
मिटा प्रथम आपुल्या त्वरित कांत ! नेत्रद्वया १

स्वकांतपदधूलिनें जड शिला अहिल्या बने
तसेंच बनतील कीं मणिविहीन हीं कंकणें
ह्मणून मणिकंकणें निजकरांतुनी काढुनी
स्वनाथपद तैं धुई बहु सुखें धरानंदिनी २

स्वमस्तकिं शिवें स्वयें बसविली सपत्नी असे
असें बघुन पार्वती बहुत रुष्ट ती होतसे
पिऊन मृत व्हावया शिवगलस्थ हालाहलां
सरोष मग चुंबि त्या क्षणिंच ती शिवाचा गळा ३

---

* गेल्या वर्षाच्या दिजंबरच्या अंकांत पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी यानीं भावगुप्तदशक प्रकरण प्रसिद्ध केलें आहे. त्या प्रश्नांस हीं उत्तरें आहेत.

करीत असतां सदा विहित कर्म राजा नल
सुलुब्ध नल–सद्गुणां प्रिय--गुणा रमा होइल
नलाहुन कमी गुणी ह्मणुन आपणा सोडुनी
भजेल नल मा चला, हरि धरी भयां या मनीं ४
वसंतदिनिं हिंडण्या उपवनीं निघे सुंदरी
वरी सुख सभृंग ती बघुन पुष्पिता वल्लरी
त्यजून कुसुमें अलीश्वसनसौरभें मोहुन
मुखीं मुकरतील ती ह्मणुन [1]तें धरी कोंडुन ५
निदाघदिनिं होउनी वरतनू [2] तृषाव्याकुल
सुरक्त निजहस्ति घे परमशुभ्र गंगाजल
तिच्या करसमागमें सलिल रक्त भासें तिला
ह्मणून तवं टाकिलें त्वरित अंगनेनें जला ६
कलंकयुत चंद्रमा ह्मणुन राहु त्या सोडिल
अलांछन धरा--सुता--मुख--शशीस तो ग्रासिल
असें रघुवरा गमें जवं वधू बसे पाहत
सुपूर्णविधु, झाकि तो तवं तिच्या सुनेत्राप्रत ७
शशीस वर काढिलें मथुन सिंधु देवासुरें
सहाय बहु त्यां दिले समयिं वासुकी--मंदरे
समुद्रसुत ताप दे विधु ह्मणून निंदी अती
सुरासुर फणी नगाऽर्णवहि विप्रयुक्ता सती ८
शुकें परिसिलें निशीं रहसिं दंपतीभाषण
प्रभातिं करुं लागला उघड तो तदुच्चारण
शुकें वदु नयें तयां ह्मणुन घालि कीराननीं
सुरक्त वधु लाजुनी करकबीजसाम्यें मणी ९

---

१ श्वसन = श्वास. २ सुंदरी.

दरेक मुकुरीं प्रिया बघुन आपुली आकृती
स्वकांतरमणी तिला स्वमनिं तेधवां मानि ती
त्वरें मग पतीकडे रुसुनि ये वदे त्याप्रत
प्रिया! फसविलें मला विफल होय मज्जीवित १०

यथामति दिलीं तुह्मा सकल उत्तरें पारखी!
तपासुन बघा तयां मणि जसें बघे पारखी
पसंत पडलीं तुह्मां मज वदा किती उत्तरें
गुणावगुण दाखवा त्वरित साग्र पत्रोत्तरें ११

———————— कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी.

## श्रीमहावीरस्तवन.

मोगलाईत जैन लोकांचें एक 'तेर' ह्मणून क्षेत्र आहे. तेथें गांवाबाहेर दक्षिणदिशेस थोड्या दूर अंतरावर श्रीमन्**महावीर** तीर्थकराचें इ. स. चे ६।७ शतकांत **श्रीपूज्यपाद** आचार्यांनीं प्रतिष्ठा केलेलें एक प्राचीन जिनमंदिर आहे. त्या मंदिरांत त्या वेळची अत्यंत भव्य अशी एक प्रतिमा आहे. तेथील सृष्टिसौंदर्य जरि विशेष चमत्कृतिजनक नाहीं तरी आंतील भागांतला पूर्ण एकांत व पवित्रपणा आणि बाहेरच्या भागांतलें सृष्टीचें साधेपण स्वच्छ स्वरूप कविजनांच्या अंतःकरणांत उदात्त विचारांच्या आणि काव्यस्फूर्तीच्या लहरींवर लहरी आणण्यास पुरेसें आहे. तेथें गेले वर्षाचे जेष्ट महिन्यांत मी गेलों होतों. तेथील परमात्म्याचें दर्शन व सृष्टीचें अवलोकन यांच्या योगानें माझ्या अंतःकरणांत जे विचारतरंग उत्पन्न झाले ते पद्यस्वरूपानें श्रीवर्धमान तीर्थकरास अर्पण केले आहेत.

### वसंततिलका.

विस्तीर्ण दुःखद भवांबु–निधींत साचें
नौकेसमानचि गमे पदयुग्म ज्याचें

यद्दिव्य तेज विलसें तरणीसमान
तें वंदितों तवपदांबुज **वर्धमान** १

अत्युग्र सिंहसमही रिपुपंक्ति येवो !
पर्जन्यतुल्य खर मार्गणवृष्टि होवो !
राहो ! उभा पुढति येउनि मूर्त काळ
ज्याचें न चित्त चळतें लव अल्पकाळ ! २

ते शूरही, भ्रुकुटिनर्तन योषितांचें
चंद्रानना–हरिणशावक–लोचनांचें
होती त्वरें निरखितां, गतधैर्य साचें
वीरांस दास करि त्यां स्मर बायकांचे ३

त्या मन्मथा बळ जिनें नर जिंकण्याला,
हो ! तीच तीव्र रमणीक्षण–बाण माला–
ज्यांच्यापुढें विफल जेंवि नगीं समीर !
त्या शोभतें तुजसि नाम यथार्थ **वीर** ! ! ४

जी स्पष्ट दावुनि सदा विमलात्मतत्त्व,
द्याया समर्थ मनुजां अजरामरत्त्व;
हंसीसमान विहरे मुनि–मानसांत;
ती त्वद्गिरा मम हरो जडता नितांत. ५

रत्नें अमोल तुजला सुर पूजितात;
गंधर्व गाति तव सद्यश गोड, तात !
तेथें कितीक मम पूजन निर्धनाचें !
मद्गान कर्कशपणा जणु मूर्त नाचे ! ! ६

गाया निरंतर विभो ! तव गोड गाणीं,–
नाहीं प्रसन्न रमणीय मदीय वाणी !

हें अर्थशून्य मम कृत्रिम शद्बजाल--
केंवी निसर्गसरसा ! तुज आवडेल ? ७

त्रैलोक्यनाथ ! तुजलागिं उणें कशाचें ?
साहित्य योग्य न कळे तव पूजनाचें ! !
निष्काम तूं तरि कळे न रहस्य गूढ;
त्वत्पूजनांतिल विभो ! जन फार मूढ ! ! ८

बा ! निर्मला ! तुज कशा हवि वारिधारा ?
अर्पूं सुगंध कसला तुज गंधसारा ?
जी जातसे सुकुनि सत्वर पुष्पमाला,
वाहूं कशी तुजसि ती अजरामराला ? ९

ज्या क्षुद्विकार नुरला सुजनाभिरामा;
नैवेद्य त्या तुजसि येइल काय कामा ?
जो नित्य दीप्त भुवनत्रय--बोध--दीप;
त्या कासया उजळणें तुजलागिं दीप ? १०

आधींच जो सफळ, दुर्बळ--लोकमित्र;
त्या अर्पिणें फळ तुला गमतें विचित्र ! !
देवेंद्रपूजितपदा ! तुज काय साचें--
हें क्षुद्र पूजन रुचे मम-पामराचें ? ११

कोठें तुझे गुण विशाल जणों नदीन !
मी क्षुद्र पामर कुठें मतिहीन दीन !
नाहीं समर्थ सुरही गुण गावयाला;
ते केंवि साध्य मज हो मति--दुर्बळाला ! १२

आहे असा परम हीन विभो ! परंतु--
वागे मनांत तव निर्मळ भक्ति--हेतु;

आलों तुझ्या शरण शुद्ध पदांबुजाला;
वारीं विभो ! झडकरी मम कर्म--जाला. १३

आधींच हें पवनचंचल आत्मचित्त;
त्यांतून हो विषय--वारुणि--पान--मत्त !
झालों नितांत अघपंकनिमग्न देवा !
गेला लया मम चिरंतन सौख्यठेवा ! ! १४

कांतासुत--प्रणय, कांचन--मोह--पाश,
बैसोनि घट्ट मनिं होय सुबुद्धि--नाश;
तेणें कळे न लवही सदसद्विचार !
सन्मार्ग सोडुनि करीं भलतेच चार ! ! १५

मातें कळे, क्षणिक मानवदेह आहे;
ऐश्वर्य सर्व जरि अस्थिर मानितों हें;
संसार शुद्ध अघ--भार कळोनि नामीं;
त्या कर्दमीं पचतसेंच पुन्हपुन्हां मी ! ! ! १६

अत्यल्पही जरि दिसे नरलोकवास;--
कां हें भुलें स्वमन ऐहिक वैभवास ?
वाचोनि शास्त्र जरि त्यांतिल कीस काढी;--
कां लोभवृत्ति पळही न मनास सोडी ? १७

वाणेरडी जरि खरोखर पूर्ण काया--
तत्संगमोत्सुक मती तरि होय कां या ?
कां घे विधींच मन, सोडुनि शुद्ध तत्त्व ?
संसार भूसचि रुचे, न परार्थ सत्त्व ! ! १८

कां चित्तवृत्ति उलटी असली असावी ?
कां सत्पथीं वळवितां न वळे वळावी ?

भीते न ते प्रखर रौरव--शासनांही
बा ! मोह दूर मतिचा लव होत नाहीं ! ! १९

हें पाहिजे तुजसि कां कळवावयास ?
सर्वज्ञ तूं, बघशि जीवदशा अशेष;
कां पाहशी न मग तूं मम यातना ही ?
सद्बोध, शांति, लव ज्या हृदयांत नाहीं ! ! २०

आहे अशी असुख--पूर्ण दशा जयाची
तो दास मी, धरुनि आस मनोजयाची,
देवा ! तुझी मजवरी तुज आज याचीं.
व्हाया कृपा सु--करुणा--वरुणालयाची. २१

केव्हां कृपा मजवरी करिशील ? देवा !
केव्हां मिळेल मजला चिरशांतिठेवा ?
सद्बोध--भानु उगवोनि जगत्रयेश !
केव्हां मनस्तिमिर होइल नामशेष ? २२

कोठें सुधाधुनि भवद्वदनोद्भवा ते ?
जी दर्शनेंच करि दूर मनोभवार्ते;
ती कोणत्या विमल मानसिं आज पाहें ?
निष्पंक मानव जिच्या अवगाहनें हो. २३

केव्हां कषाय मम जातिल हे लयातें ?
केव्हां घडेल समता--गुण--लाभ यातें ?
बाणेल सत्य, विरती कधिं आत्मदेहीं ?
कीं जे तृणापरि गणी नृपवैभवाही. २४

झालें किती भ्रमण रे ! धरुनी सुखाशा !
सर्वत्र दुःख परि भोगुनि हो निराशा ! !

हें वर्तमानसुख केवळ भासमान !
भावी स्थिती तर किती दिसते भयाण ! ! २५

संसार--दाव--दहनीं जळतें निजांग !
केव्हां दया जलद तूं वळशील सांग.
दीनांस तारक तुझ्याविण अन्य नाहीं;
बा ! उद्धरीं त्वरित आत्म कृपेक्षणाहीं. २६

त्वत्कीर्ति--गंधयुत पद्यसुमांजली ही--
मी भक्तिनें तव पदांबुजिं आज वाहीं;
भो ! साधुरंजन ! निरंजन ! सौख्य--सद्म !
दत्तात्रयांतरिं वसो ! तव पाद--पद्म-- २७

——— दत्तात्रेय भिमाजी रणदिवे.

## भाँवगुप्तप्रकाश.

शिला बनत कामिनी चरण राघवें स्पर्शितां
पती--पद--सुविक्रमें सभय होय भूमी--सुता
सु--रत्न--युत कंकणा निज--करांतुनी काढिलें
स--पत्नि नव--कंटका सहज हो तिनें मोडिलें २

शिवें सवत आपुली निज--शिरीं मुदें घेतली
स--कोप मनिं पार्वती बघुनि फार संतापली
असह्य अपमान हा सवत--मत्सरें जाहला
बरें मरण यापरीं; स--विष कंठ तो चुंबिला ३

* पां. गो. शा. पारखी यांनीं दिलेल्या भावगुप्तदशकाचीं उत्तरें पृथ्वी वृत्तांतच करून सुटलीं तेवढीं दिलीं आहेत.

सु--वास--युत--सत्सुमें मधुप सोडुनी संभ्रमें
सु--रम्य--तरुणी--मुखांबुज--पराग--वासें रमे
असे भ्रमर पाहुनी सु--तनु जाहली घाबरी
धरी श्वसन कोंडुनी ह्मणुनि अंतरीं सुंदरी ५

निदाघिं रविदीप्तिनें सखि तृषार्त ती होउनी
करीं उदक शीत तें करुनि अंजुली घेउनी
सुखार्थ जंव प्यावया कर मुखीं तिनें लाविले
तिथेंहि रविनें करें छळियलें; जला टाकिलें ६

सु--पूर्ण शशि मोहुनी विषयिं; डाग त्या लागला
सुरम्य मुख--चंद्रमा तव बघूनि संतापला
मनीं धरुनि मत्सरा छळियलें तुला अंतरीं
ह्मणूनि नयनीं नको बघुं सुधाकरा सुंदरी ७

यदा जलधि विक्रमें अमर--दानवें मंथिला
धरूनि फणि मंदराचल करीं शशी काढिला
असह्य विरहीणिला जनित चंद्र तो पीडक
गमे; पतिवियोग ती स्मरुनि निंदि देवादिक ८

विनोद पतिपत्निचा परिसुनी शुकें मंदिरीं
प्रभातिं कथुं लागला बसुनि रात्रि तो पंजरीं
परिस्फुट करील तो सकल गुप्त गोष्टी शुक
ह्मणूनि सखिनें दिला खुडुनि तन्मुखीं लोलक ९

---

कार्ष्णि.

# काव्यरत्नावलि.

## अंक ६ वा.

## आँमचे आधुनिक् कवि पूर्वकालीन कविपदावरून ढळले आहेत काय ?*

ओव्या.

विप्रप्रभूंचे अमदानींत । एकादाचि केवळ निश्चित
झाला नर बहु विख्यात । माधवपंतासारिखा १०२
योषितांमाजीं रमा साध्वी । मल्हारी—स्नुषा अहिल्या देवी
दाभाड्यांची उमा तेंवी । किंवा लक्ष्मी झांशीची १०३
ऐसे हे सर्वांगसुंदर । राष्ट्रीं चमकले नारीनर
यावच्चंद्रदिवाकर । कीर्ति त्यांची प्रसिद्ध १०४
परी यांचेवरी कोणी । महाकाव्यें केलीं न अझुनी
खेदाची ही गोष्ट मनीं । वाटे मातें १०५
आंग्ल देशीं ही मंडळी । जरी जन्मती आंग्लकुळीं
त्यांच्या अनेक ब्रीदावळी । गायिल्या असत्या १०६
अनेक चारित्रें झालीं असतीं । महाकाव्या नसती मिती
विविध नाटकां तैशी भरती । आली असती अपूर्व १०७
परी आह्मी अस्मज्जन । लेखितों सर्षपासमान
त्यांच्या अंगींचे उत्तम गुण । भासती दुर्गुण आह्मांतें १०८

---

* गेल्या अंकांत ह्या प्रकरणाच्या १०१ ओव्या प्रसिद्ध झाल्या असून ह्या अंकांत हे प्रकरण पुरें झालें आहे.

'बालबोध' नामें मासिक पुस्तक । प्रतिमासीं लिही चरित्र एक
परकीयांचेंचि बहुधा, नसे भ्रामक । बोलणें माझें १०९
जणूं कांहीं अस्मद्देशीं । पुरुष न झाले तेजोराशी
काळाची गति अद्भुत ऐशी । वाहे कैशी पहा हो ११०
चरित्र असो कोणाचेंही । वाचायातें हरकत नाहीं
वाचकें परी गुणग्राही । होवोनि तें वाचावें १११
द्वितीय पक्षीं करितां विचार । मना वाटे आश्चर्य फार
कीं आह्मीं स्व-बालांसमोर । कां तीं चरित्रें ठेवावीं ?. ११२
कारण ज्यां आंग्ल मासिकें । जीं पाहिलीं परम--कौतुकें
त्यांमाजीं परंतु निकें । अस्मच्चरित्रें नसतीं कीं ११३
त्यांनीं अपुल्या पुत्रांस । माहिती आमुची द्यावयास
जे लिहिले इतिहास । एकतर्फी असती ते ११४
जेथें जेथें प्रसंग आले । स्वकीयातें वाखाणिलें
प्रसंगविशेषीं आह्मां निंदिलें । सार्थ केलें लेखातें ! ११५
शिवाजीसारख्या पुरुषोत्तमा । चातुर्यसद्गुणशौर्यधामा
कपटू लुटारू ऐशा नामा । दिल्या उपमा तयातें ११६
येविशीं करितां विचार । अंतर्यामीं खरोखर
'चोरास दिसती सगळे चोर' । ह्मण ही साचार वाटतें ११७
एवं ऐशा चोरांवरती । काव्यें कशाला करोनि परती
बालकहस्तीं द्यावीं तीं । न कळे सर्वथा ११८
परी आमुच्या नयनांप्रती । दोष तयांचे गुण भासती
अनुकरण करावें त्यांचें निश्चितीं । ऐसें चित्तीं वाटतें ११९
आह्मांवाटे नृप इंग्रज । अवतरला जणूं धर्मराज
ऐसा हा भ्रामक समज । चित्तीं चोज उपजवी १२०
ते डोईतें न मुंडिती । आह्मां आवडे तीच रीती

ऐशी ही अनुकरण-प्रीति । अपूर्व परी १२१
सुवर्ण आणि मौक्तिकें तीं । दुर्मिळ झालीं आह्मांप्रती
कच-भूषणें ह्मणोनि निगुती । माथा संप्रती शोभवूं १२२
बंड्या धोतरें आंगरख्यास । खो दिधला पागोट्यास
आह्मां आवडे तुमान खमिस । नेक्टाय-फांस गळ्यातें १२३
सर्वेचि आह्मीं स्वहस्तकीं । प्रेमानंदें निजमस्तकीं
टोपी घालोनि घेतली निकी । आश्चर्य कीं नसे हें १२४
अग्निहोत्रातें विसरोनि । गेलों परी क्षणोक्षणीं
समिध शेकतों धरोनि वदनीं । जठरवन्हि प्रज्वालितों १२५
एवंच वस्त्रप्रावर्णीं । सर्वेचि तैसें अशनपानीं
कमाल केली अनुकरणीं । प्रति इंग्रज झालों कीं १२६
ऐसा विदेशी पोषाक । आह्मी घालितों अलोलिक
ते हांसती निंदाव्यंजक । आह्मां कौतुक वाटे परी १२७
दोन शतकें इंग्रजासी । येऊनि झालीं अस्मद्देशीं
परी त्यांनीं अनुकरणासी । नाहीं केलें आमुच्या १२८
देशाकाला शोभे ऐसा । जरी आमुचा पोषाक खासा
परी त्यांनीं त्याच्या सहसा । स्वीकार न केला पहा कीं १२९
बंडी पगडी घालतांना । धोतरें तैशीं नेसतांना
कधीं कोणीं इंग्रजांना । पाहिलें काय सांगा कीं १३०
ऐशा स्थितींत आह्मी तरी । कां करावें सांगा परी
अनुकरण तयांचें साचारी । वाटे परोपरीं आश्चर्य ! १३१
अनुकरणातें करावयास । प्रतिकूल मी नसें खास
चित्तीं परी विचारास । करोनी तें करावें १३२
अनुकरण करावें सद्गुणांचें । न करावें परी दुर्गुणांचें
जें जें यथार्थ दिसेल साचें । तें तें नेमें घ्यावें कीं १३३

कालव्ययीं नियमितता । मिठें भाषण चतुरस्रता
दीर्घोद्योग आणि धूर्तता । सद्गुण तत्त्वतां आंग्लांचे १३४
सद्गुण हे अनुकरणीय । ऐसा माझा अभिप्राय
जेणें घडे सर्वथा अपाय । तें अनुकरण वर्जावें १३५
असो हा विषय प्रतिपादितां । विषयांतर झालें तत्वतां
समारोप करोनि आतां । विषय पूर्ण करूं कीं १३६
तात्पर्य महाकाव्याजोगी । स्थिति नाहीं देशालागीं
भाकडकथा काव्योपयोगी । सर्वथा नसती कीं १३७
समाजामाजीं फाटाफूट । शद्बांचा वृथा काथ्याकूट
कर्तृत्वाचा नायनाट । अवघीकडे १३८
कोणांमध्यें कर्तृत्व नसे । खुळ्या सुधारणेचें पिसें
लागलेलें सर्वत्र दिसे । काय यातें ह्मणावें १३९
ज्या काय झाल्या चार दोन । नरनारी कर्तृत्ववान
त्यांच्याविषयीं उदासीन । असे मन आमुचें १४०
उरली न कांहीं ईश्वरभक्ति । तैशी नाहीं देश-प्रीति
परकी रीती आवडती । जडे आसक्ति तयांवरी १४१
परकीयांच्या सत्ताबळें । शक्ति क्षीण झाल्यामुळें
अंतःकरण झालें दुबळें । कैसीं काव्यें व्हावींत ? १४२
" काय आणि कैसें करूं " । हाचि मंत्र अष्टोप्रहरू
घरीं दारीं निरंतरू । जपत असों १४३
आश्रय कोठें आह्मां नुरला !। कैसा प्रसंग ओढवला !
उदर लागलें पाठीला ! । चित्तीं कांहीं सुचेना १४४
एवं ऐशा कारणांनीं । आह्मी अस्मत्पदाहुनी
भ्रष्ट झालों सर्वथा जनीं । ऐसें मनीं वाटतें १४५
याचि कारणें मातें वाटे । पडल्या काळीं अशक्य मोठें

होण कवित्व उत्तम गोमटें । शंका नसे कांहीं ही १४६
आश्रयलाभ मिळाल्याविणें । उत्तम कवि निपजणें
पूर्वस्थानीं किंवा चढणें । शक्य न गमे सर्वस्वीं १४७
असो. जे जे म.झे चित्तीं । विचार आले कांहीं निश्चितीं
ते ते मी तुह्मांपुढतीं । ठेविले निगुतीं प्रेमानें १४८
प्रस्तुतविषया प्रतिपादितां । जास्ती उणें बोलिलों तत्वतां
परी त्याची क्षमा आतां । मुज्ञें मातें करावी १४९
मानवी कृति दोषास्पद । माझी न त्या अपवाद
कारण मी विशारद । नसे सर्वज्ञ तत्ता कीं १५०

मु. खेड.
२५।२।१९०७ — अनंततनय.

## रथरूपक.

कित्येक लोक असे असतात कीं त्यांच्या अंगीं स्वावलंबन नसतें, आणि ते नेहेमी दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करीत असतात, तेणेंकरून त्यांच्या हांतून कोणतेंही महत्वाचें कार्य होत नाहीं. तसेंच दुसरेही कित्येक लोक असतात, ते स्वतः कर्तबगार असूनही त्यांना इतरांशीं सलोख्यानें वागतां येत नसल्यामुळें त्यांच्या हांतून कोणतेंही मोठें कार्य होऊं शकत नाहीं. जे कोणी महत्वाचें कार्य करावयाची इच्छा करीत असताल त्यांनीं स्वावलंबन आणि सहकार्यकारिता हे दोन्हीही गुण शिकले पाहिजेत. हा उपदेश ह्या काव्यांत केला आहे.

ह्या काव्यांत वैभवाची इच्छा करणारा पुरुष हा रथी आणि देह हा रथ कल्पिला असून ह्या रथाची अंगें आणि उपांगें विस्तारानें निरुपिलीं आहेत ह्मणून त्यास " रथरूपक " असें अन्वर्थक नांव दिलें आहे.

श्लोक.

गौ[1]तमीतटिं सुगंध, शीतल, । मंद सेविन समीर निर्मळ
हा धरोनि मनिं काम हिंडलों, । फार, फार सुख तेथ पावलों १
हिंडलों बहुत काल या स्थलीं; । देखिली विकचपादपावली
तेथ पर्णकुटिकेंत राहिला । एक दिव्य मुनि तोहि पाहिला २
त्याचिया नमुनि वंद्य पावलां । सौख्य जीव मम फार पावला
तन्मुखोच्चरितशद्बसेवन । [2]हो ह्मणोनि धरि काम मन्मन ३
तोंच मंद गतिनें तया स्थळा । एक पूरुष वि[3]षण्ण पावला
त्या नमूनि मुनिला रडावया । लागला पुरुष तो भ[4]र्योंभया ४
तद्विलाप मज आयकावया । येउनी मजसि वाटली दया
शोक अल्पतर जाहल्यावरी । बोलला मुनिस तो अशापरी ५
“ काय मी करुं ? कसें करूं अतां ? । देवही न करि मत्सहायता
जाहला अदय देवही मग । कां न होइल तसेंच हें जग ? ६
हाय ! हाय !! कठिना मदापदा, । दुःख हाच मम भाग सर्वदा
सौख्यगंधहि मला न तो शिवे, । देहताप न मदीय हा निवे ७
कोणिही मज न देति आश्रया । जेवि देति न गृहीं बिले[5]शया
टाळिती मज जसे हलाहला, । साहवे न जनवृत्ति ही मला ! ८
खावया मज मिळे न भाकरी, । काय मी करुं ? कसें करूं तरी ?
आलिया मरण तो महोत्सव । मी ह्मणे न; रडवी इथें भव ! ९
दाविती न कुणिही मला दया, । येति कोणि न सहाय व्हावया !
रक्तपीतिमलि[6]नांस ज्यापरी । टाळिती मजासि लोक त्यापरी १०
हाय ! हाय !! पडलों असें तमीं, । मंदभाग्य मजसा, न अन्य, मी
साहवे न उपवासयातना, । सौख्यलेश नच्चि माझिया मना ११

---

१ गोदावरी. २ होवो. ३ खिन्न. ४ ओकसाबोकसी. ५ सापाला. ६ महारोग पीडितांस.

मी धनार्थ झटतों जरी सदा । येतसे न सदनांत संपदा
एकही मम नसे कपर्दिका । संसृती मजसि तापदायिका १२
लेशही यश नसे करा मम । व्यर्थ सर्व मम होति उद्यम
धिग्जिणें मम ! कशास जन्मलों ? । जन्मतांच तरि कां न वारलों ? १३
मानवी तनु सुखास भाजन । हें सदैव ह्मणती महाजन
किंतु हीच तनु मानवी मला । दुःख भोगवितसे सुनिर्मला १४
हा प्रपंच मजला नको नको !! । वाटते मजसि भार बायको
भार होति मुलगे, मुली मला, । फार फार मम जीव कावला १५
मी कुटुंबपरिपोषणाक्षम, । एकही नचि कपर्दिका मम
काय देउं तरि त्यांस खावया ? । धान्यमुष्टि न शिवे मदालया " १६
दुष्ट दैव पुरुषें तयें असें । वर्णिलें मुनिस खिन्नमानसें
ऐकिलें सकळ लक्ष्यपूर्वक । त्या तदुक्त समजोनि तो स्वकें १७
तीव्रशोकवच ऐकतां मला । शोक बाढतम चित्तिं जाहला
कोण कोमळमना न होइल । देखतां परशुचा शुगाविल ? १८
सांत्ववाक्य वदणार तो मुनी । प्रेम कोमल तयास दावुनी
तोंच पूरुष दुजाहि पातला-- । तेथ, यास्तव मुनी न बोलला १९
हा दुजा पुरुष कोपभीषण । तेथ टाकुनि पदें दणादण
ठाकला मुनिपुढें उभा क्षण, । बोलला मग असेंच भाषण २०
" अग्रय मान न मिळे मला जनीं, । लागले जन अनर्हपूजनीं
पूज्य मी तरि मला न पूजिती, । मद्गुणा लव न लोक अर्चिती २१
कःपदार्थ समजें मला जन । पात्र मी जरि तिरस्कृतीस न
लाभतां अवसर प्रशस्तसा । मी जना करिन तुष्टमानसा २२
आळियास अधिकार मत्करीं । लोक होतिल सुखाढ्य सत्वरीं

१ कवडी. २ माझ्या हाताला मुळींच यश नाहीं. ३ पात्र. ४ अत्यंत पवित्र अशा मला. ५ नातलग. ६ अयोग्य माणसाच्या सेवेला. ७ तृप्त आहेत मनें ज्यांची.

किंतु नावेसर[1] लाधतां मला । दावुं केवि मम रीति निर्मला ? २३
मीच योग्य जनतेस अग्रणी, । मी समर्थ जनविघ्नवारणीं
बोढ बाढ[2] मम वावदूकता,[3] । लोकचित्त रमवीन तत्वता २४
मी करीन शतशा सुधारणा, । मी झटेन जनरोगवारणा
ज्ञानवर्द्धन जनांत व्हावया । द्रव्य मेळविन पुस्तकालया २५
बार्डकष्टसहनीं[4] न मी उणा, । ते न ओळखिति माझिया गुणा
शास्त्रवृंद मज सर्व ठाउका, । मी करीन बहु लोकभावुका[5] २६
सर्वकर्मकरणीं गती मम, । श्रेष्ठकार्यकरणास मी क्षम
कार्यदक्ष मजसा, न अन्य, मी । नेणतों जन न कां मला नमी " २७
यापरी करुनि उग्र भाषण । हा दुजा पुरुष थांबला क्षण
तों मुनीहि उभयां वदे असें । " आयका हित विशुद्ध मानसें २८
जाणतां उभयही न सत्पथ, । साधती न तुमचे मनोरथ
स्वावलंबन न एक जाणतो, । यामुळेंच न सुखास लाहतो २९
हा दुजाहि सहकार्यकारिता[6]– । नेणतो, न मिळवी निजा हिता
स्वावलंब सहकार्यकारिता । युग्म दावि विभवास निश्चिता ३०
युग्म हें जर अभंग[7] राहिल । लोक वैभव तरीच पाहिल
युग्म हें फुटुनि एक एकला । दाखवील गुण नैव तत्फला ३१
देश मेळविन आपुल्या प्रिया । एक एक गुण अंगिं ज्याचियी[8]
हीन दीनचि सदैव राहिल । नष्टचर्य न कधींच टाळिल ३२
धैर्य न त्यजुनि मार्ग चालणें, । दूर निंदक जनास टाळणें
देशकार्य मनिं नित्य वाहणें । हेंच योग्य बुध सर्वदा ह्मणे ३३
स्वावलंबनें सहार्थसाधन । चक्रयुग्म मिळवो जगीं जन[9]

---

१ संधी न साधता. २ पुष्कळ. ३ वक्तृत्व. ४ पुष्कळ त्रास सोसण्याच्या कामीं. ५ लोककल्याण. ६ दुसऱ्याशीं मिळून मिसळून वागणें. ७ न फुटलेलें. ८ ज्या देशां-तील माणसाच्या (अंगीं.) ९ श्लोक ३४ पासून ४० पर्यंत रथाचें रूपक स्पष्ट केलें आहे.

देह हा रथ, तदक्ष निश्चय, । अर्थ काम ढकलोत तो हय ३४
धर्म सारथि सजो अशा रथा । जो कधीं अनुसरे न कापैथा
हाच सारथि समस्त टाळिल । मत्सराद्युपल जे पथांतिल ३५
प्रेम तैल मसृणा करो गती, । घर्षणाग्नि न नडो रथाप्रती
अक्षचक्रपरिघर्षणोद्भवों । मंदता लघु करो न कीं जवौं ३६
चित्तगा विमलमोक्षकामना । ही कशौं हयरथाभिवर्द्धना
ही कशा हयतनूंस लागतां । ते कधीं न धरितील मंदता ३७
स्थान गम्य समजोनि वैभव । ह्या रथावरि चढोत मानव
ह्या रथावरि बसेल जो कुणी । तो सजेल सकलाहि सद्गुणीं ३८
चालतां नयपथें असा रथ । सिद्ध होतिल निके मनोरथ
मेळवाल सगळे तुह्मी जय, । बाळगा मनिं न लेश संशय ३९
अंग ह्या रथिं उपांग एकही । न्यून दुःखि ढकलील दुःसहीं
सिद्धता सबल जाहल्यावरी । मेळवील जन काम सत्वरीं ४०
जा कलिप्रवणता तुझी गळो, । द्वेष मत्सर अशेषही जळो
तूं जनास बिलगूनिया रहा । स्वीकरीं सहनशीलता महा ४१
सर्वही तुजसि लोक चांगले– । वाटतील, ह्मणतील आपले
तत्समागम तुला सुखावह । नित्य होइल, मुळीं न दुःसह ४२
जे परस्परविरोध मांडिती । ते न वैभवदशेस भोगिती
ते समाजदृढबंध तोडिती । देशभावुक उगाच रोधिती ४३
देशहानिकर ह्या कलीपरी । वस्तु कांहिंच न, गोष्ट हे खरी
अग्नि हानि न करी तशी कधीं, । सेतु वा न फुटतां महोदधी ४४
पीडितो कलिजसा जना सदा । तेवि पीडित नसे शंतन्हदा

१ अक्ष–आंस, कणा. २ भलताच मार्ग. ३ मत्सर वगैरे मार्गांतील धोंडे. ४ गुळगुळीत. ५ आंस आणि चाके एकमेकावर निघणारी उष्णता. ६ वेगाप्रत. ७ चाबूक. ८ घोड्याची गती वाढविण्यासाठीं. ९ तंटे करण्याची खोडी. १० वीज.

भूमि घोर कलिनें खचे जशी । [1]वप्रभित्ति पडतां न तीं तशी ४५
लोकहानिकरणीं कली बळी, । दूर टाळुनि असा सदा कलीं
लोकसंहतिविवर्द्धना[2] झटा, । अंतराय बघतां न वा हटा, ४६
लोकसंहतिविभंग व्हावया । लोकशक्ति विहता करावया
शत्रु नित्य झटती सकैतवैं,[3] । दक्ष होउनि रहाच यास्तव ४७
सावधान हितशत्रुशीं रहा, । घोरनाशकर तो असें पहा
स्नेह दाखवुनि मान कापितो, । आश्रयोचित न हो कदापि तो ४८
वक्तृतागुण न एकटा बरा, । कर्तृतागुण तयासवें वरा
कर्तृतागुणविहीन जो नर । बावदूकहि फुका खरोखर ४९
देखतों नर अनेक भूवरी । वक्तृतागुण वसे यदंतरीं
ते न कार्य करितात एकही. । दुःखि लोटिति जनास दुःसहीं ५०
कर्तृतागुणविशिष्ट वक्तृता । लोकभावुक करील तत्वता
व्यर्थ त्या गडबडी ह्मणे कवी । ज्या न दावितिं महोन्नती नवी ५१
बंधुबांधवजनास रक्षिणें । लोकसंघकुशलास लक्षिणें
हाच उच्चतम धर्म मानिला, । हाच धर्म कविनींहि वानिला ५२
षंढतां तुजहि लेश नातळो, । सर्वही अलसता तुझी गळो
जा निरंतर करोनि उद्यमा । संसृतींतचि लहो सुखा शमा ५३
सव्यबाहुसम मित्र नेतर । आढळेल भुवि हें खरोखर
सव्य बाहुस करील आश्रय । त्यास अल्पहि नसे कुठें भय ५४
सव्य बाहु फसवी न तो कधीं, । मित्र तत्सम नसे जगामधीं
संकटीं विधिवशें पडे नर । सव्य उद्धरिल बाहु, नेतर ५५
जा परस्परविचारसंमत । वर्तनक्रम धरोनि संतत
मेळवा उभयही तुह्मी मैहा[6] । स्वर्गसौख्यहि महीवरी लहा ५६

---

१ पर्वताचा भींतीसारखा कडा. २ लोकांतील एकी वाढविण्यास ३ लबाड.
४ कर्तृत्व शून्यता. ५ मिळवा. ६ वैभव.

तत्व हें तुमचिया ठसो मनीं, । व्हा दयाळु अति आपुल्या जनीं
मत्सराग्नि न तुह्मास आतळो, । द्वेष चित्तगत तूमचा जळो ५७
षड्रिपू ह्मणितले भयंकर, । ते तसे नच सदा खरोखर
बंधुबांधवहिता करावया । प्रेरितां रिपु सहा भजा तयां ५८
जे चहाड जन त्यांस आश्रय । देइ तो नर फसे, तया भय
मातृगामि नर तो चहाड जो । तत्समागमिं न कोणिही धजो ५९
श्वास तो खचित वांतिभक्षक । दंशकार्यकरणास तक्षक
क्रूर तो स्वजन डोंब जाळितो, । तो सुखी पिशुन जो न पाळितो ६०
हा समाज विभवास पारखा, । हा जिता मृत सदैव सारखा
त्यास कारण परावलंबन, । मत्सर प्रखर सोडि ना जन ६१
जो झटे मनगटाचिया बळें । निश्चयें श्रम करोनि निश्चळें
संपदा सकल तोचि भोगिल, । ऋद्धि सिद्धि वश त्यास होतिल ६२
भार घालुनि परावरी जन । बैसती, करिति यत्न लेश न
तन्मनोरथ कधीं न साधती, । शुद्ध ते सुख कधीं न लाहती ६३
स्वावलंब अति इष्ट हें खरें । किंतु न स्वजन सोडणें बरें
सोडुनी स्वजन रूक्ष वैभवें, । नित्य घ्या स्वजन आपणासवें ६४
हा मदर्थ अमकें करो असें, । तो मदर्थ तमकें करो तसें
हे विचार सुटले न जोंवरी । प्राप्त वैभव न होय तोंवरी ६५
आत्मशक्तिवरि भार घालणें, । लेशही न खचणें विपद्गणें
हा धडा जंव न ठाउका जनां । लाहतील तंव ते न कामना ६६
अग्रणीत्व मज योग्य संतत, । लोक हे अनुसरोत मन्मत
हे जिथें सकल इच्छिती जन । तो बघेल विभवा समाज न ६७
पालखी सकलही बसावया । इच्छिती, न कुणि ती वहावया
द्रव्य, मान, सुख सर्व इच्छिती । देहकष्टसहनास टाळिती ६८

१ संकट समुदायानें.

सोडुनी स्वजन जी सुधारणा । ती सुखावह नसे असें ह्मणा
आवळोनि सगळे परस्परां । देशकार्यकरणीं करा त्वरा ६९
स्वावलंब तुमच्या ठसो मनीं, । व्यस्त[1] व्हा न सहकार्यसाधनीं
स्वावलंब सहकार्यकारिता । युग्म हेंचि करितें सदा हिता ७०
हें आदरोत "रथरूपक" काव्य लोक,
हें नित्यपाठ समजोनि शिकोत तोक
त्यांतील बोध सकलां जर मान्य झाला
होईल हर्ष तर वामननंदनाला ७१

— — — — विद्याधर वामन भिडे बी. ए.

## महाराष्ट्रमहोदय.*

अध्याय २ रा.

पूर्वजवर्णन.

आर्या.

सर्व महाराष्ट्रातें यत्कृतिनें हो स्वतंत्रता दिधली
जी प्राणिमात्र इच्छी तत्पूर्वज गोष्ट पाहिजे कथिली १
ज्या रविकुलांत–ज्यांचा धवलयशःकेतु काळमंदिरिं तो
शोभे अखंड, ऐशा–मी अजदशरथमुखा नृपा स्तवितों २
सद्वंशशंसनातें अङ्गीकारीन भृंगभंगीतें
तन्नरहीरचरित्रप्रवेशना वा बनेन सूत्रचि तें ३
तरतां येइ न ह्मणुनी गंगेतें स्पर्श काय न करावा
अल्पायुष जरि कळलें सुत परि तातें न काय रक्षावा ४

१ भ्यालेले, घोटाळलेले.

* गेल्या मार्च महिन्याच्या ३ ऱ्या अंकांत ह्या काव्याचा अध्याय १ ला (नमनाध्याय) आलेला आहे.

सिंधु प्राशनिं जैसा टिटवीचा हो मदीयही तैसा
यत्न, असे रविकुलमणिमाला गुंफावयास हा सहसा ५
गळतील यांत कांहीं उत्तम; कांहीं कनिष्ट येतील
आह्मां कनिष्टही ते सदुदाहरणासमान होतील ६
सामान्य तयांतिल जे साम्य असामान्य वर्त्तमानींचे
लोकहि त्यांशिं न पावति सुविचारी मात्र जाणते याचे ७
प्राचीन वंशवर्णन हरिवंशीं वाचना मिळे लोका
अर्वाचीन नरांची मात्र कथिन अल्प वृत्त तें ऐका ८
दिनमणिकुलतेजाच्या वर्णनिं संतत सरस्वती थकली
धाली न परी ह्मणुनी पुन:पुन्हा ती तयांतची रमली ९
रविकुलवतंससद्गुणमधुरत्नाकर असे अमर्याद
त्यांतिल रत्नमणीची शिणेल करितां सहस्रकर याद १०
कुमुदा मुदास देतो शशि तो तैसाच सर्वदा त्याचा
वंशहि अतिशय लोकां संतत अतिथीस सर्व दात्यांचा ११
मानसजन्माशशि; तद्वंशनृपालावतंस तर्पिति ते
पितरासम जणु जनमनमानसहंसासमान तद्यश तें १२
याचक चातक मुदद स्वातिघनरसें नृपाल अमृतकर—
वंशीचे दानोदार्द्र सदा यत्कर हिमर्तुचंद्रकर १३
कौरव पांडव यादव यांचा आहे प्रसिद्ध इंदुभव
भारत काळीं वैभव भोगुन जाती तरून पार भव १४
कौरववंश बुडाला यादवसह पांडवीय जनें उरला
वत्सें विक्रम केला त्यांतिल ज्याची करूं न येच तुला १५
मागधमौर्यकुळींच्या स्मरण असो या अशोक राजाचें
करि भू अशोक; भूपति नमिति पदीं झुकुनियां करा ज्याचे १६
वल्लभिपुरीं करीती रविवंशज मेदिनी सवल्लभ ते

भट्टारकादि यद्यश राहे व्यापून सर्वही नभ तें १७
तत्पूर्वि त्याच वंशीं विक्रमभोजादि आब्धि सुयशाचे
श्री ज्यापुढती नाचे नृप झाले भारतस्थ सुजनाचे १८
वेङ्गीच्या चेलाभिध नृपतींचा पांडवांशिं संबंध
करि यत्सुयशोगंध त्रिभुवनिं मनुजा सुरा तसें धुंद १९
करुनी अखंड समरा वीररसा लुब्ध तत्प्रिति भ्रमरां
गेले कीर्तिस अमरा करुनी ते गेय जी सदा अमरां २०
पुढती कनोज भूपति मुख्य जयामाजि हर्ष विक्रम हो
ज्याच्या पाळायाचा सुजना धरणीस हर्षवि क्रम हो २१
बंगाल देशिं झाले सेन पुढें पाळ भूमिपाळ महा
यन्नयछत्राखालीं भोगिति सुख सर्व सर्वकाळ महा २२
आंध्रांनीं पाळियली भारतभू दोन चार शक शतकीं
हरिली यांची सत्ता चालविली आपुली पुढें चुलकीं २३
रविशालिवाहनाला दावूं मलेख सत्य सुमनाला
वाटेल दीप झाला विपरीत असा परी समय आला २४
सौराष्ट्रिं नवमशतकीं श्रीप्र करी चावडा जशी बटकी
वनराज शत्रु हटकी समरा अरिला गमे तदसि पटकी २५
माणिकराय चव्हाणें गाजविली हस्तिनापुरीं विजयें
निजकरवाल तयानें सांभारी वंश उजळिला स्वनयें २६
तद्वंशिं पृथ्विराजा श्री ज्या होऊन पाइर्चा व्हाण
राहे तो हो ज्यानें घोरीला आणिलें पदीं शरण २७
विश्वासघातपातक जोडोनी त्यास घोरि घात करी
दुष्ट स्वभाव ज्याचा तन्मद करि घात आपुला स्वकरीं २८
बुक्क महाराजाला बंदा वेदान्तभाष्य जो करवी
सायणमाधवकरवीं ज्ञानाचा मूर्त जो प्रशान्त रवि

राजे चितोडदुर्गी दुर्गासत्भक्त ज्यास राणाजी
ह्मणतात जे न केव्हां यवना तनयेस द्यावया राजी ३०
स्मृतिटीका अपरार्का केलि जयानें तया न अपरार्का
शिलहारसुवंशार्का निज हृदयांतुन करा तुह्मी परका ३१
बल्लाळचेरपांड्यादिक झाले भूप दक्षिणेमाजी
ज्यांचें वर्णन करितां अबला जिव्हा क्षणीं शिणे माझी ३२
देवगिरीचे जाधव नृप विजयानगरचे महा विभव
कादंबवंशसंभव गोव्याचे नृप अतुल यदनुभाव ३३
ऐसे अनेक वंशीं कीर्ति जयाची सदा जनीं राजे
झाले अनेक राजे कथिले स्मरले मला असे जे जे ३४
संक्षेपें कथिलें हें रुचि देतां रुग्ण माणसा लेहें
इतिहासाची भरतां तशि यानें सार्थ यत्न झाले हें ३५

नारायण कृष्ण गद्रे.

## भ्रमरीची भ्रमरास विनंती.

श्लोक.

शोकें व्याकुल जाहली मधुकरी कांहीं सुचे ना मुळीं !
चिंताक्रांत सदा बसे; तनु तिची कोमेजली कोंवळी ! !
झालें लुप्त तिचें समग्र विरहें सानंद गुंजारणें !
तैसा नित्य नवा सुपुष्परज तो सेवावया धांवणें ! १

केला निश्चय पूर्ण एकदिनिं, कीं—टाकोनियां भीतितें;
नाथातें विनवीन मी जयिं गृहामाझारि येतील ते;
साहूं ताप असह्य हा कुठवरी आतां असा मी तरी ?
देवा ! तूं विरहव्यथा लिहिसि कां माझ्या कपाळावरी ? २

ऐसी जों भ्रमरी वदे न वदनें तों नाथ आला घरीं.
स्वच्छंदें नलिनीसवें रमुनिया जो केलिलीला करी;
बोले तो "दिससी उदास इतुकी तूं कां प्रिये ! लाडके !
कां कोणीं तुज गांजिलें ? दुखविलें त्वच्चित्त पक्ष्यादिकें ? ३

नाहीं पुष्पपराग काय तुजला चाखावया लाभला ?
किंवा अन्य कुणीं बळें हिसकुनी भक्ष्यांश तो घेतला ?
तूंतें टोंचुनि बोलली कमलिनी गर्वोक्तिचीं कां वचें ?
तेणें चित्त तुझें विषण्ण गमतें कांहीं तुला ना सुचे !" ४

ऐशीं मंजुल गोड भृंगवचनें ऐकोनि ती हर्षली;
चित्तातें परि शांतता न तिचिया अत्यल्पही लाधली;
मोठें धैर्य धरोनिया स्वपतिशीं ती बोलली शेवटीं;
"दीनेची परिसा विनंति सखया ! हें मागतें संप्रति; ५

स्वामी ! काय असा प्रमाद घडला माझ्याकडोनी तरी ? .
जेणें चित्त विटे; नसे प्रणय तो अत्यल्पही हीवरी !–
नाहीं दुःख दिलें तसें कटु वचें केव्हां न मीं ताडिलें !
निर्भत्सोनि तुह्मां न मी क्षणभरी अन्या पदां इच्छिलें. ६

सेवेशीं तुमच्या सदा विनटलें मी चक्रवाकीपरी;
नाहीं लेश उणें कधीं पडुं दिलें केली किती चाकरी;
होतें प्रेम अपार जें मजवरी तें हो ! कुठें लोपलें ?
नोहे प्रेम खरें, वृथैव फसलें ऐसें मनें घेतलें !! ७

वर्षाकालिं विहार मेघ चपले संगें करी कौतुकें,
तेव्हां गांजियलें कथूं कितितरी या दुष्ट कामादिकें !
मत्प्राणेश्वर आज येतिल उद्यां आशेवरी या दिन–
कंठीं; साहुनि जाच मी पण मला झालें न तें दर्शन ! ८

वर्षाकालहि शेवटीं निघुनिया गेला प्रिया ! श्यामला !
आली शारद मंदिरीं शशिसवें ती चंद्रिका शीतला;
तेव्हांच्या किति दुःसहा प्रियकरा ! सांगूं अवस्थेस मी !
नोहे दैववशें परी निढळिंचें तें दुःख कांहीं कमी ! ! ९

एकामागुनि एक सर्व ऋतु ते गेले स्वकालक्रमें;
दुर्दैवी पण मी सदा भ्रमतसें संतापचिंताभ्रमें !
आला सांप्रत हा वसंत रसिका ! जो मन्मथातें प्रिय;
ऐशा सौख्यद काळिंही गमसि तूं मातें अहा ! निर्दय ! ! १०

आलीसे कृशता त्वदीय विरहें माझ्या शरीरा अति;
सारा वेळ अशी तटस्थ बसल्यें न स्वास्थ्य चित्ताप्रति !
जेव्हां पाहतसें विहार करितां मी राजहंसांगना;
तेव्हां जाउनि दूर दूर लपल्यें होवो न त्या यातना. ११

तेथेंही पारे तेंच तें दिसतसे दृष्टीस माझ्या प्रिया !
व्योमीं चंद्र सखीसवें; महिवरी क्रीडा विहंगांचिया ! !
तेणें ये विरहव्यथेस भरती अत्यंत दुःखासवें !
माझें सांत्वन मीच तें करितसें गाळोनियां आसवें ! ! १२

पूर्वीच्या समयीं जिला धरुनिया आलिंगिलें प्रीतिनें;
क्रीडासौख्यि असां निमग्न जिचिया संगें सदा चुंबनें—
प्राणज्योति ह्मणोनि मंजुल वचें जीतें सदा बाहिलें;
तीतें कां अवमानुनी प्रियतमा ! आतां तिरस्कारिलें ? १३

लोकीं सांगति कामिनीसम दुज्या कोणी न त्या चंचला;
खोटें हें ठरतें परंतु ह्मणणें हा बोध झाला मला.
ठेवावा जगतांत या तरि अतां विश्वास कोणावरी,
वर्तावें अथवा समंजस जनें स्वच्छंद मेवापरी. १४

एकीला त्यजुनी दुजीस वरण्या मिथ्याश्रमें धांवणें;
पाशीं गोंवुनिया तिला फसविणें; हें श्लाघ्य कोण्या गुणें ?
येऊं द्या करुणा तुम्हांस रमणा ! टाका तिच्या चिंतना;
दासी अंकित ही सदैव तुमची होवो पुरी कामना. १५

रूपें सुंदर पंकजा सुरुचिरा हीनान्वया ती परी;
तीच्या सद्गुण अंगिं येइल कसा थोरास जो आदरी ?
आहे चंचल, पापिणी, कमलिनी, ती कामिनी, [2]स्वैरिणी;
जों जों भोगितसे सुखें रतिसुखा तों तों तदिच्छा दुणी ! ! १६

तीची वृत्ति विलोल पाहुनि अशी चंद्रास खंती गमे;
तेणें खिन्न दिसे मनीं झुरतसे संदेहमोहीं भ्रमे.
ऐशी जी व्यभिचारिणी, रुळतसां तीच्या तुम्ही कां पदीं ?
नादीं लागुं नका; तिच्या जिवलगा ! लोटील ती [3]आपदीं ! १७

गौरांगी, हृदयंगमा, सुविमला, आनंदसंवर्धिनी,
प्रेमें संतत पौर्णिमा शशिसवें खेळे सदा क्रीडुनी,
ऐसी निष्कपटी परंतु मति जैं त्या पौर्णिमेची चळे,
तेव्हां राहु गिळी तिच्याच कपटें चंद्रा कुबुद्धी बळें ! ! १८

नाथा ! सांगितलीं तुम्हांस चरितें गौरांगनांचीं अशीं.
त्यांचा नेम नसेचि पाडितिल त्या केव्हां कळे ना फशीं !
सोडा छंद तिचा अतां मधुकरा ! सेवेंत मी तत्पर;
या या प्रेमभरें तुम्ही मज म्हणा " ये ये प्रिये ! सत्वर. " १९

' चक्रवाक् '

१ इच्छा. २ स्वच्छंदानें वागणारी. ३ संकटांत.

## प्रसूपय.*

श्लोक.

निज प्रसूचें पय पुष्टिकारक,
तदन्य केव्हांहि पिओ न अर्भक
प्रसूपयें अर्भकतेज वाढतें,
न वाढतें अन्यपयें कधींच तें १

जया वयीं तेज जया प्रकारचें
निसर्गरीत्या शिशुला गुणें पचे
तया वयीं दूध तया प्रकारचें
स्तनीं शिशूच्या परिपोषणा रॅचे २

अवश्य जे जे रस बालवर्द्धना
वॅसा, जल, क्षार निसर्गबंधना
प्रसूचिया ते मिळती स्तनीं तसे;
प्रसूपय श्रेष्ठ नसे वदा कसे ? ३

पय प्रसूचेंच अवश्य बालका,
गुणा तयाच्या विसरूं कधीं नका
स्वबालका पाजिल न प्रसू तरी
स्वतास ती त्यासहि दुःखदा खरी ४

प्रसूपयःपान असे हितावह
तिलाहि, त्यालाहि; अवर्ण्य तन्महॆ
हितावहा ईश्वरयोजना अशी
रुजेस उल्लंघियली न दे कशी ? ५

---

* जन्म देणारीचें दुध १ तयार होते. २ चरबी. ३ त्याची थोरवी.

अनेकरोगाकुल बाल होइल
प्रसू न ज्याला निज दुग्ध पाजिल
स्वताहि ती रोगरुजेस भोगिल,
असेंच आहे वचन स्मृतींतिल ६

असेंच धन्वन्तरिचें असें मत,
असेंच सृष्टिप्रगतीस संमत
जिणें दिला जन्म सुयोग्य तत्पय,
तदन्य जें तें न करी अनामय[1] ७

यदर्थ उत्पन्न करी निसर्ग जें
तदर्थ तें, नेतर योजिलें सजे
शिशूस प्याया जननीस्तनीं पय
तयेंच ये पुष्टि तया; न संशय ८

न पाळि जी रीति निसर्गनिर्मित
करील तो भोगिल दुःख निश्चित
क्षमील राजा निजशास्तिभंजनें[3],
क्षमा निसर्गीत मिळे कधींच न ९

निसर्ग कोणासहि न क्षमा करी
समान तो क्षुद्र नरीं महेश्वरीं
बघो नृपाला फसवूं शके नर,
निसर्ग कोणा न फसे खरोखर १०

असे अतिक्रूर[2] निसर्ग शासनीं,
निसर्ग आणी न दया, क्षमा, मनीं
निसर्ग जो लंघिल तो असो नृप,

१ निरोगिता. २ भयंकर. ३ आपल्या आज्ञेचें उल्लंघन.

क्षमा न पावेल; निसर्ग निष्कृप ११
निसर्ग लंघून न दण्ड होय तो
न मर्त्य कोणी भुवनांत पाहतो
ठसो असें तत्व जनाचिया मनीं,
न टाळवे दण्ड निसर्गलंघनीं १२
प्रसूपय:पानमहत्व संतत
न नीतिशास्त्रानुसरें न संमत
कृतज्ञता मान न पुत्र दाविल
प्रसूस जो तत्पय नैव सेविल १३
निजार्भका पाजि न जी प्रसू पय
तिच्याहि हो चित्ति ममत्वसंक्षय[1]
ममत्वहीना असती प्रसू खरी
न ती नरी; ती ह्मणिजे निशाचरी १४
मरोनि दैवें जननी स्तनंधयें[2]
अनाथ लाधेल न जो तिचें पय
परस्त्रियेचेंच अवश्य त्या पय,
न टाळवें तें जर दैव निर्दय १५
निज प्रसूचें पय शांतिदायक
निज प्रसूचें पय पुष्टिकारक
निज प्रसूचें पय तुष्टिदायक
निज प्रसूचें पय तापवारक १६
परस्त्रियेचें पय रोगकारक
परस्त्रियेचें पय शोककदायक

१ प्रेमाचा नाश. २ आंगावर पिणारें मूल.

परस्त्रियेचें पय नीतिभंजक
परस्त्रियेचें पय भक्तिहारक १७

जन विसरति हो प्रसूच्या पयाची अशी थोरवी,
स्तवुनि अजि तया न विद्याधर श्रान्त गातां कवी
सकल परिशिली जनांच्या ठसो थोरवी ही मनीं
निजहितपर जो रतो सृष्टिच्या तो न उल्लंघनीं १८

——————— विद्याधर वामन भीडे बी. ए.

## निराशेचें गीत.

साक्या.

शितल छायेमाजी गावो कोकिल मंजुल गान;
बुल्बुल रिझवो मन रजनीचें शिणवुनी पंचप्राण. १
किरण पसरोत वृक्षजलांवरि शुभ्र असे चन्द्राचे;
होवो उज्ज्वल रूप तयांनीं पर्वत सरोवरांचें. २
मधुर मनोहर करोत हास्या भुलवी प्रेम जयांना.
प्रणयाची जी ज्वाला विझली हृदयीं मम उजळे ना. ३
वेताळासम समोर माझ्या पूर्वी नाचे आशा !
अदृश्य होउनि ठायीं तीच्या येई हाय ! निराशा !! ४
व्यूहीं अजाणतीसम फसलें आशेच्या मी जाळीं;
मृगजळ आतां समजूं आलें; जल गमलें त्या काळीं ! ५
पुढच्या मार्गी दिसे न ज्याची इच्छा मनिं उपजावी;
लभ्य अपेक्षित इतरां वस्तू असोत परि मज नाहीं ! ६
हास्य स्मित वा यांची बाधा मुखास न घडे आतां;
शांतीमय हें मानस झालें हेतु सुखाचा आतां ७

चरकामध्यें ऊस पिळावा त्यातें रस ना गोडी;
सुवासिक सुके गुलाब जेव्हां रूप सुगंधहि सोडी. ८
जीवित तैसें होई माझें रसरुचि यांहीं हीन;
वैभव गेलें जगावयाचें सौख्यहि झालें दीन ! ९
पानें गळलीं जरि वृक्षाचीं आशा मधुची त्याला;
पात्र नदीचें सुकतां इच्छी सत्वर वर्षाकाला; १०
रवि अस्तातें गेला उगवे पुनरपि प्रातःकाळीं;
परि मम ठेली पीडा हृदयीं तोष न लिहिला भाळीं ! ११
वसंत किंवा वर्षर्तु पुढें मज नाहीं येणार;
सायंप्रातः स्थिति सम ऐशी हृदयाची असणार ! ! ! १२

———— लक्ष्मण विनायक परळकर.

## दुबळें तारू.

पद.

कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं
तुडुंब सागर भरला आहे
दुष्टकाल झंझानिल वाहे
तुफान तेणें खेळत राहे
कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं १

सुखदुःखांच्या लाटा येती
क्षुब्ध समुद्रातें त्या करिती
तेणें उपजे चित्तीं भीती
कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं २

षड्रिपु जलचर पसरुनि जाळे
स्वैर गतीनें फिरती सगळे

ओढुनि घेतिल नौका स्वबळें
कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं ३

मायावर्ती भ्रमेल कां हें
भ्रमतां प्रलयीं बुडेल कां हें
चित्ता चिंता जाळित आहे
कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं ४

पार पाहतां न दिसे कांहीं
दुसरा त्राता कोणी नाहीं
सदा भयाची जाचणं हृदयीं
कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं ५

नको नको हा प्रवास याचा
अब्धि नव्हे दरबार यमाचा
सोडुनि द्यावा पंथचि याचा
कसें हाकारूं ॥ शीडाविण दुबळें तारूं ६

बालकवि.

## सुभाषित.

### श्लोक.

हे हांसतेहि रडते धन मेळवाया
विश्वासवी नर नसे तरि लेश माया
वेश्यास्मशानघटिका दुसरी नरानें
स्पर्शू नयेचि कुलशीलसमन्वितानें १

मोरो गणेश लोंढे.

# काव्यरत्नावलि.

## अंक ७ वा.

## आशांकुर.

श्लोक.

आशेसमान नच मित्र जगांत अन्य;
आशावलंब करितो मनुजास धन्य;
दु:खें सुखें असति हीं तदधीन दोन्ही;
वंदीतसें प्रथम मी तिजला ह्मणोनी. १

इथें प्रथम पातले जंव दयाळ आंग्लप्रभू;–
तंव त्वरित जाहली सकल तन्मया आर्यभू.
असंख्य भुलले क्षणीं मनुज पाहुनी तन्मुख;
वशीकरण योजिलें किमपि ना कळे मोहक ! २

अह्मांसम महीतलीं विरल भाग्यशाली जन !
न आजवरि देखिला नृपति यापरी आपण.
विचित्र घटना विधे ! तव खरी ! कसें अन्यथा ! !
अकल्पित महासुखें अनुभवूं अह्मी सर्वथा. ३

प्रचंड भगवान् इहीं जलधि केंवि उल्लंघिला !
अहो दशमुखांतका श्रमुनि साध्य जो जाहला;
अचेतन पदार्थही थरथरा जया कांपती !
सजीव मग माणसें कर न त्यांस कां जोडिती ? ४

ह्मणे करिति चाकरी अमर रावणाच्या घरीं.
अहो ! कलियुगांतही दिसतसे कसें त्यापरी ?
अह्मी परिसिला नसे रथ असा अझूनी कधीं—
जयांत वसती पहा जन सुखें सहस्रावधी ! ! ५

न मृत्पथ तया असे ! तुरग त्या न वा ओढिती !
मनुष्य घटिकेमधें समुचित स्थलीं पोंचती ! !
प्रसन्न इतका तया असुनि अग्निनारायण,—
अह्मां न पुसतो मुळीं जरि करूं तदाराधन ! ६

अतां स्वजनवृत्त तें कळतसे क्षणाभीतरीं;
असो कितिहि दूर वा निकट वास त्यांचा तरी !
न दूत नच अश्व वा इतरही तया लागतो !
पुरे निपट हें पहा—नवल एक पैसाचि तो ! ७

इहीं किमपि मुद्रणाभिध सुयंत्र आह्मांप्रती—
दिलें, निघति ज्यांतुनी अमित पुस्तकांच्या प्रती;
दारिद्रहि मनुष्य हीं निखिल पुस्तकें अल्पशा—
धनें मिळवितो; नको श्रम करावया नित्यशां. ८

अनेक उपयुक्त यापरि पदार्थ तत्संगतीं—
अपूर्व बिनमोलही अधनिकासही लाभती;
बघूनि दडपे खरें हृदय तत्समाजोन्नती !
विकास बहु पावली जगति एक त्यांची मती ! ! ९

अह्मांसम तयामधें नसति जातिभेदादिक;
प्रभूसि मिळतात ते विषय भोगुनी ऐहिक,—
विवाह करिती न ते शिशुपणीं; न त्या लौकिकीं—
त्रपा; स्वजनकांपुढें सवधु बैसती मंचकीं. १०

कदाचिदपि त्यांजला मत न मूर्तिपूजाविधी;--
असे निकट त्यांचिया सतत देव सौख्योदधी;
अनंत विषयावरी असति पुस्तकें शेंकडों ! !
तदीय सहवास हा सतत आपणा सांपडो. ११

गुण अवगुण त्यांचे सर्वही याप्रमाणें--
गुणचि सकल आह्मा वाटले अंधतेनें;
अनुकृति करण्याचा सर्वलोकस्वभाव;
ह्मणुनि बहुत आह्मां आवडे तत्प्रभाव ! १२

अवगुण मनुजाला साध्य होती सुखानें;
परि गुण मिळताती नित्य मोठ्या श्रमानें;
नवल न मग आह्मी घेतले दोष मात्र--
नुमजुनि; अहिताला जाहलों हाय ! पात्र ! ! १३

काळाचा महिमा विचित्र, घडती स्थित्यंतरें यामुळें;
रंका राव करी, नृपा भणग हा, विद्वज्जनांला खुळे,
पूर्वीची स्थिति पाहुनी उपजतो उद्वेग भारी मना!
होणारें न टळे ! दयाघन हरी ठेवो सुखी आपणां. १४

गेले वेद लया ! स्वधर्म बुडला ! ! जात्यैक्य बोकाळलें ! !
जें जें नव्य गमे जना रुचिर तें; सत्संगती मावळे !
प्रेमें सेविति मद्यमांस, करिती स्त्रीशिक्षणाची त्वरा,
देशोद्धार करावया चहुंकडे जो तो असे हावरा ! १५

कोणी धर्मसभा नव्या उभविती; नास्तिक्य कोणी धरी;
कोणी ईश्वर एक बोलति; कुणी मानी बरी चाकरी;
बालोद्वाह कुणी नको ह्मणतसे; स्वातंत्र्य कोणा हवें;
काळा वर्ण कुणा नकोचि; कवणा पोषाक व्हावे नवे. १६

इंग्रेजी वदती समस्त, न रुचे भाषा स्वकीया कुणा;
कोणाला गमतो विशेष पुनरुद्वाहांत मोठेपणा;
कोणी स्त्रीसमवेत हात धरुनी, जातो हवा खावया;
कोणी पूर्वज सर्व मूर्ख ह्मणतो ! ! कीर्ती जगीं व्हावया ? १७

यारीती पडतां अपाप सगळ्या देशावरी मोहिनी,—
झाले इंग्रज लोक धन्य अपुला पाया इथें रोवुनी;
शस्त्रास्त्रें अवघीं हिरोनि अपुल्या हस्तीं तिहीं ठेविलीं;
विद्येचा करितों प्रसार ह्मणुनी भिक्षा अह्मांला दिली. १८

व्यापारोद्यम नष्ट सर्व अमुचे केले तिहीं तत्क्षणीं;
होते ग्रंथ अमूल्य ते मिळवुनी नेले स्वदेशीं झणीं.
धंदे पूर्ण रसातळा मिळविले; नेलें भरारा धन;
हा ! हा ! हंत ! सुवर्णभूमि अपुली झाली कशी निर्धन ? १९

युद्धें थोर करूनि, दुष्ट यवनीं नेली जरी संपदा,—
नाहीं तैं शिवली तथापि इतुकी आह्मांप्रती आपदा;
व्यापारी परि हे कसे नुमगतां नेती धनें चोरुन ?
हा ! हा ! हंत ! सुवर्णभूमि अपुली झाली कशी निर्धन ! २०

पोटाला न मिळे जरीहि शिकला वर्षे श्रमें द्वादश;
कोणी सज्जन अर्भभुक्त वसती होवोनि आशावश;
शेती ठार बुडे ह्मणोनि पडती दुष्काळही त्यांतुन
हा ! हा ! हंत ! सुवर्णभूमि अपुली झाली कशी निर्धन ! २१

होतां यापरि दुर्दशा, जन पुढें झाले शनैः सावध;
कोठें काय चुके ह्मणोनि अवघे धुंडाळिती जों बुध;—
आला तोंवरि वीर एक बळवान्, तेजोनिधी, सन्मती,—
नाना यत्न करी स्ववाक्तनुमनें होण्यास देशोन्नती. २२

चिपळुणकर शास्त्री विष्णु लोकैकवीर--
उपसुनि निज लेखिन्यस्त्र, झाला तयार;
सुकृत जवळि तेव्हां आमुच्या थोर होतें;
ह्मणवुनि परमेशें धाडिलें काय त्यातें ? २३

स्वभाषेचा झेंडा प्रथमचि जयानें उभविला;
विदेशी लोकांचा मतिविभव सारा लपविला;
स्वदेशाची ज्यानें समजविलि लोकांस महती;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? २४

बरी स्वातंत्र्यानें जरिहि मिळते भाकर, तरी--
पराधीनत्वाची रुचिर परि पोळी नच बरी;
असें जो स्वाचारें कळवि जनतेलागुनि कृती;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? २५

तमोमग्ना ज्यानें उजळिलि महाराष्ट्रकविता;
प्रकाशाया झाला स्वजनिं इतिहासास सविता;
जयाची सत्कीर्ती चिर समय गाते वसुमती;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? २६

करी धर्मभ्रष्टाशुचि निजकशाघात सबळ;
स्वदेशोद्धाराचें बिरुद मिरवी जो सुविमल;
न बोले जो कांहीं, परि करुनि दावी वर कृती;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? २७

नसे ईशांशानें अवतरत लोकांत नृपती;
नवा तद्दोषाविष्करण ह्मणजे पातक अती;
लया नेल्या ऐशा सकलहि जयानें समजुती;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? २८

खऱ्या स्वार्थत्यागाविण उदय नाहीं जनपदा;
प्रसंगीं धैर्यानें सहन करणें सर्व विपदा;
ह्मणे दीर्घोद्योगें सकल असतें साध्य जगतीं;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? २९

महामायामोहें सकल असतां निद्रितजन,--
सुधासेकें ज्यानें त्वरित दिधलें त्यांस चलन;
गतायूराष्ट्राचा भिषज पहिला त्यास ह्मणती;
तया विष्णूशास्त्र्या नमिति न वदा काय सुमती ? ३०

अरे ! दुष्टा ! काळा ! तुजसम नसे निर्दय दुजा !
कसा झाला नेतां गळुनि पडला हात न तुझा ?
असो प्रेमें जे हे पठति जन विष्णुस्तुति सुधी,--
तया ईशेच्छेनें अनुपम मिळो तद्गुणनिधी. ३१

होतां असें, हळुहळू अपुला समाज--
देशार्थ यत्न करि सोडुनि भीड लाज;
झाली पुन्हां हृदयिं जागृत धर्मनिष्ठा;
झाला विशेष अनुतापहि कर्मनष्टा. ३२

जात्यैक्य सर्व जगतांत करूं, ह्मणून--
ज्यांहीं विडा उचलिला शपथप्रमाण;
त्यांतील आज कितिएक धरूनि नाक,
संध्या करीत बसले विजनांत लोक ! ३३

जीं बोलती तयिं पितामह धर्मवेडे;
तीं आज त्यांस बहु मानिति नातवंडें !
आचार शुद्ध असण्यास, यथामतीनें--
जो तो झटे त्यजुनि दोष परोपरीनें; ३४

राष्ट्रोन्नती जरि सुसाध्य न अल्पकालें--
होते; तिचें तरिहि चिन्ह दिसोनि आलें;
होतां दिसंदिस अशीच जनप्रवृत्ती,
जाईल खास विलया अपुली विपत्ती. ३५

व्हाया प्रसिद्ध भुवनांत निजेतिहास,--
कोणी प्रयत्न करि सोसुनियां प्रवास;
शोधावया स्वजनवृत्त करी प्रवास;--
काढी प्रसंग पडल्यास महोपवास ! ३६

बंधीं कुणी अतुल धीरजनावतंस,--
स्वार्थानपेक्ष करि देशहितार्थ वास;
सन्मार्गवर्तन सदा जय पावणार;
कोणी सुतत्त्व करि हें स्वगुणें पसार; ३७

जी साधुसत्कविकृती अमुची अमोल;
होती वणिग्जनगृहीं पडली खुशाल !
ती आज वाचनगृहीं रसिकांतरंग--
संतोषवी सतत ज्यापरि साधुसंग. ३८

कोणी कवींद्रचरितें रचुनी, तदीय--
होतो महोपकृतितूनि विमुक्तकाय;
निर्मी तसेच अति निस्पृह लेख कोणी;
देशांतरीं नव कलापटु होय कोणी. ३९

दुःखें कुणी नृपतिला कळवी स्वकीय;
कोणी रची जनहितास नवे उपाय;
कोणी धनाढ्य जनतेस्तव तीस लाख--
मोजून देइ रुपये निरपेक्ष रोख. ४०

संस्थानिकाप्रसर एक सुखें अपार--
होण्या प्रजानुमतिनें करि कारभार;
कोणी तसा त्यजुनि पुत्रकलत्र, पैसा--
पट्टीस देह विकितो चिरकाल खासा. ४१

कोणी लहान परि लेखक धीर बाका,
द्वैमासिकी उभवि वाङ्मय सत्पताका;
धर्मोन्नतीस्तवहि एक पुराण, वेद,
भाषांतरें प्रसरि सज्जन सप्रमोद. ४२

आतां भाषा रुचत बहुधा सर्व लोका स्वकीय;
पूर्वीचा तद्विषयक तिरस्कारही दूर होय;
देशी वस्तू ग्रहण करिती आदरानें कितीक;
सेवाधर्मी तनु झिजविणें मानिती पाप एक. ४३

जन्मोत्साहा नर करि कुणी श्रीशिवाजी नृपांचे;
देशोद्धाराजनिं निपजलें जे महेशांश साचे;
कोणी आत्मस्थिति समजवी सुज्ञ देशांतरास;
स्वोद्धारार्थी मग उपजवी स्नेह तन्मानसास. ४४

विघ्नोपशांत्यर्थ कुणी सुभक्त--
करी गणेशोत्सव भक्तियुक्त;
दयार्द्रधी तो परमेश देवो--
शांती अह्मां; नित्य सुखांत ठेवो. ४५

कवित्व थोडें; विषय प्रचंड !
ह्मणोन विस्तार नको उदंड.
स्वदेश येवो उदयास तूर्ण;
करो प्रभू हे मम आस पूर्ण. ४६

सर्वोपरी देशसुधारणेला–
अनंत वर्षें जरि काळ गेला;
तथापि चित्तीं नच व्हा निराश;
कर्तव्यनिष्ठा सुख दे विशेष ४७

नाहीं कोणा चिरसमय बा ! दुःख या भूतलांत;
नाहीं तैसें सुखहि कवणा नित्यशां प्राप्त होत;
देतो याला कविवर असें एक मोठें प्रमाण;
**“ नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण ! ”** ४८

मुकुंदराय.

## महाराष्ट्रमहोदयकाव्य.*

अध्याय ३ रा.

आर्या.

उदयपुरेशकुलाला शशिच्या ग्रासास राहुसा आला
मोंगल बुडवायाला शिवपूर्वज त्यांत एक सांपडला १
भस्मासुरतापांतुन विष्णुध्यानें स्मरारिसा सुटला
भोंसगडावरि बलसा वरुनी मग काळ योग्य शान्तीला २
असुनी क्षात्र मराठी घेई उपनांव भोंसले जगतीं
आपद्धर्मन्यायें मूढहि ते कोशिं कोसले जगती ३
शिवतात महा कर्ण प्रसिद्ध कर्णापरी महा योद्धा
भारतकाळीं होता शत्रुशिरां रणमखांत जो होता ४
विजयस्तंभ तयाचा आहे अद्यापही परांड्यांत
कीर्ति तयाची उरली ब्रह्माच्या भरुनि या परांड्यांत ५

* गेल्या जूनच्या अंकांत ह्या काव्याचा २ रा सर्ग आलेला आहे.

स्वप्राणाहुतिनें तो समरमखा सांगतेस हो नेई
अरिकरिं न परी गवसे कीर्तीच्या मंदिरांत तो राही ६
शिवसुत चितोडभूपति भीम तयाचा सुपुत्र विजयरवि
तत्खेलवर्ण त्याचा जयकर्ण जगीं न शत्रु जो उरवी ७
या जयकर्णाचा सुत होय महाकर्ण; पूर्व निर्दिष्ट
राजा शिव तत्सुत जो होता ह्मणतात लोक छांदिष्ट ८
पोहावयास गेला शिव राजा एक वेळ भीमेला
दैवानें वेरियला तेथें तो बुडुनियां असे मेला ९
शिवपुत्रबाबजी या नांवें होता गरीब पाटील
राजे हें नांव; परी; नुसतें तें काय नांव चाटील १०
पाटिलकीचें यानें वाढविलें गात्र मात्र निजयत्नें
संपादिलें जनांचें प्रेम सदा आपुल्या सुरीतीनें ११
सत्पुत्र बाबजीचा मालोजी फिरुन बीज जो पेरी
स्वकुलाभिवृद्धिचें जगिं त्याची गावी किती तरी थोरी १२
देऊळगांव जिंती खानवटें तीन चंद्रभागाचे
तीरीं गांव खरेदी पाटिलकीचे करी असे साचे १३
त्याचा बंधु विठोजी हाही मोठा उदार मानाचा
यांच्याच पुत्रपौत्रीं स्वगृहीं आणिलि सदा रमा नाचा १४
रामाचा अज जैसा धर्मात्मा धीर वीर मालोजी
शिवरायाचा, उपमा ज्याच्या निजदेशभक्तिला न दुजी १५
येथुन साम्रचि सांगूं शिवरायाच्या चरित्र आजाचें
नांव असे जनिं राजे मालोजी राव भोसले ज्याचें १६
नलगे कथणें कीं हा क्षत्रिय ज्या राजपूत या नांवें
जन जाणती किती तत्प्रचंड दोर्दंड शौर्य वानावें १७
मालोजि भोसले हा महारथीं जो कुलीन वीरमणि

वेरुळिं नांदे संगें धेवोनी निज दिपा नवीरमणी १८
वीरमणीची रमणी नायक जगपालराव फलटणचे
यांची स्वसा सुरूपा सुभगा महतीस काय वानुं तिचे १९
शेतीभाती करुनी राहे तो वरुनि मोद चित्तांत
आपत्काळीं धैर्यें कंठिति काळास सुज्ञ जगतांत २०
ज्याचे पूर्वज धरिती कराल करवाल चाप शर भाते
तत्करिं नांगर यावा दैवक्रीडा अगम्य मनुजातें २१
हस्तीं प्रतोद ज्याच्या सारथि ऐसा रथीं असायाचा
दैवें तत्स्कंधीं ये बैल हकायास कोरडा साचा २२
स्थित्यंतरांत होतें वृत्यंतरही जगांत हा नियम
अनुकूल काल असतां कांहीं न करूं शकेच हानि यम २३
सिंहासन पितरांनीं भोगियलें हा तृणासनीं रानीं
बैसे, अगाध विधिकृति रावाचा रंक होय या भुवनीं २४
स्थित्यंतरकृत वृत्यंतर न करी सूज्ञ मानसा नीच
दुर्दैवा जिंकावें मालोजी प्रमुख माणसांनींच २५
सुंभ जळे न परी तो पीळ तयाचा तसाच मालोजी
कृश हो देहें न वदे परि तत्क्षत्रत्व "मी निमालो जी" २६
न रुचे तरुचें त्यातें परशूनें पर रिपूरुचेंचि रुचे
च्छेदन; यांत न कांहीं कारण आश्चर्यमग्न होण्याचें २७
ललनाधरमधुपानीं समराङ्गणधूलिवंदनीं तीच
प्रीति सदा यन्मनिं, हा तदंश कृषिकर्म केविं करि नीच २८
स्ववधूकरग्रहीं जो उत्साह वरास तोच करवाल
धरितां करीं जयां हो तदंश नांगर कसा सुखें धरिल २९
शद्ब शतघ्नीचा दे आनंद तसा न मेनकास्वरही
यत्कर्णीं तद्वीर्यज रमेल कैसा असूड वारांहीं ३०

रणशंखनाद दे जो मोद न तो शंखिणीहि रमणीची
शंखग्रीवा दे निज सुस्वरगानेंहि गोष्ट ही साची ३१
ज्यांच्या संबंधानें तद्वंशीयास केविं कृषिकर्म
लागेल गोड जरि तें देणार तया असेल बहु शर्म ३२
विद्वानां उत्तेजन येइल कैसें कशी कला पावे
वृद्धीस, हा जयांचा ध्यास तिहीं शेतिं संतत खपावे ! ३३
कारस्थानधुरंधर लोकांची मात्र वाहवा ज्यांनीं
करणें, बैलां गाणीं काय ह्मणावीं सदा मुदें त्यांनी ३४
शस्त्री ज्यांना भीती निःशस्त्रांची तयाप्रती भीति
बाधावी हें जगतीं मृतमातृस्तन पिणारची सहती ३५
ज्यांनीं न्याय करावा लोकांचा त्यांस दंड इतरांनीं
अपराधावांचुनही सहन करावा न हें सहे मानी ३६
न शकावें हे मागें द्याया द्यावेंच तेंहि जो मागे
त्यातें सहज जयानें याचकता लागली तयामागें ३७
क्षात्रातें क्षेत्रातें पिकवीणें केवि मानसांत रुचे
छायार्थ लावणारा जळणा च्छेदन करी कसा तरुचें ३८
मालोजीची झाली तीच स्थिति त्या रुचे न कृषिवृत्ति
येती नित्य नवेची क्षात्रत्वोचित विचार तच्चित्तीं ३९
" आर्ये असें आर्य असे नांव मला सर्व शर्म पर्वतसें
पारि तें न योग्य मजला रोग्या जैसें अपूर्व पर्व तसें ४०
अमरांतें अमरा ते वाटे मत्कीर्ति नित्य सेवावी
न सुधा; वसुधा तैशी प्रमुदित मत्संगिं फार ती व्हावी ४१
मदितरनृपचरणाचा स्पर्श गमे मेदिनीस, कदलीतें
वणव्याचा तैसा, अति दुःखद ऐसें स्वयेंच वदली तें ४२
शास्ता सर्वांचा मी सन्मान्य असाच पूर्व कालांत

कित्ता माझा गिरवित होते स्वसुखार्थ लोक जगतांत ४३
विद्यासेवर्नि माझ्या रत जैशी सर्वदा असे दासी
सकला सुकला मजला सुख लाभोशी धरीत आसोशी ४४
लक्ष्मीन--वर--सपूरित नवरसपूरित सदार्य चरितातें
गातां वाटे थकवा आला त्या भारतेतिहासातें ४५
ह्मणुनी दया तयावरि करण्यातें स्तब्ध आज भारत हो
किंवा न कळे त्यांना यवनांची जादु काय भारत हो ४६
कांहीं असो परी ही भूमा भारें अभारताच्या हो
वांके विचार कैसा अजुनीही तन्मनांत हा नच हो ४७
यवनांच्या कीं फुटुनी फाट तिची ह्मणुनि " हा " कशापातें
देत असेलचि आह्मां षंढ मुलां ती अनेक शापांतें ४८
तच्छापपाप अमुचें होउन एकत्र नरक भरतील
सहगुर्वस्मदधोगति परिणामी ते कसे न होतील ४९
हा परिणाम चुकाया काया होईल सर्व खर्चे जरी
श्रेयस्करची; परि करिं सीत नको जो सुदूर मोक्षकरी ५०
वर्णाश्रमधर्माचें परिपालन जो करी न; तो नरकीं
जातो असें स्वतांची गीतेंत वदे सख्या नरा नर कीं ५१
मालोजीचे पहिले विचार लिहिले अजी सदार्यांनीं "
स्वमनीं राखुनि यांतें वागावें सर्वदा सदार्यांनीं ५२

नारायण कृष्ण गद्रे.

## शंकराचार्यांचा जन्म.

आर्या.

ज्याचें यश परिसाया सज्जनमन सर्वथैव लोभावें
श्रीशंकरपदपंकज शंकर[१] तें वंदितों मनोभावें १

---

१ कल्याण करणार.

श्रीशंकरचारितामृत वर्णन करितों यथामती कांहीं
तरि परिसावें आतां दृढभावें तें समग्र रसिकांहीं २
सन्मार्गप्राप्तिस्तव साधक ज्यांचे पदीं विशंक रते
नरदेहीं अवतरले श्रीभगवत्पूज्यपाद शंकर ते ३
पूर्णानदीतटाकीं केरळ देशीं वृषाद्रिच्या निकट
शिवलिंगरूप धरुनी श्रीगिरिजानाथ जाहला प्रकट ४
तैं राजशेखरातें होतां दृष्टांत त्या महीनाथें
लवकरि अति सुंदरसें देवालय एक बांधिलें तेथें ५
तत्सांनिध कालटिका नामक तें अग्रहार की होतें
त्यामाजीं विद्वज्जन नांदत होते कवी महा होते[1] ६
विद्याधिराज नामा होता तेथेंचि एक विप्रवर
प्राक्तनकर्मबळानें त्यातें सुत जाहला कविप्रवर ७
त्याचें शिवगुरु ऐसें ठेवुनि अभिधान त्यासि सानंद
प्राणापरि सांभाळी अनुदिनिं कृष्णाप्रती जसा नंद ८
बाळपणींच सुताचें अद्भुत चातुर्य पाहुनी विप्र
सौख्य मनीं बहु पावे, तो मौंजीबंधना करी क्षिप्र[2] ९
लग्न करावें ऐसें शिव गुरुच्या तों मुळीं मनीं नव्हतें
परि आग्रहें पित्याच्या अनुमोदन दे सदां विवाहातें १०
उत्तम मुहूर्त पाहुनि मघ पंडितराय आपुली कन्या
देई शिवगुरुलागीं सति नामक जी सति स्वयें धन्या ११
संसारीं सद्धर्मी वर्तत होते महा तपस्वी ते
वृद्धापकाळ आला तरिही झाली न संसती त्यातें १२
पुत्रप्राप्तिस्तव मग दोघेही देख नित्य नेमानें
पूजाव्रत स्वयंभू शंभूचें धरिति एक भावानें १३

१ यज्ञ करणारे. २ लौकर.

पूर्णानदिचें स्नान प्रातःकाळीं करोनियां पाही
श्रीशंकरासि अनुदिनिं पूजावें शोडशोपचारांहीं १४
ऐसें कांहीं दिन ते वर्तत असतां महासुखेंकरवी
श्रितजनकल्पतरू तो शंकर त्यांचे मनोरथा पुरवी १५
सज्जनवंद्य जगद्गुरु जनहितकर अद्वितीय शंकरसा
होइल पुत्र तुह्मातें मज्जन हो लौकरी विशंक असा १६
साक्षात्कार असा कीं एके दिवशीं तयासि झाला हो
जगदीशदर्शनाचा शिवगुरु आणिक सतीहि घे लाहो १७
नंतर त्याच दिनांतीं गर्भवती ती महासती झाली
सेवा जगदीशाची सत्वर कैशी पहा फळा आली १८
दिवसां मासां हळु हळु तदुपरि तो गर्भ वृद्धितें पावे
तेव्हां त्या दंपतिचा आनंद नभीं मुळीं न सामावे १९
भरतांचि पूर्ण महिने प्रसूतिकाळीं महा महा ग्रह ते
रवि, शनि, मंगळ, आणिक केंद्रस्थानीं[2] बृहस्पती होते २०
वायु मनोहर वाहे झाल्या दाही दिशा प्रसन्न तदा
आकाश निरभ्र दिसे व्यासादि ऋषीहि मानिती मोदा २१
मंगलदायक वेळीं प्रसवे पुत्रास ती सती जेव्हां
गगनीं बहु आनंदें सुर करिती पुष्पवृष्टितें तेव्हां २२
तेव्हां उभारिल्या हो रम्य गुढ्या आणि तोरणें द्वारीं
नाना मंगल वाद्यें वाजविती लोक संमदें भारी २३
हळदी–कुंकुमपात्रें भरुनी धांवत सुवासिनी बहुत
ते वेळीं सातिसंदनीं आनंदें पातल्या अति त्वरित २४
ते काळीं अगणितजन शिवगुरुच्या मंदिराप्रती गेले
ज्योतिर्विद, विद्वजन आणिक शिवभक्त विप्रही आले २५

---

१ लाभ. २ इष्ट लग्नापासून प्रथम, चतुर्थ, सप्तम व दशम या स्थानांची संज्ञा.

नंदनमुख आनंदें पहावया पातला त्वरा करुनी
" झालों धन्य जगीं मी " शिवगुरु ऐसें स्वयें मनीं मानी २६
स्नान करोनी केलें आधीं पुण्याहवाचनातें कीं
नंतर मधुबिंदु मुखीं घालुनि पुत्राननासि अवलोकी २७
ज्योतिर्विद भूदेवें बाळाचें जातकासि वर्तविलें
तें परिसुनि सर्वांच्या चित्तातें फार फार मानवलें २८
नानाविध उत्तमशीं वस्त्रें धनधान्य विप्रवृंदातें
देउनियां जनकानें लाजविले तंव भले भले दाते २९
द्वादश दिनपर्यंतहि करुनी सदनीं अपूर्व सोहाळे
शिवगुरुनें ते समयीं सकलजनातें बहूत तोषविलें ३०
तेरावे दिवशीं मग बोलविल्या हो सुवासिनी ललना
सत्वर समुत्सवातें आल्या त्याही सतीचिया सदना ३१
त्यावरि सतिनें हर्षे ठेवुनि पुत्रासि नामकरणातें
पहुडविलें सुंदरशा रत्नजडित पाळण्यांत बाळातें ३२
वारंवार मुलातें जो, जो, जो, जो, म्हणोनि हालविती
लीला जगदीशाची स्वानंदें सर्व बायका गाती ३३
वोंटी सतिची भरुनी वस्त्रालंकार अर्पिले रुचिर
सकळां अबलांनीं तो शोभविला सोहळा भला सुचिर ३४
घेउनि हळदी-कुंकुम ललना सदनासि आपुल्या गेल्या
साक्षात् शंकर निरखुनि या लोकीं धन्य धन्य त्या झाल्या ३५
लालन पालन करुनी प्रेमानें बालकासि वाढविलें
त्याचें तिसरे वर्षी तातानें चौलकर्मही केलें ३६
नंतर पंचम वर्षी मौंजीबंधन करावयालागीं
मेळविले पुष्कळसे तेजस्वी विप्र जे महा योगी ३७
श्रीमत् शंकरकंठीं ब्राह्मण यज्ञोपवीत घालुनि तें

गायत्री मंत्राचा करिती उपदेश वेदवंद्यातें ३८
ऐसा व्रतबंधविधी झाल्यावरती करोनि अध्ययन
शिकला गुरुजवळी तो नाना विद्या कलाहि संपूर्ण ३९
नंतर एके दिवशीं शंकर आंघोळही करायातें
नित्यापरीस गेला होता पूर्णानदीतटाकातें ४०
स्नानासाठीं तो मग निर्मल सुंदर जलांत जों शिरला
तों एक्या नक्रानें पाय तयाचा धरोनियां गिळिला ४१
या दुष्टानें कैसा हा माझा अर्ध भक्षिला काय
" हे आई, ये झटकरि देवा! आतां करूं तरी काय " ४२
वाणी दीन अशी ही ऐकुनि, येवोनियां सती पाहे;
तों निर्दय सुसरीनें अर्धा पुत्रासि भक्षिला आहे ४३
' हा दैवा! हा दैवा! ' ऐसें ती धाय, धाय, आरडली
तें विपरीत विलोकुनि मूर्छित तत्काल भूवरी पडली ४४
होउनि सर्वेचि सावध " देवा! विपरीत काय हें केलें!
हा बाळा! हा बाळा! " सुतमुख कुर्वाळुनी असें बोले ४५
' आई गे, हो सावध मजविषयीं तूं करूं नको शोक
आतां एक तुला मी याचा प्रतिकार सांगतों ऐक ४६
संन्यास घ्यावयातें आज्ञा देशिल, तरीच हा मातें
सोडील पहा सत्वर याचें लक्षण असें दिसे माते! ' ४७
कळवळलें चित्त परी दैव सतीचें बळेंचि ओढवलें
ह्मणुनी निरुपायानें आज्ञा देउनि सुतास सोडविलें ४८
इतुक्यांत मगरही तो होउनियां दिव्यकाय भावानें
लागे शंकरपायीं, यास्तव मुक्ती वरी प्रभावानें ४९
होउनि संतुष्ट मनीं तत्काळ प्रैष नाम मंत्रासी
उच्चारुनी स्वयें तो शंकर तेथेंचि होय संन्यासी ५०

करुनी शांतवनातें सतिचें संपूर्ण दुःख घालविलें
देउनि अभिवचनातें तेणें जननीस फार तोषविलें ५१
मग तो तेथूनि निघे आईच्या घेउनी निरोपातें
येई सद्गुरुजवळी सज्जन हो, आजि वृत्त परिसा तें ५२
संन्यास यथाविधिनें घेउनियां श्रीगुरूचिया हातें
स्वानंदें स्वीकारी श्रीशंकर परमहंसवृत्तीतें ५३
ज्ञानोपदेश घेउनि गुरुतें पूजोनि शंकराचार्य
दिग्विजयार्थ निघाला परम प्रिय तें करावया कार्य ५४
नास्तिक-वादी जिंकुन नाना कुमतें समूळ छेदून
शुद्धाद्वैत मताचा केला विस्तर जनीं निवेदून ५५
दाउनि सन्मार्गातें करुनी ज्ञानोपदेश सत्कार्यें
केलीं असंख्य लोकीं हिंदुनि सर्वत्र शंकराचार्यें ५६

श्लोक ( शा. वि. )

घेऊनी अवतार या कलियुगीं जेणें जनां तारिलें
सद्बोधामृत पाजिलें स्वमतही सर्वत्र विस्तारिलें
त्याची जन्मकथा यथामति कवी भावें अशी वर्णितो
ती त्या शंकरपादपंकजरजा वंदोनियां अर्पितों ५७

वसंत तिलका.

पाहोनि मूळ चरितामृत सत्कवीचें
श्रीमत्जगद्गुरु कृपाकर शंकराचें
हें जन्मवृत्त रचिलें जनरंजनार्थ
सारांश हा कथितसे कवि रंगनाथ ५८

——————— रंगनाथ एच. अधिकारी.

## मदमाधुरी.

वृत्त:—कलहंस

बसुनी स्वभक्तनिवहीं[1] निज धामीं
ह्मणसी "कृती[2] त्रिभुवनीं मजसा मी
मम काय वैभव ? किती मम भक्त ?
समता करीं न मजशीं नृप शक्त" १
अहिफेनसौं[3] तुज खला ! अधिकार
बहु मातवी, करिसि बालिश चार
भजक स्तवोत तव बालिश चार
बुध निंदितात, कथितों तुज सारें २
सदनीं बसोनि अपुल्या भजकांत
वदसी अमंगल, अशोभन मात
विनयें तुझे भजक ती तव मात
निजकार्यसाधनपर[5] स्तवितात ३
तव उक्त बालिश तरी स्तविती ते,
स्तव हा तुझ्या मधुर होइ मतीतें
स्तव हा असे त्वदधिकारभयानें,
हृदयीं त्वदुक्त जरि त्यांस न मानें ४
निजभक्तवृंद जुळवून सभोंतीं,
परिसूनि तत्स्तुति सुखें तुज होतीं
उमगे तुला स्तुति कधींहि न खोटी,
मम योग्यता ह्मणसि तूं मनिं मोठी ५

---

१ आपली स्तुति करणाऱ्यामध्यें. २ धन्य. ३ अहिफेन–अफू. ४ खरी गोष्ट.
५ आपलीं कार्यें साधून घेण्याला उपयुक्त.

तव वक्तृता भजकमंडल वानी,
खुलसी मनांत बहु तत्स्तवनांनीं
तुज वाटतें ' रसिक मी अतिमात्रें
बुध मी खरा, खचित मी स्तवपात्र '. ६
पारि तो नसे स्तव यथार्थ, अलीकें,
फसवावया करिति धूर्त बरीक
खुलसी अति स्वभजकस्तवनानें,
सुख पावसी मनिं, न तें सुख सानें ७
अरसें वचें स्तवियलीं भजकांनीं
सुख देति तूज शिरतां तव कानीं
तुज गीष्पती ह्मणति जे तव भक्त,
बहु होसि तद्विषयिं तूं अनुरक्त ८
तव भक्त साधिति सुखें निज कार्या,
तुज तत्कृता विनति होति अवार्या
तवही असेच खुलतात वारिष्ठ,
तुज देति ते खुलुनि जें तव इष्ट ९
स्तविशी सदा, खुलविशी स्ववरिष्ठा
अतिवेल दाखवुनि त्यांवरि निष्ठा
भजकां जसा खुलुनि देसि तदिष्टें
तव दे तसा खुलुनि इष्ट वरिष्ठ १०
व्यवहार यापरि घडे जगतांत,
सगळे मनोरथ असे फळतात

---

१ फार. २ खगाखगींचा. ३ खांटा. ४ लबाड लोक. ५ बृहस्पति. ६ त्याचे ठायीं ७ त्याना जें काय पाहिजे असेल तें.

स्तुतिची कला वश असेल तयाचे
फळतात सर्वहि मनोरथ साचे ११

तव जे न भक्त तदनिष्ट कराया
[1]गतशंक तूं झिजविशी निज काया
[2]चुंगल्या करूनि, फसवूनि वरिष्ठा
विबुधांस भोगविसि घोर अनिष्टां १२

[3]नसल्या तुझ्या स्तवि गुणां न ह्मणून
गुणमण्डिता करिसि निंदुनि दूनें
गुणमण्डिता तुडविसी अविचारें,
अधिकार मत्त करितो तुजला रे ! १३

तुज सांगतों हित, करीं सुविचारा,
क्षणभंगुरा भुलुं नको अधिकारा
फिरलें सुदैव तर होशिल दीन,[4]
अधिकारमानधनवैभवहीन १४

[5]अनयार्जित [6]द्रविण जाइल सर्व,
मग सर्व गर्व तव होइल [7]खर्व
नरटी धरोनि कारें तूं भ्रमशील,
मग सौख्यगंधहि न मेळविशील १५

त्यजितील सर्व तुज भक्त अशंक,
न दरिद्रही तुजसि वंदिल रंक
मग भारभूत तुज होइल जीव,
स्थिति ही गमेल तुज घोर अतीव १६

---

१ मनांत शंका न धरितां. २ चहाड्या. ३ अंगीं नसलेल्या. ४ दुःखित. ५ अन्यायानें मिळविलेलें. ६ द्रव्य. ७ कमी.

परिवर्तनें[1] सतत होति जगांत
स्थिति विस्मयावह फिरे निमिषांत
धन निःस्वें[2] मेळवि, फुगे जणुं भस्त्रँ[3]
धनिका त्यजी धन, मिळे नचि वस्त्र १७

बसतो उगा धरुनि पण्डित कोणा,
खँलनष्टकीर्ति[4] दिसतो नचि कोणा
परि नष्टैचर्य[5] सरतां, स्वगुणांहीं
दिपवी दिशा सतत पण्डित दाही १८

खल निस्त्रप प्रभुपतग्रह[6] होतो,
तदुपानहा[7] सुममृदू गणितो तो
छळितो बुधां प्रभुकृपाबलशाली,
व्यसनीं पडे प्रभुकृपाक्षयकालीं १९

अधिकारमत्त खल साधुस नाडी,
गुणमण्डिता व्यसनिं निर्घृर्ण[8] पाडी
अधिकार किंतु सरतां खल त्यास
शरणास वंदि विनयें जणुं दास २०

अविकार हा उपजवी मद चेतीं,
मद माधुरी, अनय आत्मगुणें ती
अनयें अघोद्भव, अघें नरकांत
मिळतो निवास, कवि हें वदतात २१

परिणाम हे अनुभवी अविवेक,
सविवेक तो न करितो अतिरेक

---

१ उलटा पालटी. २ दरिद्री माणूस ३ भाता. ४ चंडाळांनीं नाहींशी केली आहे कीर्ति ज्याची. ५ दुर्दैव. ६ पीकदाणी. ७ त्याच्या जोड्यास ८ क्रूर.

' अधिकार सज्जनकरीं सुखहेतू,
परि तो न दुर्जनकरीं ' स्मर हें तूं २२

न टिकेल शाश्वत तुझा अधिकार
नय मात्र शाश्वत खरा सुखसार
अवलंब तूं करिं सदैव नयाचा,
पडशील न व्यसनिं ही ऋत वाचा २३

गणिसी मनांत अधिकारमदाची
अजि माधुरी शुचिसुधोपम साची
परि माधुरी खचित ती निचरेल,
अनुताप देइल रुजा अतिवेल २४

अधिकार लोपुनि घरीं बसशील,
जन निंदितील तव उद्धत शील
तव दर्शना न जन येतिल कोणी,
दिन लोटिशील विधवेपरि कोणीं २५

तुजला चुरील विधि हा वरवंटा,
ठरशील तूं जनिं कपाळकरंटा
करितील मित्र तुजशीं मग तंटा,
अपकीर्तिची तव घुमेलचि घंटा २६

मरतां निपुत्रिक असा मरशील,
निजपुत्र सर्व मृत तूं बघशील
गुण पुत्र, चर्ममय पुत्र न पुत्र,
गुण येथ चालविति वंश अमुत्र २७

---

१ खरी. २ निर्मळ अमृतासारखी. ३ वाईट परिणाम करील. ४ पीडा.
५ परलोकीं.

हरपो खला ! तव मदौघ समूल,
तव वृत्ति हो गुणिजना अनुकूल
गुणमंडितावरि करील दया तो
सुख शांतिसंभव सदैव पहातो २८

रे चंडाला ! मरणसमयीं क्लेश तूं भोगशील,
पश्चात्ताप प्रखर तुझिया दग्ध चित्ता करील
अन्यायोपार्जित न तुजला द्रव्य देईल हात,
निस्ताराया पडशिल अधें घोर तूं नारकांत २९

कृती विद्याधरें सानी रचिली " मदमाधुरी "
आकळावी जनें तीची बोधदा माधुरी पुरी ३०

——————— विद्याधर वामन भिडे बी. ए.

## सुभाषित.

श्लोक,

आहे कठीण कवची जरि नारळाला
आंतील गीर तरि दे सुरुची जिभेला
तैसेच संत दिसती वरुनी कठोर
त्यांच्या मनीं तरि दया विलसे अपार १

आहे वरून पिंवळें जरि बोर फार
आंठी तयांत विलसे अगदीं कठोर
तैसेच दुर्जन जरी दिसती उदार
ते कापितीहि कळतां न गळयास पार ! २

———— मोरो गणेश लोंढे

१ शांतीपासून उत्पन्न होणारें.

आगष्ट १९०९ वर्ष २० वें.

# काव्यरत्नावली.

## अंक ८ वा.

## विधुरविलाप.

**प्रियाविरह** हा कविता देवीच्या अत्यंत आवडत्या विषयांपैकीं एक आहे; व ह्मणूनच या विषयावर सर्वकालीं सर्व भाषांत अनेक हृदयंगम काव्यें रचलीं गेलीं आहेत. आपल्या अर्वाचीन मराठी भाषेंतही याच विषयावर **' विरहीविलाप, ' ' विलापलहरी '** व **' शोकावर्त '** आदिकरून मनोवेधक काव्यें निर्माण झालीं आहेत, आणि तीं आज आपल्या भाषेस ललामभूत होऊन तिचें नैसर्गिक सौंदर्य अधिकाधिक खुलवीत आहेत. अशा श्रेष्ठ प्रतीच्या काव्यांची प्रस्तुत काव्यानें बरोबरी करूं इच्छिणें किंचित् साहसाचें असल्याचें कर्त्यास पूर्णपणें अवगत आहे. तत्रापि या अल्प प्रयत्नानें रसिक वाचकांच्या मनोवृत्ति थोड्याबहुत जरी आनंद विकसित झाल्या तरी त्यास आपल्या सकल श्रमांचें पूर्ण सार्थक झालें असें वाटल्यावांचून राहणार नाहीं.

प्रस्तुत काव्य रचण्याची स्फूर्ति जरी मुख्यत्वेंकरून कर्त्याच्या एका अत्यंत जिवलग व परमप्रिय तरुण मित्राच्या अनुकंपनीय विधुरावस्थेनें दिली आहे तरी तीस जगत्प्रसिद्ध संस्कृत व आंग्लकविश्रेष्ठांचे नामांकित काव्य प्रबंधही अंशतः कारणीभूत झाले आहेत हेंही येथें कबूल केलें पाहिजे. यास्तव प्रस्तुत काव्यांत त्या अन्य कविवरांचे सर्व रसिक विद्वानांस पूर्ण परिचित असलेले कांहीं हृदयंगमविचार मधून मधून प्रतिबिंबित कर-

ण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांस व एकंदरींत या चिमुकल्या काव्यास कितपत यशप्राप्ति झाली आहे हें ठरविण्याचें व गुणग्राहक वृत्तीनें तें गोड करून घेण्याचें काम सहृदय वाचकांवर सोंपवितों.

दिंडी.

इन्दु–सुंदरि ! अरविंदमुखी कांते !
प्रणयवति ! गे ! मम मोहिनी विनीते !
त्यजुनि एकाकी मजासि जगीं कैसी
गमन करिसी प्रियतमे ! द्युलोकासी ?

पूर्ण–यौवन–विधु जों न तव उदेला
काल–राहूनें अहा ! ग्रासियेला !
तुझें सुविकच तारुण्य–कुमुद तें कीं
छिन्न केलें हा ! कालगजें लोकीं !

एक मूर्ती जी निखिल चारुतेची
काल–यवनें हा ! भंगियली साची !
लोपली मम आराध्य देवता, ते
कशी फिरुनी भूवरी दिसे मातें !

काल–तस्कर ने हरुनि निधानातें
रक्तहृन्माणियुत मदानंदनातें;
कनक–कलशद्वय ज्यांत हीरपंक्ती,
नीलकमलें दों रत्नखचित होती !

प्रभा अस्ता जणुं गेलि दिनकराची
गमे तिमिराक्रांत ही धरा साची !
तुझें प्रेमचि चैतन्य, चारुगात्री !
कलाहीना त्यावीण भूतधात्री !

काल निष्ठुर जरि नेइ तुझी मूर्ति,
तया असुलभ मदशरीरिणी प्रीति !
वसुनि अंतरिं जी धीर मला देतें
तुझ्या विरहीं सखि ! जीवधारणेतें ! ६

पंचभूतात्मक देह तुझा कांत
आद्यतत्त्वांमाझारिं लीन होत;
मूर्तदेहाधिक परी अतां, कांते !
तुझें ध्यानाचि मन्मना तोषवीतें. ७

विरामा ये ध्वनि जरी गायनाचा
मनीं स्फुरतो आलाप मधुर त्याचा—
कुसुम जाईचें म्लान जरी होई,
तुष्ट--करणीं तत्सुरभि सखे ! राही. ८

कमल सुंदर जरि सुकुनि लया जाय
मृदुल पत्रांवरि शयन करि तदीय
प्रिया कांता, मम तेंवि रमे प्रीती
चिंतनीं तव जरि जाशि सुरप्रांतीं ९

जाहलों मी जरि शयनिं जरा दूर
गमे दुःसह तो विरह तुला फार
अन्य लोकीं मग लाडके ! सुकेशी !
नित्य–विरहीं मम केविं तूं रहाशी १०

तुवां टाकुनि मज सेवियली नाहीं
भोग्य वस्तू अल्पही जगीं कांहीं;
रम्य नंदनवनिं एकली विहारा
करिशि आतां कशि पिउनि सुधाधारा ! ११

कांतछंदानुष्ठायिनी सुशीले !
मदानंदीं निज सौख्य तूं गणीलें
मद्रावीनें तव हृदय विद्रुत केलें,
एक जीवन जणुं भिन्नदेह झालें ! १२

मदाज्ञा तूं कधिं नावमानियेली,
तेविं दुःखप्रद कृतिहि नाचरीली;
मदाज्ञेविण जाउनी दिव्य लोकीं
कसें लोटिसि मज गाढ दुःखपंकीं ! १३

विरहपावकसंदग्ध मन्मनातें
शांतवाया चिरकाल कुंददंते !
काय ठेविशि या जगीं, सौख्यदायी
स्मरणचिन्हां निज विविध वस्तुठायीं ? १४

कंठ मंजुल मधुमत्त कोकिलांतें
गमन लीलायुत समद मरालातें,
लोल वीक्षित निज सभय कुरंगीतें,
अर्पियेलें कीं काय तुवां ? कांते ! १५

ललित विभ्रम तव तरल वल्लरींत,
मधुर मंदस्मित विमल चंद्रिकेंत,
कुरलकुंतलभा सिंधुतरंगांत,
प्रकट झाला तव वर्ण केतकींत ! १६

हार रत्नाचा त्रुटित सखे ! होतां
तोष ना दे तत्पृथग्--रत्न चित्तां;
तेविं अवयवशः चारुता विभिन्ना
तुझी किमपि न तोषवी मज विषण्णा. १७

शक्त नसती गे ! स्मारकें तुझीं हीं
वियोगार्ता मज रंजविण्या पाहीं !
प्रीति–देवी परि तूझिया अभावीं
जगीं एकलि मज शांतिसुखां दावी. १८

नभीं चपळा ती चमकुनी क्षणांत
जगद्व्यापी हरितसे जसें ध्वांत;
करुनि माझा संसारतिमिर नष्ट
दिवीं झालिस तूं तशी क्षणीं गुप्त ! १९

प्रिये ! अपुल्यासह नेसि काय सांगे
मदानंदा मच्छांति धृतींनां, गे !
आत्मगमनें मज करिशि, हे सुगात्री !
मंत्रि–गृहिणी–सखि–हीन ही धरित्री ! २०

गमे गृहिणीविण गेह तें स्मशान !
व्यर्थ जीवित तें दयितमित्रहीन !
प्रिया गृहिणी जैं जाय विनाशास
खचित बरवा तो निबिड विपिनवास ! २१

नसे भुवनीं एकाकि असा कोणी
नियम विधिचा हा सत्य ये दिसोनी;
प्रणयबद्धा ही असे धरा सारी
विरहि हृदया देतसे ताप भारी. २२

शैल चुंबिति उन्नता द्योस पाहीं,
पुष्पयुक्तां लतिकांस गंधवाही,
मधुप चुंबी मधुराम्रमंजरीसी
प्रसन्ना ही कौमुदी अंबुधीसी. २३

लता कोमल वेष्टिती तरुवरांतें,
करीं आलिंगी इन्दु कुमुदिनीतें,
महीलागीं आश्लेष दे मरीची
एकमेकां भेटती सदा वीची. २४

होति निर्झर संयुक्त गे! नद्यांशीं,
तेविं सरिता रसपूर्ण सागराशीं;
गगनिं मंदानिल सानुराग साचे
सौख्य सेविति अन्योन्य--संगमाचें. २५

विफल गमती हे प्रणयविधी मातें,
कोण देई त्या प्रीति चुंबनातें,
दृढालिंगन मज तेविं कोण दे तें,
त्यजुनि मज तूं जरि जाशि दिवीं कांते! २६

पुन्हां भेटे यामिनी मृगांकाला,
चक्रवाकी निज दयित सहचराला,
पुनर्मीलनलालसाबद्ध पाहीं
चक्रवाकहि चंद्रिकाविरह साही २७

मदीयाशा तव पुनःसंगमाची
प्रिये! झाली अत्यंत नष्ट साची!
सानुरागीं या जगीं त्वद्वियोग
हताशातें मज सह्य कसा सांग! २८

असे आशा ही अमरलतातुल्य
विफल करि ती अति तीव्र कालशल्य,
दीपिका ती हरि आपदंधकार
सुसह्य करिते संसार हा असार. २९

भाविसौख्याशा वसत जरी चित्तीं,
सोशि धैर्ये नर सकलही विपत्ती;
जेधवां ती परि नष्ट पूर्ण होत
तया जीवित निज गमे भारभूत ! ३०

जगीं सौख्याशा सकल मम निमाली
गमे स्वर्गी तुजसवें तीहि गेली !
होत तिजविण हा जीव सखे ! त्याज्य
जसा लोकीं निर्द्रव्य मंदभाग्य ! ३१

गुलाबाचें सुम होय अती म्लान
जसें ग्रीष्मीं जलसिंचनाविहीन;
प्रखर विरहीं त्वत्प्रेमजलावीण
सुकुनि जाई मम तेविं हृत्प्रसून ! ३२

दिसे गाढचि अनुराग जगीं विशालीं
करिति निर्जीवहि सुखें प्रणयकेली;
रंजवीती त्या प्रियाऽश्लेषबद्धां,
भ्रांतवीती परि विरहशल्यविद्धां ! ३३

विलोकुनियां त्यां स्मरण मला होतें
प्रिये ! अपुल्या अनुराग-विलासांचें !
क्षणिक तोषा परि देइ मानसा तें
जेविं दर्शन दुर्दिनीं सुरधनूचें ! ३४

पाहुनी गे ! कुसुमिता चमेलीतें
तिच्या गजऱ्याचें स्मरण होय मातें;
तुवां अनुदिनिं जो स्वयें गुंफियेला
करीं माझ्या सप्रेम अर्पियेला ३५

गणुनि योग्य न तो माझिया करांसी
तुझ्या स्थापीं मी सुघन केशपाशीं;
तेथ शोभे ती रम्य कुसुममाला
जणों यमुनाजलिं मग्न हंसमाला ! ३६

स्वसेसह तूं जइं दंग बोलण्यांत
अकल्पितसा पातलों मंदिरांत,
करीं झांकोनी तिच्या लोचनांसी
चुंबिलें मी तव मधुमयाधरासी ! ३७

पाठशालेंतुनि येइं जैं गृहातें
विलोकूनी मज सुचिर वियुक्तातें
भ्रमसि आनंदोत्फुल्ल निजागारीं
घनालोकें ज्यापरी ती मयूरी ३८

क्लेश हरिले सकलही प्रवासाचे,
तेविं दुःखहि मम दीर्घ वियोगाचें,
हास्यवदनें, त्वां स्निग्धकटाक्षानें,
दृढाश्लेषें निज मधुर अधरदानें. ३९

मंद मलयानिल सुखवि जैं नितांत,
अशा समयीं रमणीय वसंतांत,
प्रिये ! सौधावरि विमल चंद्रिकेंत
केलि केल्या उभयतां असंख्यात ४०

तुझ्या पीनोन्नत पयोधरांलागीं
करुनि माझें उपधान, कोमलांगी
सुखें पडलों मी समयिं त्या प्रशांत,
गणुनि अपुल्यासी धन्य अति जगांत ४१

देत जीवन नव तुझा स्पर्श मातें,
अमृत जैसें तें नित्यरुजार्तातें,
भ्रांति वाटे मज तेधवां, विलोकीं,
असें स्वर्गी वा वसत मर्त्यलोकीं ! ४२

अमृतकर तो चंद्रमा रम्य फार
करी गगनीं प्रियजनांसह विहार,
तुझा अमृताधर वदनचंद्र तैसा
स्वच्छ शयनीं सहकांत करि विलासा. ४३

प्रतिस्पर्धी अकलंक निज विराजे
पूर्ण लांच्छित विधु पाहतांच लाजे;
क्षीण होई प्रत्यहीं मत्सरें तो,
तया अन्योत्कर्ष कीं असह होतो ! ४४

प्रिये ! करुनी बहु यापरी विलास
उभयतांनीं सुरलोकिंच्या सुखास
सेवियेलें या जगीं अल्पकाल,
परी अविदित तो निघुनि जाय काल ! ४५

स्थलीं एकांतीं, तेविं समाजांत,
सौख्य वाटे ना जगीं मज कशांत;
प्रणयविधि गे ! परि पाहुनी परांचे
स्मरण सोत्सुक मज करी स्वकेलीचें ४६

शयनमंदिर रमणीय आपुलें तें,
तुझ्यावांचुनि बहु ताप मना देतें,
विफलदर्शन हो खचित आजि, हाय !
जसा नसतां चैतन्य मनुज काय ! ४७

पाहुं कोठें तव सुप्रसन्न आस्य !
हाय ! तैसें मधुमधुर तुझें हास्य !
रमवि सखये ! जें माझिया मनासी
श्रांत होवोनी येत जैं गृहासी. ४८

तुझ्या सहवासीं सतत सखे ! भासे
सौख्यसागरिं कीं विश्व हें विलासे;
विषय तैं जे आनंदहेतु होती
खेद शतधा मम आजि वाढवीती. ४९

तुझ्याठायीं मज गमे खचित होती
मनोहारिणि ! मोहिनी अद्भुता ती;
केविं होई तिजवीण जगीं या गे !
असुखदायीही वस्तु सुखद सांगे ? ५०

तुवां मायेनें मजसि भारियेलें,
सद्गुणांनीं त्वां बद्ध मला केलें;
लुब्ध झालों मी तुझ्या सुगुणवृंदीं
भृंग जेवीं तो प्रफुल्लारविंदीं. ५१

प्रीति मजवरि निस्सीम तुवां केली
तेविं माझी सेवाहि सर्वकाळीं
प्रेम तूझें जें नित्य अचल होतें
कसें आतां चळणार सांग कांते ! ५२

प्रिये ! त्रिदिवस्था प्रीतिसी त्वदीय
न कल्पांतीं शिथिलता प्राप्त होय !
शक्य आतां अपहार तिचा नाहीं
सकल विपदातीत गे ! तीहि होई ! ५३

प्रिये ! आतां तूं पाहशिल कधीं ना
स्वभावांतिल मम दोष जरी नाना;
जरी होई मम वृत्तिविपर्यास
तो न दुखविल कल्पांतिं तव मनास ५४

सुदिन होते आपुले उभयतांचे
असति दुर्दिन हे ममचि एकट्याचे !
प्रिये ! झालिस तूं मुक्त जगांतूनी,
मोहपाशातें सकल विदारूनी ! ५५

शरत्कालींचा चंद्र मनोहारी,
रवि ग्रीष्मींचा प्रखर तापकारी,
मंद मलयानिळ, चंडवात तेवीं,
सौख्य नच वा तुज दुःख आजि देई ! ५६

मला व्हावी निःस्वप्न महानिद्रा
जीविताच्या जी शोषिते समुद्रा,
मानवातें शाश्वती शांति देई
ऐहिकाधिव्याधितें लया नेई ! ५७

' क्रमिक अपचय तव फुल्ल चारुतेचा
धीर देता बहुकाल मला साचा
परी दुःसह तल्लोप अकस्मात '
खेद माझा हा खचित असे व्यर्थ ! ५८

पूर्ण विकसित जें कुसुम अद्वितीय
तेंचि लोकीं या प्रथम लया जाय !
जरी त्यातें विच्छिन्न करि न कोणी
जाति त्याचे स्वयमेव दल गळोनी ! ५९

परी अधिकाचि हो दुःख मानसातें
पाहुनीयां त्या गलितदल सुमातें;
खचित बरवें तें गमे तयाहून
अकालीं त्या जरि नेइ कुणि खुडून ! ६०

' चारुतेचा वैरूप्यिं विपर्यास
चर्मचक्षूतें असह होइ खास ! '
असे नैसर्गिक नियम हाच लोकीं;
कसा होइन अपवाद तया मी कीं ! ६१

इन्दुलेखा जैं क्षीण कृष्णपक्षीं
मनस्तापा दे तीव्र, सरोजाक्षी !
परिक्षीणा जरि कांति तुझी तैसी
व्यथा देती बहु खाचित मन्मनासी ! ६२

तुझा आयुर्दिन जाय अभ्रहीन,
तुझें दर्शन करि हृदय सुप्रसन्न;
अंतकालावधि मूर्ति तुझी रम्य
होति सखये ! अति दीप्तिमती काम्य ! ६३

प्रभा निर्वापित होत तुझें काळें,
स्वयें होइ न ती क्षीण परि सुशीले !
येत तारा जैं नभांतुनी खालीं
दिव्य भासे ती तेविं गमनकालीं. ६४

तुझी शुश्रूषा निशिदिनीं कराया,
विकल हृदया तव सतत धीर द्याया,
मधुर वचनीं गे ! तुजसि रंजवाया,
तवोत्कंठा निजदर्शनें हराया, ६५

सजलदृष्टया सप्रेम तुज पहाया,
अंत्य चुंबन तें प्रेमभरें घ्याया,
तेविं अशिथिल परिरंभ तुला द्याया,
लुलित शीर्षा निजकरीं सांवराया, ६६

शक्य उभयां अजि जो न अनुभवाया,
प्रीतिनिर्भर सुव्यक्त तैं कराया,
अंतकालीं तव नसें निकटभागीं
हाय ! लोकीं या परम मी अभागी ! ६७

तीव्र पीडा हो मनीं त्या विचारें
जाइ तेव्हां मम धैर्य लया सारें !
असह होतां तो व्यथाऽवेग फार
येति नयनीं अश्रांत अश्रुपूर ! ६८

त्यजुनि एकाकी मजसि जरि जाशी,
सुदति ! सुंदरतम विविध विषयराशी
हीन भासे स्मृतिहून तुझ्या लोकीं
सौख्य द्याया मज मग्न विरहशोकीं ! ६९

तुझें जीवितसर्वस्व खरें प्रेम
सुखाचें जें मम जगीं एकधाम,
घोर कल्पांतींहि जें अमर राही
वसे माझ्या हृदयांत नित्य पाही ! ७०

चिंतनाचा तें एक विषय होई
साम्य त्याचें जगिं ये न कुणालाही
अभावीं गे ! तव मूर्तिच्या सजीव
असें प्रियतम तें एक मज सदैव ! ७१

विभो ! विश्वेशा ! देइं सुचिर शांती
मत्प्रियेच्या आत्म्यासि सुरप्रांतीं,
विनयशीला मम वल्लभा सती ती
पुन्हा भेटविं माझिया जीवितांतीं ७२

इंदिराकांता ! सदय ! जगन्नाथा !
अकालीं रे ! मम हरिशि कशी कांता !
तिची संगति जरि अल्प हो जगीं या
चिरंतन दे स्वर्गीत, देवराया ! ७३

' असे सकला ही सृष्टि मरणशीला, '
परी गमते निर्दया काललीला
तरुण दयितां तो लोटि जैं अकालीं
नित्य--विरहानलें दुःसहीं करालीं ! ७४

घडो कोणा नच कधीं प्रियवियोग;
दयित सेवुत बहु सदा प्रीतिभोग,
देउ माधव त्यां सौख्य अविश्रांत,
हीच आशा करि नित्य ' **इन्दुकान्त** ' ७५

इन्दुकान्त.

---

## *महाराष्ट्रमहोदयकाव्य.

अध्याय ४ था.

आर्या.

ऐसा प्रतापसूर्य प्रोज्वल होतां मनांत मग काय
सौख्यें खर्चूं देतो क्षात्रा कृषिकर्मि आपुला काय १

---

* गेल्या जुलै महिन्याच्या ७ व्या अंकांत ह्या काव्याचा ३ रा सर्ग आलेला आहे.

चिंता चिता समाना अनलावांचून जाळि देहास
केविं मनोरथ साधे चिन्ता ही त्रास दे सदा त्यास २
" जावें स्थापूं राज्य स्वतंत्र तरि फार कर्म अवघड तें
निर्धन अमित्र ऐशा माझ्याहातून केविं तें घडतें ३
यत्नें धन, सन्मतमितहितसत्यमधुरसुभाषितें मित्र
मिळती--वदति तसा दे सर्व जगाचा--शुभाशितें--मित्र ४
सत्य असे तें पारि त्या यत्ना तरि पाहिजेच अल्प धन
पय लाविल्याविना तत्स्तनास पान्ह्यास गाय सोडी न ५
तें स्वल्पहि धन मिळण्या व्हावें दैवानुकूल्य तें न मला
त्याचा हिंदूवरला न रोष वाटे अजूनही शमला ६
कारस्थान धनाविण होतें पंगूच सर्वदा लोकीं
पारा न जयामागें मुख त्या आदर्शिं कोण अवलोकी ७
साधक बाधक ऐशा ग्रासियलें तन्मना विचारांनीं
हरिली शान्ति तयाची अरिच्या हृद्गौप्य जेविं चारांनीं ८
न रमे नरमणि रमणीविनोदवचनींहि सुखविला साचा
कितिही तरि तो वाटे पूर्णपणें शत्रु सुखविलासाचा ९
करि आकान्ता कान्ता कान्तातें कोण ती अशी विवशी
झडपी ह्मणे मदीया किंवा चुकलेंच काय सेवेशीं १०
निजपति--जपती असतां तन्मन राखावयास ती राजी
न कळे उदास कां जिस ठाउक पतिची न पूर्वि इतराजी ११
चुकलें सेवा देवा ! तव वा पतिचीच वा तुझी अंबे !
कांहीं नुमजे मातें माते भक्तेष्टदायककदंबे १२
यापरि सती पतीच्या औदासिन्यें उदास आपण हो
तत्सेवनीं न निजसुखि सर्व सतींचा असेच हा पण हो ! १३
निःसारीं संसारीं आर्या भार्याच सौख्यदा साची

सहधर्मचारिणी ही तीच सरी तदितरांस दासाची १४
मानी परी न मानी अपमानी रोष ती दिपारमणी
पतिकृत; समजे त्या ती निजकंठींचा सुरम्य हीरमणी १५
पाहुन सुवेळ सुवचें तद्हृद्गतभेद काढण्यास्तव ती
झाली निजपतिराया आनंदें प्रेममूर्ति हो स्तवती १६
कां म्लानवदन झालां चिन्तातुर कां असे प्रिया ! दिसतां
कां न प्रेमनिरीक्षण या निज दासीकडे गडे ! करितां १७
कैसे--पाहे अकरुण जरि मीनीं तो नदीन--ते जगती
काय सती करिल, वदे प्रेमें जरि पति न, दीन ते जगतीं १८
सांगावें जी कारण कां दिसतां हो ! असें उदासीन
कां वाटे आताशीं कीं ही अपणांस सेउं दासी न १९
आपण उदास बसतां; काम न करितां; घरांत बहु सलतां
लागेल निभाव कसा अपुल्यावरि हें सबंद गृह कलतां २०
जावा " जावा " ह्मणती दीर न नांदा तशाचाहि " न नांदा "
सोडुन बसतां ह्मणुनी स्वविचारीं मग्न होउनी धंदा २१
शेतीं काम न होई ह्मणुनी रागावती स्वबांधव ते
गृहकलि फूट करी यत्कुलिं नच तें कुल फिरून सांधवतें २२
नवरे खपती अमुचे दीर फुकट आयता कुचर चरतो
हा खोल बोल माझ्या हृदयिं जसा कोयताचि चरचरतो २३
बोले कांहीं मर्मच्छेदकही शद्व भीत भीत असे
नव्हते असत्य परि ते नसती नसती वचेंच काढितसें २४
गुळवेलिचाच काढा लागे काढावयास तापाला
सर्प न यावा ह्मणुनी उद्यानीं लाविती सतापाला २५
या न्यायें रमणीनें केला ऐशा कठोर वचनाचा
उपयोग योग्य वेळीं हाच असे पंथ सर्व सुमनाचा २६

रमणी वचनोषधिनें दावियला आपुला प्रभाव खरा
आग्रह धरिशी ह्मणुनी कथितों तुज मी असें वदे नवरा २७
रामा रामा रामा सीता नसती सती न रावण वा
वाळी मरतां योग्य जीवांचुनि या भवीं नरा वणवा २८
मी वीरवीरपत्नी तूं ऐसें या जगांत समजाया
वाटे यत्न करावा आड न येईल तूजसम जाया २९
क्षात्रकुलोचित कांहीं कर्म करावें न या अनुसरावें
कृषिकर्मातें मातें मरणहि त्याहून वाटतें बरवें ३०
गोविप्रतापशमनक्षात्रश्रीदास येतसे बट्टा
अंशें या कृषिकर्मे गोपृष्टीचा उडे जयीं चट्टा ३१
ज्याचें रक्षण करणें होई त्याचाच नाश या हस्तीं
ऐसें कर्म नको हें याहुन बरवीच मृत्युमुखिं वसती ३२
भूभारनिरसनातें जागावें क्षात्रिं त्या न भागावें
भागावें अरिशिर तनुपासुनि खग हाकण्या न भागावें ३३
संबंध हीनजातिज लोकांचा या कृषींत नित्य घडे
निजवर्णकुलाचा गे ! त्यानें संस्कार सर्वथा बिघडे ३४
संस्कारशिथिलतेनें घडते स्वाचारविस्मृती जगतीं
ऐशा कुलिचें नर मग होउन निसत्व गे ! सरण जगती ३५
यास्तव न रुचे मजला रविकुलजनिलाभ जाहलेल्याला
कर्म कृषीचें हरिला तृण जैसें वा कदन्न राजाला ३६
ऐसें ह्रद्गत कथुनी संतोषवितो उदार निजमहिला
सत्पुत्र तोच झाला ऐशा काळांत वाटते महिला ३७
आनंद हो सतीला पतिवच पीयूष जाहलें तिजला
संशयताप निवाला उदयेच्छेचा प्रकाश मनिं पडला ३८

---

## अध्याय ५ वा.

### आर्या.

पूर्वाध्यायीं कथिलें मालोजी भोंसले विटे कृषितें
कां कोणता पुढें तो स्वीकारी पंथ पाहुं आतां तें १
क्षात्राचा धर्म खरा करवाल धरुन रणांत संग्राम
करणें साधे जेथें पाहि असा तो मनांत सत्राम २
यवतनगर आठवलें त्याला लक्ष्मीनिवास नांवाचें
ज्यातें वर्णायातें रोज नवी होय वासना वाचे ३
लक्ष्मीनिवासनगरी भरली सगळी सदैव यवनांहीं
यास्तव तेथं मराठ्या बढतीची आस खास लव नाहीं ४
पुनरपि विचार करितां आठवला त्या महारथां वाली
सुकुल शहाणा ज्यातें देई सन्मान सर्वदा अली ५
जाधवकुलमणि लखुजी भूषण जो सिंधखेड गांवाचें
दे यत्सुता महारथ लोकां शिव त्या सदैव गा वाचे ६
सुलतानाचा होता सेनापति तो रविप्रतापाचा
संतत लखुजी इच्छी शेवट जो क्षात्रविप्रतापाचा ७
द्वादशसहस्र वाजी " याजी लखुजी " ह्मणावया राजी
ज्याची न होउ ह्मणुनी जपती जपती सदैव इतराजी ८
देवगिरीचे यादववंशीं-- राजेशरामदेव जया
शोभवि--जन्मे लखुजी साह्य जया परि न राम देव जया ९
श्रीरामानुजलक्ष्मण साच असे हा न सहज परिजित हो
भूषण मानी पर परि निजाम " सेनेश योग्य " कीं मज हो १०
मागावयास आश्रय जावें खेडास जाधवेशाचा
त्या आणि असें मानसिं मालोजी भक्त जो उमेशाचा ११

त्याच्या हाताखालीं सैनिक व्हावें स्वकर्म राखावें
न रतावें कृषिकर्मीं सिंहें नच जेविं उंदिरा खावें १२
यापरि विचार करुनी मालोजी निज पतिव्रतें सतिचें
मत घे पतिनीं द्यावे हक्क असे निज पतिव्रतेस तिचे १३
न सती नसतीं दाउन अडचण ये आड उत्तमा पतिच्या
हेतूच्या सुपति तसा सुपतितसाही कधीं न आड तिच्या १४
पाहुन सुवेळ त्यानें केलें प्रस्थान सर्व शर्मकर
झाला यशोद त्या जो मुक्त करी गज धरी जया मकर १५
बसला मनोरथीं तो अनिलाही वेग लाजवी ज्याचा
पोंचे सिद्धिस्थाना इच्छा जेथें तिथेंच मार्ग तिचा १६
भेटे जाधवराया सविनय कळवी तया स्वहेतूतें
" स्वार करीतों, " तूतें तोहि वदे " जरि रुचेल हें तूतें १७
मालोजीला पटलें मनीं वदे दैन्य सर्वही फिटलें
होय शुभारंभचि कीं जयसाधन वदति मुख्य सर्व भले १८
जाधवरायें केलें स्वार तयातें स्वसैनिकामाजी
प्राप्त स्थिति त्या झाली सर्व मराठ्यास येइ कामा जी १९
झाला पूर्ण मनोरथ यापरि तो जाधवाकडे जातां
सत्बुद्धीनें केल्या यत्ना जगदीश सत्य यशदाता २०
हें वृद्धवचन फिरे तो चरे बसे तो फसे असें सकळा
ठावें प्रत्यय त्याचा मालोजी भोसल्या भला आला २१
निजल्याचें दैव जगीं प्रबल असे जागल्यास उद्योग
यश दे, मालोजीला त्याच्या यत्नेंच होय सद्योग २२
शकपंधराशताला एक उणा तैं प्रकार हा घडला
भरतोदयरवि आला यत्तेजें यवनभाग्यशशि दडला २३

---

## अध्याय ६ वा.

### आर्या.

सरला दरिद्रफाल्गुन सुमना संतोष दे वसंतोषा
भूभाग्योदयसमया पावति पाहून देव संतोषा १
सायासें वाढविल्या तरुला पहिलीं फुलें फळें आलीं
मोदें नरनारी तत्स्वादा घेती सुखें करिति केली २
केली केलीं झालीं श्रान्त स्वान्तांत कान्त मूर्ति पुरी
ठेवुनि परस्परांची केलिफळा इच्छितात नरनारी ३
ती रति कामी तोही मदनयुवा कान्त एकमेकांला
सुखवायातें झटती दोघे करिती अनेक कुतुकांला ४
उभयगुणमिश्रणानें होणारी वस्तु त्यांस आवडती
रीति जशी सेतूची गंगे त्यातें तिचीच कावड ती ५
निष्काम काम नाहीं संसारीं या सदैव सुफलाशा
प्रत्येक कर्मि आहे नारी भारीच सक्त सुतपाशा ६
भूषण सुवासनींचें श्रेष्ठ जगीं एक होय संतान
त्यावांचुनि सुख तिजला नाहीं मिळतांहि नाकसंतान ७
धिग् धिग् जिणें तयाचें निष्कारण हास्य लास्य रुदनातें
पात्र न नर तनयाच्या जो धिग् तैसें तदीय सदनातें ८
सुतपदकमली ज्याचें वस्त्र न झालें मलीन तो न रकीं
पतित गणावा जातो ह्मणतात जरी कुलीनही नरकीं ९
मालोजींची भार्या सुतार्थ झुरते मनांत संतत ती
सेवी तदर्थ आशीर्वचना ती देव तेवि संतती १०
पुत्रावांचुनि जे त्यां स्वर्गीं जागा मिळेच न बसाया
देवा यास्तव करुणाकर गा पावे मदीय नवसा या ११

सुत दे अंबे मजला आणनि तुजला तयास दावाया
सदये नाहीं केली भक्ताची हाक तूं कदा वाया १२
शंभुमहादेवा गा द्या मज संतान सौख्यसंतान
आर्ताच्या दुःखाचें त्वदितर करि कोण गा निसंतान १३
यापरि रोज करी ती पूजेसमयीं अनेक नांवानें
पुत्रास्तव ईशस्तव पतिव्रतावर अनन्य भावानें १४
मालोजीराव असे शंभुमहादेवभक्तहीरमणी
होती जैशी त्याची तुळजेश्वरिचीच भक्तही रमणी १५
पूजी सुतार्थ कान्ता गिरिजामाता सदैव सुमनानें
तोही सुतार्थ तैसा गिरिजामाता सदैव सुमनानें १६
यापरि काल क्रमती ईश्वरभजनांत उभय संतोषें
साधुन संसार असे भजति तया ईश कां न संतोषे १७
एक दिनी मालोजी बसला असतां विचार त्या सुचला
कीं निजकुलेशनमना गेलों नच मी ह्मणोन तो रुसला १८
सद्धर्मोद्धारातें निर्गुण असतांहि जो जगत्स्वामी
सगुण बने तो करि मज वाजीकर्मास आचरों स्वामी १९
नसती कृपा तयाची पडलों असतों तसाच त्या नरकीं
नीच कृषीच्या संतत इक्षुपरी वा सदैव करचरकीं २०
यास्तव निजकुल दैवत शंभुमहादेव दर्शना जावें
वंदावें भावें तद्गुण गावें आदरें पद धरावे २१
ऐसे स्वमनीं आणी आज्ञा मागें विनंति करुनीयां
जाधवरायाची तो उदार देई निरोप त्या जाया २२
आनंदें निज सतिला कळवी संकेत आपुला सकल
सहधर्मचारिणी ती कैशी प्रतिकूल त्यास होईल २३
यात्रा चैत्रांत भरे शंभुमहादेविं देवरायाची

भक्त असंख्य मिळे त्या जत्रे दुसरी सरी न यायाची २४
ऐकुनि बेत पतीचा मोद न मावे हृदीं उमाप तिचा
होती सुतकामुक ती "याचिन मी वर" ह्मणे ' उमापतिचा ' २५
केली सर्व तयारी सारी वारीस चैत्र मासाच्या
शंभुमहादेवाच्या जायाची; हौस चित्ति दोघांच्या २६
सांगत सानंद निघे मालोजी स्वकुलदेवनमनातें
नित्य नवें नयनातें नवल दिसे मार्गि पावन मनातें २७
सत्पंथश्रवणातें राहो हे नित्य सावधान मन
यास्तव सुमना या मी वाहिं करुन--शंभुच्या पदा--नमन २८

नारायण कृष्ण गद्रे.

## झपूर्झा !

येति सुखाचे लोट नवे !
काय करावें
कसें करावें
चिन्ता सगळी मावळली !
वृत्ती आनन्दीं वळली !
तेजोलहरी चहूकडे
दिसतात गडे
मन त्यांत बुडे
गमे यावया नको कडे--
झपूर्झा ! गडे ! झपूर्झा ! १
स्वच्छन्दानें पिऊं सुधा !
ह्या मार्गे सुधा

प्रिय होय बुधा
अटक कुणाची मुळीं नसे !
होऊं या उन्मत्त जसे !
वेड सुखाचें गमे मना !
दुजा काम ना !
हीच कामना
भुलुनी पाहूं भूल जनां !--
झपूर्झा ! गडे ! झपूर्झा ! २

चमकवुं तारे प्रेमानें !
हसवुनि सुमनें
खुलवुं उपवनें !
जिकडे तिकडे रंग भरूं !
आनन्दीआनन्द करूं !
हसवूं हसवूं सकलांला
शोक आटला
खेद निरसला
हासत हासत म्हणा चला--
झपूर्झा ! गडे ! झपूर्झा ! ३

दुःखी कष्टी जन जगतीं
कितीक असती
कुणी न पुसती--
त्यांचे आम्ही कैवारी !
ताप वारुं सिंचुनि वारी !
सुख शान्ती लाभो त्यांना

म्हणुनी नाना
करीत गाना
नाचूं सोडुनिया भाना !
झपूर्झा ! गडे ! झपूर्झा ! ४

————एकनाथ पांडुरंग कुळकर्णी रेंदाळकर.

## चंद्रास*

श्लोक.

चंद्रा ! कां दिसते मुखावर तुझ्या म्लान प्रभा ही अशी ?
कां कान्ती त्यजिली स्वकीय रुचिरा ? वृत्ती कशी चंचला ?
होशी शून्यमनस्क सांग मजला कां ? काय झालें तुला ?
ऐशा मुग्धपणांत भाव समजूं मी कोणता ! रे तुझा ! १

लागे या करण्यास उच्च गगनीं आरोहण प्रत्यहीं,--
होतात श्रम त्यामुळें; म्हणुनिया तूं फार कां कष्टशी ?
कीं कोठें रमणीय ना किमपि; वा मित्राविना लागतें--
एकाकी फिरणें, म्हणून तुझिया दुःखास कां हेतु तें ? २

वा भालीं पडती तुझ्या विधिबलें तारा विजातीय ज्या;
तेणें काल तयांत, खिन्न मुख कां झालें तुझें त्यामुळें ?
किंवा पाहुनि पाहुनी सतत या पृथ्वीस कां भागसी ?
चंद्रा ! कोण सकाम पूर्ण जगता त्वां सांगिजे हें मला.
आहे एक तरी तुझ्यासम कवी एथें मनीं आणुनी,--
मित्रा ! तोष धरूनि कर्मरत हो. होऊं नको दुःखभाक् ! ३

———— नारायण महादेव भिडे.

---

* शेले कविच्या ' To the Moon ' कवितेवरून.

सपटेंबर १९०९ वर्ष २० वें.

# काव्यरत्नावली.

## अंक ९ वा.

## महाराष्ट्रमहोदयकाव्य.

### अध्याय* ७ वा.

आर्या.

मलयानिल भेटाया येई सह्यानिलांस मोदानें
होउन पवित्र मार्गी सत्तीर्थांच्या सुधासमोदानें १
मलयाद्रि चंदनाचा आणी भेटीस वास मित्राच्या
दोघांच्या भेटीनें शीतलता ये करांस मित्राच्या २
मंदसुगंधित मारुत मालोर्जाला करी पथःक्रमणीं
मित्रासम निजतेजें सहाय त्यां काननांत सर्व दिनीं ३
सखल प्रदेश कोठें कोठें उंच प्रदेश खळगा वा
मार्ग असा संतांनीं निज वर्तन निकष जेविं खळ गावा ४
कोठें सघनच्छाया वृक्षलतांना फुलें फळें आलीं
कोठें प्रखर धुराळी हुताशनीची प्रियोत्तमा आली ५
जाळीं करवंदीची कर वंदीची जयास पाहून
कीं न व्याघ्रा सोडा बाहिर जो क्रूर रोग पाहून ६
खडकाळमाळिं कोठें सोनेरी गवत मात्र आखुड तें
कोठें दगडाखालीं विंचू जे प्राणपंचका खुडेत ७

* गेल्या ८ व्या अंकांत ह्या काव्याचा ६ वा अध्याय आला आहे.

कोठें ओढे मोठे गोटे असती जयांत मात्र बरे
बिंदुहि परि न जलाचा ग्रीष्मीं वर्षी जनांस भयद खरे ८
कोठें निर्झर असती दुष्टभयें संत तेविं लपलेले
अमृतासम मधु ऐशा तुडुंब भरले सदैव शान्त जलें ९
कोठें लहान सरिता तहान जिरवावयास पांथांची
सिद्ध असे आलीशी सविनय कोणा उदार दयितेची १०
कोठें लहान खेडीं वाड्या कोठें क्वचित् स्थलीं गांवें
किति सांगूं मी त्यांचीं वेडीविद्री अनेक तीं नांवें ११
एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं बसलीं दिपा दिपावर हीं
दोघें विश्रामातें जो त्यां देण्यास हर्षलीच मही १२
स्निग्धच्छाया होती सहचर तरुची तशीच सुमनांचीं
होतीं झाडें तेथें दुःखें हृदि यत्सुवास गमनाची १३
निर्मल जल निर्झरही एक असे तेथ दीन पान्थाला
पय देण्या ज्या वाटे द्यावा त्यां मान जो न अमृताला १४
काळी जमीन सारी भोंतालीं जींत एकही न खडा
कोठें कोठें शठसा सड एखादा सुदुष्ट मात्र खडा १५
बोलति परस्परांशीं कांहीं मौजेंत वेळ खरचावा
यास्तव दोघेंही तो काव्यीं ज्यां वाद काय न रचावा १६
"शेतें काढुन नेलीं दोन्ही बाजूंस भूमि डिखळांनीं
भरली कुकाल येतां सत्संस्था जेविं नूतन खळांनीं १७
भगलली ही नाथा देखां सारी जमीन शेतीची
जणु केश विखुरलेली मजला विरहीं गमे प्रिय स्त्रीची १८
देउन पिकास वाही बसली दमुनीच तोंड वासून
आठहि महिने ही भू स्वप्रिय पुत्रार्थ कष्ट सोसून १९
किंवा वसंतकाळीं काळी नेसलि जमीन चंद्रकळा

झिरझिरित फार ह्मणुनी दिसतात तदवयवांतल्या वेळा" २०
तत्वज्ञांच्या किंवा विषयरतांच्या न रूपकामाजी
मालोजी भूमातेवरि करि पुरवी स्वपुत्रकामा जी २१
" शीतें कडकुनि गेलें भूमातेचें गमे मला सारें
आंग सखे किंवा इस यवनांचें झोंबलें प्रखर वारें २२
नाथा डिखळें नसुनी गमती या थंडिच्या मला गांधी
जिरवायास उदेला या कवण बघा प्रिया तरी गांधी २३
अन्यायशैत्यघायी इजला हीं टेंगळें सखे आलीं
भटभानुजोष्णकिरणें जातिल हीं लिखित हें इच्या भाळीं २४
धान्यतरूंच्या नाथा कुंकुमकुसुमाविहीन ही धरणी
दिसते माझ्या नयना जैशी निस्तेज गतधवा तरुणी २५
उत्तम खरीच विधवा असती नुसती तशी असें न ह्मण
गमते मज कीं तुजला नारींची ठाउकी असे न ह्मण २६
भारतभूचे स्वामी क्षात्रकुलींचे खरे सुवीरमणि
निर्वीर्य ते ह्मणोनी सधवा वैधव्य जाणवी रमणी २७
किंवा सखे मला ही वाटे कीं व्याघ्रदृष्ट गाय वनी
करुणा भाकी देवा त्रस्त असें मी सुदुष्ट गा यवनीं २८
काळजिचा काळ जिचा येउनि निःसत्व होय ही काळी "
ऐसें ह्मणुनी दुःखें मालोजी ठेवि हस्त निजभाळीं २९
" या मम ललाटपटलीं पटलीं बिधिला लिहावया लिखितें
कोण्या पापें माझ्या ऐशीं न कळे मला सखे अघ तें ३०
कीं ' हाय हाय काय कु--दशा मला प्राप्त ' धाय मोकलिते
' धिग् धिग् त्रिवार भरतां दुरुनी त्यांच्या सदा नमो कलिते ' ३१
थकली ' न कलि करावा ' कथितां कथितां असें स्वपुत्रास
ओरडण्यानें त्या गे पावे ईची सखे वपु त्रास ३२

' वागा बाळांनो मम एकीनें तेविं नित्य नेकीनें
समजा तुह्मांस दिधलें मग वैभव पूर्व त्या त्रिलोकीनें ३३
बनुनी बेश्रम बेकी करुनी कारिंचाहि घास गमवीतां
न नमावें निज शिर जें यमासही तें अरीस नमवीतां ३४
लाज न जतन करीतां साज कसा व्याज आज रुचला हो
दंडक हा परि तुमचा मजला असुहरणसाच कुचला हो ३५
यापरिचा निजपुत्रां करितां उपदेश भू सखे शिणली
नाहीं पिकांस देउन सुतपोषाणिं माय कोणती दमली ३६
वनराजराजसिंहासम आह्मी क्षात्रपात्र नरपत्वा
मोहें सर्वहि भुललों विसरुनि गेलों स्ववीरवंशत्वा ३७
माते कां हा ऐसा षंढ तसा मूढ पुत्र वाढविला
वाढे यद्दुग्धें तें मातृस्तन चोळुं देइ जो अरिलां ३८
ऐसें ह्मणुनी मानासिं ढाळी तो अश्रुबिंदु नयनींचे
कैसें सहतें देवा राज्य वहावें करुन अनय नीचें ३९
शंभुमहादेवा गा त्वद्दर्शन घ्यावयास येत असे
मी परि झालें मज हें ओशाळें काळतोंड दाउं कसें ४०
कां माझ्या मातेची केली कुदशा कृपाकरा देवा
कधिं तिस सुदशा देशिल ? ताता या मरण किंकरा देवा ४१
यापरि बोलत असतां भेटे त्या एक मित्र फार जुना
नेई तो त्याजवळाचि वाडितल्या आदरेंहि निज सदना ४२

---

अध्याय ८ वा.

आर्या.

अन्योन्य कुशल होतां विदित मुदित फार होय सन्मित्र
मित्राच्या भेटीच्या आनंदा जोड काय अन्यत्र १

मित्रचि नेत्र जनीं या मित्रावांचून सर्व अंधार
मित्र न पाठीराखा ज्याला त्याला कुठें न आधार २
मित्र सुखाचा ठेवा मित्र वचेंची नवा नवा मेवा
मित्रदयेच्या पेवा ये न कधीं तूट कीड लागे वा ३
मित्र सदानंदाचा पकवि मळा झाडि तेविं कुमति मळा
मित्र मना विकसन दे आकाशींचा जसा सदा कमळा ४
मित्राचा संतापहि जलद वितळुनी नवेंच सुख रचिता
विश्वास स्वाधारीं त्याच्या साठीं सदा असुख रचिता ५
व्यसनाधांची यष्टी रोगार्ताची तशी महामात्रा
गर्वमदोन्मत्तातें उपदेशांकुशधरन्महामात्रा ६
निजगुप्तविचारासम अदेय वस्तूस ठेवण्या पात्र
मित्रहृदासम नाहीं मिळणें कोठें जगांत अन्यत्र ७
धीर व्यसनीं देउन पार करी व्यसनसागरामाजी
संकटनाशन गणपति पदवी देण्या न कोण त्या राजी ८
मित्रशशीच्या दर्शनिं कोण न मानुनि जगन्नियंत्याचे
आभार वदे कीं गा हेंच असो प्रभुनतास नित्याचें ९
शोकघनतमोमीलितलोचननलिना विकासवी मित्र
जो त्याची किति गावीं गीतें जीं कारिति मानस पवित्र १०
मित्र तयास ह्मणावें जो मानी आपणा बहिर्प्राण
वेळीं स्वप्राणांतें खरचुनिही जो करी सुहृत्त्राण ११
सत्य मधुर हित मितवच सतत वदे होय तो जगन्मित्र
दुर्मिळ ऐसा परि हो एकाधिक नच दिसे जगन्मित्र १२
मिळतात मित्र जगतीं स्वसुखावांचून हेतु ज्या न दुजा
वरिल गुणांनीं युतसा एक मिळे मित्र भाग्य तरि समजा १३
मालोजीचा नव्हता मित्र परी स्वार्थसाधु मानव तो

होतां परि चंदनसा ज्या निज झिजतांच देह मानवतो १४
धर्माजी नाम तया निजधर्माचीं मतेंच संमत या
मालोजीसह गावीं जाई तो तत्सुरीति किति गावी १५
मित्रगृहींची भाकर लागे त्या गोड फार मोदकर
फिरण्याचा शीण सरे प्रवास केला कितीक तें विसरे १६
गोष्टी आनंदाच्या मित्राच्या गीति त्यास छंदाच्या
गमल्या मानव साचा त्यास गमे एक हाच नवसाचा १७
पुसती परस्परांचें कुशल तसें कर्महि यवनपरांचें
स्मरुनी दुष्कृत ज्यांचें ढाळिति अश्रूंस भक्त सत्याचे १८
माळुला धर्म वदे यवनत्रासास नित्य नव नव दे
आले कठीण साचे दिन मित्रा भीति मानसीं सांचे १९
लादिति करभाराचें ओझें देतां न धैर्य थोराचें
टिकतें गरीब तगती कसे दिसे मज बरी न यांत गती २०
दाद न फिर्यादीची धाम्याची तेविं नाहिं यादीची
ऊस तसा अधिकारी रयत पिळी कोंडि फुकट वा कारीं २१
स्त्रीची लज्जा राहूं देति न घेरिति जसें शशिस राहू
व्याघ्रांनीं गाय वनीं तैशी संतत वधावि गा यवनीं २२
आहे तुजला ठावें माझ्यानें काय अधिक साठावें
हृदयीं तुझ्या ! जिवाचा तूं राहे तुज पुढें न उगि वाचा २३
धर्मीचा छळ नयनीं बघवे नच झोंप ये न गा शयनीं
वाटे देवचि रुसला ह्मणुनी हा दुष्ट काळ ये असला २४
स्तब्ध उभा ठेउनि कर कटिवर विठ्ठल ह्मणून हा निकर
करिती यवन भयंकर आली वेळाचि धर्महानिकर २५
बाटविती जोरानें हिंदूंना सर्वदा मुसलमान
हातीं कुराण एका खड्ग दुज्या दिसति ते यमसमान २६

धरुनी द्विजांस त्यातें बनविति निमिषांत दुष्ट नष्टशिख
मांसहि तन्मुखिं घालिति याहुन बरवेंच चारितांहि विख २७
निघतां नर प्रवासा फिरुनी येईल तो सुरक्षितसा
न असा मनीं भरवसा राखूं ये प्राणमित्र हे सहसा २८
भारतभूचे कांहीं पुत्रहि यवनां भुलून गा मिळती
न कळे परि त्या कांहीं आपण होउन विषास ते गिळती २९
त्यास वदे मालोजी केल्या कर्मास पात्र झालों जी
देव न अनया साही गणिले वडिलीं सखे रिपू साही ३०
संतत कुल कलहांनीं वृत्ति गुरूंशीं निरर्थक ल्हांनीं
ठेउन निरर्गलाशी भोगुं नये कां अशाच कुफलाशी ३१
कारस्थान त्यजुनी मांडोनी रीत सर्व सत्य जुनी
भूषणिं व्यर्थचि सजुनी शृंगारीं सर्वकाळ गा कुजुनी ३२
असिला म्यानीं पुजुनी कामलतेला सदाकदा भजुनी
दुःसंगतींत रिझुनी व्यर्थ अरीला सदैव गा बुझुनी ३३
अरिसर्पा पय चारुनि गरल तयाची स्वता स्विकारोनी
नयनीं अग्निस पाहुनि गर्वानें त्यांत पाय ठेऊनी ३४
करुनी प्रीतिस कुजनीं रोष तया सर्वदा सख्या सुजनीं
निजवंशशील विसरुनि धर्मापासून दूर गा सरुनी ३५
वाहुन अरिपदिं सहशिर असितें जी योग्य तच्छिरीं शिरतां
जीचकरीं तो धरितां होउन हो आपुलेंच शिर चिरितां ३६
दुखवुन सुवीर चित्ता निष्कारण जेविं रानिं गा चित्ता
खवळुनि त्याच्या चित्ता बुडवाया करुन मार्ग निजसत्ता ३७
सेवुन कुमंत्र नित्य प्रयत्न न करून जाळण्या सत्य
सोडुन नृपत्व पथ्या कुलकलहा देउनी करूं नृत्य ३८
कां न फळें भोगावीं हीं रडगाणीं उगीच कां गावीं

काय जिरे—सांगावी गोष्ट मला सत्य—कुगुण कांगात्रीं ३९
मित्रा देव न कांहीं फुकटाचि सजवी नरमणिकनकांहीं
सुकृतें प्रत्येकाचीं रूपें घेतात सुमणिकनकाचीं ४०
काय तुला सांगावें म्यां गंधर्वापुढें नरें गावें
वा गुरुला शिकवावें शिष्यानें तेविं म्यां तुज कथावें ४१
तुजसम धर्मज्ञांच्या संगतिनेंची मला दिलें ज्ञान
ठेवियलें जपुनी मी किति हें तुज गुरुस दाविलें मान ४२
यापरिच्या धर्मानें मालोजीच्या वचास बहु मानें
ऐकुनि दिला तयाला फारचि त्या धन्यवाद समयाला ४३
मित्रा! सारविचारा धन्य खरा तूं त्वदीय धन्यतरा
माता धन्योत्तम तो पिता विचारीं त्वदीय भरत रतो ४४
शंभु महादेवानें द्यावी तुजला अशीच नेमानें
मित्रस्मृति हें मागे तदधिक द्यावें कुळून हेमागें ४५
मीही तव मित्रत्वें धन्य जशीं तीं जगांत पुत्रत्वें
राष्ट्रहिताचीं तत्वें कथितो तुज जीं सुपूर्ण सत्यत्वें ४६
ग्रामणि केली वरिलीं फुकट तयाचा प्रभाव हा आजी
की जीवनार्थ सुद्धां लागे करण्या परस्परीं आजी ४७
हें तत्व जाणसीं तूं मुद्रा त्याची तुझ्या हृदयपटलीं
वठली उत्तम मित्रा! मन्मनिं ही गोष्ट फार गा पटली ४८
समजो सर्वांना हें मग उमजोनी अपाप अनुसरती
राष्ट्रहिताचा सत्पथ दुःखें त्यांचीं अपाप मग सरती ४९
ज्याची चुकी तयाला समजुनि तो जी सुधारणा करिल
ती तन्मनांत तैशी तत्कालिं ही खोलमूळ गा धरिल ५०
एकपरी वाटे मज यवनानय आपणांस शिक्षकसा
एवं वारिलचि लावुनि सत्याचा तो सदैव पक्ष कसा ५१

मानुं नको खेदास प्रभुचे सुकृती सदा सखे दास
प्रभुचा झाला दास त्रिकाल परदास्य त्या न ये खास ५२

जें तृण मत्त गजाचें भक्ष असे तेंच दोर गा त्याचे
वळतां बांधी त्यातें बळ इतुकें या जगांत ऐक्याचें ५३

लुंगी मुंगी जंगी सर्पातें धाडि मृत्युच्या रंगीं
मिळती कोट्यावधि हे एकीचें फळ न कोण गाय महें ५४

धर्मावनरत पांचा झाला उपयोग ऐक्यसुतपांचा
कौरवशतास परिभव रौरवसह देति तरति उपरिभव ५५

मिळवील निरवकाशा स्वैक्यांत कशीं स्थळास लोकाशा
एका पाशें घट्ट प्रबद्ध सुत अग्निला करी गट्ट ५६

दृढनिश्चयरूपखतें पिकविति सत्कर्मरूप गा शेतें
चंचलवृत्ति सखे ते नाशितसे सर्वदा सुखाशेतें ५७

फार असें आभारी तव मी उपदेश मानसांत रुचे
वाटे वन मज गवसे तव रूपें मित्र आज सुरतरुचें ५८

सन्मित्रांचा लिहिला संवाद सुखास देइ जो महिला
घेवोत आर्य पहिला ऐक्याचा बोध हाच हेतु मला ५९

दुसरें निजधर्मरति स्वमनीं ठेवा; अपाय आरि मरती
दुःखाचे दिन सरती सर्व सुखें मग तुह्मास अनुसरती ६०

ईशपदीं भक्ति असो गुरुजनिं सन्मान नित्य हृदयिं वसो
उपदेश हा मनिं ठसो अधिक उण्याची क्षमा मुलास असो ६१

नारायण कृष्ण गद्रे.

## श्री शारदा.

श्लोक.

समर्था महीमंडलीं श्री खरी,
दुजा वस्तुला ये न तीची सरी !
जरी शारदा श्रेष्ठ आहे गुणीं
तरी श्रीहुनी मानिंजे ती उणी १
सदा श्रीस लाभे अरुद्धा गती,
सदा अग्र्य लाभे पद श्रीप्रती
परी शारदेला मिळेना स्थल,
तिचा सर्व ठायीं सदा हो छल २
घनें जो असे आढ्य तज्जल्पना
जनें भाविजेतात सत्कल्पना
जनीं शारदा पावते तुच्छाता
जरी तद्वचें पावनें तत्वता ३
धनें आढ्य तो कर्कशा गी वदे
तया मंजुतेचें जन श्रेय दे
जरी सूनृता गी वदे शारदा
तरी ती तिरस्कार पावे सदा ४
धनें आढ्य तो वक्रता आदरी
जनीं स्तोत्र " सारल्य त्यातें भरी "
विपर्यस्त सारल्य वा वक्रता
भरी विस्मयें मन्मना तत्वता ५
जयीं श्री समृद्धा तयांच्या गुणां
इयत्ता न ऐसें न वाटे कुणा ?

कुलीनत्व, पांडित्य, वेद, स्मृती
वसे शास्त्र विद्या तयासंगती ६
वदो श्री कुठेंही असत्या गिरा
तिची सत्यता शैलमूलास्थिरा
श्रुतीनें, स्मृतीनें विरुद्धा जरी
तरी श्रीगिरा मानिजेती खरी ७
नसें श्रीसमृद्धास लज्जालव
न पीडी तया दुःख पापोद्भव
जरी नग्न होऊन तो नाचला
तरी लोक वानी सदा त्याजला ८
जया श्री कृपादृष्टिनें पाहते
तयाचेकडे श्रेष्ठता वाहते
कितीही असो मूढ वा मूर्ख तो
जनीं आदरा होतसे पात्र तो ९
करी वास ऋद्धी जयाचे घरीं
तयाचे घरीं सिद्धि पाणी भरी
मनीं कोणताही धरो काम तो
बघों नित्य साफल्य तो पावतो १०
असे जो धनें आढ्य त्याच्या कृती
जना ऐकियेल्या करीती कृती
जरी सर्वसामान्य त्या तत्वता
तरी पावती त्या जनीं मान्यता ११
कृपादृष्टिनें श्री जयातें बघे
तयीं भात्रिजेतीं न लोकीं अघें

जरी तो करी घोर हत्या तरी
सदा कौतुकें लोक त्याचीं करी १२
धनाढ्याचिया दारुणा दुष्कृती
जना पुण्यशीलत्वजा वाटती
करो ब्रह्महत्या, पिओ वारुणी,
मना गर्ह्य तें कृत्य नाणी कुणी १३
पराची हरो स्त्री धनें आढ्य तो
जना क्षम्यसा तो सदा वाटतो
परस्वा हरो गर्ह्य मार्गें; तया
न कोणी सजे मर्त्य निंदावया १४
धनें आढ्य जो त्याचिया मत्सरा
चढाओढ हा शब्द लागे खरा
ह्मणे लोक " तो व्हावया स्वोन्नती--
झटे; वृत्ति त्याची प्रशस्या अती " १५
धनें आढ्य तो जारिणीपुत्रही
सुवंश्यत्व पावे; खरी गोष्ट ही
तयीं मित्रबीजत्व पावे लय;
नसे तीर्थतोयीं अवाला भय १६
धनें आढ्य तो गालि देई तरी
ह्मणे लोक " त्याच्या दया अंतरीं
तयाचा क्रुधा पाहिजे न स्थिरा,
उद्यां शांत होईल तो साजिरा " १७
धनें आढ्य इच्छी धना आणिका
अधाशीपणा दावितो तो निका

अधाशीपणा लोक त्याचा ह्मणे
असे दानकामें वृथा बोलणें १८

मदोन्माद उत्पन्न जी श्री करी
तदन्वेषणेच्छा नको अंतरीं
तुझा शांतिदा, कामदा, सौख्यदा
सदा तीच होईल हो शारदा १९

झटा मेळवूं शारदेची कृपा
करोनी उदंडा प्रयत्ना, तपा
तुह्मी सौख्य पावाल कीं थोरसें
न जें द्यावया श्री समर्था असे २०

बहू गांजिलों, नाडिलों ताडिलों,
धनाढ्या खलांहीं, उगा पीडिलों
तरी शारदेच्या कृपेनें मला
सुखाचा बरासा निधी लाधला २१

नको श्री पुरे शारदेची कृपा
उमासूनु टाकील मागें नृपा
शमा शारदा शुद्ध देई जया
तया श्रीकृपा पाहिजे कासया ? २२

श्रीशारदाकवन वामननन्दनास
विद्याधरास वितरो शम; नान्य आस
लोकांसही सुखद तें नववृत्तरम्य--
हो; तद्विचार न नवे, जरि वा अगम्य २३

——— विद्याधर वामन भिडे बी. ए.

## प्रदोषतारा.

पद ( चाल–रजनिनाथ हा नभीं० )

प्रणयतारका ! गगनललामा !
विरहाकुलजनसुखैकधामा ! धृ०
मंदपवनयुत मनोज्ञ काळीं
प्रदोषि पाटल वियति निशाळीं
राजसि रुचिरप्रकाशशाली
करिशी प्रमदा प्रदीप्तकामा. १

सागरतरंगतुषारशीतल
वीजित करि तो तुज मंदानिल
यशोगीत तव विहंग मंजुल
गाती सहर्ष, मंगलनामा ! २

आनंदप्रद तुझ्या दर्शनीं
करिती सुहास्य सुमनें भुवनीं
मधुर तयांचा सुगंध भरुनी
टाकी अवनिसि तेवीं व्योमा. ३

विजयध्वज तूं गमसी मजला
नाभिं उत्तुंगीं स्वयें रोंविला
मदनें, जिंकुनि चराचराला
दावाया निज विश्वा महिमा. ४

अस्तमानेंदिनकरसखया ! बा !
तारामंडळें तव अतुला भा
एकाळि वितरी दिव्यसांनिभां
जगिं ती प्रमोद–शांति–प्रेमां. ५

मदनप्रतिनिधिवैभवशाली !
अभ्युदयिं तव सुयोगकालीं
प्रियाऽलिंगनीं मरीचिमाली
होई सोत्सुक तशी त्रियामा. ६

दिनमणिरमणि संध्या स्वैरिणि
करी सुरक्ता पतिप्रयाणीं
ललित विलासा तुजसह गगनीं
जैसी परनरनिरता वामा. ७

वस्तुजात हें निखिलहि लोकीं
मग्न होतसे प्रणयविपाकीं,
प्रसन्न वदना तुज रजनीमुखिं
निरखुनि अंबरिं, हृदयारामा ! ८

प्रणयवती विरहाकुल युवती
प्रियकर—कंठालिंगनिं होती
अधीर अत्यंतचि, अभिसरती
मोदभरें संकेतस्थाना. ९

उपवनिं मंडित[1]सुमतरुपुंजीं
मुखरितमिलिंदमंजुलगुंजीं
कुसुमसुगंधित निभृत निकुंजीं
सकांत करिती विलास रामा. १०

मंगलतारावरावतंसा !
विलोकुनी तुज विकसितभासा

---

१ उपवनांचीं विशेषणें

दिवसवियोजित दयित निवासा
येती उत्कंठित विश्रामा. ११

आम्रमंजरी त्यजुनी मधुरा
मधुकर सेवी प्रणयिन्यधरा—
परतुनि कोकिल कुंजकुटीरा
कांता रमवी मनोभिरामा. १२

मराल कोमल मृणाल टाकुनी
तोषवि दयिता प्रत्यागमनीं—
सुचिरवियुक्ता ज्योत्स्नारमणी
आलिंगीं हिमकरा प्रसन्ना. १३

प्रणयी--जन--मधु--संगम--घटका !
मनोविकारां पातकात्मकां
हरुनी वर्षसि सौख्यदायिका
दिव्या प्रीती जगीं प्रकामा. १४

प्रणयवती मम दयिता ललना
निकटिं असे जैं सुहास्यवदना
दीर्घकाल करि नभीं विलसना
विनती तुज ही सह—प्रणामा ! १५

' इन्दु—कान्त. '

## मनोभृंग

श्लोक

मनोभृंगा ! माझ्या कवनकमळीं स्वैर विहरें;
तिथें आनंदाच्या अनुपम सुखा सेविं चिर रे !

कशा आधिव्याधी छळितिल तिथें सांग तुजला ?
जिथें ब्रह्मानंदामृतरस असे सर्व भरला ! ! १

कधीं शृंगाराच्या रसजलधिमाझारिं विहरें;
कधीं कारुण्याचा रव करुनि, भेदीं हृदय रे !
कधीं वीर-श्रीनें जड तनुंत तूं जीव भरवीं;
क्रमें घेई ऐशी नवरसचवी नित्य बरवी; २

अती दीना क्षांता हृदयविकला आर्यजननी
अहाहा ! आक्रंद गतविभवशोकें अनुदिनीं ! !
गड्या ! जाई तेथें गुणगुणत तूं; बोधवचनीं—
बुझावीं बा ! तीतें करुणरस गाळोनि नयनीं. ३

अगा ! जे जे गेले चतुरतर, गाजी, नरमणी;—
जयश्रीनादानें दुमदुमवुनी आर्यधरणी;
तयांची गावोनी सुरस चरितें प्रौढ वचनें—
मनोभृंगा ! जागीं करिं सतत गा ! बाधवमनें. ४

अनंताब्दें काळासह झगडुनी घोर समरीं,—
अभेद्यांगें ज्यांचीं सकल दिसती जर्जर पुरीं !
अशीं दुर्गस्थानें, नरवरयशःकीर्तिभुवनें,—
मनोभृंगा ! पूजीं सरस वचनें रम्य कवनें. ५

करोनी या कार्या, हृदयमधुपा ! स्वर्ग भुवनीं—
रमें आनंदानें सुरयुवतिशीं नंदनवनीं.
अनानंदाचा बा ! किमपि न तिथें लेश कसला.
मनोभृंगा ! माझा पुरविशिल कां हेतु असला ? ६

अनंत विठ्ठल चित्रे.

## भावगुप्तपंचक.

### श्लोक.

नीलेन्दीवरलोचनी विचरतां सद्विद्रुमोष्ठी वनीं
गाठोनी तिज एकली लुटियली ती तस्करीं भामिनी
नेलीं सर्वहि भूषणें न हरिला तत्रापि नासामणी !
याचें कारण काय तें झडकरी सांगा कवीलागुनी ?

" माते ! तूं दमलीस थांब करितों मी मन्थनातें अतां "
ऐसें बोलत कृष्ण तोंचि कमला झाली असूयारता !
होई वासुकि दीन ! देव सगळे आनन्दुनी पाहती !
याचें कारण काय तें झडकरी सांगा मला सम्प्रती ?

रामें मन्मथसुन्दरें धनुवरी जोडोनिया हा शर
ओढोनि श्रवणांन्त सोडुनि दिला वेगें कुरङ्गावर
तत्रापी भयविव्हला न हरिणी होतां बघे कौतुकें !
याचें कारण काय तें झडकरी सांगा कवीला निकें ?

कान्तें अम्बुज चुम्बितांचि तरुणी हासोनि होई दुरी !
लीलाकन्दुकिं रोपितां नख, कुचा लाजोनि झाकी करीं !
आलिङ्गी सुममालिका तंव अहा रोमांचिता होउनी
मीलदृष्टि वसे कशास्तव सखी ? सांगा कवीलागुनी !

जाया दुष्ट निशा कुणी विरहिणी घेवोनि वीणा करीं
गानारम्भ करी, मृगाङ्क परि तो पाहोनिया अम्बरीं
झाली हाय ! हताश यत्नविधुरा ! तें राहिलें गायन !
याचें कारण काय तें झडकरी सांगा कवीलागुन !

रेंदाळकर.

## कासार.

### श्लोक.

मधुम रम्य सरोवर भासतें !
मनहि होय चमत्कृतिमग्न तें !
कुशलता विधि सर्वहि आपुली--
वेंचितो गमतसेचि सरस्तलीं. १

वसन घे हिरवें वर हें सर;
खुलतसे जणुं शालु मनोहर !
वरि विकीर्ण सरोजसमूह हा;--
जणुं पटावरि रक्तफुलें पहा ! २

मनिं कुणी समजे जरि गालिचा;--
भ्रम पडेल न त्या मुळि वारिचा.
सहज इच्छि करूं जरि आसना;--
तरि फसेल तयीं नर केविं ना ! ३

सलिलजाल करी वश मानवा;
विषयजाळिं विलीन तसे न हा;
वरुनि सुंदर भोग्यहि वाटतें;
परि नरांस सदा फसवील तें ! ४

स्फटिकवर्ण कसा बसला बक ?
धरुनि मौन जणों शिवसाधक !
जलचराशन इच्छि निजांतरीं;
मन नसे वपु शुद्ध बरी जरी. ५

कुटिल चर्चितभस्म किती जनीं--
अजिन पात्रकमंडलु घेउनी,

मदनकोपमदान्वित हिंडती;
बहु नृशंस बकासम नांदती ! ६

पथिक पान करी उदकाशयीं;
तृषित तुष्ट मनीं कपिला पयीं;
महिष अश्व अजा खगही तसे—
सकळिकां सर हें जळ देतसे. ७

प्रियकराप्रति ने जल कामिनी;
करिन तुष्ट तया धरि हें मनीं;
विविधभाव धरूनिहि झटिती
जल; तयांस मुळीं न गमे क्षती. ८

मी दावितों आननिंच्या कलंका;—
तेव्हांच ना शीघ्र धुवून टाका.
आदर्श तूं लोकमतास जाण.
कीर्त्याननां स्वच्छ करीं बघून. ९

माझ्यामधें रश्मिस सूर्य सोडी;
सोडून देतों जनिं तो उजेडीं;
" लाधे जरी ज्ञान तुला सुदैवें;—
आनंद मानून जनांस द्यावें. " १०

त्र्यंबक जयराम प्रधान.

## कवीचें व राजाचें शयनमंदिर.

श्लोक.

एके दिनीं अति सकौतुक राजहर्म्यां
गेलों तिथें नृपतिवैभव पाहिलें म्यां

एके स्थलीं रजत--मंचक मांडियेला
अन्य स्थलीं कनक--मंचक दृश्य झाला १

त्यांच्यावरी मृदुतरा अति उच्च शय्या
होत्या किती पसरिल्या मज होति दृश्या
त्यातें तदा निजकरें हळु स्पर्श केला
तों तत्वतां कर मदीय विनिम्न झाला २

दीपावली सुरुचिरा रमणीय जेथ
विद्युत्प्रकाश धरुनी भरला तयांत
तेलें सुवासिक, सुगंधित द्रव्यभार
होते तसे कुसुमगुच्छ तिथें अपार ३

भित्तीवरी नयनसुंदर चित्रपंक्ती
होत्या जयें विकसती किति चित्तवृत्ती
ऐसें तदा शयनमंदिर त्या नृपाचें
म्यां देखिलें; उरत तेथ उणें कशाचें ? ४

निद्रा जरी शयन--मंदिरिं या अशाही
येई न ती नृपतिला तरि सौख्य नाहीं
ऐसा विचार सहसा शिरतां मनांत
अस्वस्थता कविमनीं पसरे क्षणांत ५

कोठें कवी वसनहीन; कुठें नृपाळ
सद्वैभवें वसनमंडित लोकपाळ !
यांची कशास तुलना कविनें करावी
खद्योतसूर्यतुलनीं मति हे धरावी ! ६

सत्ता कुठें नृपतिची ! पसरे अपार
आसिंधुनी पसरिली तिज नाहिं पार !

सत्ता--विहीन कवि सर्वपरी गमेल
सत्ता महा अखिल भूतिंहि चालवील ७

सत्ता स्वराष्ट्रिं धरितो नुसती नृपाळ
सर्वत्र तो कवि वरे कवनें रसाळ
सत्ता विशाळ कविची पसरे कुठेंही
साऱ्या जगांत, प्रकटे जगदांतरींही ८

भूमीवरीहि शयनास कवी करील
निद्रार्थ तो कधिंहि तें नभ आक्रमील
त्या अंतराळिं उडुनी जलदावरींही
निद्रा करील कवि सांद्र धुक्यावरींही ९

कार्पासराशिसम सिंधुतुनी उठून
जे वाहती प्रवह त्यावरती निजून
चंद्रप्रभेस चपलेसहि तो करील
शय्या तया द्युति--मया अति हर्षवील १०

ऐसें कथूं कितितरी शयनप्रकार
सत्काव्य-कामिनिसवें करि जो विहार
सृष्टी सृजे शयनमंदिर ज्या कवीचें
राहे अहा कुठुनि ऊन तिथें कशाचें ! ११

सृष्टी नभस्तलिं सुचित्रपटांस काढी
त्याहीं मनास कविच्या कविताहि ओढी
त्या तारका असति जेथिल रम्य दीप
सप्तर्षि, मंगल, गुरू, बुधही समीप १२

तेथें नृपालसदनीं स्तुतिपाठ होती
येथें कवीस कविता नवमंजु गीती

ती हर्षवी रुचिर नूपुर-सिंजितानें
तैसें विहंगम प्रभंजन मंजु-गानें १३

ऐसें जिथें शयन-मंदिर भूषवीलें
तेथें फिके नृपतिवैभव पूर्ण झालें
निद्रा सुखें निरवकाशिंहि ये कवीला
ती ये न त्या कनक--मंचकिंही नृपाला १४

किरात.

---

## काव्यस्फूर्ति.

( शार्दूलविक्रीडित. )

माकंदच्युतमंजरीपरिमला ने वायु चोहोंकडे
कोठें कोकिलमंजुल ध्वनि अहा ! कानीं मधूनी पडे,
डोले नूतन पल्लवा तरुतती उत्साह देई महा
होई काव्यरसीं निमग्न कवि हा ऐशा सुकालीं अहा ! १

हें आकाश निरभ्रनील विलसे, याच्यावरी तारका--
आहा ! तेजलवें प्रकाशति जनां आनंद देती निका;
ही ज्योत्स्नालहरीमधें बुडुनिया गेली पहा मेदिनी !
नांदे शान्ति चहूंकडे ! सुचत तैं गाणें कवीच्या मनीं ! २

प्रातःकाल असे रवी उगवुनी वेगें तमा निस्तरी
शोभे रागवती दिशा उगवती मोदा भरी अंतरीं;
सोडोनी परिरंभ--सौख्य उठती हे लोक सारे अतां,
संफुल्ला दिसते मही कवि तदा सेवी सुकाव्यामृता ! ३

पाहोनी प्रिय अंगना निज, कवी सानंद झाला मनीं
प्रेमानें पतिमानसा रिझविते ती सुंदरा कामिनी;

गाढालिंगनिं दंग होउनि अहा ! कांतावरी संमदा
होई स्फूर्ति कवीस काव्यरचनीं प्रेमातिभावीं तदा !

——————— वामन जनार्दन कुंटे.

## अन्योक्ति*.

श्लोक.

### चंद्र.

आहे निशाचर[1] तुझा पति; रोहिणी ! गे !
ऐशा निवार पतितें सखि ! दुर्निवार;
जाळींतुनी शिरुनिया मम गेहिं निल्य,—
स्पर्शी तनूस ! तुमचा कुलधर्म कां हा ? १

### मेघ.

गेलें मी जळुनी वसंतसमयीं पूर्वीच चूतांकुरें[2] !
दुष्टा गर्जुनि संप्रतीहि[3] जलदा ! आरंभिलें काय हें ?
झाली कान्तवियोगदुःखविधुरा क्षोमा[4] तनू ही ! तरी—
क्षारा टाकिति कां क्षतीं[5] मम ? जिची प्राणावशेषस्थिती !! २

### वीज

उत्साहें नववारिभारगुरु हे गर्जीत शद्वा घन;
वाहो वायु; करोत नृत्यहि शिखी आनंदुनी हे असें;
दीना कान्तवियोगदुःखजलधिक्षिप्ता मला देखुनी
विद्युत् ! स्त्री असुनी तरी स्फुरसि कां तूंही अशी निष्ठुरे ? ३

——————— नारायण महादेव भिडे

---

* कोणी विरहिणी म्हणते. १ रात्रीं फिरणारा, चोर. २ मोहरानें. ३ वर्षाकालीं. ४ कृश्य. ५ जखमेस.

# काव्यरत्नावली.

अंक १० वा.

## महाराष्ट्रमहोदयकाव्य.

अध्याय ९ वा.*

आर्या.

मित्रासह धर्म निघे शंभुमहादेवदर्शना जाया
यन्नाम आवडी ती घेवोनी आपुली सवें जाया १
मालोजीची त्याची वाटे जोडीच कर्मधर्मांची
भक्तिश्रद्धा यांची दिसली तैशी तदीय रामांची २
सहभक्तिधर्मकर्में श्रद्धेसहित प्रयाण मागेंही
न करावें तर कोणीं ? श्रीगोंधा सर्व चालली हो ही ३
श्रीगोंदे श्री गोंदे नाम जयाचें ल्लाटिं विसरोन
यास्तव ऐसें होतें गांव तुह्मीही तयास द्या मान ४
गोविंद नांव ज्याचें झाला चांभार साधु त्या गांवीं
त्याची सुरीति पाहुनि निंदा आपाप सर्व लाजावी ५
श्रीमंतशेषशायी ज्या पुंडे आडनांव धनिकवर
तेथें राहत होता माझ्या मित्र जो असे फार ६
वाटेनें जाताना मालोजीला कथी सखा धर्म
गोष्टी कांहीं श्रवतां देतिल सर्वांस फार ज्या शर्म ७

---

* गेल्या ९ व्या अंकांत ह्या काव्याचा ८ वा अध्याय आला आहे.

माळला धर्म कथी सुकथा निष्पाप भरत भावाची
ज्याच्या बंधुप्रीतिस सम न असे आज एक भावाची ८
लक्ष्मण रामाज्ञारत भरताज्ञारत रिपुघ्नही होता
चौघे एक विचारें यापरि ह्मणुनी यशाब्धि ये हाता ९
तिकडे रावण भांडे निजबंधूशीं ह्मणून बुडला हो
सर्वा सिद्धी असुनी सहाय घडला न त्यास जय लाहो १०
सांगे तैशी निर्मल मित्रत्वाची कथा जटायूची
मित्राच्या कार्यार्थ त्यजी तसे आप्त जो निजायूची ११
समशीलव्यसनांची मैत्री सांगे कुजेश सुग्रीव
यांची जिनें सुकर तें जिंकण्याचें कर्म हो दशग्रीव १२
ऐक्याभावें झाला वालीचा नाश दाशरथिहस्तीं
तैशीच रावणाची जिरली त्यानेंच सर्व गा मस्ती १३
जयचंद पृथ्विराजा ऐक्याभावेंच होय गा नाश
एकींत शक्ति राहे बेकीनें होय शक्तिचा रोष १४
स्वहिताची इच्छा ज्या एकीवांचून त्या न साधन रे
अन्य जगीं साधाया तें ध्यावा हाच यांत बोध नरें १५
येइ न राखूं ज्यातें निजबंधूशींहि ऐक्य तो काय
खर्चुनिही देशैक्या करण्या होईल शक्त गा काय १६
यास्तव बंधुप्रीतिच होय अधिष्टान सर्व शर्मातें
तीवांचून नराच्या वैफल्य असेच सर्व कर्मातें १७
यापरि बोलत आले श्रीगोंद्या मित्र शेषशायीचे
नयतीनें केलेले दास परी ने हमामशाईचे १८
धर्मार्जुनभेटीचा लाभचि हा आज शेषशाईला
न लिहूं शकेल मह तो आब्धीच्या करुन शेषशाईला १९
कळतां वृत्त ह्मणी ये आणाया मित्रराज समोरा

आनंद त्यास झाला मेघाच्या दर्शनें जसा मोरा २०
स्वातिरसाचे वळले मेघ जसे चातकावरी मानी
आले मित्र घरा हे यत्संगतिचा न कोण अभिमानी २१
अतिथी साधारणही यद्गृहिं पावे सुखा असामान्य
काय कमी यद्गृहिं हो येतां हा पाहुणा असा मान्य २२
सहभक्तिधर्मकर्मश्रद्धा हें पाहणें यदागारा
हो एकशेषशायी ऐसा तत्कीर्ति काय बारि दुसरा २३
आनंदानें सारुनि वर्णाश्रमयोग्यकर्मधर्मातें
कारिती भोजन सारे देवुनि मुख्यासनास धर्मातें २४
पुसती भोजन झाल्यावर मग वृत्तान्त एकमेकांचा
यवनांच्या ते सारे विटले तद्वचि असें गमे काचा २५
धर्मास शेषशायी बोले हरितिल कदा धना माझ्या
न कळे मज यवनासुर अनयचि आधार ज्यांचिया राज्या २६
चंचल धन आधींची त्यांत तया यवनराज्य सामील
जाराचें साह्य कसें जारिणिला एक जागिं ठेवील २७
नित्य नव्या युक्तीनें यवना या दूर राखतां मजला
झालें पुरें पुरेंसें बंधच्युत आडवील कोण जला २८
धर्म ह्मणे चंचल ही लक्ष्मी परि ईस आवडे भर्ता
दाता जो गरिबातें सत्कर्मीं व्यय तिचा सदा कर्ता २९
अन्यायार्जित जरि ती पळेल तरिची रमा नया वरिते
प्रेमानें त्यासाठीं सत्कीर्तीला स्वदास्य ती देते ३०
निजवर्णाश्रमधर्मा पाळुनि जी मिळविली रमा जाया
तीस न चोर कधीं नें शिकवी नच ती कधींहि माजाया ३१
निजधर्मरता तुजला ती कां सोडिल न भी मनीं मानीं
सुज्ञीं न धनीं धावें मन चालावें स्वकर्म नियमांनीं ३२

करुन समाधान असें धर्में तो धनिक फार तोषविला
धर्मार्थकाममोक्षद वचनामृत भोजनाम बैसविला ३३

---

## अध्याय १० वा.

### आर्या.

लाल दिशा अरुण करी तरुणीतें सारि दूर तरुण करीं
निद्रा त्यजुनि क्षिप्र स्नाना गंगेस जाय तो विप्र १
कोकिल सुस्वर गाती वाटे रविच्या स्तुतीस करिताती
चिमण्या चिव् चिव् करिती घुबडें वृक्षास घट्ट तीं धरिती २
नक्षत्रें विलयातें जातीं येतांच मित्र उदयातें
पक्षी त्या समयातें गाउनि त्या तान देति सदयातें ३
कामी विरहें रडती त्यांतचि परि चक्रवाक बहु हसती
चंडोल डोलुं लागे पत्निस सांगे स्वमित्र आला गे ४
पावति विकास कमळें शोभति दवबिंदुरत्न सिंधु मळें
तेज शशीचें सगळें पिउनि बने शुभ्र अभ्र जें काळें ५
झालें जागें सारें जग परि निद्रेस बाहिलें चोरें
आनंद होय पुरतां सर्वां तम परि मेरे मनीं झुरतां ६
ऐशा प्रभातसमयीं कुणास वाटेल वाट कष्टमयी
शिवदर्शन यद्हृदयीं दिपेश ये पायथ्यास रव्युदयीं ७
धर्म ह्मणे बध मित्रा लाजति वाटे वनस्पती रविला
चंद्रकरालिंगन या ह्मणुनी त्यजिती दिसे असें कविला ८
केली पतिशीं करुनी शिवगर्भा या थकोनिया गेल्या
दवघर्मबिंदुनीं गा झाल्या यांच्या वपू बघे ओल्या
सुकवी वस्त्रें यांची स्वकरें रवि तोहि यांस सन्मित्र
सुमनाविकासामिषानें करिती या त्या स्वतोष सत्पात्र १०

श्रीमंत शेषशाई ! मित्र कसा हा क्षणांत या भुवनीं
स्वकरें सुवर्ण फेंकी कां न अशा स्थल मिळो जगत्स्तवनीं ११
ऐशा प्रतापशाली पात्र विशेषण न दीन मानव हा
पात्र तया हें कळुनी मग कां भारास फुकट मान वहा १२
त्या सुकुमलतामध्यें मित्र स्वकरें सरास दावि पहा
कीं योग्य वेळिं येथें निजकर्मा आचरां असें कथि हा १३
यापरि बोलत गेले पुण्यजलामृतसरोवरानिकट
सर्व महाराष्ट्रमहोदयपर्वस्नानलोभधारि भट १४
तेथें स्नानादिक ते करिती भावें दयाघना स्मरुनी
ह्मणती मीन सरीं या होउन यावें वसावया मरुनी १५
मंदसुगंधितवायू कुसुमलतांचे कटाक्ष निष्कपट
यांतें पात्र सरोवर करितें हें मानवांस सरसकट १६
सुमभारें लवलेल्या वेली जणुं जोधिंच्या मना युवती
गमती शिथिलादर ज्या न कधीं कोणाकडेच कीं बघती १७
रविकरसुवर्णरंगित उठती अनिलें सरोजलीं लहरी
पाहुन कुतुहल आठवि मन विधिजन्मदसरोजलील हरी १८
सारुनि संध्यावंदन ऐशा सुंदर सरोवरतटाकीं
वंदुन गिरिला लागति त्यावर चढण्यास सर्व तीं नेटीं १९
शिवनामघोषवदनें जातां जातां करीत ते चढले
प्रहर दिवसास सारा चढुनी गिरिते शिरावरी गेले २०
भूलीवंदन करुनी घेती विश्राम सर्व नंतर ते
शंभुमहादेवाचे भक्त शिरोमणि जया न अघ शिवतें २१
पूजिति कान्तेसह मग गिरिजामाता द्विजोक्त रीतीनें
संपूर्ण कर्म व्हाया द्विजसंतर्पण करून पक्वान्नें २२
विप्रांस हेमदानें निजसामर्थ्यानुसार भक्तमणी

तर्पिति सुवासिनींतें तैशा त्यांच्या दिपादिकारमणी २३
इच्छाभोजन घाली मालोजी सर्व साधुसंताना
दे वस्त्रपात्र दीना वाटे कीं लाजवीच संताना २४
आशीर्वादा देती "पात्र असो जी सुकीर्ति संताना
हा" ऐशा सगळे त्या गाती तन्नाम मारुनी ताना २५
कारितीं दोघें स्तव तीं कुलदेवाचे सुतार्थ युवयुवती
इच्छा नव दंपत्या आपत्यावांचुनी न या जगती २६
मातेपाशीं घेण्या आळातें केविं वत्स लाजावें
तुजवांचुन मागाया आह्मी कोणास वत्सला ! जावें २७
कुलदीपपुत्र देवा द्यावा पावुन दयाब्धि नवसा या
नाहीं दुसरी इच्छा असुतपित्यास्थान नाकिं न वसाया २८

नारायण कृष्ण गद्रे.

## वसईचा वेढा.

श्लोक.

सत्राशें वर तीस आणिक नऊ ख्रिस्तीं शकीं घातला--
वेढा जो वसईस थोर; बुधिं तो आहे बहू वानिला.
आप्पा ज्या चिमणाजिला ह्मणति तो भ्राता असे बाजिचा,
योद्धा तोचि पराक्रमी समरिं ह्या, ने गर्व जो शत्रुचा. १

लोकांतें अति पोर्तुगीज मनुजें जेव्हां करीं पीडिलें;
प्राणाहूनिहि आवडे बहु अशा धर्मासही हारिलें;
अप्पानें मनिं निश्चया करुनियां, तेव्हा चमू घेतली;--
आला शत्रु हरावया निजभुजें योद्धा रणाच्या तळीं. २

झाले ते भयभीत पाहुनि तया, किल्ला तधीं गांठला;
आहे जो त्रिदिशीं भयंकर अशा रत्नाकरें वेष्टिला.

केला आश्रय पोर्तुगीज अरिंनीं त्या थोर कोटा; असें—
पाहूनी, चिमणाजि तो वदतसे आतां करावें कसें ? ३
मान्याला उरली अह्मांस अवघी बाजू अतां एकच;
येऊनी समरा समोर, अरि हा खाइल कैसा कच ?
बाजूनें चवथ्या सदोदित रिपू वर्षात्र अग्नी करी;
शूरांनो? अरि गांठिजे तरि कसा? सैन्यास पृच्छा करी ४
हल्ले कैक करून थोर थकले ! कांहीं न हो ! फायदा.
दावी बाहुबलास वीर जरिही मोठ्या मराठा तदा;
केले आजवरी कितीक निकरीं युद्धीं रिपू जर्जर !
चाले यत्न इथें मुळीं न परि त्या कैसा अरातीवर ? ५
आप्पा मानसिं लाजला बहु जसें तोयीं बिरे ढेंकुळ !
हल्ले सर्वहि घोर तो करुनिया शत्रू करी व्याकुळ
चिंतेनें सरदार अन्य अपुले केले तसे भाजन;
' शत्रुकुञ्जरकेसरी ' मिळविली ऐशी उरे कीर्ति न ६
आप्पा एकदिनीं सखेद बसला तंबूंत होतां जधीं,—
झाली गोष्ट अपूर्व एक कथितों ती मी तुह्माला अधीं.
होती जात पळून शत्रुयुवती गोव्यास नाकेंतुन;
तीतें बद्ध करून सैनिक करी कोणी उभी आणुन. ७
ठेवावी सुचवीति लोक इजला बंदींत घालुनियां;
तेव्हां होइल पोर्तुगीज वश तो; हीशीं न दावा दया.
नीतीचा निधि जो तयाप्रति रुचे आप्पास कां बोध हा ?
बोले तो वच शत्रुदारहरणें अन्याय होतो पहा. ८
द्यावी पाठवुनी हिला परत हो ! स्वालंकृता मागुती;
द्यावीं सुंदर मूल्यवान वसनें आहेर साध्वीप्रती.

आज्ञा नायक दे तसेंच करणें तें प्राप्त सेनाजनीं;
थाटानें मग मागुतीं दवडिली ती शत्रुची कामिनी. ९

जातां आंत सती अशी कुशल ती, नाथा कथी सर्वही--
वृत्तांता; वदली असा अरि कधीं देखें न मी एकही!
नाथा! युद्ध नका करूं; न मिळणें तुह्मां कदाही जय;
त्याहूनी तह मांडिला तरि बरा. मानी न तो हा नय! १०

“ झाला फारच काल! या लवकरी.” संदेश ये बाजिचा;
“ वेढ्याचा अझुनी निकाल न कसा?” रस्ता धरा मागचा.
“ आला सैन्य अफाट घेवुन वरी दिल्लीस नादिर्शहा;”
“ जातों तेथ; मिळा ससैन्य मजला; काढूं चला त्या शहा.” ११

आप्पाला पडला विचार, करणें आतां कसें संकटीं?
गेला काल निरर्थ! वित्तहि तसें! कीर्ती वरी गोमटी!!
याला काय उपाय? बंधु मजला हांसेल पाहूनियां!
“ किल्लाही सर जाहला न लढुनी!” बोलेल “ आलेत! या!!” १२

केला निश्चय एक सत्वर मनीं, बोलाविलें नंतर--
सर्वां वीरजना; ह्मणे “ लढुनियां किल्ला न झाला सर!
इच्छा तों मम जिंकणें बहुत तो, ती राहते शूर हो!
तोफेनें उडवा त्वरें शिरचि हें इच्छा अशी पूर्ण हो.” १३

खंडूजी अडनांव माणकर ह्या शब्दीं मनीं तापला;
योद्धा तो सरदार शूर सकलीं आदित्यसा भासला!
बोले शेवटचा करूंच निकरें मारा पुनः एकदां;
नेटानें बहु घेउं कोट; अथवा जाऊं कृतांतास्पदा. १४

वीरश्री चढली अशा परिसतां बोला रणीं सैनिकीं;
केला मार्ग सुरंग लावुनि तदा प्राकारिं बांरादिकीं.

होतां आंत सुख प्रवेश, धरुनी खड्गें रिपू कापिला;
केलें जर्जर त्यास देहरुधिरें त्यांच्या सडा शिंपिला ! १५

होई असें सार्थक त्या श्रमाचें;
आनंदरत्नाकरिं सैन्य नाचे.
लाधे असा तो वसईत किल्ला;
जो पोर्तुगीजें तर्यि बांधवीला. १६

——————— त्र्यंबक जयराम प्रधान.

## बाळ प्रभु चिटणीस.

( संभाजीनें जिवें मारण्याचा हुकूम केल्यानंतर )

श्लोक.

कशी केली झाली शिव ! शिव ! हरे भक्ति विफल !
कसें देवा तीतें परम कटु येई विष फल ! !
कृपा केली, ठेवी शिवनृप मला सेवक तदा;
करीं मीही सेवा नृपजनपदीं; भोगिं विपदा. १

प्रयत्नातें आलें विमल यशही सत्वर निकें—
शिवाजीसूर्याचा असिकिरण नाशी अरिधुकें.
महासामर्थ्यानें भरतजननी मुक्त करि तो;
मला तत्सान्निध्यें धवलयशपुण्यांश वरितो. २

स्वधर्मा रक्षावें ह्मणुन करिं घे जो स्वशिरही;
‘ विधर्मी येऊनी करु न कधिं ही शासित मही; ’
अशी इच्छा ज्याची करुणघन तो भूपति शिव—
मला शब्दें एका न कधिं वदला हो ! कटु रव ३

परी दुर्दैवानें प्रखरतरशा ह्या मजवरी,—
प्रसंगा लोटूनी निजपरुषता दाविलि खरी
जिवें मारायाचा हुकुम सुटला भूपतिकरीं !
नसे अन्या कांहीं गति मज अतां श्रीपति ! हरी ! ४

न वंशज्येष्ठाचा स्मृतिविसर मातें मुळिं घडे;
तया राज्या द्यावें मति न दुसरी भाषणिं पडे.
न केव्हांही सत्या कुमतिवश होऊन टळलों
असद्गामी कां मी जगतिं तरिही आज ठरलों ! ! ५

नृपा बंधीं टाका कुवच असलें ये न वदनीं;
न वा लेखा ऐशा निज करिं दिलें सत्य लिहुनी
खरें होई जिव्हा तरिच शतधा ही मम झडो !
गळोनी हे हस्त, प्रिय परम देहीं कृमि पडो ! ! ६

न वाटे मृत्यूची, परि अपयशाची क्षिति मला !
न डागातें ऐशा मम दुरित लावो निजकुला !
न त्या लोकीं माझें अजवरि कधीं शील मळलें !
तयालागीं आतां ह्मणति जन तें शुद्ध ढळलें ! ! ७

कसें संभाजीचे खलफणधरीं श्रोत्र भरिले ?
तयापाशीं खोट्या कपटवचना कोण वदले ?
कुणी तो क्रोधाग्नि क्षितिपतिमनीं हो ! शिरविला ?
कराया मद्देहा विमलतर जो भस्म सजला ! ! ८

स्वदेशासाठींही वपु झिजविलीं मीं अजवरी;
न राजद्रोहाचें तिळभरिहि ये पातक शिरीं.
असूनीही मारी आजि निरपराधी नृप मला
कसा दुष्टांच्या तो कपटवचनीं हाय रमला ! ! ९

मला हत्तीपायीं मरण दिधलें भूपतिवरें !
करीं दीर्घायू त्या प्रभुस विनवीं मी निजकरें.
प्रभो त्यातें देईं यवनहनना शक्ति अतुल;
तया हातें होवो भरतजननी कीर्ति धवल

— — —— त्र्यंबक जयराम प्रधान

## दुर्जनोपकार.

आर्या.

उपकारी जगतीं या न खळासम अन्य कोणि मज दिसतो.
क्लेशापमानपापा साहुनि सज्जन—गुणांस वाढवि तो. १
कैकेया न वनाला धाडिति तरि राम देव कां होता ?
आद्यकवि न रामायण रचुनी—वाल्मीकि, तद्गुणां गाता. २
जरि सार्वभौम होता जिंकवतें त्यास काय काळातें ?
इतिहासाभावीं तन्नाम गमे लाधतें न कर्णातें. ३
जरि चोरितां न सीता—देवीला दुष्ट रावण वनांत;
पातिव्रत्याची ती होती का देवता त्रिभुवनांत ? ४
कोणी पांडव केले विख्यात जगीं सुयोधनाविण ते ?
होते शतपट सुगुणी शूर, तरि न भारतीं अमर हो ते. ५
साध्वी द्रुपद—सुतेची विडंबना धार्तराष्ट्र ना करिते,
सतिसमान होतें कृष्णेचें नांव काय भारतिं तें ? ६
विश्वामित्रें छळिलें नसतें नृप—रत्न तें हरिश्चन्द्र[1];
" धर्माहुनि शांत नृप न " गर्व असा वाहता न का चन्द्र[2] ७

---

१ रामचंद्रास २ धर्म हा चद्रवंशांतील राजा. हरिश्चंद्राचा छळ झाला नसता तर त्याची शांतता कळतांना. व हा प्रसंग न घडता तर धर्माहून शांत दुसरा कोणी नाहींच असा गर्व चंद्र वहाता.

दुर्वासानें छळिलें नसतें राजर्षि अंबरीषाला;
कविवर्य काय गाते मोरोपंतादि तच्चरित्राला ? ८
सापत्न--जननि राजांकावरुनि न सारिती पद--तलानें;
अचल--स्थल ध्रुवातें गगनीं मिळतें न राज--राज्यानें. ९
करितां हिरण्यकशिपु द्वेष न, मारावया श्रमा करितां;
प्रऱ्हाद भक्त--वीर न होता, अजहि न नृसिंहता धरितां. १०
मेले शत पुत्र तरि न ढळला सत्त्वास, सर्व छळ केला--
सहन वसिष्ठें गाधिज--मुनिचा; तेणें सुरादिकीं स्तविला. ११
किति सार्वभौम, गुणवान्, शूर नृपहि नामहीन काळानें
केले ! परि प्रतापचि अजरामर नित्य यवन--छलनानें ! ! १२
सोडोनि क्रूर--दहन--व्यापार ज्वलनें शांत जरि होता;
उलना--अलीकें--तलिं का वास सुवर्णा करावया मिळता ? १३
जरि तीक्ष्ण सूचिका नच मौक्तिक--हृदयांतरास भेदिति तीं;
वरवर्णिनी--कुच--तटीं तरि काय तयास लाधती वसतीं ? १४
पाहुनि दारिद्र्याचें दुःख, भजति सर्व लोक लक्ष्मीला
दारिद्र्याविण जगतीं पावति लक्ष्मीहि काय नामाला ? १५
नसते दुर्गुण लोकीं तरि सद्गुण मान पावते काय ?
मृत्युच नसता, तरि मग अमृतास न चोरिते अमर--काय १६
दुर्जन निकष--ग्रांवे, साधूला लाविती कसाला ते;
न कसास लाविल्याविण धरिती ज्ञाते शिरीं सुवर्णातें. १७

——————

भामा--सुत.

१ मारावयास उद्युक्त न होता. २ प्रतापसिंह. ३ अग्नि. ४ कपाळ. ५ सुंदर स्त्री. ६ देव. ७ कसोटीचा दगड.

## माझा एक अनुभव.

आर्या.

गेलों एके दिवशीं सहल कराया बराच मी दूर;
सहज पडे मत्कर्णीं कोमल अस्पष्ट पक्षिगणसूर. १
जाउनि पुढतीं पाहें, एक दिसे बाग तोंच धनिकाचा;
' रम्योद्यान ' असे त्या नाम, बने प्रीतिहेतु रसिकाचा. २
शिरतां आंत क्षणीं मी, झालों विस्मित बघून अति थोर—
वृक्ष तशीं फुलझाडें; दाटे आनंद मन्मनीं फार. ३
वाहे मध्यतडागीं मधुर तसें स्वच्छ नीर मंद सदा;
नूतन हरित तृणानें भासे जणुं गालिचाच तेथ तदा ४
शुककोकिल पिकशब्द श्रुतिहारी दे मनास आनंद;
इतर विहरती, रमती, बालासह खेळती विहगवृंद. ५
असतां इकडे तिकडे हिंडत दिसले अनेक वृक्षवर,
अंबा, दाडिम, जांबू, पेरु, तथा नारळीहि अति थोर ६
स्वच्छंदानें फिरतां, जाय सहज दृष्टि आम्रतरुवरती;
शाखाहस्त पसरुनी डोले जो होय उल्लासित चित्तीं. ७
पर्णान्तास्थित दिसलें पोळें मधुपूर्ण कृष्ण त्यावरती.
इच्छालहरि कुणाच्या मजसम पाहूनि तें न भरभरती ? ८
गेलों द्रुत तें घ्याया; मारीं मी एकदोन मधुमाशा;
तळमळती भूमीवर ! इतर उडाल्या त्यजूनिया आशा. ९
धडपडती, पडती, त्या माशा धरणीवरी पुन्हा उठती,
फडफडती बहु पक्षें, यत्नें निजजीवरक्षणीं झटती. १०
पाहुनि त्यांची तळमळ, निष्ठुर मी, परि उठे दया—लाट
हृदयीं माझ्या, तेणें नयनांतुनि अश्रु काढिती वाट ११

स्तब्ध उभा राहें मी, क्षणभर होई विचारशून्य मन !
दाटे कंठ बहु तदा केलें मीं व्यर्थ व्यर्थ तद्दमन ! ! १२
सर्व विचार पळाले मधुपोळाचे मनांतुनी पार !
अस्वस्थ चित्त होता चिंती प्रियवस्तुही कवण फार ? १३
दु:खान्वित झालों मी, शिरता सहसा विचार हा स्वमनीं.
'धिक् ! धिक् ! त्या दुष्ट मला' ! ! दुखवी जो बहु निरागसा करणी १४
'सांठविलें मधु ज्यानीं नवकुसुमांतिल न मानुनी कष्ट
'हा ! हाय ! हाय ! आह्मी छळितों त्यांना अकारणचि दुष्ट १५
'श्रमलब्ध वस्तु घेणें दुसऱ्याची हा नसे बरा न्याय
'कष्टविणें अबलांना मानिति बुधजन न काय अन्याय ?" १६
ऐशी विचार--माला उठली, मनिं तों विवेक उद्भवला;
टाकुनि मधुपोळातें, त्वरित निघे जावयास गेहाला. १७
कथिली स्वानुभवाची रम्य कथा; ती मनीं सदा राहो.
कवि 'नारायण' इच्छी निवडा यांतील मात्र सारा हो ! १८

——————— नारायण महादेव भिडे.

## कोकिलान्योक्ति.

गीति.

माधुर्य कोकिला तव वाणीचें सहज भासतें न मला;
त्यां लाधतांचि, पक्षा ! त्यागिसि कीं पोसिलें जिहीं तुजला ! १
माकंद--तरुशिरावरि 'बसणारे विहग ते किती असतां;'
आस्वाद मंजरीचा समजे परि एक कोकिला जगतीं. २
हे ! बालकोकिला ! तूं लीलेनें चिर बसोनि सहकार--
वृक्षीं, न लाजसी ! कां त्यागुनि त्या आजि सेविसी इतर ? ३
कलकंठा ! तव वाणी होई मञ्जुल, बसोनि सहकारीं;

होईल काय तेवीं खदिरपलाशावरी मनिं विचारीं ४
कर कोकिला! पुरे तव कल आलापांस; काय सहकार
शोधिसि? भात्यांत भरुनि शर संधा संचरे स–धनु शबर ५
स्मरसी न काममंदिरि जें त्वां उपभोगिले परभृता! तें.
सहकार कुसुमसमयीं; आतां कां कारिसि थोर रावातें! ६
धरिं मौन कोकिला! जों जलधरसमयीं असे मही लोला;
कुटज कदंब विकसतां, वक्ते होतां न भेक समय तुला. ७

भामासुत.

## आदर्श.

श्लोक.

गेलों स्वताचें मुख पाहण्यातें,
आदर्श लागे तंव बोलण्यातें.
निर्जीव मी तों जरि भासतो रे!
ऐकें तुला ह्वद्गत सांगतों रे! १

माझ्याविणें कामिनिचें न चाले;
आहे जणो जीवित मीच बाले;–
शृंगार ती सांग कसा करील?
मातें जरी ना जवळीं धरील. २

माझ्यामधें पाहुन गंध लावी;
माथां शिरोभूषण तेंवि ठेवी;
तो स्वच्छ तैसा करि आननाला;
आशा मदीया बहु रे! युव्याला. ३

पाहूनियां तें प्रतिबिंब आंत,
तोका गमे मोद बहू मनांत;

नाचे उडे खेळ करी तयाशीं;
आक्रंदतो दूर जरी करीशी.
स्वीकारितो वृद्ध मला अगारीं;
झाली तयी ये मनिं वृद्ध भारी !
पाहून केशीं बकशुभ्रता ते,--
लावी मिशीला कळपास हातें.

कन्यांहि देती मज आदराला.
सासू न दे कां मज जांवयाला ?
शृंगारसाहित्य मिळे सुनेला;
कोणी चुके ना तयिं आरशाला

मी शोभवीतों बघ थोर हर्म्य;
माझ्याविणें ते दिसती न रम्य;
श्रृंगारलोभी गृह भूषवीतों;
मानास आधीं मज फार दे तो.

जेव्हां कधीं मंगल होय धामीं;--
आरासभावें मज न्याच तुह्मी;--
शोभा किती ये तयिं मंडपाला !
आनंद नोहे नसतां जनाला !

कुजन हा दिसतो नच पात्रसा;
ह्मणुनि मानसिं ये न, न द्या रसा;
विगतवारि तरी वितरी घन;
परहितव्रत देइ जसा धन.

सुमनभाजन नेइं; कृपाजल--
[illegible] चूर्ण जना ! तुज केवळ.

सर, तसाच असे हारि तो नरा !
अधिक एक न कोश कधीं पुरा. १०

———— त्र्यंबक जयराम प्रधान.

## स्वप्नांत पाहिलेलें शारदामंदिर.

श्लोक.

होतों जात कुठें स्मृती न मजला त्याची असे कांहिही
वीथ्या होति विशाल विस्तृत अशी; तेथें नसे कोणिही
दोहीं बाजुस वृक्ष रम्य सुरुचे जाती नभीं उंचसे
दीपस्तंभ तसे सुदिव्य जळती तेजें तडिद्दीपसे १

गोलाकार सुखंडमंडल-तती स्तंभावरी त्या उभ्या
भासे इंद्रधनुष्यपंक्ति रचिल्या स्तंभावरी काय त्या
वेळा शांत, तयांत रम्य धवला ती चंद्रिका मौक्तिका
वाटे मौक्तिकहार काय रचिते त्या तोरणां कौतुका २

ऐसें वैभव हें पहात हळु मी गेलों पथांतूनि त्या
तो तेथें मज एक रम्य नगरी दृष्टीं पडे तत्वता
होती रम्य सुमंदिरें रचियलीं गच्चया तयांचे वरी
ज्या होत्या स्फटिकेंचि सर्व खचिल्या, गेल्या नभाभीतरीं ३

त्यामध्यें नवकौमुदी प्रकटली, तारादि त्या बिंबल्या
वाटे रत्ननिधी, हरिन्मणि तती, कीं येथ कोंदाटल्या
भित्ती स्वर्णमयी तयावरि रुची त्या चंद्रिकेची पडे
तों त्या टाकिति दिव्यभा उलट ती, जी जात चोंहीकडे ४

जेथें देखिलि सप्तभूमिक गृहें उत्तुंग ज्या गोपुरें
नेत्रातें फिरवूनिया वरि तदा मी पाहिलें आदरें

तों व्योमीं मज दिव्यशी सुरुचिरा चंद्रावली दीसली
तीतें पाहुनि जाहलों चकित मी तैं मन्मती गुंगली ५
आलों कोणिकडे ? कसा ? नगरि ही रम्या कुणाची असे ?
तारामंडल कोठचें दिसतसे ? हे चंद्र येथें तसे
आले कोठुनि दिव्य ? इंद्रधनुचीं हीं तोरणें कोठलीं ?
मुक्ताहार तयांस कोणि ग्रथिले ? ही तेंवि दीपावली ? ६
झालों भ्रांत विचार सर्व विलया गेले मती कुंठली
आश्चर्यांत निमग्न पूर्ण मन हो, वृत्तीहि आनंदली
आला एक विचार अंतरिं तदा प्रेरी मनीं कौतुका
जाण्या हर्म्यतलावरी रुचिर त्या, ती पाहण्या चंद्रिका ७
मी जों पाउल टाकलें सुभवनद्वारीं वरी जावया
तों तेथें मज द्वारपाळ दिसले भव्याकृती; त्यांचिया
मुद्रेतें बघतांच अंतर भयें संप्राप्त तैं जाहलें
झालों भीतिवशें विकुंठित गती मन्नेत्र ही झांकले ८
" हां हां जाशि कुठें, शठा अधमता स्वीकारिशी कां अशी ?
" राहे द्वारिं उभा, तुझ्या हृदिं मुळीं ती ये न शंका कशी ?
" निःशंका परि मंदिरीं घुस शि कां ? मज्जाव सर्वांस ही
" आहे येथ ! " ह्मणोनि दंड हपटे हो कंपिता ती मही ९
झालों चित्रित मी, सकंपित तदा झाली तनू सर्वही
अंगीं घर्म सुटे, फुटे हृदयही, आंदोलतां ती मही
तेव्हां मंदिर तें क्षणांत क्षितिशीं सोडोनि जाई वरी
वाटे अद्भुत, केंवि हें निरवकाशीं स्थैर्य ऐसें धरी १०
द्वारीं तों भुवनाचिया सुरुचिरा दिव्यांबरा सुंदरा
कोणी ये कनकांबरा मधुगिरा बिंबाधरा अप्सरा

बाहे कोमलशा करें मजशिं, ती भासे जणूं इंदिरा
मीही भ्रंशित पूर्ण, गूढ मज हें:-- ' जावें कसें मंदिरा ? ' ११

तों ती सुंदरि मंजु वाणि वदली मंजुस्वना प्रेमळा
" होशी शंकित कां असा ? चढ वरी, घे हस्त देतें तुला
" ये ये काव्य--विशारदा ! भिउं नको मी जाण रे ' **शारदा** '
" ये ह्या मंदिरिं सत्वरीं, रचि नव्या काव्या महा तोषदा " १२

आनंदें कर मी मदीय सहसा केला वरी सत्वरीं
ती तो घट्ट धरूनिया उचलती झाली मला अंबरीं
मी तीचे चरणारविंद धरिलें वंदूनि सानंद तें
ती दावी कविचें सुमंडल मला ज तद्यशा वर्णितें १३

वाग्देवी वदली, " अगा कविवरा मन्मंदिरा देखिलें
" तैसें ह्या कविमंडलासहि असे त्वां आज रे पाहिलें
" झालें कार्य तुझें, कवे ! परतुनी तूं जाइ पृथ्वीवरी
" जेव्हां येइल पात्रता तुजशिं, तूं येईं सुखें मंदिरीं १४

" माझ्या मंदिरिं यावयास न असे द्वारांतुनी मार्ग तो
" जी सोपानपरंपरा दिसतसे ती भ्रामका, भास तो;
" द्वारीं राहति द्वारपाळ बनुनी जे मंदबुद्धी कवी
" द्वारीं येति तयांस भेवडविती यांची कृती दानवी १५

" जी दिव्य **प्रतिभा** नभा क्रमितसे, तद्भास्वतामंडलें
" ते सारे कविसिंह वेष्टित उभे रोंखोनि दिग्मंडलें
" त्यातें अंबरगामि तीच **प्रतिभा** मन्मंदिरीं आणते
" जेव्हां आणिल ती तुला पुनरपी येई कवे तूं इथें. " १६

ऐशी कर्ण मनोहरा वदुनिया मंजुस्वना सद्गिरा
एकाकी मज सोडि भूमिवरती ती **शारदा** सुंदरा

मी येतां अवनीवरी दचकलों, अंगेंहि मत्कंपिलीं,
झालों जागृत, मावळे सदन तें, ते सृष्टिही भंगिली १७

किरात.

## घोडा, हरिण, आणि मनुष्य.

[ १ ]

आर्या.

एके समयीं झालें अश्वाचें तुमुल युद्ध हरिणाशीं
लत्ताशृंगाघातें त्याणीं बहु उठविले रजोराशी १
सामर्थ्यें अश्व अधिक, चापल्यें हरिण अधिक दोघांत
झालें बहुकाल समर, परि एकाचाहि होइ ना पात २
अंतीं हरिणें अश्वा रण सोडुनि लाविलें पळायास
अश्व हताश पळाला घेउनि रिपुशृंगविद्ध गात्रास ३
मग शांत मनें त्याणें केला रिपुदण्डनीं बहु विचार
घ्यावें नरसाहाय्या ही रुचली कल्पना तया फार ४
विनवुनि नरास वाहुनि पृष्ठीं त्याला सधैर्य तो आला
मग उत्साहें त्याणें हरिणा आमंत्रिलें द्रुत रणाला ५
नरसाहाय्यें अश्वें केलें हरिणास रणिं पराभूत
अश्वखुरें नरशल्यें केलीं बहुत क्षतें रिपुतनूंत ६
पंचत्व हरिण तेव्हां अश्व विजय पावला, समर सरला
भरला विजयानंदें घनसंनिभ अश्व बहुत फुरफुरला ७
मग वदला अश्व नरा, " झाले मजवर बहु त्वदुपकार
वधिला मच्छत्रु, तुझें चिंतित राहीन कुशल बहुवार ८
सोड अतां मज, जातों मी, तूंही जा स्वकीय कामास
त्वत्साहाय्यें झालों विजयी मी रणिं दुजी न मम आस " ९

त्यावर नर अश्वा हें वदला, " सोडीन मी तुज कधीं न
वाहन योग्य मला तूं, ठेविन तुज मी सदा मम अधीन " १०
ऐसें वदुनि नरें तो अश्व सदनिं ठेविला करुनि दास
अनुताप जाहला बहु अश्वा, आला परी न कामास ११
ह्या गोष्टीपासुनि जो निघतो तो मनिं धरा सदुपदेश
मिटवाया गृहकलहा परसाहाय्यास घ्या न लवलेश १२

---

## मुंगी आणि खबुतर.

### (२)

आर्या,

बहु तान्हेली मुंगी गेली जल प्यावया नदीतीरीं
तेथें दुर्दैवें ती पाय सरुनि वाहली तदा नीरीं १
तीचें संकट पाहुनि तटतरुवरचा कपोत हळहळला
तरुपर्ण खुडुनि त्याणें व्हाया आधार टाकिलें तिजला २
ह्या पानावर मुंगी होवोनी हृष्ट फार मनिं बसली
परि त्या पक्षाच्या ती उपकारा हर्षभरिं न विस्मरली ३
तेथुनि वायुबलानें तीरा पानावरोनि ती आली
तिज सुखरूप विलोकुनि हृष्ट तिची मित्रमंडळी झाली ४
एके दिवशीं आला वनिं फासे पारधी खग वधाया
शर कर्मधर्मयोगें त्याणें खर रोखिला कपोता या ५
इतुक्यांत तीच मुंगी डसली येउनि धनुर्धरपदाला
चळला शर, परिसुनि तो पक्षि टणत्कार तेथुनि उडाला ६
व्हा बाल हो कपोतापरि सिद्ध करावयास उपकार
जरि नसले मुंगीपरि ते फेडायास सिद्ध नर फार ७

---

## डुक्कर आणि घोडा.

[ ३ ]

आर्या.

कोणी सूकर तरुवर घासुनि रद तीक्ष्ण ते करित असतां
वदला तुरग तया " मज येइ हसें तव बघून बालिशता १
रिपु न उपस्थित येथें, नर वा हरि वा न येथ वा दूर
रद घासुनि कां श्रमसी ? सेतु नदीवर वृथ. नसुनि पूर " २
वदला सूकर तुरगा, " आधीं चिंतिति उपाय बुध सकल
संकट ओढवल्यावर तत्प्रतिकारीं प्रयत्न तो विफल ३
मजवर रिपु आल्यावर मज रदघर्षणिं मिळेल न क्षण गा !
यास्तव या अवसरिं मी सिद्ध करुनि शस्त्र ठेवितों तुरगा " ४
बालांनों ! ह्या गोष्टीवरुनि अशी शुभकरी स्मरा उक्ति
अवसर असतां भावि स्थिति सुखकर व्हावया करा युक्ति ५

---

## तान्हेला कावळा.

[ ४ ]

आर्या.

प्यायास कावळा जल बघतां दिसलें तया सजल पात्र
जल खोल त्यास त्याची पोचे ना चोंच कष्टलें गात्र १
प्यायास तयें तें जल बहुविध केले उपाय परि फसले
मग ही तयें काढिली हिकमत शोधोनिया स्वबुद्धिबळें २
जळिं चंचुनें तयानें बारिकसे टाकिले अनेक खडे
त्यायोगें पात्राच्या जळ तें वर ठपलें चढोनि कडे ३

मग कावळा सुखें जल पिउनि उडाला तादिष्ट देशास
व्हा न निराश मुलांनो ! युक्ति करुनि मेळवा स्वसाध्यास ४

सौ. स. भिडे.

## दिवाळी

पद.

भीषण घनगर्जना संपल्या
तमोव्याकुला रजनी गेल्या
जोत्स्नेसह तारका उगवल्या
पडे गुलाबी थंडी; वेढिति युवती रमणा गाढ करीं !
आनन्दचि सर्वत्र पसरला
प्रेमगन्ध हृदयांत दाटला
प्रीतिजयन्ती–दिवाळिचा सण--नरनारीगण पहा करी ! १
शरच्चन्द्रिका उगवे गगनीं
प्रीति महीवरि उतरे त्रिभुनी
प्रवेशली ती युवयुवतिमनीं
सकलवृत्ति उत्तेजित झाल्या तेव्हां प्रेमोत्साहभरीं !
अकस्मात जगता पालटली--
तिमिर जाउनी कान्ति कोंदली
चन्द्रा आलिंगाया चढल्या मत्ता सागर जललहरी ! २
दुभागलें हें जग सैतानें
परी सांधिलें सत्प्रेमानें
प्रेम वगळितां शून्यचि जाणें !
तिनेंच रसयुक्ता सृष्टी ही--पाझरते जी प्रेमझरी !
कोण नष्ट करील प्रेमातें ?

नाशुनिही तें विवृद्ध होतें
कृष्णीं हरिली परि शुक्लामधिं रम्य चन्द्रिका वाढ धरी !
प्रीतिविलासीं रमुनी नाना
तरुणजनानो ! सोडुनि भाना
सेवा बहुविध आनन्दांना !
सुखास्तवचि दिपवाळी आली, मजा करा हो घरोघरीं !
पाहुनि शारदसुधांशुलेखा
विकसे शुद्धप्रीती--कलिका
ओढुनि आणा स्वर्गानन्दा प्रिय भगिनींनो, महीवरी !
भिकार तेलें बाजुस ठेवा
मनस्तनुस सुखेंहीं बुडवा
दिगन्ति वाहत सुगन्ध जावा,
तरिच दिवाळी होय साजिरी ! कशास अन्योपाय तरी ?
भगिनींनो ! निजबन्धूपाशीं
मागुनि घ्या गे सत्प्रेमासी
शुभ्र पीत वा खण्ड धातुचे तुच्छ ! अखण्ड प्रीति खरी !
करा कसेंही सुखांत राहा
तुह्मांत मिळवे मला न पाहा
दुष्ट असे हें मद्दैव महा !
अशा प्रसंगीं प्रणयरूपिणी भगिनी रुसली कवीवरी !
तेणें वेडें मन हें झालें
उदासीन होउनिया ठेलें
असाच भटकत गात कांहिंतरि फिरतों आहे कुठें तरी !

——————एकनाथ पांडुरंग कुलकर्णी रेंदाळकर

# काव्यरत्नावली.

## अंक ११ वा.

## आर्यभगिनीस दोन शब्द.

श्लोक.

व्हाया देशसुधारणा झडकरी कित्येक विद्वज्जन
नाना यत्न यथामती सुचविती लोकांस रात्रंदिन
देती अल्पचि लक्ष्य त्यांत बहुधा व्हाया गृहिण्युन्नती
तैसा देश सुखी दुजा न सुपथें नारी जिथें वागती १

ज्या गेहीं ललना सुपूज्य असती लक्ष्मी वसे त्या स्थळीं
सारे देव तसेच तेथ वसती तीं तीं सुखें वेगळीं
जेथें मान नसे स्त्रियास उलटी याच्या स्थिती त्या घरीं
यासाठीं गृहिणीमहत्त्व गणिती मोठें जगाभीतरीं २

आणी पती अमित वित्त जरी खपून
संसार तो कारिल कां गृहिणीसमान
दारिद्र्य पूर्ण असुनीहि घरीं स्त्रियानीं
तीं आणिलीं बहु कुलें उदया गुणांनीं ३

करोनि उदरोद्यमा पति पुन्हा गृहीं ये यदा
वदे स्मितमुखें तया मधुर शब्द आधीं तदा
श्रमोनि दिनरात जो उदरपोषणा लागुन
झटे. कारे तया सदा मुदित हें वधूदर्शन ४

कार्यीं व्यापृत सर्वदा पुरुष ते फावे न त्यांना मुळीं
त्या योगें गृहकृत्य सर्व अबला वाहे शिरीं एकली
सोशी कष्ट अनेक देह झिजवी जोपा मुलांची करी
त्यांच्या शिक्षणधर्मनीतिविषयीं घे काळजी अंतरीं ५

पिता गुरू मित्र जरी मुलाला
नेती पुढें पुष्कळ लौकिकाला
तथापि तच्छ्रेय विशेष तीतें
जी ज्ञान त्या अल्पवयांत देते ६

न द्रव्य खर्ची अविवेकतेनें
होतात तोटे उधळेपणानें
तात्पर्य संसार असे स्वाधीन
त्यानींच तो चालविजे जपून ७

महत्त्व येतें न वृथा स्त्रियांला
हवेत मोठे गुणही तयांला
असो स्त्रियांचे गुण एथ थोर
द्यावे असा उद्भवला विचार ८

नाहीं स्त्रियास पतिवाचुनि अन्य देव
ठेवी तिथें सुललना दृढभक्तिभाव
सेवा करी परम आवडिनें पतीची
देवांगनाहि करिती स्तुति थोर तीची ९

जें आवडे पतिस तेंच सुखें करावें
जें त्याप्रती असत अप्रिय तें त्यजावें
जें आपणा प्रिय परंतु तया रुचेना
तें केलिया फळ मुळीं तिजला मिळेना १०

जे आपणाहुनि घरीं असती वडील
द्यावा तयांस बहुमानचि सर्वकाल
श्वश्वादिकीं विनय पूर्णपणें धरावा
तत्सेवनार्थ न अनादर दाखवावा ११

उच्चारिले जरि तिहीं अपशब्द रागें
सुज्ञी क्षमा नमुनि त्यांस तथापि मागे
देतां न त्यां उलट उत्तर मानिते ते
" आत्मापराध ह्मणुनी वदती असें ते " १२

अभिमत अपणाला होय कांहीं विचार
गुरुजन परि त्याचा दाखवीती अव्हेर
अनुभव बहु येतो नेहमीं वृद्ध लोका
ह्मणुनि तंव करावा आपुला दूर हेका १३

स्वमत सत्य परी पति कोपतां
धरुनिया विनयें क्षण मूकता
झालिया विगतरोष पुन्हा तया
स्वमत सांगति नित्य भल्या स्त्रिया १४

असति इतर जे कां दीर जाऊ नणंद
निज गुणनिवहानें त्यांस द्यावा प्रमोद
वदुनि मधुर वाणी वाढवा प्रेम त्यासीं
न वचन कधिं त्यांचें सिद्ध व्हा मोडण्यासी १५

यदपि असति कोणी आपणाहूनि सान
तदपि मन तयाचें तोडिजे दुर्वचें न
प्रथम हृदयिं त्याचा ओळखून स्वभाव
तदनु करित जावे तुष्टवाया उपाव १६

निज परिजन जे कां त्यावरी लोभ ठेवा
उचित समय येतां मानही त्यास द्यावा
न कळत अपराधीं जाहल्या ते प्रवृत्त
त्वरित सदुपदेशें त्या करावें निवृत्त १७
विपुल धन सुदैवें लाधल्या गर्व मारा
क्षणभरिहि नसावा मानसीं अल्प थारा
व्यय करुनि सुपात्रीं जोडिजे कीर्ति मोठी
धनमद मनुजातें देतसे दुःख कोटी १८

दुर्वृत्ताचा संग येई न कामा
लागे त्यानें सर्वथा डाग नामा
राहो चित्तीं आत्मवंशाभिमान
सत्संगानें लाभतें सौख्य पूर्ण १९
सासूपणा जरि तुह्मांस पुढें मिळाला
द्यावे न कष्ट अधिकारमदें सुनेला
सोडोनि तातजननीस वयीं लहान
कन्येपरी असत जी तुमच्या अधीन २०
असेल जें त्यामधि तृप्त राहें
ह्मणूं नये द्या मजलागि तें हें
ज्या आपुल्या सोबतिणी तयांस
सन्मार्ग दावा जगिं वागण्यास २१
आलस्य वैरी न शिरो शरीरीं
उद्योग होतो अतिसौख्यकारी
दैवावरी ठेवुनि भार टाकी
उद्योग, तो मूर्ख मनुष्य लोकीं २२

देवा मनोरथ पुरीव मदीय ऐसे
बोलोनि फक्त फळ तें मिळणार कैसें
साहाय्य त्यासचि सदा परमेश देतो
जो कां सहाय अपणा स्वयमेव होतो २३

शेजारिणी मम अनेक विभूषणांनीं
आहेत मंडित नसे मज काप कानीं
इत्यादि बोलुनि नका दुखवूं पतीतें
यत्नें सदा मिळविजे गुणभूषणातें २४

सुवर्णालंकारें सकलहि तनूतें मढविते
महामूल्यें वस्त्रेंकरुनि अपणा धन्य ह्मणते
कटाक्षश्रेणीनें युवमन हरी वारयुवती
गुणांची या चित्तीं न गणि महती अल्पहि सती २५

सुशील मितभाषिणी पुरुष अन्य मानी पिता
गमे अनृत भारती प्रबल वैरिणी तत्वतां
असे मरण जीप्रती पतिनिदेशउल्लंघन
न हीं कनकभूषणें करिति तन्मनोरंजन २६

कदाचित् दुर्मार्गी पद निजपती ठेविल जरी
तरी त्या क्रोधानें न कटुवचनें ताडन करीं
पहा सद्धेतूनें सविनय तया बोध करुनी
बरे जागा झाल्या न तरि समजा दैवकरणी २७

स्वतांच्या तोंडींचा कवळहि तुह्मां अर्पण करी
ह्मणे तूं अर्धांगी तुज न विसरें मी क्षणभरी
स्वयें भोगी दुःखें क्षणहि नच पावे उपरमा
तया कांतातें जी फसवि तिजला काय उपमा २८

पती सुखी तैं सुख आपणाला
दुःखी तरी दुःख असे जियेला
रहस्य सांगे अवघें पतीला
पतिव्रता भूषवि ते महीला २९

फुका काळ मुळीं दवडूं नये
गतघटी न पुन्हा परतून ये
अचल भक्ति वसो परमेश्वरीं
सुपथ दावित तो भवसागरी ३०

कठिण शब्द वदोनि जनाप्रति
दुखवितां आनि होइल दुःस्थिती
सकलसंमत तों प्रियभाषण
असुनिही अपणा नच दूषण ३१

स्वहितमात्रपरायण होउन
जनमनें दुखवा न कदाचन
परहितास्तव यत्न यथामती
करुनि साधितसे स्वहिता सती ३२

समाधान नांदे सदा ज्या घरांत
स्वयें सर्वही संपदा तेथ येत
असंतुष्टता हे करी जेथ वास
तिथें संपदांचा क्षणीं होय ऱ्हास ३३

मला हें हवें तें नको या प्रमाणें
न कोणावरी केधवां रुष्ट होणें
खुषानें मिळे तेंच घ्यावें प्रसंगीं
असंतुष्ट ते सर्वदा दुःख भोगी ३४

खरी योग्यता आपली ओळखून
जरीं वागते तीजला काय ऊन
असूनी दरिद्री करी जे मिजास
पुढें लागते मागण्या भीक तीस

उरकुनी गृहकृत्य यथाविधी
अवधि राहत तैं न निजा कधीं
विविध लेखन पुस्तकवाचन
करुनिया अपुलें रमवा मन ३६

" लिहूनी वाचूनी बनति तरुणी चावट अती
परीक्षेला जाती फुकट अवघा डौल करिती
शिके पत्नी तैं तत्पति मग घरीं चूल फुकती "
न तें चित्तीं आणा अमित जन ऐसें बहकती ३७

ज्ञानाचा परिणाम दुष्ट कधिंही झाला नसे भूवरी
जो त्याचा उपयोग योग्य न करी ती चूक त्याची खरी
ज्ञानें लाभ नरांस होय मग कां स्त्रीतें न व्हावा बरें
गेला काळ जुना सुशिक्षण अतां संपादजे आदरें ३८

हवी न शाळाच शिकावयाला
मिळे घरीं शिक्षण बायकांला
ज्या अर्पितां आपण आत्मकाय
ठेवील तो अज्ञ तुम्हांस काय ३९

कादंबऱ्या बालिश पुस्तकें वा
वाचावयाचा नच नाद ठेवा
देई पती जे निवडून लेख
पुनः पुन्हा वाचित जा सुरेख ४०

आर्यावर्ती कितिक अबला जाहल्या दानशूर
साधी नारी निरुपम अशा एथ झाल्या अपार
ब्रह्मानंदीं रत कवणही कोण त्या वीरमाता
संसारीं या तदनुकरणें शोभवा आत्मकांता ४१

सीता देवी द्रौपदी धर्मनिष्ठ
यांहीं पूर्वी भोगिले फार कष्ट
पातिव्रत्यें पावल्या सौख्य अंतीं
कीर्ती ज्यांची लोक अद्यापि गाती ४२

संसार हा परम दुस्तर सर्वथैव
दुःखेंच एथ मिळती न सुखास ठाव
हा येतसे नियम चोंहिकडे दिसून
तो मोडण्या प्रबल यत्न करा झटून ४३

कोण्या गुणें कोण कसा जहाला
गणी कसा कोण न संकटाला
संसार दे तोष कसा कुणाला
हें दाविती सच्चरितें जगाला ४४

यांचा ग्रंथ सुपूज्य भागवत वा रामायणें भारत
घ्यावें सार तयामधील अपणां वाटेल जें संमत
कीजे सोबतिणी मिळोनि अवघ्या संवादही थोडका
ठेवा प्रेम परस्परांत कलहा हो सज्ज होऊं नका ४५

पूर्वी देश कसा असे दिसतसे कोण्यापरी संप्रती
केल्यानें सदुपाय काय विलया जाईल हे दुःस्थिती
राष्ट्रें अन्य कशा स्थितीत असती सद्धर्म कां लोपला
हेही प्रश्न सखीसमाज जमतां ठेवा पुढें आजला ४६

ज्या क्षुद्र रीति अपणांत परंपरेनें
आहेत चालत तयां विलयास नेणें
जें सत्य तेंचि कारितां जरि अंतराय
आले अनंत, तरि शेंवट गोड होय ४७

शिवण काम कला कुसरी शिका
कुशलता मिळवा सुखदायका
समजुनी निजदेह अशाश्वत
प्रभुपदीं चिरकाल असा रत ४८

झालां शिकूनि विदुषी जरिही तथापि
चित्तांत गर्व अपुल्या न वहां कदापि
विद्येमुळें विनय जो न मनुष्य जोडी
त्याला तिची न कळली तिळमात्र गोडी ४९

प्रपंचीं पत्नीतें रमण समजो हे सुगृहिणी
ह्मणो दावी मातें कठिणसमयीं योग्य सरणी
तशी एकांतीं ही जिवलग सखी भासत मना
प्रिया शिष्या ऐशी ग्रहण करिते सुंदर कला ५०

झाल्या तुह्मी पुत्रवती सुदैवें
कर्तव्य नेथील तुह्मां कळावें
देतों इथें यास्तव शब्द दोन
ऐका जरा होउनि सावधान ५१

होण्यास आज अमुची अतिदुर्दशा हे
माझ्या मतें प्रथम कारण हेंच आहे
मातापिता स्वतनयांविषयीं मनांत
व्हावी तशापरि न काळजि वाहतात ५२

प्रतापी जगन्मान्य राजा शिवाजी
महाशूरही पेशवा आद्य बाजी
न झाले वृथा स्थापिते हिंदुराज्य
करी मातृशिक्षा तयां सर्व पूज्य ५३

वंध्यत्व सुद्धां बरवें परंतु
असद्गुणी पुत्र न सौख्यहेतु
ह्मणोनि सच्छिक्षण युक्त पुत्र
करोनि कीर्ती मिळवा पवित्र ५४

सत्कर्मवांछा परमेशभक्ति
स्वदेशसेवा सुजनप्रसक्ति
या सद्गुणें मंडित बालकाला
केल्या, सुखी देश ह्मणाल झाला ५५

कोणी बोलति धर्मशिक्षण नसे शाळांमधें यामुळें
होतीं नास्तिक धर्मशून्य अमुचीं सर्वत्र सारी मुळें
वाटे हें मत तों निरर्थक मला सद्धर्मशिक्षा घरीं
अत्यावश्यक होय भार नलगे कांहींच शाळेवरी ५६

चाले खिश्चन जैन वा यवनही शाळेमधें ब्राह्मण
सर्वांला समकाल दुर्लभ असे माझ्यामतें शिक्षण
नीती, सत्य जितेंद्रियत्व असली सर्वोपकारी मतें
शाळेभीतरिं संप्रतीहि असतीं तेथें चुके कोणतें ५७

सद्धर्मशिक्षण मुलांस घरींच द्यावें
धर्मांतराचरण त्यांस न आवडावें
सांगा चरित्र इतिहासहि पूर्वजांचें
कर्तव्य त्यास कळवा पुढलें तयांचें ५८

झाली प्रजा परम दुर्बल आज सारी
व्हावें ह्मणोनि तनयांस्तव दक्ष भारी
व्यायाम योग्य समयीं करवा तयांस
देऊं नका अधिक अध्ययनप्रयास ५९
शाळेंत शिक्षण जरी मिळतें मुलांला
नेतें न तें परि तया परिपूर्णतेला
मात्रादिकीं ह्मणुनि त्यांस सुमार्गदीक्षा
द्याया तयार असणें करणें न शिक्षा ६०
बाळांनों तुमच्यावरी भरवसा सारा अह्मी ठेविला
देशाचा उदयापकर्ष तुमच्या हातीं असे राहिला
आतां स्वस्थ नका बसू दिवस हे आले महादुर्धर
आत्मोत्कर्ष करावया झडकरी बांधा बंधू कंबर ६१
अमित जन्म तपश्चरणामुळें
बहु अलभ्य मनुष्यतनू मिळे
करिल सार्थक योग्य तिचें नर
तरिच त्या सुख होय निरंतर ६२
ज्याच्या कृपें सकल विश्व सुयंत्र चाले
ज्याच्या कृपें मनुजजन्म अह्मां मिळाले
अज्ञान जो हरुनि सन्मति देत जीवा
त्या सर्वसाक्षि हरिच्या पदिं घ्या विसावा ६३
असो विषय वाढला अधिक कासया विस्तर
धरा हृदयिं सर्वदा सदुपदेश हा सादर
पतीसह शतायु व्हा सुसुत संपदा सेवक
करा मिळवुनी जगीं प्रसृत आर्यभूमौक्तिक ६४

मुकुंदराय.

## एका कवीचा सरस्वतीमंदिरप्रवास.

मंदाक्रांता.

होतें माझें शिशुपण तईं बोबडे बोल बोलें
‘ पाती तोपी ’ नकळत असे मंदसा फार चालें
शाळेमध्यें ह्मणुनिच मला पाठवीती न तात
भीती देती रडत असतां मात्र तीची मनांत १

गेले कांहीं दिवस मग मी नीटसा मार्ग चाले
तें पाहूनी मजसि जनकें पाठशाळेंत नेलें
जाईना मी निज जननिच्या प्रेमभावें स्वभावें
लोळे भूमीवरि मज कसे ज्ञात तद्धेतु व्हावे २

वाटे ‘ देती उगिच मजला त्रास हा कासयासी ’
रुग्णातें कां ! अगद रुचतें वांच्छि तो कां ? तयासी
जेव्हा कांहीं मजसि कळलें वाटलें कीं मनातें
वाग्देवीचें नवगृह तरी दृष्ट होईल कां तें ३

चिंताब्धीच्या उठति लहरी त्याकडे वेध लागे
गेले जाती विबुध–जन ज्या शिक्षण–ज्ञान -मार्गें
त्या मार्गें न गुरु मम ह्मणीं मार्ग माझा चुकेना
त्या वृत्तींचीं सुखद कथनें पूर्ण तीं वर्णवेना ४

मार्गीं त्यांच्या अभिनव अशा काव्य वृक्षावलींची--
होती दाटी. ह्मणुनि पसरे थंड छाया तयांची
मातें येई मधुरतर जो गंध त्यांच्या फुलांचा
त्यायोगें हा मधुकर फिरे गुंग होऊनि साचा ५

तेथें नाना रसिक अलि जे हिंडतां मत्त–गंधें
ते भारी हो ? कवन कुसुमा सेविती त्या मदांधें

कालीदासोत्पलकवनसुमें प्रीय त्या फार वाटे !
प्रेमें त्यांचा सुखद रस ते प्राशिती जो न आटे ६
मल्लीनाथें तरुशि जल जें ओतिलें भाष्यरूपें
त्यामध्यें जो सुम--रस गळे तो दिसे अर्थरूपें
त्यातें प्राशी निजमनिं डुले तेथुनी जाववेना
त्या स्वादाची कवनिं मजला पूर्णता आणवेना ७
सन्मार्गी जे गुरु मज बरें लाविती ते फिरून--
मागें होवो नच चुकुर ते मित्र माझे ह्मणून--
'ह्या मार्गानें तुज यश मिळे' जाति ऐसे वदून
प्रेमाश्रू हे गळति मम तत्सत्कृती आठवून ८
एकाकी मी तिथुनि पुढती चाललों त्याच नादें
वृक्षांतूनी सुरभियुत तो वात वाहे सुनादें
त्या पंथींच्या मधुकर, खगा पाहुनी तोष होई
जी दे मैत्री व्यसन--समतो ती न हो लुप्त कांहीं ९
झाले पंथ--श्रम बहु मना झोंप येई प्रशांत
तों जें चित्तीं दिनभरि वसे तेंच देखी तियेंत
कोटी--सूर्य--द्युति मज दिसे नेत्र हे दीप्त झाले
वाग्देवीचें कमनिय असें गेह पाहूनि धाले १०
उच्च--स्थानी मयुर--वहना देखिली प्रीयमूर्ति
हस्तीं वीणा धरुनि वरुनी तर्जनी जात होती
भासे सारें द्युतिमय मनीं मानिलें भाग्यवंता
पाहूनी ती हिम--नग--सुता--पुत्र--कांता सुशांता ११
श्रीदेवीच्या भवति दिसली बाल--लीला मजेची
कांहीं अंकीं बसुनि चव ते घेति तत्स्तत्पयाची

कांहीं कांहीं मधुर करिती मंजु गान स्वनानें
त्या पाहूनी किति तरि गमे अज्ञ मी मन्मनानें १२

बाही त्या ती कमलनयना प्रेम--भावें सुजाणा
या! या! ऐशी मधुर वदली दांड! हर्षा! सुबाणा!
येई माघा! जवळि छकुल्या कालिदासा क्षणीं ये
तों हर्षानें सकळ धरिता धांवुनी अंबरातें १३

मी तद्घोषें नयन उघडी तों न कांहीं दिसे तें
तैसाची मी उठुनि पुढतीं चाललों फार मोदें
अद्यापीही गमन करितों सांगणें हें कशाला!
देती भारी दिवस सुख हे रम्य माझ्या मनाला १४

हा! वेड्या वाग्वधुगृह खरें दृष्ट हो कां! जगांत
मानीं ज्ञाता तिस रसिका! जाण! तें मी मनांत
शोधी! तूंही मजसम गड्या! हिंडतोसी तदर्थ
याहूनी तें अधिक कवनीं काय! सांगूं यथार्थ १५

——————— दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी

## तिमिर.

गाणें

प्रकाश सरला
तिमिर जाहला
दृष्टिस कांहीं
दृश्य न होई
तम हें वरतीं
तम हें भवतीं
सर्व भेसूर! भीति वाटते फार १

कवण प्रकाशा
ने विश्वेशा
तम हें कोठुनि
आलें जन्मुनि
जाइल भूदरीं
किंवा अंबरीं
मी अज्ञात । सांग तूं जगन्नाथ २
एक विवरतो
दुसरा पळतो
दोन्हि न राहती
एक्या जगतीं
विरोध ऐसा
यांचा कैसा
उमजत नाहीं । हेतु बोल तूं कांहीं ३
उजेड जीवन
तम कां निधन
प्रकाश जाणिव
तम कां नेणिव
परस्परांची
अनुमति यांची
कैसें काय । नुमजतें तिळप्राय ४
कांहिं असो तें
तम में देतें
हरुनी सत्वर
त्या नें तूं दूर

प्रकाश खासें
जीवन भासें
मज तो देई । शिर्ष ठेवतों पायिं
दिसतें जाण
तम अज्ञान
प्रकाश किरण
उज्ज्वल ज्ञान
पहिलें जावें
दुसरें यावें
मला सुप्राप्त । प्रभो हेंच विनवीत ६

त्र्यंबक जयराम प्रधान

## कान्तानुनय.

( चाल—प्रिये चारु शीले. )

प्रिये सोड आतां झणी सोड कोपा
सहन करवे न गे मदनतापा ! ॥ ध्रु ॥
संपली यामिनी चन्द्र धूसर दिसे
पातला हा उषः—समय पाहीं ! १
मन्द शीतानिलें दीप हा कापतो
अजुनि धरिशी किती मान सखये ! २
क्षीण शशि होय परि राग वाढे तुझा !
कमल विकसे परी वदन मिटलें ! ३
श्रवणिं ये भ्रमररव मौन धरिसी परी
विमल अम्बर दिसे कलुषहृदये ! ४
रक्त ऐन्द्री दिशा दिसत परि मन न तव !

रजनि हे जाय परि कोप न सरे! ५
चरणिं शिर ठेवितों राग आवर परी!
फिरविं इकडे मुखा दास विनवी! ६
वळविं लोचन सखे पाहिं दीनास या!
काममन्थरभुजीं बद्ध करिं गे! ७
अधरमधु पाजुनी तरल मन शान्तवीं!
देइं आलिङ्गना कमललतिके! ८
कठिन कुचसंगतीं कठिन मन होय कीं!
चण्डि! चल ये! पुरे क्रोध राहे! ९

रेंदाळकर.

---

## असें कसें झालें?

(अंजनीगीत.)

तरु–कोटरिंचा हंस उडाला!
निदाघ–कालीं मोहर गळाला!
आम्र माधुरी-विहीन झाला!
असें कसें झालें? १

जाइ, मोगरा, गुलाब यांला–
सौरभ कैसा सोडुनि गेला!
माधविं पिकरव लुप्त जहाला!
असें कसें झालें? २

चंद्र कौमुदी--विहीन झाला!
धरेवरी वर्षतो विषाला!
रवि–कर–कांचनवर्ण पळाला!
असें कसें झालें? ३

रसिक कवी विसरे कवितेला !
नवल ! पाहुनी भृंग गणाला
पुष्पां सोडुनि कर्दमिं रतला !
असें कसें झालें ? ४

बृहस्पती लुप्त—संज्ञ झाला
गंगेचा कीं ओघ परतला !
भक्तां ईश धरी वेठीला !
असें कसें झालें ? ५

स. ग. कालेकर.

---

## गुणज्ञ गातात गुणा.

एक दारिद्री कवि कोण्या धनिकाकडे याचना करावयास गेला असतां त्या धनिकानें त्या कवीचा व त्याच्या कवितेचा उपहास केला व त्याला घरांतून हाकून लाविलें. तेव्हां क्रुद्ध झालेल्या कवीनें हे उद्गार काढिले.

श्लोक.

गुणज्ञ गातात गुणा सगौरव,
मिळे गुणज्ञांत गुणास वैभव
न सद्गुणांची तुज योग्यता कळे,
असोनि विश्वीं रवि घूक अंधळे १

खला ! कशाला पिरगाळिशी मिशी ?
उगाच डोळे तरि कां वटारिशी ?
न दाविशी, दावुं नको कृपा तिळ,
कधीं तरी सद्गुण वंद्य होतिल २

खुशामत्ये जो करिती तुझा स्तव
तयांत नाहीं परमार्थता लव
भयें स्वकार्यास्तव वा तुझा स्तव
खुशामत्यें हे करिती सकैतव ३

धनाधिकारास्तव मान्यता तव
न उच्च पांडित्य गुणादिसंभव
खुशामत्ये वाढविती महत्व तें
सरस्वती मंदिरिं नैव थारतें ४

सरस्वतीच्या स्थल तूज मंदिरीं
नसे तुझी मूर्ति असोनि साजिरी
तिथें अविद्वान् न शिरे तुझ्यापरी,
मिळे तिथें मान न भूषणांबरी ५

असोनि वस्त्रें मम जीर्णरूप मी
बसेन रे ! तेथ पदीं महत्तमीं
तया स्थलीं जे कविराय बैसती
तयांचिया मीहि बसेन संगतीं ६

असोनि हातीं तव रत्न कंकणें
घडेल दारिंहि तुला न ठाकणें
न वस्त्र, न द्रव्य, न भव्य आकृती
तिथें असे भाजन आदराप्रती ७

असंख्य देखों कृमिकीट जन्मती
मरोनि मातीस मिळोनि लोपती
तशीच होईल अरे ! तुझी गती
न नांव वा रूप नुरेल न स्मृती ८

सरोनि आयू मरशील निश्चयें,
न तारिजेशील सुवर्णसंचयें
खुशामत्ये ही मरतील गा ! तव,
विनष्ट हें होइल थोर वैभव ९

तुझे नदीच्या पुलिनीं कलेवर
जळोनि होईलचि भस्म सत्वर
परी यशोदेह मदीय भूवरी
ठरेल विश्रांत रवींदु जोंवरी १०

चितान्त चैतन्य तुझें खरोखरीं,
त्वदायु संपेल अरें चितेवरी
तुझ्या तनूचे कण सागरोदकीं
पडोनि भक्षील तयांस यादकीं ११

तुझेपरी पार्थिव देह हा मम
सरेल, दावील दया न तो यम
परंतु मद्देह यशःस्वरुप हा
चिता न नेईल लया कधीं अहा ! १२

गुणज्ञ गातात गुणा, न व्हावें खिन्न पंडितें
हें वामनात्मज कथी तत्त्व तें खेद खंडितें १३

——————— विद्याधर वामन भिडे. बी. ए.

## कवितेचें प्रकाशन.

श्लोक.

मी एकदां रचुनिया कविता नवीन
त्या दाविल्या प्रिय सख्यास मुखें वदून

तों तो वदे मजशि धाड लिहूनि यातें
छापावया दिसति योग्यचि मन्मनानें १
घेतील मूल्य किति काव्य--प्रकाशनास ?
मी लागलों मनिं हिशोब करावयास
श्लोक द्वयास जरि एक पडे रुपाया
त्या अष्टकास मज लागति चार वाया २
ह्या देखुनी नविनशा गणन--प्रकारा
केलें स्मितास सुहृदें; गणि काव्यकारा
वेडा खरा, इतरही कविवर्ग जैसा
आहेस तूं कवि खरा; कविबंधु तैसा ३
'वेडे कवी सकलही जगतावरी' रे
हें मान्य सर्व वदले परि तें असारें
ऐसेंच आजवरि म्यां गणिलें परी रे
त्वां व्यर्थ ते ठरविलें गणनप्रकारें ! ४
ज्याची असेल कविता रसपूर्ण त्यातें
नाहींच रे पडत मूल्य प्रकाशनातें
देतील मूल्य उलटें कवितेस त्याच्या
वाखाणितील कृति कल्पक त्या कवीच्या ५
हें ऐकुनी वचन कंठ भरूनि आला
आनंद फार कविला हृदयांत झाला
तों भूवरी उडत मुद्रित पत्रिकेचे
विच्छित्र कांहिं कपटे करिं येत त्याचे ६
ते तो कवी जुळवुनी बघतां तयाला
सत्काव्य सुंदर असें दिसलें कवीला

त्याची तदा बघुनि दीन दशा अशी हे
उद्गारला कवि तदा वच काय पाहे ७
होऊनि मुद्रित जरी कविता मदीय
ऐशी गती मिळत त्यां तरि व्यर्थ होय
वाटे मनीं मज अशी कविता करावी
जी मुद्रिता सकल लोकहृदींच व्हावी ८
जीचें सदा श्रवण, पाठ, जगत व्हावे
जीतें प्रकाशन सुवृत्ति जनीं मिळावें
जीचा प्रभाव रसिकांतरिंही दिसावा
जीचा प्रताप जगतांवरि ख्यात व्हावा ९
देईल यापरि जरी कविता कराया
मानीन मी सफलता मम जीविता या
नाहीं तरी शिणवुनी उगि शारदेस
कां कष्टवूं वद उदात्त सुकल्पनेस ? १०
हें ऐकुनी कविसखा हृदयीं निवाला
त्यानें हंसूनि कविला प्रणिपात केला
" वेडा कवीच रचुनी कविता नवीन
दावील सत्पथ जगा, " वदला हंसून ११

किरात.

---

## तापीवरील रजनिकाळ.

पद्य.

( चाल—वीरा भ्रमरा० )

शीतल तापी सोज्वल जल हें चढत असे अंबरीं
कृति ही चित्र असे कितितरी ॥ ध्रु० ॥

सुंदर सरिता—पात्र पसरिलें बघुनी क्षितिजांतरीं
अमर ते मोहुनिया अंतरीं १

सुंदर रजनी नटवुनि थटवुनि मोहिनि जणुं प्रेषिती
सुर ते, मोहाया जनमती २

तारा--हारां घालुनि कंठीं, कुसुमें कबरीवरी,
खोंविते रजनी नानापरी ३

अथवा विस्तृत कृष्णपटा या सुर वरुनी सोडिती
छपविण्या चौर्यवृत्ति नवरीती ४

असह्य होता अंगदाह तो सोमरसा सेवितां ?
वांछिती हिमजळ सुर तत्वतां ५

अद्भुत चुंबक शक्ती सोडुनि घेती तापी वरी
प्रदोषीं स्पष्ट स्थिती हे खरी ६

तारा--मंडल चिच्छक्तीनें उतरत तापीजळीं
किंवा भ्रान्त दृष्टि दीपली ७

ही सरिता, कीं नभ हें न कळे गुंगुनि जाई मती
विचारें जागृत हो पारि मती ८

नक्षत्रांची दिव्य विभा पारि दावी नभ--मंडळा
भूवरी भिल्ल--दीप तापिला ९

रजनि--मुखीं या चमत्कृति अशी रंजवि कविच्या मना
तीं मग करवि काव्य--विरचना १०

---

किरात.

## चांदण्यांतील प्रेमदशक.

चाल—चंद्रकांत०

प्रेमाची जणुं दृश्य मूर्ति ही आकाशीं विलसे;
स्निग्ध कौमुदी नव्हे, स्त्रोत हा प्रेमाचा भासे. १
प्रेमपूर्ण जीं मानवहृदयें अवनीवर होतीं;—
ताराख्पें विधुसन्निध तीं लकलकती वरतीं. २
मृण्मय देहा त्यागुनि जाइन मी जैं स्वर्गासी;—
शांत निकेतव विधुसन्निध दे; प्रार्थिन मी विधिसी. ३
प्रेमाची ही सत्ता चाले अनियंत्रित जगतीं;
प्रेमबंधनें--ईश्वरसूत्रें--तींच ह्मणों येती. ४
प्रेम वास ज्या चित्तीं नाहीं उपलगणासम तें !
रुक्षत्वीं त्या सहृदयतेचें रोप कधिं न जगतें ५
जरी काढणें आनंदानें दिवस तुह्मां जगतीं;—
चित्तशुद्धि घ्या स्निग्ध निर्मल प्रेम--सिंचनांतीं. ६
' प्रेम वाढतें. प्रेमानें जगिं ' ध्यानीं हें आणा.
प्रेम—बंधनें दृढतर करणें. कर्तव्यचि जाणा. ७
दुःखसागरीं बुद्‌बुद येतो, तो हा नरदेह;
स्निग्ध प्रेम तयास बनवितें परी सौख्यगेह. ८
क्रौर्याचें जगिं निरशन करुनी, प्रेमपेय प्यावें;
सहृदय—मित्र--प्रसन्नतासुख समृद्ध भोगावें. ९
आकाशींच्या स्निग्ध पुष्प--सौरभा सेवितांना,--
लहर येइं जी, कृष्णानुज ती अर्पी रसिकांना. १०

शं. म. कानिटकर.

# काव्यरत्नावली.

अंक १२ वा.

## सालअखेर.

रत्नावलीची

## शरण्यशरणागति.

श्लोक (तोटक वृत्त.)

जगीं पूर्ण असूनि वरी न दिसे,
पारि ज्याविण एक अणूहि नसे;
सकलेंद्रियचालक जो विलसे,
पारि गम्य तयांस[1] न होत असे; १

अति अद्भुत त्या जगदीशवरा
स्तविण्या मम शद्ब न होय पुरा;
वमनासम नाशिभवा[2] त्यजुनी
पदिं अर्पि मना नमना करुनी. २

जगतीं भयकृद्भयनाशन तो
प्रभु, भारतिं[3] व्यास असें वदतो;
सभयास अपंगुनि नाशि भया,
अभया भय दावि; करी उभया[4]! ३

---

१ इंद्रियांस. २ नाशवंत संसारास. ३ भारतांतर्गत विष्णु सहस्रनामांत.
४ भय येणें व नाहींसें करणें ह्या दोन्ही गोष्टींस.

पदरत्नसमुच्चय गुंफितसे<br>
कवि, चालक अर्पि जनांस तसे;<br>
ग्रथनीं प्रथितीकरणीं घडतें[1]<br>
बहु अंतर विघ्नगणें, परि तें ४

जनिं साहुनि आश्रय राखियला,<br>
मनिं कालविलासचि तो गणिला;<br>
अजि विंशति वत्सर हे सरले;<br>
नत ईशपदीं जन ते तरले. ५

किति काव्यवधू प्रतिवर्षि जना<br>
विनवी निज ही करसंग्रहणा;[2]<br>
परि लेश दया न तदीय मनीं<br>
दिसली करुणास्पदिंही[3] नमनीं! ६

हितधी[4] अथवा निज धर्म[5] न वा<br>
वररीतिहि[6] वा; जनमार्ग नवा!<br>
पुढचें फळ ते न जरा बघती,<br>
हतकालवशें[7] नजरा फिरती! ७

जड पार्थिव अर्थचि[8] आवडतो,<br>
कवितार्थ न चिन्मय त्यां प्रिय तो!<br>
अविनाशि सुकाव्यज अर्थ खरा,<br>
क्षणभंगुर पार्थिव[9] तो नखरा. ८

---

१ प्रसिद्ध करण्यांत. २ पाणिग्रहणास (हातीं धरण्यास, पक्षीं विवाहास.) ३ करुणा येण्यासारख्या पायां पडण्यांनीं सुद्धां. ४ स्वहित बुद्धि. ५ कर्तव्य. ६ थोरांची चाल. ७ अनिष्ट काळ आल्यामुळें. ८ पृथ्वीसंबंधीं अर्थ (द्रव्य) ९ पार्थिव अर्थ.

कवितासुमनार्थहि अल्प धना
करणें करमुक्त न येइ मना;
कशि काळगती ! परि ढंग किती
धननाशक घातक ते करिती ! ९

जगिं देव समर्थ ! जडार्थ तया
न रुचे, कवनार्थ रुचे सदया;
नच काळ तया भुलवील कधीं;
तरि कां मग दैन्य वरी कविधी? १०

कविवर्ग ! रसज्ञहि ! चाळक हो !
नच दैन्यज खेद तुह्मां कधिं हो;
नरवैद्य कशास भवार्तिगदीं[1]?
शरणागत व्हाचि शरण्यपदीं[2]. ११

विहंगम.

---

## श्रीनिवृत्तिनाथ स्तुति.

आर्या.

श्रीमन्निवृत्तिनाथा साधो ! मी ठेवितों पदीं माथा
भवभयहरणा आतां त्राता तूं, काम मारितो लाथा १
होती लीन पदीं हे संत तुझ्या, तारि कोण गा त्यांतें
पाहुनि एकचि निष्ठा देव न हो कां प्रसन्न गात्यांतें २
श्रीत्र्यंबकांत बससी तूं एकांत स्थलास पाहून
वाहून शिरीं पातक आलों हा मी तिथेंच धांवून ३
दूर न ढकलीं मातें भवाब्धिनौका तुझ्याविना कोण
तारक, मारक एकचि तूं, मी आहें मनांत जाणोन ४

---

१ संसार दुःखरूपी रोगाला. २ रक्षण करण्यास समर्थ अशा परमेश्वराच्या चरणीं.

देवा ! निवृत्तिनाथा ! प्रवृत्तिनाथास कोण गा तारी
पडलों विषयसमुद्रीं, ग्रासिति कामादिमकर, त्यां वारीं ५
विषयेंद्रियसंयोगें जें जें मिळतें अह्मास लवचि सुख
या द्वंद्वांत बुडालों, आहे त्याची मनांत फार भुक ६
श्रुति कथिते लोकांतें ' परांचि खानीं ' द्रियेंहि बाह्यमुख
धीर पुरुष आहे जो वळवी त्यांतें, करोनि आंत मुख ७
जैसा श्रुतींत, तैसा कथिला स्मृतिमाजि सच्चिदानंद
परि तो विचार सारा संस्कृतिं, अह्मा मिळे न आनंद ८
ज्ञानेशें जाणुनि हें केली भावार्थदीपिका टीका
संसारसुखांधाच्या काढी ती ज्ञानचक्षुच्या टीका ९
अथवा झाली पाया, देउळ करि त्यावरीच नाथ तुका
जो देवळांत रमतो, त्या पुढती स्वर्ग कां न होय मुका १०
विठ्ठल--पायीं झाली ज्याची ती एकनिष्ठता भावें
गातां टाळमृदंगीं त्या कां परमेश्वरें न तारावें ११
" अपि चेत्सुदुराचारो " इत्यादी वाक्य सांगते गीता
करि जो भगवद्भजना वैश्यस्त्रीच्याहि वारि भवशीता १२
हा भक्तिमार्ग शिकविति निवृत्तिनाथादि अज्ञ या लोका
यवनांच्या कालीं ही झाली उपकृति कितीच आलोका १३
पंढरपुरांत रमती विठ्ठल--पादीं अनेक ते भक्त
तरती दर्शन घेतां जे संसारांत असति हो सक्त १४
मुख नामोच्चार करी, कर्ण करी टाळनाद तो श्रवण
दृष्टी विठ्ठलपाई, ऐशीं हीं इंद्रियें तुला शरण १५
मग मन काय करी बा जाती संसारकल्पना विरुन
जग हो विठ्ठल सारें " वसुधैवकुटुंबकंहि " आचरुन १६
सन्यासीपुत्र ह्मणुनि छळिती ब्राह्मण तुह्मास ते फार

परि साक्षात्परमेश्वर होता तरि दाविले चमत्कार १७
चालवुनी भित तसे रेड्याकडुनीच वदविले वेद
मायेचा खेळ कसा दाखविला, ब्रह्मिं नाहिं तो भेद १८
ब्राह्मणपंडित तेव्हां नाथ तुकाराम साधुनां छळिती
वेदार्थ आणिला हा सर्व मराठींत, ही बरी न रिती १९
सोसुनिया छळ सारा केले लोकीं अनंत उपकार
ब्रह्मस्वरूप होउनि भक्तीचें दाविती जना सार २०
घेउनि अवतार विभो पवित्र केली जगांत आळंदी
क्षेत्र श्रीत्र्यंबक जें रमला तेथेंच सच्चिदानंदीं २१
वेदांत विषय कठिणचि, केला दृष्टांत देउनी सोपा
सोपान जो असे गा मोक्षासी, जाळि वासनाकोपा २२
वामन, मयूर असती पंडित, भगवद्भक्त पंतही दिसती
श्रीरामदास तैसे परि संतपथांत कां न त्यां गणिती २३
तो संप्रदाय आहे कारण यासी कथीति किति लोक
परि भगवद्भजनीं रत, संसाराचा असे तया शोक २४
पौषांत वद्यपक्षीं संतैकादशिस संत सर्वही जमती
श्रीत्र्यंबकांत रमती निवृत्तिपाईंच, देव हे गमती २५
त्यासाठीं करुनी स्तव अर्पी तो सत्पदांबुजीं भावें
जाळुनि कामादिक रिपु प्रभुवर—कृपेसि कां न लाभावे २६

दिंडी.

श्रीनिवृत्ती त्या संत तुकारामा
ज्ञानराजा तो नमू तसा नामा
निळोबा मुक्ताबाइ एकनाथा
वंदि मुक्तेश्वर ठेवि पदीं माथा

———— गजानन गोपाळ जोशी.

## व्हावयाचें जें, तें न कधीं राहे.

दिंड्या.

धनिक होता नर एक वृद्ध; त्याला–
बहुत नवसांनीं एक पुत्र झाला.
लोभ त्यावर तो फार सदा ठेवी;–
आत्मवित्तावर कृपण मनुज जेवीं. १

व्यसन मृगयेचें लागलें सुतास;
सदा सेवी मृगयार्थ तो वनास;
ह्मणुन चिंता ही लागली पित्यास;
'व्याघ्रसिंहादिक भक्षितिल मुलास.' २

झटे बहु तो तें व्यसन घालवाया,--
परी त्याचे जाहले यत्न वाया;
मनीं वागे जें, स्वप्निं दिसे तेंच;
पिता पाहे दुःस्वप्न हें लगेंच. ३

'पुत्र मृगयेस्तव जाय अरण्याला,–
सिंह मोठा तैं भेटला तयाला;
त्यास धरिलें तत्काल मृगेंद्रानें;
क्षणें फाडुन त्या भक्षिलें तयानें ! ४

खरें होइल हें स्वप्न, या भयानें--
तईं बांधविलें थोर घर पित्यानें;
त्यास भोंवति घालवी उंच कोट;
तयारी तो करि त्यांत कडेकोट. ५

त्यांत ठेवी कोंडून मग सुतास;
तिळहि होऊं देई न तया त्रास.

चित्त त्याचें तेथेंच रमुन जावें,
ह्मणुन यत्न करी बाप मनोभावें. ६

आवडीचीं जीं सावजें मुलाच्या--
तिथें टांगविल्या तसबिरी तयांच्या;
त्यांत सिंहाचें चित्र एक होतें,--
मुलाच्या ये बघण्यांत एकदां तें. ७

क्रुद्ध होउन, चित्रास त्या वदे तो;--
तुझ्यासाठीं मज बाप ताप देतो.
मला बंधन हें प्राप्त तुझ्यापायीं;
कडक शिक्षा करितोंच तुला पाहीं, ८

जवळ असती या समयिं जर कट्यार,
तिनें केलें असतेंच तुला ठार !
हाय ! पण मी निःशस्त्र बंदिवान !
तरी नाहीं सोडीत तुला जाण. ९

असें बोलुन, तो दांत ओंठ खाई;
नुरें क्रोधास्तव भान त्या जराही !
तई आणुन बळ सर्वही करांत,
बुकी सिंहाच्या मारितो उरांत. १०

आंत मोठा भिंतीस खिळा होता.
खोल रुतुनी तो, घाय करी हाता !
घाय जाई तो फार बिकोपास,
अल्प कालांतच मरण ये सुतास ! ११

स्वप्न पडलेलें आपणास, खोटें--
करायातें करि बाप कष्ट मोठे;

व्यर्थ होती श्रम सर्व पण तयाचे:
अखेरीला घडलेंच घडायाचें !

तात्पर्य,--

व्हावयाचें जें तें न कधीं राहे;
न जें होणारें तें न घडत आहे;
व्यर्थ चिंता तर धरुन भविष्याची,--
करुन घ्यावी कां यातना जिवाची ?

—————— कृष्णाजी बावाजी कुलकर्णी

## रजनी.

श्लोक.

दिनभरी सकलां श्रम जाहले,
मिळविण्या जगिं जीवित गुंतले;
शयन गांठुनि सत्वर झोंपले.
रजनि त्यांस पुनः करि चांगले.

विविध खेळ करी शिशुंचा गण.
दिसत संप्रति एकहि बाळ न;
जननिचाच करी उदराश्रय;
जगतिं अन्य तसा न दयाशय.

रमणिही रमली रमणासवें;
करुनि भाषण ती बहुलाघवें.
मधुर बोलुन साधि हितास ती;
कवण ना वनितावचिं मोहती ?

विहगही निजले निजकोटरीं;
विहरुनी वनिं वा गगनोदरीं.

द्रुमहि सुप्त; असें मज वाटतें
न तरुचें दळ एकहि हालतें. ४
रवि न अंबरिं, जाणुनि तारका,—
पुरवितील न त्या मनिं काम कां ?
विहरती सुखलुब्ध पहा नभीं
गृहिं धणीनच चोर कुणा न भी. ५
निशि भयाकुलशी मज भासते;
बघ कशी रुचिरा तनु कांपते !
रविभयें पळण्या द्रुत इच्छिते;
कपटकार्य जणों मनिं डांचते. ६
बघ समाकुल ही रजनी कशी--
पति न ये ह्मणुनीच दिसे अशी.
विरहदग्ध वधू बघ हे ! शशी !
लवकरीं तिज येउन उल्हशी. ७

—————— त्र्यंबक जयराम प्रधान.

## संक्रांतीची भेट.

### आर्या.

ज्या परमेशें मजला दाखविला आजचा कृपें सुदिन;
त्यातें भावें वंदुन, अर्पी तिळगूळ दास हा दीन. १
तिळगूळ हे ! स्वसे ! मी नतिपूर्वक तूज धाडुनी देतों;
स्वीकारीं तूं तैसें करुन कृपा वाचकां तुझ्या दे तो; २
पूर्ण स्नेह वसो तव हृदयीं; मधुरा गिरेस सतत वद;
तिळगूळासम संतत तूं मज हो सर्वतोपरीं सुखद. ३
' लोभ असो माझ्यावर सतत ' अशी नम्र मागणी करितों;

तव वाचक–वृंदाला; मान्य करो मद्विनंति झडकरि तो.
मम संगोपन केलें ज्यांनीं साहून कष्ट चिरकाल.
श्रीपार्वती प्रसू मम, बाबाजीपंत जनक, सच्छील,
माझी चुलती शुद्धा श्रीगोदा, रामचंद्र ते चुलते;
सद्भगिनीत्रय, तैसे 'दत्त' गणेशहि सुधी मम भ्राते.
हे ह्या शुभ प्रसंगीं या जगिं असते मदन्यही आप्त,–
तर दुग्धि शर्करेचा असता मज योग जाहला प्राप्त.
ईशेच्छेस नसे पण उपाय. हें तत्त्व चित्तिं जाणून,–
आहे त्यांतच घेतों करून मी मन्मनःसमाधान.
मन्मित्रांचा, तैसा तुजसम आहेत त्या मदाप्तांचा,–
लाभ मला चिर होवो हे देवो मजसि नाथ जगताचा.
'आर्या आर्यांस रुचे.' यास्तव आर्यांत पत्र हें लिहिलें.
तव वाचकांस तैसें तुज तें मज वद; किती असे रुचलें ? १

—————— कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी

## बगलबच्चे.

[ जीव जागृति काव्यांतील उतारा. ]

श्लोक.

समर्थांचेपाशीं प्रिय बगलबच्चे असति जे
तयांशीं सर्वांनीं सतत विनता वृत्ति धरिजे,
तयांच्या वाटेला नर कवणही जाति न कधीं,
सदा ते संसारीं असति बहुसौख्यास्थितिमधीं

समर्थाचे जे जे प्रिय बगलबच्चे गणियले,
तयांना भोगाया मिळति विभवें नित्य सकलें

तयांना भीतीचें क्षणभरिहि वारें न शिवतें,
सदा ते काढोनी मिरविति जगीं ऊर वरते २

समर्थाला लोकीं मिळति नमनें नित्य जितकीं
तयांच्या संगानें जगिं बगलबच्चांस तितकीं
जशीं ईशानाला मिळति नमनें भक्तनिवहीं,
तशीं नंदी बैला मिळति नमनें; उक्ति ऋत ही ३

समर्थाच्या भाग्यें जगिं बगलबच्चे झळकती,
समर्था शेजारीं सदिं बगलबच्चेहि बसती
अजाच्या कंठाला स्तन चिकटले रम्य दिसती,
मुखें ते आजन्म स्तन धरुनि कंठास डुलती ४

समर्थाच्या इच्छा शुचि अशुचि वा ते पुरविती,
स्वताच्या मानाची उपचिति असो वा अपचिती
समर्थाच्या पाया वळवळ सुटे त्या समयिं ते
स्वताच्या देहानें प्रिय बगलबच्चे शमविती ५

समर्थातें नाना कथिति अनृतें स्वार्थपर ते,
न त्यांचें हीं कर्में हृदय करितांना कचरतें
पशूच्या कंठातें सतत चिरिती सैनिक, परी
दया त्यांच्या हाता क्षणहि न कधीं अस्थिर करी ६

समर्थाच्या कर्णीं प्रतिदिनिं चहाड्या भरविती
खऱ्याचा खोट्याचा लवहि न मनीं भेद गणिती
स्वकल्याणाचा हा पथ बगलबच्चे धरुनिया
अहो! नाना दुःखें भुवनिं विबुधां भोगविति या ७

———— विद्याधर वामन भीडे बी. ए.

## करडूं आणि लांडगा.

आर्या.

तान्हेलें करडूं जल प्याया गेलें सरित्प्रवाहाला
प्याया जल तान्हेला त्याच ठिकाणास लांडगा आला १
देखुनि करडाला तो वदला हें लांडगा वचन खोटा
" माझें प्यायाचें जल बिघडविसी, त्वदपराध हा मोठा " २
नम्रपणें करडूं तें वदलें " तुह्मि वर असून मी खालीं
तुमचें जल बिघडविलें ही तुमच्या गोष्ट मनिं कशी आली ३
करडास लांडगा हें मग वदला, " हें असो; तुवां गाली
मज दिधल्या गतवर्षीं ही मज आतांच आठवण झाली " ४
वदलें करडूं " दादा, मज जन्मुनि जाहले न सा मास
गतवर्षिं तुह्मां गाली म्या दिधल्या हें अशक्य वच खास " ५
पदरांत मूर्खपण हें येतां तो लांडगा चिडुनि वदला
त्वां नसल्या तरि तुझिया जनकें असतिल शिव्या दिल्या मजला ६
एकुन एकच दुष्टा, तूं कीं तव बाप, नीच दोघेही
सभ्याचार न तुजला वृत्ती दिसते सदोष तव रे! ही " ७
हें लांडगा वदुनि वच करडा फाडून भक्षिता झाला
तात्पर्य हें असें कीं ह्मणती बळवंत नीतिच बलाला ८

सौ. स. मि.

---

## धूमकेतु.

पद.

( चाल--निशिदिनीं सखीचा. )

हीं नक्षत्रें जीं अनंत गगनीं दिसती;--
तीं नियमित अपुल्या त्या त्या स्थानीं वसती.

ग्रह सारेही जे इकडुनि तिकडे फिरती;--
ते आपआपुल्या मर्यादेंत विहरती.
रविचंद्र तसे जे दिनरात्रीस उगवती;
ते निजगमनाच्या भ्रमती चक्राभंवतीं.
हा वायु निरंतर वाहे भूवर;
तच्छिरीं स्वकालीं राहे जलधर;
संचरे जलीं उत्साहें जलचर;
जीं स्थळें विधीनें नेमुनि दिधलीं असती,
तीं चराचरोचित; उल्लंघाया नसती. १

हा धूमकेतु जो प्रकटे क्षितिजावरती
तद्भव्यशिखेला व्यर्थ लोक घाबरती.
मर्यादित नाहीं नाहीं याची फिरती;--
हा अपार गगनोदरीं वाढवी स्वगती.
रविदर्शनार्थ या येतां जातां भीती;
कधिं होइल याची न कळे मज कुगती तीं.
याचिया शिरीं जी मोठी--साजिरी;
ती असे खरोखर खोटी मंजिरी;
धूम्रची तियेच्या पोटीं हा भरी;
अविचारी ऐसे मदें फुगुनि, जे चुकती;
ते भयदभवीं या खास अकालीं मुकती. २

मी उडून केव्हां नच जाइन आकाशीं;
या भूवरीच बहु धरीन लीनपणासी;
तो अविचाराचा नलगे स्पर्श मनासी;
वक्रताहि बरवी नाहीं विधिनियमाशीं.

तें मरण सुखाचें येवो मद्देहासी;--
हा आत्मा राहो प्रभुच्या दृढ सहवासीं,
होईल अशी मम हातें--कृति जरी,--
भय कवणाचेंही मातें--नच तरी;
सेवीन सदैव सुखातें--बहुपरी;
कर्पुरा नसे गति जळतां धूम्रापरती.
मुकतांहि सुपुष्पें, सुगंधांत तीं उरती. ३

' सुमंत '

---

## वियोगी.

( वियोगिनी वृत्त )

श्लोक.

रमणीय सुरेख बाग हा
वसती गे असते तुझी इथें;
ह्मणुनी तुज धुंडितों पहा
मग कां सांपडशी न तूं तिथें? १

कुसुमें फुललीं चहूंकडे
किति हीं रम्य अशा लतांवरी
मज दर्शन दे अतां गडे
अति उत्कण्ठित हाय! अन्तरीं २

तुज भूषविलें कितीकदा
कुसुमीं या मधुमासिं या जनें.
रमणीयपणा वसे सदा
तव अंगीं मधुर! शुभांगने! ३

मधुर स्वर काढुनी अहा !
विहगीं सेवियलें तुला सदा
खग भाट तुझे प्रिये ! पहा
मजहीं सेविति फार हे तदा. ४

मज दुःखचि देति हे खग
जधिं झाला तव अस्त सुन्दरी !
तुझियाविण हे नसे मग
मजला तोषद गे खरोखरी ! ५

रमतां वनिं निर्झरोदकीं
किति लीला करिशी मनोहरे !
गमशी कमलेपरीच कीं
हृदयीं मोद अहा ! तदा भरे. ६

कमलीं नव खेळशी लये !
कधिं सानन्द सरोवरांतिल
मज दर्शन द्यावयास ये
हरवीं खेद सखे ! मनांतिल ७

तव खेळ अपूर्व हे अहा !
कधिं केली करितेस अम्बरीं
उडु हींच फुलें तुझीं पहा
पसरीतेस नभांत सत्वरी ! ८

तव केळि मनोहरा सखे
विलसे हा तव इन्दु कन्दुक,
रमशी कधिं याशि तूं सुखें.
तव आहे कृति सर्व मोहक. ९

कविचें मन फार कोमल
झुरतो हाय ! कवी तुझ्याविण
मज दर्शन देईं उज्ज्वल
कविते ! हा करिं दास रक्षण ! १०

वामन जनार्दन कुंटे

## नीतिसार.

### गीति.

मिळतां--मूर्ख स्वामी, कर्कश भार्या, शरीरही रोगी,--
ऋणयातना, परगृहीं वास, मनुज तो विडंबना भोगी. १
शुद्धपणें वर्तावें; सत्य वदावें; नयेंचि अर्जावें
दीना दान करावें; धर्मरतें परकलत्र वर्जावें. २
दान समर्पा दीना; जैसें जल शुष्क पादपाला तें.
व्यर्थ जलार्पण अब्जा, तैसें धनदान वित्तपालातें. ३
जेंवि असंचय होतो आपन्मूलक जगीं गृहस्थाला,--
तैसा धनादिकांचा संचय बहु दुःख दे विरक्ताला. ४
पूर्ण विचारें लोकीं कर्तव्या जो स्वकीय आदरितो,--
त्या आपदा कदापि न येती, परि सर्व संपदा वरि तो. ५
अर्थे नर सुकुलीनचि होतो; अर्थेंचि धैर्यनययुक्त;
अर्थे सकलहि मानव वश होती; भूतलीं असे व्यक्त ६
या लोकीं अर्थी जन अर्थविहीनास कासया भजती ?
मीन जसे निर्मल सर, फलहीनहि पादप द्विज त्यजिती ! ७
दीनांचें दैन्य हरी धन देउनि; तोचि धन्य जनिं जाणा.
विषतरुला जलसिंचन योग्य न; सोडून शुष्क विटपांना. ८

चिंतामण माधव पिंपळसकर.

SP 90